hananjayarao Gadgil Library
GIPE-PUNE-009789

# कार्ल मार्क्स

## चरित्र व शिकवण

"आमचे सिद्धांत म्हणजे केवळ जड व निष्क्रिय विचार नसून प्रत्यक्ष कृतीचा मार्ग दाखविणारी ती सूत्रें आहेत, असें कार्ल मार्क्स व एंजल्स यांनी म्हटलें आहे."

—लेनिन

लेखक—विनायक महादेव भुस्कुटे

किंमत दीड रुपया

in marathi 2110211

प्रकाशक—
विनायक महादेव भुस्कुटे
१९६ (५०) सदाशिव पेठ,
पुणें नं २.

X10M18
G4

[ सर्व हक्क प्रकाशकानें राखून ठेवले आहेत. ]

९७८९

मुद्रक—
लक्ष्मण नारायण चापेकर
आर्यसंस्कृति मुद्रणालय,
१९८(१७) सदाशिव पेठ, टिळकरस्ता पुणें २.

3789

9759

आजच्या समाजरचनेमुळें नागवल्या जाणाऱ्या

व

गुलामगिरीच्या बेड्यांची जाणीव होत चाललेल्या

कामकऱ्यांना व शेतकऱ्यांना

# प्रस्तावना

कितीतरी दिवसाचा माझा संकल्प आज सिद्धीस जात आहे. कम्युनिझमवरील पुस्तकें मी वाचूं लागलों तेव्हा सहजच मार्क्सचें चरित्रही मी वाचलें आणि 'कम्युनिझम्' म्हणजे काय याची कल्पना लोकांना द्यावयाची असल्यास मार्क्सचें चरित्र प्रकाशित केलें पाहिजे, असें मला वाटू लागलें. तसें पाहिलें तर मार्क्सच्या चरित्रात अद्भुत व काव्यमय असें काहीं नाहीं. नेपोलियन, शिवाजी, मॅझिनी या क्रांतिकारकांचीं चरित्रें अनेक रसांनीं भरलेलीं आहेत. मार्क्सचें चरित्र तसें नाहीं. मार्क्स हा क्रांतिवादी असला तरी त्याचें चरित्र ज्ञानमय आहे.

कार्ल मार्क्स हा जसा तत्त्वज्ञानी, समाजशास्त्रज्ञ व अर्थशास्त्रज्ञ होता तसाच तो क्रांतिवादीही होता. केवळ लेख लिहिणारा व भाषणें करणारा असा तो क्रांतिवादी नव्हता. क्रांतीच्या चळवळींत त्यानें प्रत्यक्ष भागही घेतला होता. आपल्या लेखांनीं व भाषणांनीं मार्क्सनें कामगारांना जागें केलें एवढेंच नव्हे तर प्रत्यक्ष संघटना करण्याचे व आपलें संघसामर्थ्य वाढविण्याचे मार्गही त्यानें कामगार जनतेला दाखवून दिले होते. परंतु मार्क्स ज्या काळात निर्माण झाला होता त्या काळांत त्याला हवी तशी क्रांति घडवून आणतां आली नाहीं आणि आपल्या आयुष्याचा बराच मोठा हिस्सा त्याला लेखनव्यवसायांतच घालवावा लागला. राजकारणाच्या क्षेत्रांत मार्क्सला क्रांति घडवून आणता आली नाहीं. तथापि समाजाच्या विचारक्षेत्रांत त्यानें प्रचंड क्रांति घडवून आणली, इतकेंच नव्हे तर विचार करण्याच्या पद्धतींतच त्यानें क्रांति घडवून आणली. कार्ल मार्क्सच्या चरित्रांतील विशेष यांतच आहे.

मार्क्स ज्या ज्या विचारक्षेत्रांत शिरला त्या त्या सर्व क्षेत्रांत त्यानें क्रांति घडवून आणली. कोणी कोणाशी भांडूं नये, सर्वांनीं सर्वांवर प्रेम करावें, कोणी कोणाला लुबाडूं नये, सर्वांनीं सर्वांच्या उपयोगी पडावें इ. नीति-

तत्त्वांवर समाजाची रचना करावी आणि पृथ्वीला स्वर्ग बनवून सोडावें, या विश्वकुटुंबवादाच्या कल्पना प्राचीन कालापासून प्रचलित आहेत. प्लेटोपासून टॉलस्टॉयपर्यंत सर्व आत्मवादी तत्त्ववेत्त्यांचें तत्त्वज्ञान याच विचारसरणीवर उभारलेलें आहे. 'वसुधैव कुटुंबकम्' या कल्पनेची महति आर्य तत्त्वज्ञान्यांनींही गायिली आहे. केवळ मानवी अंतःकरणांतील भावनांवर व संकल्पांवर विश्वास ठेवूनच भावी विश्वकुटुंबाची (कम्युनिझमची) कल्पना या तत्त्ववेत्त्यांनीं मांडलेली आहे. पण या विश्वासाला कार्ल मार्क्सनें जोराचा धक्का दिला व कम्युनिझमला आत्मसंकल्पाच्या तडाक्यांतून सोडवून त्याला शुद्ध शास्त्रीय स्वरूप प्राप्त करून दिलें. केवळ आत्मसंकल्प किंवा मनुष्याच्या अंतःकरणांतील प्रेमाच्या व दयेच्या भावना कम्युनिझमची प्रस्थापना करण्यास समर्थ होणार नाहींत तर कम्युनिझमची प्रस्थापना होण्यास मनुष्यसमाजाच्या प्रत्यक्ष भौतिक परिस्थितीमध्यें व विचारांमध्यें विशिष्ट प्रकारची क्रांति घडून आली पाहिजे व प्रसंगीं ती घडवूनही आणली पाहिजे, असें कार्ल मार्क्सचें मत आहे.

अदृश्य व अव्यक्त आत्मतत्त्वापासून विश्वाची उत्पत्ति झाली व त्याचीच सत्ता सृष्टीच्या सर्व व्यवहारांवर चालू आहे, ही आत्मवादी कल्पना मार्क्सला मुळींच मान्य नाहीं; तसेंच सर्व कांहीं केवळ मृत व जड यातूनच निर्माण झालें आहे अशी कट्टर जडवाद्यांची कल्पनाही त्याला मान्य नाहीं. अखिल विश्व हा विरोधविकासन्यायानें झालेला "विश्ववस्तूचा" विकास आहे. जड व चैतन्य हीं या विश्ववस्तूचीं दोन अंगें आहेत. आत्म्याची निर्मितीही विरोधविकासन्यायानेंच झाली असून विश्वांतील असंख्य प्राणियोनींची निर्मिती हा विरोधविकासाचाच परिणाम आहे. मनुष्ययोनि हीसुद्धां इतर प्राणियोनींपैकींच एक आहे. इतर सर्व योनींप्रमाणें उदरनिर्वाहाला लागणाऱ्या साधनांच्याच अनुरोधानें मनुष्यसमाजाचा विकास झाला आहे. मनुष्यसमाजांतील सर्व ऐतिहासिक घटनांच्या मुळाशीं देखील उत्पादनसाधनेंच आहेत. ज्याच्या हातांत उत्पादनसाधनें तोच समाजांतील सत्ताधारी वर्ग बनत असतो. वर्गकलहाला येथूनच सुरुवात होते आणि हा कलहच मानवी समाजाच्या प्रगतीला कारणीभूत होतो, असें ऐतिहासिक प्रकृतिवादाची मांडणी करून मार्क्सनें दाखवून दिलें आहे.

अर्थशास्त्राच्या क्षेत्रांतही 'अतिरिक्त मूल्य' सिद्धांताचा शोध लावून मार्क्सनें क्रांति घडवून आणली आहे. कामकऱ्यांच्या, व शेतकऱ्यांच्या श्रमफलाचा अपहार हाच जगांतील सर्व भांडवलाचा मूळ झरा आहे. भांडवलदाराचें भांडवल व श्रीमंताची श्रीमंती या अपहारावरच उभारलेली आहे. औद्योगिक क्रांतीनंतरच्या यंत्रयुगांत भांडवलशाहीची वाढ होऊन एका बाजूला मूठभर श्रीमंतांचा वर्ग व दुसऱ्या बाजूला उपासमारीनें गांजलेला प्रचंड रोजंदार व बेकारवर्ग निर्माण झाला आहे. विषमतेनें प्रस्थापित झालेल्या भांडवलशाही समाजरचनेंतच तिच्या नाशाचीं बीजें सांठविलेलीं असून विरोधविकासन्यायानें भांडवलप्रधान समाजरचनेचा नाश होऊन त्या ठिकाणीं श्रमशक्तिप्रधान समाजसत्तेचा उदय होणार आहे, या सिद्धांताची मांडणीही कार्ल मार्क्सनें अत्यंत तर्कशुद्ध रीतीनें केली आहे. सारांश 'विश्ववस्तूंच्या' विरोधविकासाचा सिद्धांत प्रस्थापित करून त्यानें तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रांत क्रांति घडवून आणली, ऐतिहासिक प्रकृतिवादाच्या सिद्धांताची मांडणी करून त्यानें समाजशास्त्रांत व इतिहासशास्त्रांत क्रांति घडवून आणली व 'अतिरिक्त मूल्य' सिद्धांताचें संशोधन करून त्यानें अर्थशास्त्रांत क्रांति घडवून आणली.

मार्क्सच्या क्रांतिकारक विचारसरणीचें रहस्य वरील प्रकारचें आहे. आपल्या अनेक लेखांतून व ग्रंथांतून या विचारांची सप्रमाण व सुबोध रीतीनें मांडणी करून आधुनिक सामाजिक, राजकीय व आर्थिक व्यवहाराकडे पाहण्याची एक नवीनच दृष्टि मनुष्यसमाजाला मार्क्सनें प्राप्त करून दिली असून आजवर न उकललेलीं समाजशास्त्रांतील व अर्थशास्त्रांतील अनेक गूढें उकलण्यास मार्क्सनें दिलेल्या या ज्ञानदृष्टीचा अत्यंत उपयोग झाला आहे, यांत शंका नाहीं.

मराठी वाचकांना आज जें पुस्तक मी सादर करीत आहें त्यांत कार्ल मार्क्सचें चरित्र तर दिलेंच आहे. त्यावरून मार्क्सचें शिक्षण, मार्क्सचा स्वभाव, त्याची बुद्धिमत्ता, त्याचें कर्तृत्व, त्याच्यावर आलेले अनेक प्रसंग, स्वयाजित कार्याच्या सिद्धीकरितां त्यानें सोसलेले हाल, त्याचें दारिद्र्य, त्याची कौटुंबिक परिस्थिति वगैरेंची कल्पना येईल. पण पुस्तकांतील मुख्य भाग हा नव्हे. मार्क्सची शिकवण हा या पुस्तकांतील महत्त्वाचा

भाग आहे. मार्क्सची विचारसरणी नवीन आहे. मराठी वाचकांना तर ती अगदींच नवीन आहे. ही विचारसरणी नवीन असली तरी तींत गूढ असें कांहीं नाहीं. रोजच्या जीवनकलहाचें म्हणजे वर्गकलहाचें स्वरूपच मार्क्सनें आपल्या क्रांतिकारक विचारपद्धतीनें लोकांच्या मनावर बिंबविण्याचा प्रयत्न केला आहे. एंजल्सनें म्हटल्याप्रमाणें खरोखरीच आज "पृथ्वीच्या अगदीं पूर्वेकडील सैबेरियाच्या टोंकापासून ते अगदीं पश्चिमेकडील कॅलिफोर्नियाच्या टोंकापर्यंत मार्क्सच्या विचारांनीं प्रवेश केला असून करोडोंनीं मोजतां येतील इतके समाजसत्तावादाचे अनुयायी या विचारांनीं निर्माण केले आहेत."

एकाद्या थोर पुरुषाचें चरित्र अनेक बाजूंनीं सजवून दाखवितां येईल, पण त्याचे विचार लोकांना समजतील अशा रीतीनें मांडणें हें अत्यंत कठीण काम आहे. तथापि मार्क्सचें म्हणणें शक्य तितक्या सुबोध रीतीनें मांडण्याचा मी प्रयत्न केला आहे. या बाबतींत श्री. पां. वा. गाडगीळ, उपसंपादक, मराठा व माझे नवीन दोस्त श्री. दिनकर केशव बेडेकर यांनीं मला जें साहाय्य केलें व माझें पक्कें हस्तलिखित लक्षपूर्वक वाचून ठिकठिकाणीं मला ज्या महत्त्वाच्या दुरुस्त्या त्यांनीं सुचविल्या त्यांबद्दल मी त्यांचा फार आभारी आहें. याशिवाय माझे दुसरे स्नेही श्री. यशवंत कृष्ण सोवनी यांनीं पुस्तकप्रकाशनाच्या कामीं मला फारच मदत केली आहे. त्यांच्या मदतीच्या अभावीं हें पुस्तक इतकें लवकर मला प्रकाशित करतां आलें नसतें. पक्की प्रत तयार करणें, प्रुफें तपासणें व प्रकाशनाच्या कामीं येणाऱ्या दुसऱ्या अनेक अडचणी दूर करणें हीं सर्व कामें त्यांनीं अत्यंत उत्साहानें शेवटपर्यंत केलीं आहेत. त्यांचे जितके आभार मानावे तितके थोडे आहेत. तसेंच आर्यसंस्कृति-मुद्रणालयाचे व्यवस्थापक श्री. लक्ष्मण नारायण चापेकर यांनीं हें पुस्तक इतक्या थोड्या दिवसांत व सुबक रीतीनें छापून दिलें याबद्दल त्यांचे आभार मानणें भागच आहे. शिवाय प्रुफांत अगदीं शेवटपर्यंत मजकुराचा व शब्दांचा फेरफार करून आर्यसंस्कृति-मुद्रणालयांतील कंपॉझिटर मंडळींना मी फारच त्रास दिला, पण तो त्यांनीं आनंदानें सोसला याबद्दल त्यांचे आभार मानले पाहिजेत.

इतक्या सगळ्यांचे आभार मी कसें तरी मानूं शकलों, पण ज्या पुस्तकांच्या आधारानें हें चरित्र मी लिहूं शकलों त्या पुस्तककर्त्यांचे आभार

शब्दांनीं व्यक्त करणें शक्य नाहीं. The Life and Teaching of Karl Marx by M. Beer; Basic principles of Scientific Socialism by A. S. Sachs; Karl Marx, Man, Thinker and Revolutionist, A Symposium Edited by D. Riazanov; The Essentials of Marx by Algernon Lee; या चार पुस्तकाच्याच आधारानें मुख्यतः हें चरित्र मी लिहिलें आहे. चरित्र व शिकवण या दोन्ही भागांत या पुस्तकांतील कांहीं कांहीं भागांचे अनुवादही मी दिले आहेत. मार्क्सच्या चरित्रात व शिकवणींत माझें असें कांहींच नाहीं. या ग्रंथकारांनीं मला जें सांगितलें तेंच मराठींत उतरून दाखविण्याचा प्रयत्न मी केला आहे. याशिवाय Social struggles and Modern Socialism by M. Beer; Karl Marx's Capital by Lindsay; The Story of Philosophy by Will Durand PH.D.; History of Philosophy by Frank Thilly; History of Socialist Thought, by Harry W. Laidler; Historical Materialism by Bukharin; Karl Marx by Achille Loria; Karl Marx by R. W. Postgate, Karl Marx and Friedrich Engels by Riazanov; कार्ल मार्क्स ( हिंदी ) ले. सत्यभक्त; या पुस्तकाचाही मी ठिकठिकाणीं उपयोग केला आहे.

मार्क्सचें चरित्र व विशेषतः शिकवणीचा भाग लिहितांना मला आणखी कांहीं पुस्तकांची जरूरी होती, पण तीं अनेक कारणामुळें मिळूं शकलीं नाहींत. मार्क्सच्या चरित्रावर व शिकवणीवर जितकें लिहावें तितकें थोडेंच आहे. मार्क्स व त्याचें तत्त्वज्ञान यांवर जगांतील अनेक भाषामधून शेकडों पुस्तकें प्रसिद्ध झालीं आहेत. मार्क्सनें लिहिलेल्या पुस्तकांचीं भाषांतरेंही अनेक भाषांमधून प्रसिद्ध झालीं आहेत आणि कार्ल मार्क्सनें जे जें कांहीं लिहून ठेवलें आहे तें तें सर्व एकंदर ३६ ग्रंथात प्रसिद्ध करण्याची योजना मास्को येथील मार्क्स-एंजल्स इन्स्टिटयूटतर्फे तयार करण्यात आली असून या योजनेप्रमाणें ग्रंथप्रकाशनाचें कामही सुरू झालें आहे. इतर अनेक बाबतींत आपण ज्याप्रमाणें मागासलेले आहों त्याचप्रमाणें समाजशास्त्रविषयक व अर्थशास्त्रविषयक वाङ्मयप्रकाशनाच्या बाबतींतही आपण मागासलेले आहोंत. पण प्राचीनकालाप्रमाणें हिंदुस्थान आतां एकाकी व स्वतंत्र देश राहिलेला नाही. जगातील विचारमय वातावरणाचा हिंदुस्थानावरही

झपाट्यानें परिणाम होत आहे. समाजसत्तात्मक वाङ्मय वाचण्यासंबंधानें व समाजसत्तात्मक विचार समजून घेण्यासंबंधानें तरुण मंडळींत आजकाल जी तीव्र इच्छा दिसून येत आहे त्याचें कारणही हेंच आहे. पश्चिमेकडून येणारा माल व तिकडून येणारीं यंत्रें आपण ज्याप्रमाणें थोपवून धरूं शकत नाहीं त्याचप्रमाणें पश्चिमेकडून येणारा समाजसत्तात्मक विचारांचा वाराही कोणी थोपवून धरूं शकणार नाहीं. मार्क्सचें हें चरित्र वाचल्यानें वरील विचारांचा परिचय होईल इतकेंच नव्हे तर कम्युनिस्ट व कम्युनिझम् यां-संबंधानें जे अनेक प्रकारचे गैरसमज पसरलेले आहेत ते दूर होण्याच्या बाबतींतही या पुस्तकाची मदत होईल. कम्युनिस्ट जाहीरनाम्याची पहिली दोन प्रकरणें याच उद्देशानें या पुस्तकांत दिलीं आहेत. जगांतील सर्व भांडवलशाही राष्ट्रांतून ज्या विचारांचा आज जोरानें फैलाव होत आहे आणि ज्या विचारांच्या अनुरोधानें युरोपांतील रशियासारख्या एका प्रचंड राष्ट्रांत क्रांतीही घडून आली आहे, त्या शास्त्रीय समाजसत्तावादाचा आद्य पुरस्कर्ता कार्ल मार्क्स प्रत्यक्ष कसा होता व त्यानें जनतेला काय शिकविलें, हें समजून घेणें प्रत्येक तत्त्वजिज्ञासूचें काम आहे. हे विचार समजून घेतल्याशिवाय भागावयाचें नाहीं, अशी परिस्थितीही हिंदुस्थानात आज निर्माण झाली आहे. तेव्हां देशांत निर्माण झालेली ही आवश्यकता पूर्ण करण्याचे कामींही या पुस्तकाचा उपयोग होईल. वरील हेतु साध्य होण्याकरितां मार्क्सनें चालविलेल्या चळवळींची आणखी पुष्कळच माहिती जनतेपुढें यावयास पाहिजे. त्याच्या शिकवणीसंबंधाचें तात्त्विक विवेचन यापेक्षा अधिक विस्तृत रीतीनें व्हावयास पाहिजे, त्याचप्रमाणें खुद्द मार्क्सनें लिहिलेल्या ग्रंथांच्या आधारानेंच त्याच्या विचारांचा आणखी जास्त परिचय वाचकांना करून द्यावयास पाहिजे, हें खरें आहे पण अनुकूल परिस्थितीच्या अभावीं मला तसें करतां आलेलें नाहीं. मला जी सामुग्री मिळाली तिच्या आधारावर मार्क्सचें चित्र सर्व बाजूंनीं वाचकांपुढें उभें करण्याचा मी कसो-शीनें प्रयत्न केला आहे. पुस्तकाच्या दुसऱ्या आवृत्तीच्या वेळीं यांत ज्या कांहीं वरील प्रकारच्या उणीवा राहिल्या आहेत त्या भरून काढतां येतील, अशी मला उमेद आहे.

पुणें,
१ जानेवारी १९३४

विनायक महादेव भुस्कुटे.

# अनुक्रमणिका

## भाग पहिला – चरित्र



| | | |
|---|---|---|
| १ | बालपण | १ |
| २ | विद्यार्थी-जीवन | ५ |
| ३ | सार्वजनिक जीवनाचा प्रारंभ | १४ |
| ४ | विचारक्रांति | १९ |
| ५ | मतप्रस्थापन | २६ |
| ६ | कम्युनिस्ट जाहीरनामा | ३८ |
| ७ | १८४८ ची क्रांति | ७४ |
| ८ | अंतर्राष्ट्रीय चळवळ | ८७ |
| ९ | अखेरचे दिवस | १०४ |
| १० | काही आठवणी | ११६ |


## भाग दुसरा – शिकवण


| | | |
|---|---|---|
| ११ | विरोधविकासवाद | १३५ |
| १२ | ऐतिहासिक प्रकृतिवाद | १५१ |
| १३ | मूल्याचा श्रमसिद्धांत | १७४ |
| १४ | अतिरिक्त मूल्य | १८९ |
| १५ | वर्गकलह | २०० |
| | परिशिष्ट– थोर पुरुषांचा परिचय | २०९ |

# भाग पहिला

# कार्ल मार्क्स



जन्म :
ता. ८ मे सन १८१८]

मृत्यु :
[ता. १४ मार्च १८८३

# कार्ल मार्क्स

## चरित्र

### बालपण

कार्ल मार्क्स याचा जन्म ट्रीव्हज् येथें ता. ५ मे १८१८ रोजीं झाला. त्याचा बाप ज्यू होता. तो वकिलीचा धंदा करीत असे. कित्येक पिढ्या त्याच्या घराण्यांत हाच धंदा चालू होता. त्याचें घराणें जर्मनींतील एक कुलीन व अब्रूदार घराणें म्हणून प्रसिद्ध होतें. त्याचा धंदा चांगला चालत असे व समाजांतील एक इभ्रतदार व वजनदार गृहस्थ म्हणून त्याला चांगला मान मिळे. तो स्वभावतः परोपकारशील होता. त्याचें मन सुसंस्कृत होतें. अंतःकरणाचा तो कोमल होता. धंदा बरा चालत असे तरी त्याची सांपत्तिक स्थिति फारशी समाधानकारक नव्हती. कार्ल मार्क्सची आई डच होती. तीही वकील–घराण्यांतील होती. त्याच्या आईचें घराणें प्रेसबर्गहून हंगेरींत गेलें व तेथून तें हॉलंडमध्यें येऊन वसाहत करून राहिलें. यामुळें हॉलंडमध्यें नवीन वसाहत करून राहिलेल्या ज्यू समाजांत त्याच्या आईचें घराणें, प्रेसबर्ग घराणें या नांवानें प्रसिद्ध होतें. जर्मन भाषा तिला चांगलीशी अवगत नव्हती. अगदीं मोडक्या तोडक्या तुटपुंज्या शब्दांत तिला आपले मनांतले भाव व्यक्त करावे लागत. या प्रेमी जोडप्याला पुष्कळ मुलें झालीं पण त्यांपैकीं कार्लवर त्यांचें फार प्रेम होतें. सर्व मुलांत अत्यंत हुशार व बुद्धीनें चलाख अशा कार्लनें शेजाऱ्या पाजाऱ्यांचें मन आपणाकडे ओढून घेतलें होतें. कार्ल आपल्या घराण्याचें नांव काढील अशी त्याच्या आईबापांना मोठी आशा होती व ती त्यानें सफलही करून दाखविली. पण कार्लला आईची एक मोठी इच्छा मात्र पूर्ण करतां आली नाहीं. आपल्या बुद्धिवान् व हुशार मुलानें खूप पैसा मिळवावा असें

कोणत्या आईला वाटत नाहीं ! कार्लनें पुष्कळ वर्तमानपत्रें चालविलीं. पुष्कळ पुस्तकें लिहिलीं पण त्याचें दारिद्य मात्र कमी झालें नाहीं हें पाहून तिला फार वाईट वाटे. कार्ल मार्क्सनें अत्यंत परिश्रमपूर्वक 'भांडवल' नांवाचा जगप्रसिद्ध ग्रंथ लिहिला त्यावेळीं "भांडवलासंबंधानें शेंकडों पानें खरडण्याऐवजीं कार्लनें खूप भांडवल जमा केलें असतें तर फार बरें झालें असतें!" असे त्या माउलीनें एकदां उद्गार काढले असें म्हणतात.

१८२४ सालीं या घराण्यानें खिस्ती धर्म स्वीकारला. ज्यू लोकांची धर्माभिमानाची वृत्ति लक्षांत घेतली असतां या घराण्याचें हें कृत्य अत्यंत साहसाचें होतें यांत शंका नाहीं. येशूला क्रूसवर चढविण्यास ज्यू पाद्रीच कारणीभूत झाले. ज्यू लोकांची ही कट्टर धर्मवेडेपणाची वृत्ति सतराव्या शतकाच्या अखेर अखेरसुद्धां कमी झालेली नव्हती. या समाजाचे निरनिराळे गट युरोपांत सर्वत्र पसरले होते. इ. स. १८७० सालीं जेरुस्लेम रोमन साम्राज्यांत सामील झालें. जेरुस्लेम व त्याच्या भोंवतालच्या प्रांतांतील ज्यू लोक तेथून हद्दपार केले गेले. मायदेशांतून हद्दपार होऊन देशोधडीला लागलेल्या या लोकांचा युरोपांत व आशियांत ते जिकडे जाऊन राहतील त्या त्या ठिकाणीं अतोनात छळ होऊं लागला. या लोकांना कोठेंही स्वतःच्या मालकीची जमीन विकत घेऊन किंवा एखादा स्वतंत्र धंदा काढून त्यावर उपजीविका करून राहतां येत नसे. या हद्दपारीनंतर या लोकांचें व्यापार हेंच एक उपजीविकेचें साधन बनलें. व्यापार करून राहतां राहतां पुढें हे लोक व्याजबट्ट्याचा धंदाही करूं लागले. युरोपांतील इतर सर्व देशांपेक्षां हॉलंड देशानें त्या लोकांना अत्यंत उदारतेनें आश्रय दिला. हॉलंडमध्यें या लोकांची संख्या साहजिकच जास्त होती. सर्व सामान्य लोकांनीं यांच्यावर हल्ले करावे व त्यांना सुखानें राहूं देऊं नये. राजे लोकांनीं व त्यांच्या सरदारांनीं त्यांची मालमत्ता बेदरकारपणें लुटून न्यावी असा प्रकार इतर ठिकाणीं सर्रास चालू होता. परंतु हॉलंडमध्यें आलेले ज्यू कांहींसे सुस्थितींत होते व त्यांचा धर्माभिमानही अधिक जाज्वल्य राहिला होता. युरील कॉस्टा नावाच्या एका तरुणानें प्रचलित धर्मकल्पनांविरुद्ध एक लेख प्रसिद्ध केला त्याबरोबर हॉलंडमधील सर्व ज्यू समाजांत भयंकर खळबळ उडाली व हीं विधानें प्रायश्चित्तपूर्वक सार्वजनिक रीत्या

परत घेण्यास त्यास भाग पाडण्यात आलें. प्रार्थनामंदिराच्या दरवाजात या तरुणास पालथें निजविण्यांत आलें व प्रार्थनेनंतर मंदिरांत जमलेले लोक त्याच्या अंगावर पाय देऊन चालून गेले. प्रायश्चित्ताचा हा प्रकार त्या तरुणास सहन झाला नाहीं. त्यानें एक लेख लिहून या अत्याचाराचा तीव्र निषेध केला व स्वतःवर गोळी झाडून त्यानें आत्महत्त्या केली. "व्यक्त जगत् हेंच ईश्वराचें शरीर आहे. देवदूत वगैरे कल्पना खुळचटपणाच्या आहेत. जीव हाच आत्मा होय. जुन्या करारात अमरत्वासंबंधानें कांहीं एक सांगण्यात आलेलें नाहीं," वगैरे मतें एका मित्राजवळ प्रगट केल्याबद्दल प्रख्यात तत्त्ववेत्ता स्पिनोझा[1] यालाही ज्यू समाजानें बहिष्कृत केलें होतें. पिढ्यानपिढ्या हाडींमासीं खिळलेल्या या धर्मवेडेपणामुळें हे ज्यू लोक सर्वत्र अप्रिय झाले होते. अंधश्रद्धेवर प्रस्थापित झालेल्या व बुद्धीला मारण्यास सांगणाऱ्या या धर्माला ज्यू समाजांतील विद्वान् व सुसंस्कृत मनाचे लोक कंटाळून गेले होते. विशेषतः जर्मनीमध्यें ख्रिस्ती धर्माला जें रमणीय व राष्ट्रीय स्वरूप प्राप्त झालें होतें तें पाहून कार्ल मार्क्सच्या बापासारख्या सुशिक्षित व प्रगतिपर विचाराच्या वकीलानें ख्रिस्ती धर्म स्वीकारला यांत आश्चर्य मानण्यासारखें कांहीं नाहीं. ही गोष्ट त्या कालातील परिस्थितीला अनुरूप अशीच झाली. बाल्यदशेंतून नुकतेच डोकें वर काढीत असलेल्या कार्लवर बापाच्या या धाडसी चरित्राचा चांगलाच परिणाम झाला. कार्लचा बाप ख्रिस्ती झाला त्याप्रमाणें तो पक्का प्रशियन राष्ट्राभिमानीही झाला. मार्क्सचें हें कुटुंब ख्रिस्ती झाल्यावरोबर त्या धर्मीयांशीं लवकरच तें समरस झालें. जर्मनीतील अनेक राजकीय, सामाजिक, धार्मिक प्रश्नांवर या कुटुंबांत बरीच जोराची चर्चा चाले. आणि या बाबतींत विचारसाम्य होऊन हें कुटुंब आपल्या जर्मन देशबंधूंशीं राष्ट्रप्रेमानें निगडित झालें. कार्ल मार्क्सला ल्हानपणापासूनच कविता करण्याचा नाद होता. प्रशियाचा विजय व नेपोलियनचा अधःपात या विषयावर एक कविता करण्याबद्दल मार्क्सच्या बापानें त्याला एकदां सांगितलें. बापाची ही इच्छा मार्क्सला पुरी करता आली नाहीं. घरांतील वरील वातावरणामुळें ख्रिस्ती धर्माभिमानाचा किंवा

१ पुस्तकांत ज्या ज्या थोर पुरुषांचा उल्लेख केला आहे त्यांचीं अल्प चरित्रें किंवा त्यांच्यासंबंधाची थोडक्यांत माहिती परिशिष्टांत दिली आहे.

प्रशियन राष्ट्राभिमानाचा मार्क्सवर कांहीं एक परिणाम झालेला दिसत नाहीं. ज्यू लोकांवर होत असलेले अन्याय पाहून त्याला वाईट वाटे तरी पण ज्यू लोक कवडीचुंबक असतात, व्याजबट्ट्यावर ते उदरनिर्वाह चालवितात, सत्यासत्याची त्यांना चाड नसते, फेरीवाल्यांपेक्षां या लोकांना जास्त महत्त्व नाहीं, असें त्याचें मत झालें व तें अखेरपर्यंत कायम राहिलें.

ट्रीव्हज् येथें असतांना कार्ल यास तेथील एका व्याकरण शाळेंत पाठविण्यांत आलें. शाळेंतील एक अत्यंत हुशार मुलगा म्हणून त्याची त्यावेळेस प्रसिद्धि होती. त्याचे सहाध्यायी त्याच्यावर प्रेम करीत होते व त्याला भीतही होते. शाळेच्या क्रीडांगणावर चालू असलेल्या खेळांत उत्साहानें भाग घेत असल्यामुळें तो विद्यार्थ्यांचा आवडता झाला होता. ज्या विद्यार्थ्यांबरोबर त्याचें पटत नसे त्यांच्यावर तो व्याजोक्तिपूर्ण कविता रचीत असे, व त्यांना खूप चिडवीत असे. यामुळें त्याचे सहाध्यायी त्याच्याशीं भिऊन वागत. वर्गांतील अभ्यासाच्या बाबतींत तो कधींच मागे नसे. अभ्यासाशिवाय इतर पुष्कळ पुस्तकें त्यानें वाचून काढलीं. काव्य व नाटकें वाचण्याचा त्याला फार नाद होता. या विषयांवर शाळेंतील वरच्या वर्गांतील मुलांशीं व शेजारी पाजारी असलेल्या मोठ्या मंडळींशींही तो चर्चा करीत असे. व्हॉन वेस्ट फॉलन हे या मंडळीपैकींच एक गृहस्थ होते. ते चांगले सुशिक्षित सरकारी कामगार होते. प्रीव्ही कौंसिलमधील ते एक सभासद होते. वयानेंही ते बरेच प्रौढ होते. तथापि छोट्या मार्क्सशीं त्यांचा निकट स्नेह जमला होता. फुरसत सांपडली कीं, वेस्ट फॉलनच्या घरीं जावें व त्यांच्याशीं अनेक विषयांवर गप्पा माराव्या हा मार्क्सचा बाळपणांतील एक आवडता व्यवसायच बनला होता. आपल्या या छोट्या मित्राबरोबर गप्पा मारण्यांत वेस्ट फॉलन यांनाही आनंद वाटे. मार्क्सच्या अंतःकरणांत वेस्ट फॉलन यांच्याबद्दल सादर प्रेम व पूज्यबुद्धि वसत असे. वेस्ट फॉलन हे प्रगतिपर विचाराचे होते. सत्याचे ते कट्टे पुरस्कर्ते होते व अत्यंत उत्साहीही होते. जी गोष्ट आपल्याला पटली ती प्रत्यक्ष आचरणांत आणून दाखविली पाहिजे असा त्यांचा दंडक होता. " ध्येयवाद म्हणजे केवळ कल्पना नसून तो सत्यस्वरूपानें प्रत्यक्ष आचरणांत आला पाहिजे." या सिद्धांताचें ते चालतें बोलतें उदाहरण होतें.

# विद्यार्थी–जीवन

पब्लिक स्कूलमधील शिक्षण संपल्यानंतर मार्क्स बॉन येथील विश्वविद्यालयात दाखल झाला. आपल्या मुलानें कायद्याचा अभ्यास करावा व आपल्याप्रमाणेंच वकील व्हावें अशी मार्क्सच्या बापाची फार इच्छा होती. बापाच्या या इच्छेनुसार बॉन येथील कॉलेजांत असताना मार्क्सनें मोठ्या उत्साहानें कायद्याच्या अभ्यासास सुरवात केली. बॉन येथें तो एक वर्षभरच राहिला. पण तेवढ्या दिवसांत कॉलेजच्या जीवनातील सर्व ऐषआरामांचा त्यानें आस्वाद घेतला. पुढें बॉन युनिव्हर्सिटीपेक्षां बर्लिन युनिव्हर्सिटीच त्यानें अधिक पसत केली, व १८३६ साली तो बॉन सोडून बर्लिन येथें आला. "बर्लिन हें विद्येचें माहेरघर आहे. संस्कृतीचें तें आगर आहे. सत्याचे कट्टे पुरस्कर्ते बर्लिन येथें आहेत. सत्याला बर्लिनमध्यें मान मिळतो," अशी बर्लिनची त्यावेळीं ख्याति होती. प्रसिद्ध तत्त्ववेत्ता हेगेल यानें आपलें हे मत एका भाषणात बोलून दाखविलें होतें. याच ठिकाणी मार्क्सच्या आयुष्यातील एका महत्त्वाच्या गोष्टीचा उल्लेख करावयास हरकत नाहीं. वेस्ट फॉलनच्या घरीं जाऊन मार्क्स त्याच्याबरोबर अनेक विषयांवर मोठ्या प्रेमाने चर्चा करी. या चर्चेमुळें व सान्निध्यामुळें मार्क्सनें शुद्ध चारित्र्याची जोड करून घेतली. त्याचप्रमाणें त्याच्या घरीं त्याने आपल्या आयुष्यातील प्रेमाचा जोडीदारही मिळविला. वेस्ट फॉलन व मार्क्स यांच्यांत कविता, गायन व नाट्य या विषयावर चर्चा सुरू झाली म्हणजे वेस्ट फॉलनची मुलगी जेनी साहजिकच त्या ठिकाणीं येऊन बसत असे व तीही त्यांत मोठ्या हौसेनें भाग घेत असे. कार्ल मार्क्स हा काव्यगायनाचा चांगला भोक्ता आहे, तो स्वतंत्रपणें अनेक विषयावर कविता रचतो हें पाहून जेनीच्या अंतःकरणांत त्याच्याबद्दल प्रेम उत्पन्न झालें व जेनीचें काव्यप्रेम पाहून मार्क्सही तिच्यावर प्रेम करूं लागला. प्रेमी जीवाचें हें छुपें प्रेम हळूहळू वाढत चाललें व बर्लिनला जाण्यापूर्वी दोघानीं परस्पर हृदयाविष्करण केले. प्रेमाचें हें आविष्करण उभयतामध्यें मोठ्या प्रेमानें झालें. दोघेही याप्रमाणे प्रेमबद्ध झालीं तथापि आपल्याशिवाय इतरांना या गोष्टीचा त्यांनीं

मागमूसही लागूं दिला नाहीं. गुप्त रीतीनें झालेलें हें प्रेमसंमीलन उभयतांना त्यांच्या सर्व आयुष्यभर अत्यंत सुखावह व आनंदमय झालें. सौंदर्य, सुसंस्कृत मन व शुद्ध चारित्र्य या गुणांनीं अलंकृत असलेल्या जेनीवर मार्क्सचें प्रेम अखंड राहिलें. जेनीनेंही मार्क्सला अनेक आपत्तींमध्यें एकनिष्ठ मनानें सहाय्य करून आपलें सहचारिणीपद सार्थ केलें.

बर्लिनमध्यें असतांना मार्क्सनें इतर सर्व चैनींना फाटा दिला व तो पूर्णपणें अभ्यासांत गढून गेला. तत्त्वज्ञान, कायदा, इतिहास, भूगोल, वाङ्मय, काव्य या विषयांचा त्यानें अगदीं कसून अभ्यास करण्यास सुरवात केली. सत्यान्वेषणासंबंधाची त्याची इच्छा अत्यंत तीव्र होती. सत्यसंशोधनाचें त्याला जणूं काय वेडच लागलें होतें. मार्क्सला या अभ्यासाचा इतका जबर नाद लागला कीं, त्यानें दुसऱ्याकडे जाण्यायेण्याचें अजीबात सोडून दिलें. रात्रंदिवस तो अभ्यासांत गढलेला राही. जें जें वाचावें त्यातील सारांश लिहून काढावे, ग्रीक व लॅटिन पुस्तकांतील महत्त्वाच्या उताऱ्यांचें भाषांतर करावें, तत्त्वज्ञानाच्या निरनिराळ्या पद्धतींचा विचार करावा, त्यांची रूपरेषा मनाशीं नक्की करावी व त्यांचें टांचण करावें, अशी त्याची अभ्यास करण्याची पद्धति होती. कायदा, इतिहास व वाङ्मय यांच्या अभ्यासांतही त्यानें याच पद्धतीचा अवलंब केला होता. अशा रीतीनें कॉलेजचा अभ्यास व इतर वाचन चालूं असतांनाच मार्क्सनें तीन पुस्तकें भरतील एवढी प्रचंड काव्यरचना केली. मार्क्सचा हा प्रचंड दीर्घोद्योग व अविश्रांत श्रम पाहून कॉलेजमधील त्याच्या सहाध्यायांत त्याच्यासंबंधानें पूर्ण आदर उत्पन्न झाला होता. कार्ल मार्क्सच्या आयुष्यांतील हा काल त्याच्या बौद्धिक विकासाच्या दृष्टीनें अत्यंत आणीबाणीचा होता. यावेळीं तो ऐन तारुण्यांत होता. अविश्रांत श्रमामुळें त्याची प्रकृति ढासळली होती. त्याचें शरीर दुबळें झालें होतें तरी बुद्धि चलाख होती. तिचें तेज सारखें वाढत होतें. अनेक तत्त्वज्ञान्यांच्या सिद्धांतांचा त्यानें अभ्यास केला होता. आपापले सिद्धांत प्रस्थापित करण्यासाठीं या तत्त्वज्ञान्यांनीं ज्या अनेक प्रकारच्या तर्कपद्धति उपयोगांत आणल्या होत्या, त्यांचेंही मार्क्सनें मननपूर्वक अध्ययन केलें होतें. या विचारांच्या खळबळींत मार्क्सची बुद्धि प्रचंड हेलकावे खात होती. पण त्याच्या कुशाग्र व तेजस्वी बुद्धीनें या अंतःकलहांतूनच वाट शोधून काढली.

हेगेलचा तत्त्वज्ञानाचा सिद्धांत व त्याचा आत्मवाद जरी मार्क्सच्या बुद्धीला पटला नाहीं तरी त्याची विरोधविकासवादपद्धति त्यानें ग्रहण केली. या कुंजीच्या सहाय्यानें अनेक सामाजिक, आर्थिक व ऐतिहासिक बिकट प्रमेयें आपण उकलून दाखवूं असा आत्मविश्वास मार्क्सला वाटूं लागला, व त्याची बुद्धि स्थिर झाली. ता. १० नोव्हेंबर १८३७ रोजीं मार्क्सनें एक विस्तृत पत्र आपल्या बापास लिहिलें. इतक्या लहान वयांत बर्लिन युनिव्हर्सिटीच्या दोन टर्म्स् त्यानें भरल्या होत्या. कॉलेजचा अभ्यास तर तो कसोशीनें करीत होताच पण त्याशिवाय तत्त्वज्ञान, इतिहास वगैरे विषयांचा त्यानें स्वतंत्र रीतीनें अभ्यास चालविला होता. याचें सविस्तर वर्णन मार्क्सनें या पत्रांत केलें आहे. तसेंच या कालांत त्याच्या अंतःकरणांत जी प्रचंड खळबळ चालू होती त्याचेंही मनोरम वर्णन त्यानें या पत्रात दिलें आहे. या पत्रांतील कांहीं महत्त्वाचा भाग खालीं दिला आहे:—

" आपल्या जीवनांत आपल्यावर असे कांहीं प्रसंग येतात कीं, ज्यामुळें आपण आपल्या जीवनांतील एक अंश पुरा करून स्पष्टपणें दुसऱ्या अंशांत प्रवेश करीत आहों असें दिसून येतें. या संक्रमणावस्थेंत आपल्या गतजीवनाचें व आजच्या प्रत्यक्ष मनःस्थितीचें निरीक्षण करावें व आपली पिछेहाट होत आहे किंवा आपण आहों त्या जागीं स्थिर राहिलों आहों, हें पहावें असें आपणाला वाटतें. पण वस्तुस्थिति तशी नसते. यावेळीं आपण केवळ मनोमय विश्रांति घेत असतों व आत्म्याच्या सूक्ष्म कर्तृत्वाचें मनन करीत असतों. अशा प्रसंगीं मनुष्याची वृत्ति साहजिकच काव्यमय बनते. मनुष्याचें जीवन म्हणजे तरी काय ? तेंही एक काव्यच आहे. त्याच्या आयुष्यांतील प्रत्येक संक्रमण म्हणजे त्याच्या गतजीवनावरील एकेक खंडकाव्यच होय आणि हें काव्यसुद्धां रंगी बेरंगी छटांनीं भरलेल्या भावी जीवनाची नांदीच असते. तें कसेंही असलें तरी आपण आपल्या गत आयुष्यांतील अनेक अनुभव लिहून काढून त्यांना चिरस्थायी स्वरूप देण्यांत आनंद मानावा असें वाटतें. कारण हे अनुभवही अत्यंत महत्त्वाचे असतात व अनेक व्यवसायांनीं भरलेल्या आपल्या रोजच्या जीवनांत आपण त्यांचें महत्त्व विसरून जात असतो. हा उद्देश साधण्याकरितां हे अनुभव आपण आपल्या आईबापांपुढें मांडावें यापेक्षां दुसरा कोणता उचित मार्ग आहे बरें ?

"आपलें जीवन म्हणजे आपल्या आत्मशक्तीचें व्यक्त स्वरूप होय. शास्त्र, कला व व्यक्तिगत गुण वगैरे अनेक मार्गांनीं ही आत्मशक्ति व्यक्त होत असते. या दृष्टीनेंच सबंध गेलें वर्ष मी कॉलेजांत कसें घालविलें, हें आपल्यापुढें मांडीत आहें. यावेळच्या माझ्या कल्पनेप्रमाणें काव्यानें माझें अंतःकरण प्रथम ग्रासून टाकिलें व काव्यरचना करणें हा माझा आवडता व्यवसाय बनला. हें काम माझ्या हातून चांगल्या रीतीनें पार पडावें अशीं मी काळजीही घेऊं लागलों. माझी ही सर्व कविता अर्थातच शुद्ध आध्यात्मिक स्वरूपाची होती. माझा स्वभाव लक्षांत घेतां व ज्या परिस्थितींत माझा मानसिक विकास होत होता, तिचा विचार केला असतां असें होणेंच स्वाभाविक होतें. दुसरी गोष्ट म्हणजे मला कायद्याचा अभ्यास करावयाचा होता; आणि ज्यानें माझें अंतःकरण सर्वांत जास्त आकर्षित केलें तो विषय म्हणजे तत्त्वज्ञान होय. हे दोन्ही अभ्यास मी एकाच वेळीं कसोशीनें चालविले होते. कायद्याचीं अनेक पुस्तकें मी वाचलीं व जस्टिनियनच्या रोमन सिव्हिल लॉ वरील पुस्तकाचें तर भाषांतरच केलें. कायदे करण्याच्या मुळाशीं कोणतें तत्त्वज्ञान आहे व कोणतें तत्त्वज्ञान असावें याचाही मी विचार केला. या विषयासंबंधानें मला सुचलेले विचार मी लिहूनही काढले. हें लिखाण भरपूर तीनशें पानें झालें आहे.

"काय आहे व काय असावें याचा विचार हाच अध्यात्मिक वादांतील विषय होय. अध्यात्मवादांतील हा झगडा मला आवडेनासा झाला होता. अध्यात्मासंबंधाच्या न्यायशास्त्रांतील मूलतत्त्वांचा, टीकांचा व व्याख्यांचा मी जसजसा विचार करूं लागलों तसतशी सत्यतत्त्व व प्रत्यक्ष व्यवहार यांतील भिन्नता माझ्या प्रतीतीस येऊं लागली. बुद्धीपेक्षां श्रद्धेलाच या विषयांत महत्त्व दिलेलें मला आढळून आलें.

"याप्रमाणें या भिन्न भिन्न विषयांचा अभ्यास चालविल्यामुळें पहिल्या टर्ममध्यें कितीतरी रात्री मला जागून काढाव्या लागल्या. पुष्कळ मानसिक व शारीरिक प्रक्षोभ सहन करावा लागला. इतकें होऊनही माझी कांहीं प्रगति झालेली नाहीं, असें मला आढळून आलें. या दिवसांत मी निसर्गाचे कायदे पाळले नाहींत. दुसऱ्याकडे जाण्यायेण्याचें तर मी सोडून दिलें होतें.

करमणुकीच्या सर्व विषयांचा मी त्याग केला होता. मुखावर मी पाणी सोडलें होतें. माझ्या या वर्तनाविरुद्ध माझें मन तक्रार करीत आहे, असें मला दिसत होतें. या वर्तनामुळें माझी प्रकृति स्वाभाविकच बिघडली व मी शहर सोडून खेडेगावच्या मोकळ्या व शुद्ध हवेंत जाऊन रहावें असा डॉक्टरानीं मला सल्ला दिला. या विद्याव्यासंगानें माझ्या विचारसृष्टींत मात्र एक मोठा फरक घडवून आणला. अध्यात्माकडे आतापर्यंत माझा विशेष ओढा होता तो कमी होत चालला; प्रत्यक्ष सत्यसृष्टींतच या आत्मतत्त्वाला मी पाहूं लागलों. सृष्टिबाहेर वर स्वर्गांत देवाची वस्ति आहे अशी माझी कल्पना होती ती आता नाहींशी झाली. प्रत्यक्ष सृष्टीच आतां या देवाचें वसतिस्थान बनली. हेगेलच्या तत्त्वज्ञानाचा मी अभ्यास केला. पण त्याचें विचित्र व ओबडधोबड पुराण मला आवडलें नाहीं. तथापि पुनः या ज्ञानसमुद्राच्या बुडाशी आणखी एकदा खोल बुडी मारून त्याचा ठाव घेण्याचें व त्यांतील विचाररत्नें सूर्यप्रकाशांत आणण्याचें मी टरविलें. असले ग्रंथ वाचून बुद्धीच्या बळावर केवळ शब्दांची लटपटपंची करणें मला केव्हाही आवडलें नाहीं.

" 'तत्त्वज्ञानाचा अपरिहार्य विकास' या विषयावर मी एक संवाद लिहिला व तो चोवीस पाने भरला. कला व विज्ञान हे दोन विषय भिन्न नाहींत, कांहीं अंशीं त्यांचेंही सुंदर मीलन झालेले असतें, असें मी यात दाखविलें आहे. मी स्वभावतःच धाडसी आहें यामुळें शुद्ध भावना, धर्म, निसर्ग व इतिहास यातील ईशस्वरूप [1]विरोधविकासवादाच्या दृष्टीनें कसें विकसित झालें आहे हें दाखविण्याचें काम मी अंगावर घेतलें. हेगेलच्या विचारपद्धतीसंबंधानेंही माझे विचार मी लिहून कांढले. हा निबंध लिहितांना विज्ञान, इतिहास व शेलिंगचे ग्रंथ यांचें परिशीलन मला करावें लागलें. हें काम फारच कठीण होतें. तें करतांना माझ्या विचारशक्तीला मला खूप शीण द्यावा लागला. या सर्व अभ्यासाचा एक परिणाम असा

---

१ दोन परस्परविरुद्ध द्रव्यांच्या झगड्यांतून तिसरेंच एक द्रव्य निर्माण होतें आणि या कलहपरंपरेंतूनच विश्वांतील सर्व वस्तूंचा विकास होतो, हा विरोधविकासवादातील मूळ सिद्धांत आहे. या विषयावर पुढें एक स्वतंत्र प्रकरणच लिहिलें आहे.

झाला कीं, माझें हृदय श्रद्धाहीन झालें. याचवेळीं जेनी आजारी झाल्यामुळें माझें मन अस्थिर झालें. त्यांतच मी आजवर जे बौद्धिक श्रम केले ते सर्व निष्फळ झाले असें मला आढळून आलें. ज्या भावनेचा आजवर मी तिरस्कार करीत होतों त्याच भावनेनें माझ्या हृदयात आतां मूर्त स्वरूप धारण केलें आहे हें पाहून माझें मन अत्यंत व्यथित झालें. या सर्व कारणामुळें मी आजारी पडलों. मी आजारी असल्याची हकिकत माझ्या मागच्या पत्रात मी कळविलीच आहे. बरा झाल्यावर माझ्या सर्व कविता मी जाळून टाकल्या. लघुकथा लिहिण्याच्या उद्देशानें जी सामुग्री मी जमा केली होती तीही मी जाळून टाकली. असें केल्यानें ज्या भावनांनीं प्रेरित होऊन मी या कविता रचिल्या होत्या व ही सामुग्री जमविली होती, त्या भावनांच्या त्रासांतून मी पूर्ण मोकळा होईन असें मला वाटलें होतें, पण तें फोल ठरलें. गेल्या कांहीं महिन्यांत माझी मनःस्थिति अशी झाली होती हे मी नाकबूल करीत नाहीं.

"आजारी असतांना मी हेगेलचे ग्रंथ अथपासून इतिपर्यंत पुन्ह वाचले आणि त्याच्या पुष्कळ शिष्यांचा परिचय करून घेतला. यानंत ग्रॅज्युएट क्लबांतील मंडळींशीं माझी ओळख झाली. या क्लबांत बरेच प्रोफे सर होते. बर्लिनमधील माझे जिवलग स्नेही डॉ० रुटेन्बर्ग हे याच क्लबा होते. या क्लबांतील मंडळींत ज्या चर्चा चालत त्यांत सहजच परस्परविरोधं मतें पुढें मांडण्यांत येत. या मतांच्या बाबतींत जसजसा जोराचा खल हो लागला तसतसा ज्यांतून बाहेर पडण्याचा मी प्रयत्न करीत होतों त्य नव्या तत्त्वज्ञानाच्या जाळ्यांत मी अधिकाधिक गुरफटून जाऊं लागलों. य मनःस्थितीमुळें मी अधिकच स्तंभित झालों. मीच माझ्यावर रागावलों. प माझ्या विचारांत घडून आलेली ही क्रांति विरोधीविचारकलहांचा सह परिणाम आहे, असें मला आढळून आलें."

मार्क्सचें हें पत्र वाचून त्याच्या बापाला मुळींच बरें वाटलें नाह असल्या ध्येयहीन चंचल वृत्तीबद्दल त्यानें मार्क्सची कानउघाडणी केल मागचा पुढचा विचार न करतां बेफामपणानें कितीही अभ्यास केला त [illegible] कांहीं [illegible] असें त्यानें त्यास कळविलें. कांहीं त

प्रचंड रद्दड काव्य रचावयाचें व त्याचा नाशही करून टाकावयाचा त्यापेक्षां बर्लिनमधील अभ्यासाचा जास्त फायदा आपल्या मुलानें करून घेतला असता तर बरें झालें असतें, असें त्याला वाटलें. दुसरी कोणतीहि गोष्ट करण्यापूर्वी आपलें भावी आयुष्य कसें घालवावयाचें याचा विचार कार्ल करील अशी त्याच्या बापाची अपेक्षा होती. त्याच्या परीक्षेला जरूर असलेलीं लेक्चरें त्यानें मनःपूर्वक ऐकलीं असतीं, बर्लिनमधील अधिकारी वर्गातील मंडळींचा त्यानें परिचय करून घेतला असता, तो अधिक काटकसरीनें वागला असता, तत्त्वज्ञानाच्या पोकळ अभ्यासांत आपला वेळ त्यानें गमावला नसता तर मार्क्सच्या बापाला फार बरें वाटलें असतें. कॉलेजांतील तरुण विद्यार्थी सुखानें झोप घेतात. समजा, हे विद्यार्थी कधीं कधीं सबंध रात्रीच्या रात्री जागून काढीत असले तरी ते निदान आपल्या मनाची करमणूक करून घेतात. पण माझा हा हुशार व बुद्धिमान् मुलगा काय करतो पहा ! ज्या अभ्यासात मुळींसुद्धां राम नाहीं असला तत्त्वज्ञानाचा रुक्ष व भिकारडा अभ्यास करण्यांत तो रात्रींच्या रात्रीं जागून काढतो. असें करताना आपल्या शरीराची व मनाची किती नासाडी होत आहे हेंही तो पहात नाहीं. इतकें रखडून तो करतो काय तर आदल्या दिवशी जें तो लिहितो त्याचा दुसरे दिवशी नाश करून टाकतो. अखेर त्याच्या हातीं काय लागतें तर कांही नाहीं. जेवढें काही ज्ञान त्यानें दुसऱ्याकडून संपादन केलेलें असतें तेवढें तो घालवून बसतो.

आपल्यासंबंधानें आपल्या बापाचें वरील प्रकारचें मत झालें आहे असें मार्क्सला समजले तरी त्यानें जो मार्ग पसंत केला होता तो सोडून देणें त्याला आता शक्य राहिलें नव्हतें. मार्क्सनें सरकारी खात्यांत शिरावें व खूप पैसा व कीर्ति संपादन करावी अशी त्याच्या बापाची इच्छा असली तरी मार्क्सला तसें मुळींच वाटत नव्हतें. सरकारी नोकरींत आपलें भावी आयुष्य घालवावें ही कल्पना मार्क्सच्या लढवय्या स्वभावाला पसंत पडली नाहीं.

मार्क्सनें आतां आपलें मूळचें राहण्याचें ठिकाण बदललें. तो स्ट्रॅलो येथे राहू लागला. त्याची प्रकृति चागली सुधारूं लागली होती. पण त्याचा

तत्त्वज्ञानाचा अभ्यास अद्याप चाललाच होता. तत्त्वज्ञानाच्या बाबतींत जे नवीन सिद्धांत त्याला पटले होते त्याचें दृढीकरण करण्याकरितां त्यानें खूपच बौद्धिक श्रम घेतले. या बाबतींत ग्रॅज्युएट क्लबातील बऱ्याच सभासदांबरोबर तो चर्चा करीत असे. 'धर्म' या विषयाचे प्रो. ब्रूनो बोर व व्याकरण शाळेचे एक शिक्षक फ्रेडरिक किपेन या दोघां विद्वानांशीं त्याचा चांगला परिचय झाला. मार्क्स व यांच्यामध्यें वयाच्या दृष्टीनें कितीही अंतर असलें तरी हे गृहस्थ मार्क्सबरोबर, प्रेमानें, सलगीनें व बरोबरीच्या नात्यानें वागत असत. सरकारी नोकरी करण्याची कल्पना मार्क्सनें केव्हांच सोडली होती व एखाद्या कॉलेजांत लेक्चररची जागा मिळाल्यास पहावी, असे विचार त्याच्या मनांत येऊं लागले होते व त्याप्रमाणें तो प्रयत्नही करीत होता. आपलें मत कार्लला पसंत पडलें नाहीं तरी त्यानें पसंत केलेला मार्ग वाईट नाहीं असें त्याच्या बापाला अलीकडे वाटूं लागलें होतें. आपलेकाचें आतां चांगलें जमतही चाललें होतें. पण १८३८ च्या मे महिन्यात मार्क्सचा बाप एकाएकीं आजारी पडला व त्यांतच त्याचा अंत झाला. मरणसमयीं त्याचें वय ५६ वर्षांचें होतें. कार्ल मार्क्सनें पुढील आयुष्यात जी कीर्ति संपादन केली ती पाहण्याचें त्याच्या नशीबीं नव्हतें हेंच खरें.

बाप मेल्यावर मार्क्सनें कायद्याचा अभ्यास करण्याचें मुळीं सोडूनच दिलें व तत्त्वज्ञानाचा अभ्यास जारीनें सुरू केला. तत्त्वज्ञान या विषयावरील परीक्षेंत चांगल्या रीतीनें उत्तीर्ण झाल्यास बॉन युनिव्हर्सिटींत त्याला लगेच तत्त्वज्ञानाच्या लेक्चररची जागा मिळेल, असें ब्रूनो बोरनें त्याला सांगितलें होतें. तत्त्वज्ञानाचा अभ्यास कसोटीनें चालू ठेवण्यास हेंदेखील एक कारण होतेंच. बर्लिन युनिव्हर्सिटींत पांच वर्षें नोकरी केल्यावर बॉन युनिव्हर्सिटींत ब्रूनोलाही प्रोफेसरची जागा मिळणार होती तेव्हां या दोघां मित्रांनीं अशा रीतीनें एकत्र राहण्याचें ठरविलें असल्यास त्यांत नवल नव्हतें. "नॅचरल फिलॉसफीज् ऑफ डेमोक्रायटस् ॲन्ड एपिक्यूरस्" या विषयावर कार्ल मार्क्सनें एक निबंध लिहिला व १८४१ सालीं येना युनिव्हर्सिटीनें त्याला डॉक्टर ऑफ फिलॉसफीची पदवी अर्पण केली. नंतर तो बॉन येथें आपला मित्र ब्रूनो बोर याच्याकडे गेला. या ठिकाणीं आतां प्रोफेसरची नोकरी करण्यास हरकत नाहीं असें त्यास वाटलें. पण या बाबतींत

त्याची निराशा झाली. सत्याचें स्वतंत्र बुद्धीनें संशोधन करून स्वतंत्रपणें आपले विचार प्रदर्शित करणारांना प्रशियांतील विश्वविद्यालयांत स्थान नाहीं, असें त्यास आढळून आलें. ब्रूनोलाही बॉन युनिव्हर्सिटींत प्रोफेसरची जागा मिळणें शक्य झालें नाहीं. ब्रूनोसारख्या नेमस्त मताच्या विद्वानाचीही जेथें डाळ शिजली नाहीं तेथें कार्ल मार्क्ससारख्या जहाल तरुणाची कशी वर्णी लागणार! या अडचणींतून बाहेर पडण्यास स्वतंत्र शिलेदारी बाण्याचा वर्तमानपत्राचा धंदाच तेवढा कार्ल मार्क्सला मोकळा राहिला होता. कार्ल-मार्क्सला तशी संधी लवकरच मिळाली.

## सार्वजनिक जीवनाचा प्रारंभ

कार्ल मार्क्सनें याप्रमाणें सार्वजनिक जीवनांत प्रवेश केला. मार्क्सनें या-वेळीं तत्त्वज्ञानाच्या विषयांत चांगलें प्राविण्य संपादन केलें होतें. जर्मनीच्या आत्मिक स्वातंत्र्याच्या झगड्यांत आपण आतां भाग घेतला पाहिजे अशा आकांक्षेनें त्यानें हें स्वतंत्र जीवन पत्करलें होतें. आत्मिक स्वातंत्र्य म्हणजे धार्मिक मतस्वातंत्र्य व राजकारणांतील उदारमतवादित्व होय, असें मार्क्सचें म्हणणें होतें. हा झगडा चालविण्याकरितां कोणत्या शस्त्राचा उपयोग करावयाचा हेंही त्यानें ठरविलें होतें. तें शस्त्र म्हणजे खंडनात्मक टीका होय. सद्यःस्थितींत कितीही दोष असले तरी त्यांचें समर्थन करीत रहावयाचें व त्यांतल्या त्यांत कांहीं थोड्या सुधारणा सुचवावयाच्या, हा मार्ग परिणामकारक नसतो व तो बुद्धीस पटण्यासारखाही नसतो ही गोष्ट मार्क्सला पूर्णपणें समजली होती. टीकेचें हें शस्त्र यापेक्षां कितीतरी उपयुक्त असतें. खंडनात्मक टीकेचें हें शस्त्र बुद्धीवरील मल दूर करतें. तें मनुष्याला विचार करावयास लावतें. तें त्याला चिकित्सक बनवितें. अंधश्रद्धेचा तें नाश करतें. समाजाच्या विचारक्रांतीला हें शस्त्र मदत करतें. [1]यंग हेगेलियन पक्षानें याच शस्त्राचा उपयोग करण्याचें ठरविलें होतें. खंडणात्मक टीका हें एक विनाशक शस्त्र आहे. समाजांत रूढ असलेल्या दुष्ट चालीरीतींचा व धर्मश्रद्धेचा नाश करण्यास आणि आपल्या जीवनाचा भावी हेतु निश्चित करण्यास या शस्त्राचा चांगला उपयोग होतो. नवीन तत्त्वांची प्रस्थापना करावी अगर नवीन धर्मपंथ रूढ करावा असा यंग हेगेलियन पक्षाचा हेतु नव्हता. विरोधविकासवाददृष्ट्या पाहिलें असतां विघातक टीका किंवा विरोध हेंच विधायक कार्य ठरतें. प्रतिपक्षाविरुद्ध निर्दयतेनें युद्ध चालवावयाचें असल्यास व त्यास हादरून सोडावयाचें असल्यास टीकास्त्र हाच एक रामबाण उपाय आहे. असत्याचा नायनाट करावयास टीकास्त्राचा जेवढा उपयोग होतो तेवढा कशाचाही होत नाहीं, असा यंग हेगेलियन पक्षाचा सिद्धांत होता.

---

१ हेगेलच्या कल्पनावादाचा स्वीकार न करितां फक्त त्याच्या विरोधविकासवाद-पद्धतीचा पुरस्कार करणारा पक्ष.

बाप वारल्यामुळे कार्ल मार्क्सच्या दैन्यावस्थेंत अधिकच भर पडली होती. स्वाभिमानाच्या रक्षणाकरितां त्यानें युनिव्हर्सिटींत नोकरी करण्याचें नाकारलें होतें आणि उपजीविकेचें स्वतंत्र साधन म्हणून वर्तमानपत्राच्या धंद्यांत सामील होण्याचें त्यानें ठरविलें होतें. ऱ्हाइन प्रांतांतील लिबरल पक्षाचे पुढारी याच वेळीं आपल्या पक्षातर्फे एक वर्तमानपत्र काढण्याच्या विचारांत होते. राष्ट्रीय स्वातंत्र्याचा मार्ग अधिक सुलभ करणें हाच अर्थात् या पक्षाचा हें पत्र सुरू करण्यांत हेतु होता. या योजनेप्रमाणें लागणारा पैसा लवकरच जमविण्यांत आला. आणि लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट ही की या पत्राच्या संपादनाचें व लेखनाचें कार्य यंग हेगेलियन पक्षांतील मंडळींच्याकडून करून घ्यावयाचें असें या पुढाऱ्यांनीं योजिलें. १८४२ च्या जानेवारीच्या १ तारखेस कलोन येथें 'ऱ्हाईनिश झिटूंग' चा पहिला अंक प्रसिद्ध झाला. पत्राचे संपादक डॉ. रुटेन्बर्ग हे होते. बर्लिन युनिव्हर्सिटींत अभ्यास करीत असताना डॉक्टर मजकुराचा व मार्क्सचा जिव्हाळ्याचा स्नेहसंबंध जुळला होता. मार्क्स बॉन येथें असतांना या पत्राच्या संपादकवर्गांत काम करण्याकरितां त्यास बोलाविण्यांत आलें व हें आमंत्रण त्यानें मोठ्या आनंदानें स्वीकारलें. 'ऱ्हायनिश झिटूंग' मध्यें प्रसिद्ध होणारे मार्क्सचे लेख अर्नोल्ड रोज याच्या नजरेस आले. अर्नोल्ड रोज हेही मोठ्या कसोशीनें वाङ्मयप्रसाराचें काम करीत होते. फोरबाख, बोर व मोझेस हेस वगैरे प्रसिद्ध जर्मन विद्वान् पुढारी तरुणांचें या कामीं साहाय्य घेत होते. अर्नोल्ड रोज यांनीं या कामासाठीं मार्क्सची मदत घेण्याचें ठरविलें. मार्क्सनें हें काम मोठ्या खुषीनें पत्करलें. ऱ्हायनिश झिटुंगमधील मार्क्सचे लेख पत्राच्या वाचक वर्गालाही फार आवडले. १८४२ आक्टोबरमध्यें पत्राचे संपादक डॉ. रुटेनबर्ग हे रिटायर झाले. त्याच्या जागीं कार्ल मार्क्सची निवड करण्यात आली. पत्राच्या संपादकीय कामाची सर्व जबाबदारी आता मार्क्सच्या आंगावर पडली. हें काम करीत असतांना अनेक अर्थशास्त्र व राजकारणविषयक प्रश्नांचा विचार मार्क्सला करावा लागला. शुद्ध कर्तव्याची, जबाबदारीची पूर्ण जाणीव नसणारा दुसरा एखादा संपादक मार्क्सच्या जागीं असता तर त्यानें तें काम कसे तरी रेटून नेलें असतें. मार्क्सच्या हातून अशी गोष्ट होणें शक्यच

नव्हतें. असल्या प्रश्नावर लिहिण्याचा प्रसंग आला म्हणजे मार्क्सला बरेच बौद्धिक व मानसिक श्रम करावे लागत होते. पण एवढ्यानें त्याचें समाधान झालें नाहीं. या प्रश्नावर सांगोपांग व योग्य चर्चा करावयाची असल्यास अर्थशास्त्र व राजकारण यांचें चांगलें व पूर्ण अध्ययन केलें पाहिजे असें मार्क्सला वाटूं लागलें. याच सुमारास स्ट्रासबर्ग येथें फ्रेंच व जर्मन विद्वानांची एक परिषद भरली व तींत फ्रान्समध्यें प्रचलित असलेल्या सामाजिक सिद्धांतांसंबंधानें चर्चा करण्यांत आली. फ्रेंच सामाजिक सिद्धांत व जर्मन दार्शनिक सिद्धांत यांचा समन्वय करण्याचा प्रयत्न जर्मनीच्या बौद्धिक जगांत मोठ्या कसोशीनें चालू होता. वरील परिषद हें त्या प्रयत्नाचेंच एक फळ होतें. त्याचप्रमाणें ऱ्हाइनप्रांतांत जमीनीवरील मालकी हक्क व कर यासंबंधानें अनेक प्रश्न उद्भवले होते. या सर्व विषयावर अधिकारयुक्त व निःशंकपणें लिहावयाचें तर केवळ तत्त्वज्ञानविषयक विद्वत्तेनें भागावयाचें नाहीं ही गोष्ट कार्ल मार्क्सला पूर्णपणें पटली होती. तसेंच सरकारी निरीक्षण खात्याच्या तडाख्यांतून असल्या टीकास्त्रांचा वर्षाव करणाऱ्या पत्राचें रक्षण करणें हेंही अत्यंत मुष्किलीचें काम झालें होतें. निरीक्षण खात्यांतील अधिकाऱ्यांच्या मूर्खपणामुळें या अडचणींत अधिकच भर पडली होती. पण मार्क्सनें मोठ्या चतुराईनें व धिटाईनें हा झगडा चालू ठेवला होता. ऱ्हायनिश झिटुंग वगैरे पत्रांचें निरीक्षण करण्याकरितां नेमलेल्या अधिकाऱ्यानें एका वर्तमानपत्रांत छापलेल्या डांटेच्या एका नाटकाच्या भाषांतराची जाहिरात आक्षेपार्ह ठरविली व धार्मिक विषयावर कोणीही नाटक लिहिता कामा नये असा शेरा मारला. ऱ्हायनिश झिटुंगच्या संपादकांनीं असल्या मूर्खपणाला मुळींच दाद दिली नाहीं. आपल्याला जो मजकूर प्रसिद्ध करावयाचा आहे तो ते कोणत्या ना कोणत्या तरी मार्गानें प्रसिद्ध करून टाकीत असत. फारसा महत्त्वाचा नसलेला लेख 'अद्याप तपासला जावयाचा आहे' या सदराखालीं प्रसिद्ध करण्यांत येई. असलाही लेख प्रसिद्ध करण्याला अयोग्य आहे असें ठरविण्यांत येईल तर उद्यांचा अंकच आम्ही प्रसिद्ध करणार नाहीं असल्या धाकाचाही केव्हां केव्हां प्रयोग करण्यांत येत असे. ऱ्हायनिश झिटुंगसारखीं दहा वर्तमानपत्रें असतीं व थोडासा तोटा आला तरी तो भरून तीं चालविण्याची धमक त्यांच्या

संपादकात असती तर १८४३ सालींच जर्मन सरकारच्या निरीक्षणखात्याचा कारभार अशक्य झाला असता. परंतु जर्मन वर्तमानपत्रांचे मालक भ्याड होते. त्यांचे विचारही संकुचित होते व त्यांची साधनसामुग्रीही अल्प होती. यामुळें न्हायनिश झिटुंगला एकाकी या झगड्याशीं तोंड द्यावें लागलें. या पत्राचें निरीक्षण करण्याकरितां एकामागून एक निरनिराळे अधिकारी नेमावे लागले. या नंतर या कामावर एकाऱ्या ठिकाणीं दोन अधिकारी नेमण्यात आले. प्रकाशित होणारा मजकूर प्रथम एका स्थानिक अधिकाऱ्यानें तपासावयाचा व प्रांतिक गव्हर्नरानें त्यावर अखेरचे संमतीचें शिक्कामोर्तब मारावयाचें असा प्रकार सुरू झाला. इतकी व्यवस्था करूनही न्हायनिश झिटुंगमध्यें संपादक वाटेल तो मजकूर प्रसिद्ध करूं लागलेच. शेवटीं एका वर्तमानपत्राच्या निरीक्षणाकरितां इतका खर्च करावयाचा व इतकी तसदी घ्यावयाची व त्याचा उपयोगही कांहीं व्हावयाचा नाहीं, असें आढळून आल्यामुळें जर्मन सरकारनें हें पत्र तावडतोब बंद करण्याचा हुकूम सोडला. "अर्थशास्त्रावरील टीकाकार" या पुस्तकाच्या प्रस्तावनेंत कार्ल मार्क्सनें आपल्या या संपादकीय अनुभवासंबंधानें पुढील विचार प्रदर्शित केले आहेत.—"१८४२ व १८४३ अशीं दोन वर्षें मी न्हायनिश ग्याझिटचा संपादक होतों. समाजाच्या आर्थिक हितरक्षणासंबंधाच्या ज्या अनेक वादग्रस्त प्रश्नावर वर्तमानपत्रातून चर्चा चालत त्यांत भाग घेण्याचे अडचणीचे प्रसंग प्रथम या दिवसात मजवर आले. जंगलांतील लांकूडतोडीचा बंदोबस्त करण्यासंबंधानें न्हाइन प्रांतिक कौन्सिलांत झालेली चर्चा, भौतिक मालमत्तेची विभागणी, मोसेल जिल्ह्यातील शेतकऱ्याविरुद्ध सरकारनें उपसलेलें हत्यार, खुला व्यापार व उद्योगधंद्याचें सरकारी संरक्षण या विषयांवरील वाद, या सर्व गोष्टींनीं आर्थिक प्रश्नांचें संशोधन करण्यास मला प्रवृत्त केलें. उलटपक्षीं फ्रेंच सोशियालिझम् व कम्यूनिझम् यांतील तात्त्विक मतभिन्नतेसंबंधानें न्हायनिश ग्याझिटमध्यें चर्चा चालू होतीच. या वादांतील उथळपणाबद्दल माझा विरोध मी जाहीर केला होता. पण या विषयाचा जितका अभ्यास मी केला होता त्याच्या आधारावर फ्रेंच मनोवृत्तींना या बाबतीत किती महत्त्व द्यावयाचें याबद्दलचा निर्णय देण्यास मी असमर्थ होतों, हें मला कबूल केलें पाहिजे."

अर्थशास्त्र व समाजशास्त्र या विषयांचा कसून अभ्यास करण्याची मार्क्सची वाढत चाललेली इच्छा ऱ्हायनिश ग्याझिट बंद झाल्यामुळें सफल झाली असें म्हणण्यास हरकत नाहीं. मार्क्सच्या स्वतंत्र वृत्तीला वर्तमानपत्राचें बंधन असह्य झालें होतें. मार्क्सनें संपादकाचें काम सोडलें खरें पण त्यामुळें त्याची आर्थिक परिस्थिति अधिकच हलाखीची झाली. बाप वारल्यामुळें कुटुंबपोषणाचा सर्व भार त्याच्यावरच पडला होता व त्यांतच जेनीवरील प्रेम लवकरच लग्नांत परिणत करण्याचें त्यानें ठरविलें होतें. मार्क्स कधींच सुखलोलुप नव्हता. सांसारिक सुखमय जीवनापेक्षां आत्मिक-आकांक्षापूर्ती-लाच तो नेहमीं जास्त महत्त्व देत असे.

# विचारक्रांति

१८४३ व १८४४ हीं वर्षें मार्क्सच्या बौद्धिक विकासाच्या दृष्टीनें अत्यंत महत्त्वाचीं होतीं. १८३७ सालीं तो हेगेलच्या मतांचा पुरस्कार करूं लागला. यानंतरच्या दोन वर्षांत हेगेलच्या तत्त्वज्ञानाचा त्यानें अधिक कसोशीनें अभ्यास केला. आध्यात्मिक विचारांत हेगेलचीं मतें त्याला पटेनाशीं झालीं तरी हेगेलची विरोधविकासवादाची कल्पना त्यानें आत्मसात् करून टाकली. या दृष्टीनें तो हेगेलचा खरा खरा शिष्य बनला. न्हायनिश ग्याझिटचा संपादक असतांनाच सामाजिक व आर्थिक विषयांचा अभ्यास करण्याची आवश्यकता त्याच्या प्रत्ययाला आली होती. यामुळें संपादकीय कार्यातून मोकळे होतांच सोशियालिझमवरील फ्रेंच वाङ्मय त्यानें वाचण्यास सुरवात केली. हेगेलच्या तत्त्वज्ञानाचा त्यानें जितक्या कसोशीनें व मननपूर्वक अभ्यास केला तितक्याच आस्थेनें त्यानें या विषयावरील पुस्तकेंही वाचलीं आणि विशेषतः फ्रेंच वाङ्मयाच्या अभ्यासानेंच मार्क्सच्या विचारांत क्रांति घडून आली. मार्क्स या सुमारासच समाजसत्तावादी झाला. या दिवसांत मार्क्सनें अर्नोल्ड रूजला जीं पत्रें लिहिलीं आहेत त्यांतील मजकुरावरून मार्क्सच्या विचारांत कशी क्रांति घडून येत होती हें दिसून येतें. फ्रँको जर्मन इयर बुकांत हीं सर्व पत्रें छापलीं आहेत. १८४३ च्या मे महिन्यांत कलोनहून पाठविलेल्या एका पत्रांत त्यानें पुढील आशयाचे विचार प्रगट केले आहेत.

" संपत्ति निर्माण करण्याच्या व तिच्या विभागणीच्या प्रचलित पद्धतीनें आजच्या समाजांतील स्वास्थ्याचा भंग केला आहे. लोकसंख्येची झपाट्यानें होणारी वाढ समाजांतील वाढत्या कलहांना कारणीभूत झालेली नाहीं तर उद्योगधंद्यांची झपाट्यानें वाढ होण्यास जी पद्धति कारणीभूत झाली आहे तीच समाजांतील या सर्व अनर्थांचें मूळ आहे. " वरील विचारांत भावनेचें प्राबल्य जास्त दिसून येत असलें तरी त्याच्या विचारसरणींत झपाट्यानें क्रांति होत चालली होती हें स्पष्ट आहे.

निरनिराळ्या विषयांवरील ग्रंथ वाचावे, त्यांतील विचारांचें मनन करावें याशिवाय मार्क्सला आतां कांहीं उद्योग राहिला नव्हता. १८४३ मधील मे ते सप्टेंबरपर्यंत चार महिन्यांत त्यानें पुष्कळच अभ्यास केला. फोरियर, प्राउधन, कॅबेट, विटलिंग वगैरे ग्रंथकारांचे व समाजधुरीणांचे ग्रंथ त्यानें वाचून काढले व त्यांच्या विचारांचा त्यानें पूर्ण परिचय करून घेतला. वरील ग्रंथकारांनीं सामाजिक चळवळी व समाजरचना या विषयांवर जे जे विचार प्रगट केले आहेत ते त्यास पसंत पडले. पण ध्येयात्मक समाजरचनेच्या ज्या कल्पना त्यांनीं प्रतिपादन केल्या होत्या त्या त्यास आवडल्या नाहींत. असल्या ध्येयात्मक कल्पना लोकांपुढें मांडाव्या व त्याबरहुकूम समाजमंडळें स्थापण्याचा प्रयत्न करावा, यापेक्षां चालू राजकीय व सामाजिक परिस्थितीवर सडकून टीका करावी व हे सामाजिक कलह कसे निर्माण झाले याची कार्यकारणसंगति लावून दाखवावी हेंच मला अधिक पसंत आहे, असें अर्नोल्ड रूजला सप्टेंबर १८४३ मध्यें लिहिलेल्या एका पत्रांत त्यानें म्हटलें आहे; १८४३ च्या हिवाळ्यांत हेगेलच्या 'फिलॉसफी ऑफ लॉ' या ग्रंथावरील टीकात्मक पुस्तकाची प्रस्तावना त्यानें लिहिली. आपलीं मतें स्पष्टपणानें व धीटपणानें या प्रस्तावनेंत मार्क्सनें मांडलीं असून त्याची ही प्रस्तावना म्हणजे एक अत्युत्कृष्ट निबंधच ठरला. मार्क्सनें यावेळीं चालविलेल्या अभ्यासाचेंच हें एक फळ होतें. जर्मन राज्यक्रांतीसंबंधाचे आपले विचार मार्क्सनें या निबंधांत प्रदर्शित केले आहेत. समाजांतील कोणता वर्ग ही क्रांति घडवून आणील व जर्मनीला स्वतंत्र करील हेंही त्यांत त्यानें दाखविलें आहे. समाजांतील जो वर्ग आज दास्याच्या शृंखलेंत बद्ध झाला आहे व भांडवलशाही पद्धतीमुळें ज्या वर्गाची उत्पत्ति व वाढ झाली आहे तो रोजीवर रहाणारा मजूरवर्गच ही क्रांति घडवून आणील, असें आपलें मत मार्क्सनें या निबंधांत व्यक्त केलें आहे. आजची रचना अजीबात मोडून हा वर्ग एका नवीनच तत्त्वावर समाजरचना करील असेंही मार्क्सनें या लेखांत म्हटलें आहे. उद्योगधंद्याची जशी वाढ होते तशीच मजूरवर्गाचीही वाढ होते. या समाजाचें दारिद्य नैसर्गिक कारणामुळें वाढत नसतें, तर भांडवलदारवर्गच कृत्रिम उपायांनीं त्यांच्यांतील दारिद्य वाढवीत असतो. आणि शेवटीं दारिद्य व दास्य यांतू-

नच क्रांतीचा उदय होत असतो," असे निर्वाणीचे विचार त्यानें या निबंधात प्रदर्शित केले आहेत.

मार्क्स या वेळीं पॅरिसमध्यें होता. आपल्या तरुण पत्नीसह तो येथें रहावयास आला होता. अर्नोल्ड रूज याने सुरू केलेल्या 'फ्रँको जर्मन इयर बुक' या नियतकालिकाचें संपादकत्व याच वेळीं त्यानें स्वीकारलें. १८४३ च्या सप्टेंबरमध्यें त्यानें अर्नोल्ड रूज यांना एक पत्र पाठविलें. वरील नियतकालिकाचे धोरण कशा प्रकारचें असावें याचा विचार मार्क्सनें या पत्रात केला आहे. चालू राजकीय व सामाजिक संस्थांतील दोष निर्भयपणे लोकापुढें मांडावे, राजकीय व सामाजिक चळवळींच्या बाबतींत शिरलेल्या अंधश्रद्धेचें समूळ उच्चाटण करावें व आपल्या सर्व हालचाली बुद्धिप्रधान असाव्या अशाच आशयाचे क्रांतिकारक विचार त्यानें या पत्रातही प्रदर्शित केले आहेत. १८४४ च्या वसंत ऋतूंत फ्रँको जर्मन इयर बुकाचा पहिला व शेवटचा अंक प्रसिद्ध झाला. 'कायदेशास्त्राचें तात्विक स्वरूप' या हेगेलच्या पुस्तकावरील टीका व 'ज्यू प्रश्न' या बोरच्या पुस्तकावरील अभिप्राय असे मार्क्सचे दोन लेख या अंकात होते. याशिवाय अर्थशास्त्रांतील मूलतत्त्वें या विषयावरील फ्रेडरिक एंजल्स याचाही लेख या अंकात होता. मार्क्सची बुद्धिमत्ता अलौकिक होती. तात्त्विक सिद्धांताची प्रस्थापना करण्यात त्याचा हातखंडा होता. पण रोजच्या व्यवहारात मात्र त्यानें असावें तितकें लक्ष नव्हतें. सबंध आयुष्यात नियमित स्वरूपात कधीं त्याला पैसे मिळाले नाहीत, यामुळें आपल्या आयुष्यात जीं अनेक कार्ये त्यानें करण्याचें ठरविले होतें ती त्याला सुलभ रीतीनें करता आलीं नाहीत. असल्या अनिश्चित परिस्थितींत एंजल्सची त्याला फार मदत झाली. तसेंच बौद्धिक दृष्टीनेंही एंजल्सने मार्क्सला बरीच मदत केली. अनेक विषयांवर मार्क्स व एंजल्स याचे जोराचे वाद चालत. यामुळे शंकाकुशंकाचें निरसन होऊन उभयताच्या विचारानें दृढीकरण होत असे. एंजल्स प्रथम आत्मवादी (कल्पनावादी) होता. सत्ययुगाची प्रस्थापना करण्याची कल्पना एंजल्सला आनंददायक वाटत असे. मानवी अंतःकरणांतील सद्भावनांवर विश्वास ठेवावा व त्या पायावरच समाजधारणेचा प्रयत्न करावा या कल्पनेनें एंजल्सला वेड लावलें होतें. युरोपांत औद्योगिक क्रांति झाली. या क्रांतीमुळें

बहुजनसमाजाच्या सुखसमाधानांत भर पडली नाहीं. उलट त्याच्यावर अनेक प्रकारचे जुलूम होऊं लागले. त्यांच्या श्रमांचा फायदा पुंजीवाले घेऊं लागले. अत्यंत मोठ्या प्रमाणावर त्यांचें रक्तशोषण करण्यांत येऊं लागलें. कामकऱ्यांची संख्या झपाट्यानें वाढूं लागली. त्याबरोबर त्यांचीं दुःखेंही वाढूं लागलीं. अशा शोकजनक परिस्थितींत युरोपमध्यें गरीबांचे अनेक कैवारी पुढें आले. मजुरांवर होत असलेले अमानुष अन्याय त्यांनीं जनतेसमोर मांडले. कामकरी वर्गावर होत असलेले अन्याय दूर कसे करावयाचे याचा त्यांनीं अत्यंत सूक्ष्म रीतीनें अभ्यास केला. रोजच्या रोज कामगार वर्गावर जे जुलूम चालू होते त्यांचा प्रतिकार करण्याकरितां कामगार वर्गाची संघटणा करण्यांत आली पाहिजे ही गोष्ट त्याला मान्य होतीच, पण कामगारसमाजाचें आत्यंतिक कल्याण करावयाचें असल्यास सत्य, प्रेम, सहकार्य, अपरिग्रह या आत्मिक तत्त्वांच्या बलावर श्रद्धा ठेवणारीं अनेक समाजमंडळें स्थापन करावीं, या मंडळांतील घटकांनीं परस्परप्रेमानें व सहकार्यानें आपलें जीवन व्यतीत करावें, अशीच या काल्पनिक समाजसत्तावादी पुढाऱ्यांची भावना होती. या पुढाऱ्यांपैकीं रॉबर्ट ओवेन यानें तर ही कल्पना प्रत्यक्ष अंमलांत आणण्याचा प्रयत्नही केला.

रॉबर्ट ओवेन हा न्यू लानार्क ( स्कॉटलंड ) येथील एका कापडाच्या गिरणीचा डायरेक्टर होता. आपल्या गिरणींतील २५०० मजूरांची त्यानें एक स्वतंत्र वसाहतच निर्माण केली. या वसाहतींत कामगारांच्या सर्व प्रकारच्या सुखसोयींची व्यवस्था करण्यांत आली होती. या वसाहतींतून मद्यपानासारख्या व्यसनांची पूर्ण हकालपट्टी करण्यांत आली होती. कामगारवर्गाशीं तो आपलेपणानें वागे. यामुळें कामगारांनाही ही गिरणी आपलीच आहे असें वाटूं लागलें होतें. वसाहतींतील सर्वच लोक परस्परांशीं प्रेमानें वागत असल्यामुळें कामगारांची गुन्हा करण्याची प्रवृत्तीही नष्ट झाली होती. ज्या ठिकाणीं गुन्हाच होत नाहीं व जेथील लोक परस्परांची सोय पहाण्यास तत्पर असतात त्या ठिकाणीं पोलिसांची किंवा मॅजिस्ट्रेटांची जरूरी तरी कोठून भासणार! आपल्या या लहानशा वसाहतींत नांदत असलेली शांति व प्रेम पाहून ओवेनच्या चित्ताला अत्यंत समाधान वाटत असे. पण या आदर्श स्थितीच्या मुळाशीं आपलें आत्मवादित्व व आपली

दयाशील वृत्तीच आहे याची जाणीव त्याच्या हृदयाला बोचत होती. गिरणींतील कामगार मोठ्या उत्साहानें काम करीत होते. धंद्याच्या दृष्टीनें लागणारें शिक्षण त्याना देण्याची व्यवस्था झाल्यामुळें कामगारांची कर्तृत्वशक्ति वाढलेली होती. कामगारांच्या मुलांनाही योग्य तें शिक्षण देण्यांत येत असे. त्यामुळें कर्तृत्ववान, प्रामाणिक व चिकाटीनें काम करणाऱ्या कामगारांची गिरणीला कधींच उणीव भासली नाहीं. सर्व प्रकारच्या नवीन यंत्राची योजना व तीं यंत्रें चालविणारा कर्तृत्ववान् कामगारसमाज या दोन्हींची उत्तम प्रकारची जोड ओवेनच्या न्यू लानार्क येथील गिरणींत झाली होती. औद्योगिक क्रांतीनंतर मालाची पैदास पूर्वीपेक्षां कितीतरी पटीनें वाढली होती. पन्नास वर्षांपूर्वी ६,००,००० मजूर एका दिवसात जेवढ्या मालाची उत्पत्ति करीत त्यापेक्षांही अधिक मालाचें उत्पादन ओवेनच्या कारखान्यांतील २५०० मजूर करीत असत. अर्थात् ६,००,००० मजूरांना वेतन देण्याकरितां जेवढा पैसा खर्ची पडे त्यापेक्षां २५०० मजूरांना वेतन देण्याकरिता कितीतरी पटीनें कमी पैसा लागूं लागला. यामुळें या कारखान्याकरितां जें भांडवल उभारण्यांत आलें त्यावर शेंकडा ५ डिव्हिडंड देण्यात आलें. याशिवाय ४५,००,००० रु. निवळ नफा झाला तो निराळाच. आपल्या कल्पनेप्रमाणें या सर्व संपत्तीचा उपयोग कामगार वर्गाकरितांच करून घेण्यात येईल असें ओवेनला वाटलें, पण तें शक्य झालें नाहीं. ओवेन हा हुशार आंकडेशास्त्रज्ञ होता. आयर्लंडमधील कामगारवर्गाची दुःखें व गाऱ्हाणीं दूर करण्याकरितां न्यू लानार्कच्या नमुन्यावर तेथील कामगाराच्या लहान लहान वसाहती कशा निर्माण कराव्या याची एक विस्तृत योजना त्यानें आखली होती. आपल्या स्वतःच्या खर्चानें त्यानें अमेरिकेतही अशाच प्रकारच्या नमुनेदार कम्युनिस्ट आदर्श वसाहती प्रस्थापित केल्या. ओवेनच्या कार्याचा व्याप अधिकाधिक वाढूं लागला पण या कामाकरिता लागणारा पैसा मात्र त्याला पुढें मिळेनासा झाला. रॉबर्ट ओवेन हा एक अत्यंत उदार, दयाशील व प्रेमळ अंतःकरणाचा गृहस्थ आहे अशा समजुतीनें पुंजीवाल्या समाजांतील त्याचे दोस्त व इतर लोकही त्याला सढळ हातानें मदत करीत असत. पण ओवेन हा समाजसत्तावादी बनला आहे, समाजसत्तावादाच्या तत्त्वानुसार हल्लींच्या समाजरचनेंत क्रांति

घडवून आणण्याचा त्याचा विचार आहे व याच दृष्टीनें ठिकठिकाणीं अनेक वसाहतीही तो निर्माण करीत आहे, असें आढळतांच धनिक लोकांच्या मर्जीतून तो उतरला. ओवेनच्या कार्याबद्दल त्यांना पूर्वी जी सहानुभूति वाटत होती ती नष्ट झाली. अर्थात् पूर्वीप्रमाणें त्याला पैशाची मदतही होईनाशी झाली. प्रस्थापित करण्यांत आलेल्या वसाहतींचा खर्च चालविणें त्याला अशक्य होऊं लागलें. सामाजिक सुधारणेच्या बाबतींत खासगी मालमत्ता, धर्म व विवाहाची चालू पद्धति या तीन मोठ्या अडचणी आहेत असें ओवेनला आढळून आलें. समाजांतील या दोषांविरुद्ध हल्ले चढविल्यास आपल्याला हद्दपारीची शिक्षा भोगावी लागेल, धनिक वर्गांतील व अधिकारीवर्गांतील आपले दोस्त आपल्यावर बहिष्कार घालतील या गोष्टींची ओवेनला पूर्ण जाणीव होती. ही आपत्ति डोळ्यांपुढें उघड उघड दिसत असतांही ओवेन आपल्या कर्तव्यापासून च्युत झाला नाहीं. पण एवढें मात्र खरें कीं, त्याला या आदर्श वसाहती स्थापण्याचा व त्या चालविण्याचा नाद कायमचा सोडून द्यावा लागला. समाजांतील त्याचा दर्जा नष्ट झाला आणि या वसाहतींच्या पायीं त्याची खासगी मालमत्ताही नष्ट झाली. रॉबर्ट ओवेनप्रमाणें फ्रान्समध्यें बॅबॉफ, कॅबेट, सेन्ट सायमन, फोरियर, ब्लँक, प्राउधन वगैरे आदर्श साम्यवादाचा पुरस्कार करणारे अनेक कामगार पुढारी उदयास आले. कौंट टॉलस्टॉय हाही असाच एक आत्मवादी होता. टॉलस्टॉयनें कल्पिलेल्या आदर्श समाजांची प्रत्यक्ष अंमलबजावणी खुद्द त्याच्याकडून झाली नाहीं. त्याच्या कांहीं शिष्यांनीं टॉलस्टॉय फार्म्स् नांवाच्या मंडळ्या स्थापन केल्या. केवळ मनुष्याच्या सद्भावनेवर श्रद्धा ठेवून केलेले हे प्रयत्न यशस्वी झाले नाहींत. अपरिग्रहाचें — खासगी मालमत्ता न राखण्याचें — खडतर व्रत या मंडळांच्या सभासदांकडून पाळलें गेलें नाहीं व मंडळांत परस्परविद्वेष व कलह वाढला आणि तीं मोडून गेलीं. फ्रेड्रिक एंजल्स हाही प्रथम असाच भावनाप्रधान होता. आदर्श साम्यवादावर त्याचा विश्वास होता. पण कार्ल मार्क्सशीं त्याची दोस्ती जसजशी वाढूं लागली तसतसा तो जास्त जास्त चिकित्सक बनूं लागला. "अर्थशास्त्रावर टीका" या नांवाचें एक पुस्तक एंजल्सनें लिहिलें होतें. एंजल्सचें वय यावेळीं २३ वर्षांचें होतें. त्याच्या वयाच्या मानानें त्याचें हें कृत्य कौतुकार्ह होतें.

परंतु ओवेन, फोरिअर व प्राउधन या कल्पनावादी लेखकांच्या विचारांचेंच अनुकरण एंजल्सनें आपल्या या पुस्तकांत केलें होतें. ओवेननें चालविलेल्या "न्यू मॉरल वर्ल्ड" या मासिकांत एंजल्सचे कांहीं लेख प्रसिद्ध झाले. यातही एंजल्सचे भावनाप्रधान हृदय अधिकच प्रगट झालें. समाजातील दोषाचें विवरण करताना व त्याचें निरसन कसें करावयाचें याचा विचार करताना मानवी स्वभावातील दया, प्रेम, न्याय वगैरे भावनांनाच त्यानें प्राधान्य दिलें होतें. या दोषाचें मूळ कशांत आहे याचा त्यानें विचार केला नव्हता. समाजात चालू असलेले हे झगडे देखील समाजाच्या प्रगतीच्या दृष्टीनें आवश्यक आहेत ही गोष्ट एंजल्सच्या लक्षांत आली नव्हती. कार्ल मार्क्सचें ह्याच्या अगदीं उलट होतें. त्यानें विरोधविकासवादाची कसोटी लावून जगांत अस्तित्वांत असलेल्या अनेक प्रकारच्या संस्कृतींतील कार्यकारणभाव शोधून काढले होते. विश्व अस्थिर आहे तेव्हा त्यांतील सर्वच वस्तु अस्थिर आहेत. सर्व धार्मिक, सामाजिक व नैतिक कल्पनाही अस्थिर आहेत. अशा परिस्थितींत मानवी समाजाचा जीवनकलह कोणत्या तत्वावर चालू आहे व कोणत्या परस्परविरुद्ध तत्त्वांच्या झगड्यामुळं मानवी स्वभावाची प्रगति होत आहे याचा विचार केला पाहिजे, या प्रगतीच्या आड कोणत्या व्यावहारिक अडचणी आल्या व त्या कशा दूर करण्यांत आल्या याचें सूक्ष्म अवलोकन आपण केले पाहिजे, समाजहिताच्या किंवा समाजोद्धाराच्या कितीही उच्च कल्पना डोक्यात आल्या तरी त्या प्रत्यक्ष अंमलात येण्यास मनुष्याच्या हृदयांतील अव्यक्त भावनांवर विश्वास ठेवून भागावयाचें नाही, तर त्याकरिता प्रत्यक्ष व्यावहारिक मार्गच शोधून काढले पाहिजेत, असा कार्ल मार्क्सचा सिद्धांत होता. मार्क्सच्या या विचारांची छाप एंजल्सच्या मनावरही पडली. एंजल्सला त्यानें व्यावहारिक जगांत आणून सोडले. मार्क्स स्वतः विरोधविकासवादी होता. एंजल्सलाही त्यानें आपणासारखेंच बनविलें.

# मत-प्रस्थापन

'फ्रँको जर्मन इयर बुक' मध्यें लेख लिहीत असतांना अर्थशास्त्राच्या अभ्यासाची आवश्यकता मार्क्सला अत्यंत तीव्रतेनें भासूं लागली होती. हें नियतकालिक बंद झाल्याबरोबर या विषयाचा अभ्यास मार्क्सनें अधिक कसोटीनें केला. समाजवाद व इतिहास या विषयाचा अभ्यास तर त्यानें चालूच ठेवला होता. एका विशिष्ट दृष्टीनें मार्क्स या विषयांचा अभ्यास करीत होता. भौतिक व आर्थिक दृष्ट्या विचार करून मानवी - समाजाच्या इतिहासाची प्रगति कोणत्या दिशेनें झाली, हें तो ठरवीत असे. मार्क्सला ही दृष्टि लाभल्यामुळें आतांपर्यंत त्याच्या ठिकाणीं दिसून येणारी संशयी व अनिश्चित वृत्ति नष्ट झाली होती. तो छिन्नसंशय झाला होता. मार्क्सनें याच सुमारास (इ.स. १८४४) 'पवित्र कुटुंब' या नांवाचें एक पुस्तक लिहिलें. या बाबतींत एंजल्सनेंही त्याला थोडी मदत केली होती. या पुस्तकांत मार्क्सनें आपल्या ऐतिहासिक सिद्धांतांचा उहापोह केलेला आहे. समाजवाद व अर्थशास्त्र या विषयांचा अभ्यास करून ज्या निश्चित निर्णयाला तो येऊन पोंचला होता त्याचेंही विवेचन त्यानें या पुस्तकांत केलें आहे. तत्त्वज्ञान, समाजवाद, इतिहास या सर्व विषयांतील अनेक अनीर्णित प्रश्नांचा विचार करून मार्क्सनें आपलें ठाम मत या पुस्तकांत प्रस्थापित केलें आहे. इंग्लंड व फ्रान्समध्यें प्रचलित असलेल्या नास्तिकवादांचें सोपपत्तिक विवेचन करून इंग्लिश व फ्रेंच नास्तिकवादांत कशा प्रकारची मतभिन्नता आहे हें मार्क्सनें या पुस्तकांत थोडक्यांत पण स्पष्ट रीतीनें दाखविलें आहे. ऐतिहासिक भौतिकवादाचा मूळ संस्थापक म्हणून मार्क्सची प्रसिद्धि आहे. 'पवित्र कुटुंबांत' मार्क्सच्या या सुप्रसिद्ध वादाचा उगम झालेला आढळतो. पुंजीवाले व मजदूर यांच्यांतील वर्गकलहांतच आजपर्यंतच्या सामाजिक क्रांत्यांचीं बीजें कशीं सांठविलीं आहेत, हें दाखविण्याचा प्रयत्न मार्क्सनें या पुस्तकांत केला आहे. समाजाच्या अनेक स्थित्यंतरांचा विचार करतांना ऐतिहासिक भौतिकवादाची चिकित्सक दृष्टि ठेवावी, आजपर्यंत चालत आलेली कायम ठशाची आध्यात्मिक श्रद्धालु दृष्टि ठेवूं नये, या गोष्टीचें महत्त्व

हेगेलच्या तरुण शिष्यमंडळाला पटवून द्यावें, हा देखील हें पुस्तक लिहिण्यांत मार्क्सचा हेतु होता. आपला जुना मित्र व पंतोजी ब्रूनो बोर याच्या जुन्या पुराण्या मतांचा चांगला समाचार मार्क्सनें या पुस्तकांत घेतला आहे. मानवी समाजाच्या इतिहासांत ज्या क्रांत्या झालेल्या आढळून येतात त्याच्याशीं विज्ञान व औद्योगिक प्रगति याचा कांहींएक संबंध नाहीं. मानवी समाजाच्या अंतःकरणांतील विचारक्रांति त्याच्या बाह्य क्रांतीला कारणीभूत होत असते हें ब्रूनोचें म्हणणें मार्क्सनें सप्रमाण खोडून काढलें आहे. समाजांत क्रांति घडून येत असतांना त्या काळांत कोणकोणते उद्योग-धंदे प्रचलित होते व जीवननिर्वाहाचीं कोणकोणतीं निकटवर्ती साधनें उपयोगात आणलीं जात होतीं, याचा विचार केल्याशिवाय सामाजिक क्रांतीच्या मूळ कारणाचा शोध लागावयाचा नाहीं असें मार्क्सचें म्हणणें होतें. ज्ञानेंद्रियें व विचार, देह व आत्मा यांचा परस्पर कांहींच संबंध नाहीं. जग बुडालें तरी मी स्वतंत्रच आहे, जगाचें मी कांहीं लागत नाहीं हें ब्रूनोनें म्हणणें तर मार्क्सला मुळींच मान्य नव्हतें. तसेंच विज्ञान व औद्योगिक प्रगति याचाही इतिहासाशीं कांहींच संबंध नाहीं, असें ब्रूनो बोर आपल्या लेखांत प्रतिपादन करीत असे. ब्रूनोचें अशा प्रकारचें द्वैती व विचित्र मत असल्यामुळ ऐतिहासिक क्रांतीच्या मूळ कारणांचा शोध त्याला लागला नाहीं. पृथ्वीवरील भौतिक उत्पादन-साधनांतूनच इतिहासाचा उगम होतो, ही साधी गोष्ट न समजल्यामुळें ऐतिहासिक क्रांतीचें कारण ब्रूनो वगैरे तत्त्वज्ञान्यांना इहलोकात सांपडलें नाहीं., तर या सर्व क्रांतीच्या मुळाशीं कांहींतरी अदृश्य दैवी कारणें असलीं पाहिजेत अशी कल्पना करून तेवढ्यावर त्यांनीं श्रद्धाळुपणानें आपलें समाधान करून घेतलें आहे. जगांत आजपर्यंत अनेक मोठमोठ्या क्रांतिकारक चळवळी घडून आल्या पण शेवटीं त्या अपयशीच ठरल्या. याचें कारण बहुजनसमाजाच्या तात्कालिक हितसंबंधांचें रक्षण करण्या-करिता त्या सुरू झाल्या होत्या व बहुजनसमाजाच्या संमतीनें त्या चालल्या होत्या, असें ब्रूनो म्हणत असे. ब्रूनो हा पक्का कल्पनावादी होता. तो अत्यंत भावनाप्रधान होता. जगांतील प्रत्येक घडामोडीच्या मागें प्रत्यक्ष व्यावहारिक परिस्थिति नसून एकादी बलशाली कल्पनामय भावना आहे, असें तो मानीत असे.

मार्क्सचा सिद्धांत याच्या अगदीं उलट होता. " सर्व ऐतिहासिक घडामोडी बहुजनसमाजाच्या हितरक्षणाकरितां झालेल्या आहेत. स्वातंत्र्य, समता इ. कल्पना जनतेंत उत्साह उत्पन्न करूं शकतील पण बहुजनसमाजाचें हित साधावयाचें हा हेतु चळवळीच्या मुळाशीं नसेल तर या चळवळीचें पाऊल कधींही पुढें पडावयाचें नाहीं. फ्रेंच राज्यक्रांतीचा हाच अनुभव आला. या क्रांतीच्या मुळाशीं असलेल्या कल्पनामय भावनांनीं मध्यम वर्गाला उत्साहित केलें पण या चळवळीमुळें बहुजनसमाजाचें प्रत्यक्ष हितरक्षण होत नाहीं, असें जेव्हां आढळून आलें तेव्हां ती चळवळ बहुजनसमाजाच्या मर्जीतून उतरली व ती शेवटीं अपयशी ठरली. " केवळ फ्रेंच राज्यक्रांतीचेंच नव्हे तर जगातील अनेक घडामोडींचीं उदाहरणें घेऊन मार्क्सनें आपलें हें म्हणणें सिद्ध करून दाखविलें आहे. आगस्ट (१८४४) मध्यें मार्क्सनें ' पॅरिस व्हार्वर्ट ' या नियतकालिकांत ' मार्जिनल् नोट्स् ' नांवाचा एक विस्तृत निबंध लिहिला. जर्मन तत्त्वज्ञानी अर्नोल्ड रूज याच्या मताचें खंडण या निबंधांत मार्क्सनें केलें आहे. जर्मनींतील ध्येयवादी मध्यमवर्गाच्या लोकांपेक्षां कामकरी बहुजनसमाजच कसा कर्तृत्ववान् ए तो, हें मार्क्सनें यांत सप्रमाण दाखविलें आहे.

पॅरिसमध्यें असलेल्या जर्मन कामकरीवर्गाची संघटना करण्याचें काम मार्क्सनें याच वेळीं सुरू केलें होतें. कल्पनावादी अराजकांच्या व समाजवाद्यांच्या जाळ्यांत हे लोक यावेळीं सांपडले होते. या लोकांना व्यवहारवादी बनवून संघटनाशक्तीच्या साहाय्यानें आपल्यावर रोजच्या रोज चालू असलेले अन्याय व जुलूम कसे नाहींसे करावयाचे ही गोष्ट त्यांना शिकवावयाची होती. मार्क्सला या कामांत थोडेंबहुत यशही मिळालें होतें. जर्मन कामकरीवर्गाची संघटना करण्याचें व त्याना आपलीं मतें पटवून देण्याचें काम करीत असतांना मार्क्सला त्यावेळचे कामकरीवर्गाचे पुढारी व तत्त्वज्ञानी हीन व प्राउधन यांच्याशीं दोन हात खेळावे लागले. एक कल्पनावाद या दृष्टीनें हीननें साम्यवादाचा विचार केला आहे. साम्यवाद हा एक कल्पनावाद आहे, असें हीनचें म्हणणें होतें. पण त्याची कल्पना मार्क्सला अर्थातच पसंत पडली नाहीं. प्राउधनच्या बाबतींत मात्र मार्क्सची थोडी निराशा झाली. ' मालमत्ता म्हणजे काय ' या पुस्तकांत प्राउधननें

हेगेलच्या विरोधविकासवादाचा थोडासा अवलंब केलेला मार्क्सला आढळला. हें पाहून प्राउधनला आपलीं मतें पटवून द्यावीं व हेगेलच्या तरुण शिष्यमंडळात त्याला सामील करून घ्यावें, असा त्यानें प्रयत्न केला. पण या बाबतींत त्याची निराशा झाली.

अशा रीतीनें मार्क्सचा जीवनक्रम चालू असतांना मार्क्सला व 'पॅरिस व्होर्वर्ट' मध्यें लेख लिहिणाऱ्या जर्मन लेखकांना १८४५ च्या जानेवारीमध्यें फ्रान्समधून हद्दपार करण्यांत आलें. प्रशियन सरकारच्या सूचनेवरूनच अर्थात् फ्रेंच सरकारनें हें कृत्य केलें होतें. मार्क्सनें पॅरिस सोडलें व आपल्या बाइलमुलांसह तो ब्रुसेल्स येथें येऊन राहिला. १८४८ च्या फेब्रुवारीत सर्व युरोपात क्रांतीचा प्रयत्न झाला. तोंपर्यंत मार्क्स ब्रुसेल्स येथेंच येऊन जाऊन होता. या दिवसांत मार्क्सनें आपला अर्थशास्त्राचा अभ्यास तसाच चालू ठेवला होता. एंजल्सनें आपला अर्थशास्त्रावरील सर्व ग्रंथसंग्रह मार्क्सच्या स्वाधीन केला होता. या अभ्यासाचें फल म्हणजे मार्क्सनें प्राउधनच्या मतांचें खंडण करण्याकरितां लिहिलेला 'तत्त्वज्ञानाचें दारिद्र्य' हा ग्रंथ होय. मार्क्सनें हा ग्रंथ १८४७ सालीं प्रसिद्ध केला.

'दारिद्र्याचें तत्त्वज्ञान' या प्राउधनच्या पुस्तकातील मतांचें खंडण करण्याकरिता कार्ल मार्क्सनें हा ग्रंथ लिहिला. प्राउधनच्या मताचें खंडण मार्क्सनें या ग्रंथात केलें आहेच पण याशिवाय सर्व कल्पनावादी समाजवाद्याचा खूप समाचार त्यानें यात घेतला आहे. इतक्या वर्षांच्या अर्थशास्त्राच्या व समाजशास्त्राच्या अभ्यासानंतर आपण कोणत्या निर्णयाला येऊन पोंचलों आहोंत हें मार्क्सनें या पुस्तकांत स्पष्टपणें ग्रथित केलें आहे.

प्राउधननें 'दारिद्र्याचें तत्त्वज्ञान' हा ग्रंथ लिहिला. त्यांतील मुख्य हेतु हा होता कीं, जर्मन तत्त्वज्ञान्यांचीं मतें इंग्लिश व फ्रेंच तत्त्वज्ञानी व अर्थशास्त्रज्ञ यांच्या मतांशीं कशीं जुळतीं आहेत हें दाखवावें. आपल्या पुस्तकांत हा हेतु बराच साधला आहे, असें प्राउधनला वाटलें म्हणून मार्क्सला मुद्दाम एक पत्र लिहून त्यानें आपलें पुस्तक वाचावें व त्यावर आपलें स्पष्ट मत प्रदर्शित करावें व वाटल्यास कडक टीका देखील करावी, अशी त्यानें त्यास विनंति केली. प्राउधनचीं मतें मार्क्सला मुळींच पसंत पडलीं नाहींत,

व तीं खोडून काढण्याकरितां त्यानें ' तत्त्वज्ञानाचें दारिद्य ' नांवाचें एक स्वतंत्र पुस्तकच लिहिलें. जर्मन तत्त्वज्ञान्यांची आपण महति गाइली, इंग्लिश व फ्रेंच अर्थशास्त्रज्ञांच्या पंक्तीला आपण त्यांना आणून बसविलें हें पाहून मार्क्सला बरें वाटेल व त्याचा आपल्याशीं स्नेह जमेल, अशी प्राउधनची कल्पना होती. पण परिणाम अगदीं उलट झाला. प्राउधन व मार्क्स याचीं मतें जुळलीं नाहींत व त्यांचा स्नेह तर कधींच जमला नाहीं. केवळ आधिभौतिक, तार्किक व क्रांतिकारी तत्त्वावर मार्क्सनें समाजसत्तावादाची उभारणी केली होती. प्राउधनचें मत याच्या अगदीं उलट होतें. समाजांतील आर्थिक कलह परस्परसहकार्यानें मिटवून शांततायुक्त मार्गानें राजसत्तेचें निर्मूलन करावें, समाज पूर्ण स्वावलंबी व्हावा, समाजांत शांति व व्यवस्था राखण्याकरितां राज्यसत्तेची त्याला मुळींच गरज लागूं नये व सर्वत्र शासनाभाव व्हावा, असें प्राउधननें म्हणणें होतें. आपल्या मताची प्रस्थापना करण्याकरितां समाजसत्तावाद्यांच्या निरनिराळ्या पंथांवर व त्यांच्या पुढाऱ्यांवर पूर्वग्रहदूषित होऊन त्यानें सडकून टीका केली होती. मार्क्सला अर्थातच ही गोष्ट आवडली नाहीं. त्यानें अत्यंत तर्कशुद्ध-पद्धतीनें प्राउधनचीं सर्व विधानें व सर्व मतें सप्रमाण खोडून काढलीं. आणि त्याच वेळीं समाजांतील आर्थिक व ऐतिहासिक घडामोडींच्या मुळाशीं कोणतीं कारणें असतात व अशा घडामोडी होणें कसें आवश्यक असतें हें त्यानें दाखवून दिलें.

प्राउधनवर मार्क्सनें टीकांचा कितीही भडिमार केला व त्याच्या मताचें सपशेल खंडण केलें असलें तरी प्राउधन हा एक सच्चा व प्रामाणिक कार्यकर्ता होता. भांडवलशाहीच्या मगरमिठींतून कामकरीवर्गाची पूर्ण सुटका झाल्याशिवाय व भांडवलवाल्यांच्या हातीं असलेली राज्यसत्ता पूर्ण नष्ट झाल्याशिवाय बहुजनसमाजाचें हित होणार नाहीं, ही गोष्ट तो जाणून होता. तसेंच केवळ ध्येयवाद हृदयाशीं बाळगून किंवा मानवी समाजावर श्रद्धा ठेवून हें कार्य सिद्धीस जाणार नाहीं, याचीही त्याला जाणीव होती. पुराणमतवादी अर्थशास्त्रज्ञांनीं जें अर्थशास्त्र प्रचारांत आणलें होतें त्याच्यावरही तो मार्क्सप्रमाणें सडकून टीका करीत असे. कल्पना-

वादावरच विसंबून राहण्याइतका तो भावनाप्रधानही नव्हता. त्याच्या ठिकाणीं एकच उणीव होती व ती म्हणजे ज्या शास्त्रीय वादात तो पडला होता त्या शास्त्रासंबंधींचें योग्य तें ज्ञान त्याला झालेलें नव्हतें व या कामाकरिता जशा प्रकारची ऐतिहासिक चिकित्सक दृष्टि लागते तीही त्याला प्राप्त झालेली नव्हती. एकाच वेळीं एका बाजूला अफाट संपत्ति वाढत आहे व दुसऱ्या बाजूला भयंकर दारिद्रय पसरत आहे, हा डोळ्यादेखत घडत असलेला विरोध पाहून त्याचें चित्त होरपळून जात असे. उपयुक्तता–मूल्य, विनिमय–मूल्य, श्रमविभागणी, स्पर्धा, मक्तेदारी, यांत्रिक शक्ति, मालमत्ता, जमिनीवरील भाडें, व्याज, कर यांच्यामुळे समाजातील हा झगडा कसा वाढत आहे, हेंही तो पहात असे. "कोणत्याही देशांतील मजूर दरसाल समजा २० अब्ज रुपये किंमतीचा माल निर्माण करतात. परंतु त्याच मजुरांनीं आपल्या गरजा भागविण्याकरितां तो माल खरेदी केला तर त्याना २५ अब्ज रुपये द्यावे लागतात. कामकऱ्यांनीं निर्माण केलेल्या संपत्तीचा पाचवा हिस्सा अशा रीतीनें लुबाडला जातो. केवढा हा भयंकर अन्याय !" प्राउधनचा अशा प्रकारचा एक विशिष्ट सिद्धांत होता. प्राउधन आपल्या पुस्तकातून ॲडॅम स्मिथ, रिकार्डो वगैरे अर्थशास्त्रज्ञांच्या ग्रंथातील उतारे देत असे. तेव्हा त्यानें या विद्वानाचे ग्रंथ वाचले असले पाहिजेत यात शंका नाहीं. पण वरील सिद्धात पाहिला म्हणजे मूल्याच्या बाबतींतील महत्त्वाचीं लक्षणेंही त्याला माहीत नव्हती, असें म्हणावें लागतें. या अर्थशास्त्रज्ञाचीं मतें त्याला समजली असतीं व न्यायाच्या दृष्टीनें त्याच्यावर टीका करण्यास तो प्रवृत्त झाला असता, तर तोच सिद्धान्त त्यानें पुढीलप्रमाणें मांडला असता. कोणत्याही देशांतील मजूर, समजा २० अब्ज रुपयाच्या किंमतीचा माल निर्माण करतात. परंतु त्यांच्या कामाचा मोबदला म्हणून फक्त १० ते १२ अब्ज रुपये किंमतीचा माल त्यांना मजुरीच्या रुपाने मिळतो. हें न्याय्य आहे काय ! या प्रश्नाचा विचार अशा रीतीनें केला असता तर वेतन, मूल्य, नफा, भांडवल व त्याच्यातील विरोध यांचें मूळ स्वरूप काय, हें त्याला समजलें असतें. उत्पादनाच्या बाबतींत नाहीं तर फक्त विनिमयाच्या बाबतींतच फसवणुकीचा व चोरीचा व्यवहार चालू असलेला प्राउधनला दिसतो. तो स्वतःला असें विचारीत नाहीं कीं, जर कामकरी फक्त २० अब्ज रुपयांचाच माल निर्माण कर-

तात तर २५ अब्ज रुपये तो खरेदी करण्याकरितां कां लागतात ? या पांच अब्जांची वाढ होण्यास कोण जबाबदार आहे ? याप्रमाणें अनेक परस्परविरोधी प्रश्नांचा विचार प्राउधननें केला आहे. उदाहरणार्थ कोणत्याही वस्तूचें विनिमय मूल्य हें ती वस्तु निर्माण करावयास लागणाऱ्या श्रमावरून ठरत असतें. श्रम संपत्तीचें उत्पादन करतात. पण जसजशी संपत्ति वाढत जाते तसतसें विनिमय–मूल्य कमी होतें. संपत्तीची वाढ होण्यास श्रमविभाग हें एक परिणामकारण साधन आहे. पण श्रमविभागणी जसजशी वाढत जाते तसतसें मजूरांचें महत्त्व कमी होत जातें व यंत्रांतील अनेक घटकांप्रमाणें तोही एक घटकच बनून जातो. स्पर्धेमुळें मजूरांची संख्या वाढण्यास मदत होते परंतु त्याचबरोबर चांगल्यावाईट मालांची सरमिसळ करण्यास व दुसऱ्या अनेक प्रकारच्या लटपटी करण्यास उत्तेजन मिळतें व परस्परांमधील झगड्यांची प्रवृत्ति वाढते. करांचें प्रमाण संपत्तीच्या प्रमाणावर ठरविण्यांत आलें पाहिजे पण व्यवहार त्याच्या अगदीं उलट होतो. जसजसें दारिद्र्याचें प्रमाण जास्त तसतसें कराचें प्रमाणही जास्त, असें प्रत्यक्ष अनुभवास येतें. खासगी मालकीमुळें जमिनीची उत्पादनशक्ति वाढावयास पाहिजे पण तसें होत नाहीं. जमिनीचे मालक शेतकऱ्यांकडून जमीन काढून घेतात. शेतकऱ्याला जमिनीबद्दल आपलेपणा वाटेनासा होता व तिची उत्पादनशक्ति वाढविण्यास त्यास उत्तेजन मिळत नाहीं. याप्रमाणें प्राउधननें अर्थशास्त्रांतील अनेक विरोधात्मक स्थळें दाखविलीं आहेत. आणि या विरोधामुळेंच दारिद्र्याची सारखी वाढ होत आहे, असें तो म्हणतो. या परस्परविरोधांतूनच तिसरीच एक आर्थिक परिस्थिति निर्माण होईल. या परिस्थितींत जें चांगलें तें स्थिर राहील व जें वाईट व अनिष्ट असेल तें नष्ट होईल आणि शेवटीं न्यायाची प्रस्थापना होईल, असा प्राउधनचा सिद्धांत आहे. पुराणमतावर प्रस्थापित झालेला समाजवाद ही परिस्थिति निर्माण करूं शकणार नाहीं. कारण समाजाची आर्थिक उभारणी बंधुभाव, त्याग, प्रेम या तत्त्वावर झालेली नाहीं तर निसर्गाच्या निर्दय कायद्यांच्या हिशेबानें ती उभारण्यांत आली आहे. प्रामाणिक व सत्त्वशील अंतःकरणाच्या समाजसत्तावाद्यांनीं या उच्च ध्येयाचा महिमा गाइला आहे व लोकांच्या हृदयांत दैवी भावना उत्पन्न करण्याचा प्रयत्न केला आहे, पण

त्याचा उपयोग झालेला नाहीं. जीझस् ख्राइस्टच्या आत्मबलिदानाचें उदाहरण लोकांच्या मनावर परिणाम करूं शकलें नाहीं. असल्या बलिदानाची आवश्यकताही लोकांच्या मनाला पटलेली नाहीं. स्वार्थच शेवटीं बलवान् ठरला आहे. निर्दय व कडक न्यायाचा व अपरिवर्तनीय आर्थिक कायद्याचा आश्रय केल्यानेंच या स्वार्थाला विरोध करणें शक्य आहे. भूतदयामूलक व नीतिमूलक उत्साहानें संस्कृतीनें पाऊल कधींच फारसें पुढें पडलेलें नाही. समाजांतील असंतोष नष्ट करून कायदा व सुव्यवस्था यांचें रक्षण करण्यास व समाजाची धारणा करण्यास जिनसांच्या किंमतींतील फेरफारामुळें येणारीं आर्थिक अरिष्टेंच कारणीभूत झालीं आहेत. निसर्गानें म्हणा किंवा ईश्वरानें म्हणा मनुष्याच्या अंतःकरणात परस्परद्वेषच उत्पन्न केला आहे. परस्परावर प्रेम केल्यानें सर्वांचेंच हित होईल या तत्त्वावर लोकांचा विश्वास राहिलेला नाहीं. ईश्वराचा हेतु प्रकट करणारें म्हणून जें कांहीं शास्त्रीय संशोधन झालेलें आहे त्यामुळें मानवी समाजाची प्रगति झालेली नाहीं, तर उलट ईश्वराचे हेतु असे समाजविघातक कसे असतील, अशी शंका मानवी अंतःकरणांत उत्पन्न झाली आहे. कायद्याच्या साहाय्यानें कामगारवर्गाची संघटना करून किंवा राज्यकारभारविषयक सुधारणा घडवून आणून किंवा राज्यसत्ता काबीज करूनसुद्धां हा प्रश्न सुटावयाचा नाहीं, असें प्राउधनचें मत आहे. मानवी समाजात न्यायाची प्रस्थापना करण्याचा पुढील एकच उपाय प्राउधन सुचवितो व तो म्हणजे जो वर्ग निर्वाहाचीं साधनें प्रत्यक्ष निर्माण करतो त्याची स्वतंत्र संघटना करण्यात यावी व या वर्गांतील लोकांनीं जिन्नस निर्माण करण्यास जेवढे श्रम लागले असतील तेवढ्याच मोबदल्यांत इतर जिनसा घ्याव्या. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे व्यापारधंद्याची अशी व्यवस्था करण्यात यावी कीं, ज्यामध्यें पुरवठा व मागणी हीं दोन्हीही समप्रमाणांत राहतील.

'दारिद्याचें तत्त्वज्ञान' या पुस्तकांत प्राउधननें जे वरील विचार प्रकट केले आहेत त्यांना मार्क्सनें आपल्या 'तत्त्वज्ञानाचें दारिद्र्य' या ग्रंथांत चोख उत्तर दिलें आहे. अर्थशास्त्रविषयक प्रश्नांचा प्राउधननें जो विस्तारपूर्वक विचार केला आहे त्याचा समाचार मार्क्सनें या पुस्तकात घेतला आहे व प्राउधनचें अर्थशास्त्रविषयक ज्ञान किती कोतें व अर्धवट

होतें, हें सप्रमाण सिद्ध करून दाखविलें आहे. उत्पादनाच्या एका विशिष्ट परिस्थितीमध्यें यंत्राचा उपयोग करून मनुष्यें सुताचें व तागाचें कापड विणूं लागलीं, ही गोष्ट प्राउधनच्या लक्ष्यांत आली असली तरी उत्पादनाच्या सामाजिक परिस्थितीचा उत्पादकशक्तीशीं निकट संबंध असतो, हें प्राउधनला समजलेलें दिसत नाहीं, असें मार्क्स म्हणतो. नवीन नवीन उत्पादनशक्ति हातीं आल्याबरोबर उत्पादनपद्धतींतही बदल होतो, निर्वाहाचें साधन संपादन करण्याच्या पद्धतींत फरक होतो आणि यामुळें समाजाच्या राहणींतही फरक होतो. हातचक्की किंवा पवनचक्की रूढ होती त्यावेळीं लहान लहान प्रमाणावर कारखाने चालविणारे कारागीर ज्यात आहेत असा समाज निर्माण झाला, आणि बाष्पचक्की चालूं लागली त्यावेळीं मोठमोठे कारखाने चालविणारे भांडवलवाले पुढें आले व समाजांत भांडवलशाही सुरूं झाली. उत्पादनसाधनांच्या अनुरोधानें सामाजिक परिस्थितीला निरनिराळें वळण देण्यास जे लोक कारणीभूत होतात तेच लोक अर्थशास्त्रविषयक तत्त्वें व कल्पना निश्चित करीत असतात. म्हणूनच औद्योगिक प्रगतीला कार्ल मार्क्सनें फार महत्त्व दिलें आहे. औद्योगिक प्रगतींत बलशाली क्रांतिकारक सामर्थ्य सांठविलेलें असतें. औद्योगिक प्रगति होत असतांना श्रमशक्तीला जसजसें भिन्न स्वरूप प्राप्त होत असतें त्याप्रमाणें समाजाच्या राहणींत व परिस्थितींत क्रांति घडून येत असते. कोणता माल निर्माण करण्यांत येतो यावरून नव्हे तर कोणत्या साधनानें माल निर्माण करण्यांत येतो यावरून निरनिराळ्या वेळीं निरनिराळी समाजरचना कां प्रचलित झाली याची उपपत्ति लावता येते. भिन्न भिन्न सामाजिक कल्पना व प्रथा त्या त्या वेळच्या परिस्थितीनें व उत्पादनाच्या प्रचलित साधनांनीं निर्माण केलेल्या असतात. हे सर्व बदल कसे घडतात हें समजून घ्यावयाचें असल्यास ते घडून येण्यापूर्वीचा काल कशा प्रकारचा होता, त्याचप्रमाणें त्यावेळच्या सामाजिक कल्पना व प्रथा कशा प्रकारच्या होत्या, याचें काळजीपूर्वक संशोधन करावयास पाहिजे.

समाजांत जे अनेक कलह चालू आहेत व समाजातील निरनिराळ्या वर्गांना ज्या हालअपेष्टा भोगाव्या लागत आहेत त्या सर्व नष्ट झाल्या पाहिजेत आणि नीतिदृष्ट्या जें जें चांगलें आहे त्यावरच समाजाची रचना

करण्यात आली पाहिजे, असें जे समाजवादी व समाजक्रांतिवादी प्रतिपादन करीत असतात त्यांना मानवजातीच्या इतिहासाचें रहस्यच आकलन झालेलें नाहीं असे म्हणावें लागतें. हे सर्व लोक आध्यात्मिक व कल्पनामय दृष्टीनें विचार करीत असतात. भूतकालांतील घडामोडी कशा घडून आल्या, हे त्याना समजत नाहीं व आजची समाजरचना अशी कां आहे, याचेंही त्याना आकलन करतां येत नाहीं. यामुळें भूत व वर्तमान या दोन्ही कालासंबंधानें त्यानीं प्रकट केलेले विचार व निश्चित केलेले सिद्धान्त चुकीचे असतात. 'तत्वज्ञानाचें दारिद्र्य' या पुस्तकांत मार्क्सनें वरील विचार प्रदर्शित केले असून श्रमजीवी दलित मजूरवर्गानें आपल्यावर होत असलेले अन्याय नाहींसे करण्याकरितां कशा प्रकारचे संघटित प्रयत्न केले पाहिजेत याचेंही विवेचन मार्क्सनें या पुस्तकात केलें आहे. मजूरसंघाचें ऐतिहासिक महत्त्व व आवश्यकता पटवून देण्याकरिता मार्क्सनें एक स्वतंत्र प्रकरणच लिहिलें आहे. सर्व कल्पनावादी व पुराणमतवादी अर्थशास्त्रज्ञानीं मजूरसंघटनेच्या पुरस्कर्त्यांना कितीही सावधगिरीच्या सूचना दिल्या किंवा मजूरसंघटनेचा प्रसार होणें हें समाजावरील भयप्रद संकट आहे, असे कितीही प्रतिपादन केलें तरी भांडवलशाहीच्या जुलमांतून मुक्त होण्याकरिता मजूरसंघाचे प्रयत्न चालूच आहेत. परस्पराचे हितसंबंध सुरक्षित राहावे म्हणून समाजातील भिन्न भिन्न वर्गात कलह उत्पन्न होणें साहजिक आहे. आजच्या मजूरसमाजाची चळवळ म्हणजे समाजांतील एका अत्यंत मोठ्या वर्गानें आपले हितसंबंध रक्षण करण्याकरितां चालविलेली चळवळच होय. जीं उत्पादनसाधनें आज प्रचलित आहेत त्यामुळेच परस्पराना विरोध करणारे दोन वर्ग समाजात निर्माण झालेले आहेत. परस्पराना विरोध करणाऱ्या दोन शक्ति आज समाजांत वावरत आहेत हें रोजच्या अनुभवावरून स्पष्ट दिसत आहे. ज्या साधनानीं संपत्ति निर्माण होते तीच साधनें आज दारिद्र्यही वाढवीत आहेत. ज्या साधनांनीं उत्पादनसामर्थ्य वाढत आहे तींच साधनें दलितवर्गाच्या चळवळी दडपून टाकण्याच्या कामीं उपयोगी पडत आहेत. हीं साधनें एका बाजूला श्रीमंतांना जास्त श्रीमंत बनवीत आहेत तर दुसऱ्या बाजूला मजूरवर्गातील लोकांची संख्या वाढवीत आहेत व त्यांचें दारिद्र्यही वाढवीत आहेत. भांडवल-

प्रधान समाजातील या विरोधामुळें अर्थशास्त्रज्ञाच्या मतांमध्येंही क्रांति-घडून येते. समाजाच्या प्रचलित परिस्थितीचा पुरस्कार करणारे अर्थशास्त्रज्ञ वर्गकलह वाढविणें, हें निंद्य आहे असें ठरवून त्याचा निषेध करूं लागतात आणि या परिस्थितीतून मुक्त होण्याकरिता कल्पनावादात्मक मोठमोठ्या योजना आखूं लागतात. खरें पाहिलें असता मनुष्याच्या अंतःकरणांत वसत असलेल्या सद्गुणावर पूर्ण विश्वास ठेवून भांडवलदारवर्गांत त्या गुणाची वृद्धि करण्याचा प्रयत्न केल्यानें दलित समाजावर होत असलेले अन्याय व जुलूम नष्ट होत नाहीत. याकरितां दलित समाजाची संघटनाच केली पाहिजे व त्याला वर्गजागृतीचीं तत्त्वें समजावून देऊन त्याच्याकडून हे कलह चालविले पाहिजेत. कारण या वर्गजागृतिमूलक कलहांतूनच एका नवीन समाजाचा जन्म व्हावयाचा असतो. परंतु ही परिस्थिति देखील तेव्हांच निर्माण होते की, ज्यावेळीं उत्पादनसामर्थ्य प्रगतीच्या एका विशिष्ट मर्यादेला जाऊन पोहोंचलेलें असतें. आपण ज्याला दलित समाज असें म्हणतों तो तरी कसा निर्माण होतो? परस्परवर्गद्वेषाचें व कलहाचेंच तें एक फळ असतें. अर्थात् या दलितवर्गाची मुक्तता म्हणजेच एका नवीन समाजाची निर्मिती होय. दलित समाज स्वतःची मुक्तता करून घेण्याच्या कामीं समर्थ होण्यास त्याची संख्या व त्याच्यातील उत्पादनसामर्थ्यही एका विशिष्ट मर्यादेला पोहोंचावें लागतें. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे अत्युच्च कोटीला पोचलेलें उत्पादनसामर्थ्य म्हणजेच क्रांतिकारी सामर्थ्य होय. मजूरवर्गाची प्रचंड संख्या व वर्गजागृतीच्या तत्त्वावर झालेली त्याची प्रबल संघटना हींच समाजांत क्रांति घडवून आणतात. श्रमजीवी दलितवर्गाचा उद्धार झाला व त्याची पूर्ण मुक्तता झाली म्हणजे सहजच समाजातील सर्व वर्ग नष्ट होतात. समाजातील वर्ग नष्ट झाले म्हणजे त्याबरोबर समाजातील राज्यसंस्थाही नष्ट होतात. कारण राज्यसत्ता म्हणजे दुसरें कांहीं नसून समाजातील वर्ग कायम ठेवण्याकरितांच संघटित झालेली एक संस्था असते. श्रमजीवीवर्गावर जुलूम चालवून त्याला हवें तसें लुटतां यावें म्हणूनच राज्यसत्तेचा जन्म झालेला आहे. या कामाकरितांच ऐतखाऊ लुबाडणाऱ्या वर्गानें या सत्तेचा उपयोग केलेला आहे.

भांडवलदारवर्ग व मजूरवर्ग यांच्यांतील कलह म्हणजे समाजातील

एका वर्गानें दुसऱ्या वर्गाबरोबर चालविलेला लढा होय. हा लढा उत्कट स्वरूपाला पोंचला म्हणजेच राज्यक्रांति होते. तेव्हां कोणत्याही सामाजिक चळवळीचा राजकीय चळवळीशीं कांहीं संबंध नाहीं, असें म्हणतां यात्र्याचें नाहीं. आतांपर्यंत अशी एकही राजकीय चळवळ झालेली नाहीं कीं, जी समाजांत चालू असलेले अन्याय नष्ट करण्यास कारणीभूत झालेली नाहीं. किंबहुना सामाजिक अन्यायांचा नाश करण्यासाठींच राजकीय चळवळी सुरू होतात. अशा रीतीनें राजकीय चळवळ व सामाजिक चळवळ या दोन्हींही एकरूपच आहेत. ज्या समाजांत मुळीं वर्गच नाहींत त्यांतीलच सामाजिक प्रगतीची चळवळ राज्यक्रांतींत परिणत होत नाहीं. जोंपर्यंत अशा प्रकारची वर्गरहित समाजरचना निर्माण झालेली नाहीं तोंपर्यंत "लढा, नाहीं तर कायमचे नष्ट व्हा" हा महामंत्र दलितवर्गाला लक्ष्यांत ठेवावा लागेल. समाजांत चालू असलेल्या अन्यायाचा नाश करावयाचा असेल तर त्याला हा एकच उपाय आहे. 'तत्त्वज्ञानाचें दारिद्र्य' हा ग्रंथ मार्क्सनें वरील युद्धघोष जाहीर करूनच संपविला आहे. कम्युनिस्ट जाहीरनाम्याची ही नांदीच होती, असें म्हणण्यास हरकत नाहीं.

# कम्युनिस्ट जाहीरनामा

मार्क्सनें एका नवीन समाजरचनेचा पुरस्कार केला आणि तशीच एका नवीन आर्थिक सिद्धांताची प्रस्थापना केली, एवढ्यावरूनसुद्धां तो एक क्रांतिवादी पुरुष होता असें म्हणतां येईल. परंतु मार्क्स एवढें करूनच थांबला नव्हता. ज्या नवीन समाजरचनेचा त्यानें पुरस्कार केला होता तिची प्रस्थापना होण्यास राज्यक्रांति घडवून आणली पाहिजे असेंही त्याचें म्हणणें होतें. उत्पादनसाधनांवर समाजाची सत्ता प्रस्थापित झाल्याशिवाय वर्गरहित समाज अस्तित्वांत यावयाचा नाहीं व हीं साधनें समाजाच्या कबजांत यावयाचीं असल्यास राज्यसत्ताही समाजाच्या हातीं यावयास पाहिजे, असें मार्क्सचें म्हणणें होतें. त्याप्रमाणेंच ही क्रांति प्रत्यक्ष घडवून आणावयाची असल्यास सशस्त्र-शक्तीचाही उपयोग करावयास पाहिजे याही तत्त्वाचा पुरस्कार मार्क्स करीत असे. क्रांतिवादी म्हणजे त्यानें शस्त्रशक्तीचा पुरस्कार केला पाहिजे, अशी एक लोकप्रिय कल्पना आहे व या दृष्टीनेंही मार्क्स हा क्रांतिवादी होता, असें म्हणण्यास हरकत नाहीं. समाजरूपी पृथ्वीच्या पोटांत क्रांतीच्या स्फोटक द्रव्यांचा खळखळाट चालू आहे, हें मार्क्सच्या तीक्ष्ण कानाला ऐकूं येत होतें. या नवीन समाजरचनेसंबंधाचे विचार मार्क्सच्या मनांत ज्यावेळीं घोळत होते त्यावेळीं युरोपांत सर्वत्र क्रांतीचें वातावरण पसरलेलें होतें. १८४२ सालीं इंग्लंडांत मजुरांचा एक मोठा संप झाला. या संपाला सार्वत्रिक संपाचें स्वरूप प्राप्त होणार, अशी भीति इंग्लंडच्या भांडवलवाल्यांना वाटत होती. असा संप झाला तर इंग्लंडमध्यें राज्यक्रांति होईल, अशीही परिस्थिति निर्माण झाली होती. लवकरच राज्यक्रांति होणार अशी कल्पना १८४३ व १८४४ सालीं जर्मनींत तर सर्वत्र पसरली होती. सर्व मोठ्या शहरांतून समाजवादी नियतकालिकांचा प्रसार चालू होता. फ्रान्समध्यें तर या वाङ्मयाला जणूं काय ऊतच आला होता. अशा रीतीनें हें साम्यवादाचें पिशाच्च युरोपांत सर्वत्र थैमान घालीत होतें. चौथ्या फ्रेड्रिक वुइल्यमनें १८४८ च्या प्रारंभीं लोकसभेची बैठक बोलाविली. ही बैठक म्हणजे जर्मन राज्यक्रांतीचा एक शुभ मुहूर्तच होय, असें

लोक मानूं लागले होते. ठिकठिकाणीं घडून येत असलेल्या या परिवर्तनाचा परस्परसंबंध काय आहे, ही गोष्ट युरोपीय मुत्सद्याच्या लक्षांत आली होती. उद्योगधंद्याच्या वाढीबरोबर रेल्वे व तारायंत्रें याचाही सर्वत्र प्रसार झाला. यामुळे एकीकडे संपत्तीची वाढ होत चालली व दुसरीकडे दारिद्य वाढत चाललें, मजुराची संख्या वाढत चालली, मजुरांची संघटनाशक्ति वाढत चालली आणि मजुरी वाढवून घेण्याबद्दल मजूरवर्गाचे मालकवर्गांबरोबर कलहही सुरू झाले. बहुजनसमाजाला जसजसे जास्त राजकीय हक्क प्राप्त होत जातील तसतशी त्याच्या सुखात भर पडेल व बहुजनसमाज अधिक सामर्थ्यवान् होईल अशी लोकनायकांची खात्री होत चालली होती. इंग्लंड, फ्रान्स वगैरे युरोपीय देशांतून ज्या सामाजिक चळवळी चालू होत्या त्यावरून लवकरच सर्वत्र राज्यक्रांति होणार अशीं स्पष्ट चिन्हें दिसूं लागलीं होतीं. १८४३ सालीं मार्क्सनें अर्नोल्ड रूजला एक पत्र पाठविलें. "चौथ्या फ्रेड्रिक वुइल्यमच्या कारकीर्दीत जे राजकीय फेरफार घडून येत आहेत त्यावरून जर्मनींत लवकरच राज्यक्रांति होणार" असें आपलें मत मार्क्सनें या पत्रात प्रकट केलें होतें. रूजला या गोष्टीचें आश्चर्य वाटलें. मार्क्सच्या या मतावर त्याचा विश्वासही बसला नाहीं. मार्क्सचीं मतें मात्र दिवसेंदिवस अधिकाधिक क्रांतिकारक बनत चाललीं होतीं. कम्युनिझमचा विजय व्हावयाचा असेल तर राज्यक्रांति करून कामगारांनी सर्व राज्यसत्ता आपल्या हातीं घेणें आवश्यक आहे, असें या चळवळीच्या काळात मार्क्स मोठ्या जोराने प्रतिपादन करूं लागला होता.

मार्क्स यावेळीं ब्रुसेल्समध्यें होता. कामगारवर्गात जागृति करण्याचें कार्य पॅरिसप्रमाणें येथेंही त्यानें चालू ठेविलें होतें. ब्रुसेल्समधील जर्मन कामगारांत तो मोकळेपणानें मिसळत असे व त्याचे हक्क त्यांना समजावून देत असे. संघटना कशी करावी व आपल्या मतांचा प्रसार कसा करावा, हेंही तो त्यांना समजावून सांगे. व्याख्यानापेक्षां या विषयावर खासगी चर्चा करणें हें अधिक सोईस्कर व अधिक उपयुक्त होय, असें त्याला आढळून आलें होतें. या कामात एंजल्सनें त्याला पुष्कळच मदत केली. पॅरिस, कलोन, एल्बरफील्ड वगैरे शहरातून मार्क्सच्या नवमतांचा प्रसार त्यानें मोठ्या उत्साहानें केला. या कामीं पैशाची व इतर जी जी

मदत लागली ती ती सर्व त्यानें पुरविली. जर्मनीबाहेर युरोपांतील अनेक देशांतून राहाणाऱ्या जर्मन कामगारांची संघटना करण्याचें काम १८३६ पासूनच सुरू झालें होतें. या संघात इतर ठिकाणचे कामगार व त्यांचे पुढारी सामील झाले होते. "न्यायी संघ" हें या संघाचें नाव होतें. कामगारसंघाची ही चळवळ कांहीं देशांतून उघडपणानें चालविणें शक्यच नव्हतें. यामुळें संघाची मुख्य कचेरी अमुकच एका ठिकाणीं कायम ठेवणें शक्य झालें नाहीं. संघाची ही कचेरी युरोपातील अनेक शहरांतून फिरतां फिरतां १८४० मध्यें ती लंडनमध्यें आली होती. इतर ठिकाणांपेक्षां या शहरांत संघटनेचें कार्य अधिक मोकळेपणानें करता येत होतें. संघातील सभासदाचीं छोटीं छोटीं मंडळें काढून संघाच्या कार्याचा प्रचार चालू होता. या मंडळाचा परस्परसंबंध कायम राखण्याकरितां संघातर्फे लहान लहान कमिट्याही नेमण्यात आल्या होत्या. पत्रव्यवहाराच्या साहाय्यानें अर्थात् हें काम करण्यांत येत असे. कामगाराचा एक विद्वान् व उत्साही पुढारी म्हणून कार्ल मार्क्सची यावेळीं प्रसिद्धी झाली होती. पॅरिस व ब्रुसेल्स येथील मंडळानीं लंडन येथील मंडळाच्या सभासदांना ही गोष्ट कळविली होती इतकेंच नव्हे तर आपल्या कार्यांत मार्क्सची मदत घेण्यासंबंधानेंही त्यांनीं लंडनकमिटीला विनंति केली होती. 'न्यायी संघा'चें कार्य व त्याची कार्यपद्धति मार्क्सला पसंत पडली व मार्क्स या संघाला येऊन मिळाला. मार्क्स ब्रुसेल्समध्यें होता त्यावेळींसुद्धां त्याला आपल्या संघांत घेण्यासंबंधानें या मंडळांचा प्रयत्न चालू होता. कार्ल मार्क्स या संघाचा सभासद झाल्यावर एंजल्स थोडाच बाहेर राहणार! तोही या संघांत सामील झाला आणि अशा रीतीनें हे दोघेही विद्वान् व कळकळीचे कार्यकर्ते या संघाला मिळाले. मार्क्स व एंजल्स हे दोघे कामगारपुढारी संघाला येऊन मिळाल्यानंतर थोड्याच दिवसांनीं या संघाचें पहिलें नांव बदलून "समाजसत्तावादी संघ" असें नांव त्यास देण्यांत आलें. १८४७ च्या उन्हाळ्यांत व हिवाळ्यांत या संघाच्या दोन बैठकी लंडन येथें भरविण्यांत आल्या. दुसऱ्या बैठकीच्या प्रसंगीं मार्क्स व एंजल्स हे दोघेही सभासद या नात्यानें हजर होते. या बैठकींत संघाच्या कार्यप्रसारासंबंधानें बरीच चर्चा झाली व संघाच्या कार्याची दिशा स्पष्ट-पणें ठरविण्यांत आली. युरोपांत सर्वत्र या संघाच्या शाखा प्रस्थापित

करण्यात आल्या होत्या. या संघाचें काम एकसूत्रीपणानें चालण्याकरितां एका या कार्यक्रमाची अत्यंत आवश्यकता आहे, असें या संघाच्या मुख्य मुख्य कार्यकर्त्यांना वाटूं लागलें होतें. समाजसत्तावादी लोकांचें ध्येय व कार्य यासंबंधानें युरोपांतील भांडवलवाल्यांनी आपल्या हस्तकांच्या साहाय्यानें गैरसमज पसरविण्याचें काम जोरानें सुरू केलें होतें. समाजसत्तावादाविरुद्ध पसरविण्यात आलेल्या गैरसमजाचा निरास केल्याशिवाय कामगारवर्गात संघटनेच्या कार्याचा प्रसार करण्याचें कामही दिवसेंदिवस कठिण होत चाललें होतें. तेव्हां हे सर्व अडथळे दूर करण्याकरितां समाजसत्तावादी लोकांच्या तर्फे एक जाहीरनामा प्रसिद्ध करण्यांत आला पाहिजे असें या मंडळांतील सभासदांना वाटूं लागलें होतें. जाहीरनाम्याचा मसुदा तयार करण्याचें काम अर्थात् मार्क्स व एंजल्स यांना देण्यांत आलें. या जाहीरनाम्याचा कच्चा मसुदा एंजल्सनें तयार केला व हा मसुदा कोणत्या दृष्टीनें तयार करण्यात आला आहे, हेंही एंजल्सनें पॅरीसहून मार्क्सला कळविलें होतें. यानंतर थोड्याच दिवसांत या दोघा मित्रांनीं या मसुद्याचें काम पुरें केलें. या जाहीरनाम्याचीं एकंदर चार प्रकरणें असून त्यापैकीं पहिलीं दोन महत्त्वाचीं प्रकरणें पुढें दिलीं आहेत :—

जाहीरनामा:—

कम्युनिझमच्या पिशाच्चानें सर्व युरोपला पछाडलें आहे. पोप व झार, मेटरनिश् व गिझट, जहाल प्रजासत्तावादी म्हणविणारे फ्रेंच पुढारी व जर्मन-पोलिसांतील हेर हे सर्वच लोक युरोपच्या अंगात शिरलेल्या या पिशाचाला बाहेर घालविण्यास सिद्ध झाले आहेत. पुराणमतवादी युरोपांतील सर्व शक्ति याचा नाश करण्यास प्रवृत्त झाल्या आहेत.

आपल्याविरुद्ध असलेल्या पक्षाचा नाश करावयाचा झाला कीं, त्याला ‘ कम्युनिस्ट ’ म्हणावें व त्याची निंदा करावी असा जणूं काय रिवाजच पडला आहे. युरोपांत अधिकारारूढ झालेला असा कोणता पक्ष आहे की, ज्याने या उपायाचा अवलंब केलेला नाहीं !

या परिस्थितीमुळें दोन महत्त्वाच्या गोष्टी घडून आल्या आहेत:—

१ ‘ कम्युनिझम् ’ ही एक स्वतंत्र शक्ति आहे अशी मान्यता सर्व युरोपियन राष्ट्रांनीं दिली आहे.

२ कम्युनिस्ट पक्षानें उघडपणानें आपले हेतु काय आहेत, आपली ध्येयें कोणतीं आहेत व आपली विचारसरणी कशा प्रकारची आहे, हें सांगण्याची व मुलांना पाळण्यांत भिवविणाऱ्या या पिशाच्याच्या कल्पनेचा नाश करण्याची वेळ आतां आली आहे.

हा हेतु मनांत धरूनच जगांतील निरनिराळ्या राष्ट्रांतील कम्युनिस्ट पक्षाचे पुढारी लंडनमध्यें जमा झाले व इंग्रजी, फ्रेंच, जर्मन, इटालियन, स्पॅनिश व डॅनिश या भाषांतून प्रसिद्ध करण्याकरितां पुढील जाहीरनाम्याचा मसुदा त्यांनीं मंजूर केला :—

**१ भांडवलदार व कामकरी**— मानवी समाजाचा इतिहास म्हणजे समाजांतील निरनिराळ्या वर्गांत झालेल्या कलहांचा इतिहास होय.

धनी व गुलाम, श्रीमंत व गरीब, जमीनदार व कूळ, कारखानदार व मजूर, एका शब्दांत सांगावयाचें म्हणजे जुलूम करणारा व जुलमानें गांजलेला हे दोन्ही वर्ग आपसांत सारखे झगडत आले आहेत. या दोन्ही वर्गांनीं परस्पराशीं कधीं गुप्तपणें तर कधीं उघडपणें अव्याहत लढत चालू ठेविली आहे. या झगड्यांमुळें क्रांति होऊन समाजाची कधीं पुनर्रचना झाली आहे तर कधीं आपसांत झगडणाऱ्या या दोन्ही वर्गांचा सारखाच नाश झाला आहे.

प्राचीन कालांत समाजाची रचना बहुतेक सर्वच ठिकाणीं फार घोटाळ्याची असलेली दिसून येते. रोमन साम्राज्यांत सरदार, श्रीमंत, गरीब व गुलाम असे निरनिराळे वर्ग समाजांत होते. मध्ययुगांत संस्थानिक, जमीनदार, कारखानदार, मजूर, कारखान्यांत काम शिकण्याकरिता राहिलेले उमेदवार, जमिनीवर राबणारीं कुळें, असे अनेक वर्ग समाजांत पडलेले होते व त्यांच्या त्याच्या दर्जाप्रमाणें लहानमोठ्या जाति निर्माण झाल्या होत्या.

जमीनदारी पद्धतीवर उभारलेला पूर्वीचा समाज नष्ट होऊन त्यांतून आजचा भांडवलप्रधान समाज प्रस्थापित झाला आहे. पण त्यामुळें वर्गकलह मात्र नष्ट झालेला नाहीं तर उलट जुलूम करण्याच्या नवीन नवीन पद्धति व झगडण्याचे निरनिराळे प्रकार मात्र निर्माण झाले आहेत.

आजचें युग—भांडवलशाहीचें आजचें युग—एक विशिष्ट प्रकारचें आहे.

या युगाचें एक विशेष लक्षण आहे. वर्गयुद्ध चालविणें या युगांत सोपें झालें आहे. आजचा समाज दोन परस्परविरोधी वर्गांत विभागला गेला आहे. हे दोन्ही वर्ग परस्परांविरुद्ध लढण्याकरितां एकमेकासमोर ठाणी देऊन राहिले आहेत. हे दोन वर्ग म्हणजे भांडवलदार व कामकरी हेच होत. मध्ययुगांतील कुळांच्या वर्गांतूनच शहरांतील सरदार निर्माण झाले आणि या सरदारांतूनच पुढें भांडवलदाराचा वर्ग निर्माण झाला.

अमेरिकेचा शोध लागला व केप ऑफ गुडहोपला वळसा घालून जगांतील इतर देशाशीं दळणवळण चालविण्याचा मार्ग सोपा झाला, यामुळें भांडवलदारवर्गाला आपले हातपाय पसरण्यास संधि मिळाली. हिंदुस्थानचे व चीनचे बाजार, अमेरिकेंतील वसाहती, या वसाहतींमधून चालू झालेला व्यापार, विनिमयाच्या व व्यापाराच्या साधनांची सामान्यतः झालेली वाढ, या सर्वांमुळे व्यापार, उद्योगधंदे व नौकानयन यांना अभूतपूर्व उत्तेजन मिळाले आणि मोडकळीस आलेल्या जमिनदारी समाजांत नवजीवन संचारूं लागले.

जमीनदारी पद्धतीवर उद्योगधंदे चालू असल्यामुळें लहान लहान प्रमाणावर कारखाने काढून माल निर्माण करण्यांत येत असे; पण जगातील नवीन बाजारांत उत्पन्न झालेली मागणी पुरी करण्याइतका वरील मालाचा पुरवठा करणें अशक्य होऊं लागलें. यांत्रिक युगाला सुरवात झाली तेव्हा लहान लहान कारखान्याचे मालक बाजूला पडले. या कारखान्यातून काम करणारे लोकच आतां यंत्रावर काम करण्यास पुढें सरसावले. निरनिराळ्या लहान लहान कारखान्यातून जी श्रमविभागणी होत असे ती नष्ट होऊन एकाच कारखान्यात् आतां ही विभागणी होऊं लागली.

या मधल्या काळात बाजारांची सारखी वाढ होऊं लागली. मालाची मागणी भराभर वाढूं लागली. यंत्राच्या साहाय्यानें काम करणारा कारखानदारही आतां पुरे पडेनासा झाला. केवळ साध्या यंत्रानें आतां भागेनासें झालें. वाफशक्तीचा शोध लागल्यामुळें यंत्राची काम करण्याची ताकद पुष्कळ वाढली. वाफ आणि यंत्रें या दोघांनीं मिळून औद्योगिक उत्पादनाच्या साधनात क्रांति घडवून आणली. लहान लहान यंत्रें असलेले कारखाने नष्ट

झाले. त्या जागी आता प्रचंड कारखाने उभारण्यात आले. उद्योगधंदे चालविणारा मध्यम वर्ग मागें पडला व त्याची जागा कामकऱ्यांचें लष्कर—हें लष्कर हाताखालीं वागविणारे पुंजीवाले कारखानदार यांनीं बळकावली.

अर्वाचीन औद्योगिक व्यवसायानें जगड्व्याळ बाजारपेठ प्रस्थापिली. या प्रस्थापनेचा पाया प्रथम अमेरिकेच्या शोधानें घातला. या बाजारपेठेमुळें व्यापाराची प्रचंड भरभराट झाली व नाविक व युद्धकीच्या दळणवळणाला उत्तेजन मिळालें. अशा रीतीनें एकीकडे व्यापाराची भरभराट झाली व उद्योगवृद्धीला उत्तेजन मिळालें तर दुसरीकडे प्रतिक्रियेलाही सुरवात झाली. उद्योग, व्यापारधंदा, नौकानयन, रेल्वे यांची ज्या प्रमाणात वाढ झाली त्या प्रमाणात भांडवलशाहीचाही विकास होऊं लागला. भांडवल भराभर वाढत चाललें व मध्ययुगापासून चालत आलेला समाजांतील प्रत्येक वर्ग मागें पडूं लागला.

याप्रमाणें दीर्घकालपर्यंत विकासाच्या अनेक पायऱ्या चढून व विनिमय व उत्पादन यांच्या साधनांत अनेक प्रकारच्या क्रान्त्या घडून येऊन अर्वाचीन भांडवलशाहीचा उदय झाला आहे, ही गोष्ट आपल्याला समजून चुकली आहे. भांडवलशाहीच्या विकासाच्या प्रत्येक पायरीबरोबर या वर्गाच्या हातातील राजकीय सत्तेची वाढ झालेली आहे. प्रातिनिधिक तत्त्वावर उभारलेल्या लोकशाहीच्या आजच्या युगात तर या भांडवलदारवर्गानें संपूर्ण राज्यसत्ता आपल्या हातात घेतली आहे. अर्वाचीन राज्यकारभार चालविणारें कार्यकारी मंडळ म्हणजे भांडवलदारवर्गाची सर्व प्रकारची कामें करून देणारी मॅनेजिंग कमेटीच होय.

याप्रमाणें भांडवलदारवर्गानें ऐतिहासिकदृष्ट्या समाजक्रांतीच्या कार्यात बराच मोठा भाग घेतला आहे.

भांडवलदारवर्गाचें वर्चस्व जेथें जेथें प्रस्थापित झालें तेथें तेथें जमीनदारी पद्धतीमुळें समाजांत निर्माण झालेले पूर्वीचे परस्परसंबंध नष्ट झाले. कुटुंबांतील वडीलधाऱ्या माणसाचें कोणी ऐकेनासे झाले व त्याच्यासंबंधाची पूज्य भावना नष्ट झाली. समाजांत स्वभावतःच ज्यांच्याकडे पुढारीपणा आलेला असतो अशा अनुभविक वरिष्ठ मंडळींशीं ज्या ऋणानुबंधांनीं मनुष्य बद्ध

झाला होता ते सर्व ऋणानुबंध या वर्गानें अत्यंत निर्दयपणें तोडून टाकले. नागव्या स्वार्थापलीकडे माणसाची दृष्टि जाईनाशी झाली. रोजमुरा हेंच माणसामाणसांत परस्परसंबंध जोडणारें मुख्य साधन बनलें. धर्मभावनांमुळें उत्पन्न होणारा स्वर्गीय आनंद व परोपकारविषयक उदात्त भावना या वर्गानें स्वार्थपूर्ण हिशेबी वृत्तीच्या थंड पाण्यांत बुडवून टाकल्या. या वर्गानें माणसाला बाजारांत आणून उभें केलें. माणसाचें मोल पैशानें मोजण्यांत येऊं लागलें. व्यवहारात रूढ असलेले मनुष्याचे अनेक अखंड स्वातंत्र्याचे हक्क नष्ट होऊन त्या जागीं सत्यासत्य व सारासारविवेकशून्य अनिर्बंध व्यापाराच्या हक्काचें प्रस्थापन या वर्गानें केलें. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे धर्माच्या व राजकारणाच्या मोहक नांवाखालीं पूर्वी चालू असलेल्या गुप्त परस्वापहरणाला या भांडवलदारवर्गानें आतां उघड उघड लांछनास्पद, नागवें व पशूला शोभणारें असें स्वरूप दिलें आहे.

आजपर्यंत ज्या धंद्यांना समाजात मान देण्यांत येत असे त्यांचें पावित्र्य या भांडवलदारवर्गानें नष्ट केलें आहे. वैद्य, वकील, पुरोहित, कवी, वैज्ञानिक वगैरे सर्वांना या भांडवलदारांनी रोजंदारीचे मजूर बनविलें आहे.

आजच्या भांडवलप्रधान युगात कुटुंबांतील माणसांना एकत्र ठेवणारी परस्परप्रेमाची भावना नष्ट झाली असून आर्थिक दृष्टीनें हिताचें असेल तरच एकत्र राहावे, नाहीं तर तसें राहाण्याचें कारण नाहीं, अशी हीन वृत्ति भांडवलदारवर्गानें समाजांत निर्माण केली आहे.

मध्ययुगांत पाशवी शक्तीचें प्रदर्शन होत असे. समाजसत्ताविरोधी लोक या गोष्टीचें कौतुक करतात. पण या बलाचें साह्य घेऊन समाजांतील एक वर्ग आपल्याला सुखांत, चैनींत व आळसांत दिवस काढतां येतील अशी परिस्थिति कशी निर्माण करतो ही गोष्ट भांडवलदारवर्गानें आज उघडपणें सिद्ध करून् दाखविली आहे. मनुष्यानें मनांत आणलें तर तो काय काय करूं शकतो, हेंही भांडवलशाहीच्या आजच्या युगांत प्रत्यक्ष दिसत आहे. इजिप्तमधील पिरॅमिड, रोममधील प्रचंड प्रार्थनामंदिरें व तलाव यांनाही मागें टाकतील अशीं आश्चर्यें या युगांत निर्माण करण्यांत आलीं आहेत. प्राचीन कालीं अनेक राष्ट्रांनीं ज्या स्वाऱ्या केल्या व धर्मयुद्धें केलीं त्या

सर्वांनाही मागें टाकणाऱ्या स्वाऱ्या व युद्धें या भांडवलशाहीच्या युगांत घडविलीं जात आहेत.

उत्पादनाच्या साधनांत सारखी क्रांति घडवून आणल्याशिवाय भांडवलदारवर्ग जगूं शकत नाहीं. ही क्रांति घडून येत असतांना उत्पन्न झालेल्या मालाचा विनिमय करण्याच्या बाबतींतही क्रांति होते व त्याबरोबरच मानवी समाजांतील निरनिराळ्या वर्गांच्या परस्परसंबंधांतही क्रांति झाल्याशिवाय रहात नाहीं. याच्या उलट उत्पादनाच्या जुन्यापुराण्या पद्धतीचें जसेंच्या तसें रक्षण करीत राहणें, हें पूर्वीच्या धंदेवाल्यांचें आद्य कर्तव्य बनलें होतें. उत्पादनाच्या साधनांत सतत कांहीं ना कांहीं क्रांति घडून येत असावी, सामाजिक परिस्थितींत अव्याहत घोटाळे उत्पन्न व्हावे व सर्वत्र नेहमीं अस्वस्थता व चळवळ चालू असावी, असा अर्वाचीन युगांतला दंडक आहे. पूर्वीच्या युगांत व भांडवलशाहीच्या युगांत हाच मोठा फरक आहे. सर्व जुन्यापुराण्या चालीरीति व खुळ्या समजुती. या भांडवलशाही युगांत झपाट्यानें नष्ट होतात व सर्व नव्या कल्पना व चालीरीति समाजांत मूळ धरण्यापूर्वीच त्या जुन्या झाल्याप्रमाणें भासूं लागतात. जें जें कांहीं घनीभूत आहे अशी समजूत असते तें तें सर्व हवेंत वितळून जातें. जें जें कांहीं पवित्र म्हणून मानलें गेलेलें असतें तें तें सर्व भ्रष्ट म्हणून मानलें जातें आणि आपल्या भोंवतीं उत्पन्न झालेल्या खडतर परिस्थितीशीं मनुष्याला शेवटीं झगडावें लागतें.

वाढत्या पक्क्या मालाला खपविण्याकरितां सारखी वाढती बाजारपेठ पाहाणें जरूर असल्यामुळें भांडवलदारवर्गाला पृथ्वीचा सर्व कानाकोपरा धुंडून काढावा लागतो. त्याला प्रत्येक ठिकाणीं आपले पाय रोवावे लागतात व आपले व्यापारी संबंध प्रस्थापावे लागतात. अशा रीतीनें जगांतील बाजारपेठांची लूट चालवावी लागल्यामुळें प्रत्येक देशांतील मालाच्या उत्पादनाला व त्याच्या खपाला जागतिक स्वरूप द्यावें लागलें आहे. ज्या राष्ट्रीय वृत्तीच्या पायावर हे उद्योगधंदे उभे राहिले तो पायाच अशा रीतीनें भांडवलदारवर्गानें काढून टाकल्यामुळें समाजसत्ताविरोधी राष्ट्रभक्तांची निराशा झाली आहे. सर्व जुनेपुराणे स्थिर झालेले राष्ट्रीय धंदे या भांडवलशाहीच्या युगांत नष्ट झाले आहेत व रोजच्या रोज नष्ट होत चालले

आहेत. याची जागा नव्या उद्योगधंद्यांनी घेतली आहे. यामुळें सर्व सुधा-
रलेल्या राष्ट्रांपुढें जगावें कीं मरावें असा प्रश्न उत्पन्न झाला आहे. या नव्या
उद्योगधंद्यांना देशात उत्पन्न झालेला कच्चा माल पुरेसा होत नाहीं.
यामुळे जगातील अगदीं दूरदूरच्या प्रदेशांतून हा माल आणावा लागतो.
या नव्या कारखान्यात निर्माण झालेला माल केवळ स्वदेशात खपतच
नाहीं यामुळें जगातील प्रत्येक भागात नेऊन तो खपवावा लागतो. देशांत
निर्माण होणाऱ्या वस्तूंनी माणसाच्या जुन्या गरजा पूर्ण होत असत. पण
आता नवीन नवीन गरजा उत्पन्न झाल्या असून त्यांची तृप्ति करण्याकरितां
दूरदूरच्या व निरनिराळ्या हवापाण्याच्या प्रदेशात उत्पन्न झालेल्या वस्तूंची
आवश्यकता भासू लागली आहे. पूर्वीं कोणत्याही राष्ट्राला दुसऱ्या राष्ट्रा-
पासून अलग राहून स्वयंपूर्ण राहता येत असे. पण आता तसें राहिलेलें नाहीं.
जगातील सर्व राष्ट्रांना आतां एकमेकावर अवलंबून राहावें लागत आहे.
एकेकट्या राष्ट्राने स्वतंत्रपणें लावलेले बौद्धिक शोध आतां सर्व राष्ट्रांच्या
सामान्य मालकीचे झाले आहेत. कोणत्याही राष्ट्राला आता एकलकोंडे-
पणानें व संकुचित वृत्तीनें राहणे दिवसेंदिवस अधिकाधिक अशक्य होत
चाललें आहे. निरनिराळ्या राष्ट्रांमधून उत्पन्न होणाऱ्या वाङ्मयानेंही आता
एक नवीनच जागतिक वाङ्मय निर्माण केलें आहे.

उत्पादनाच्या व दळणवळणाच्या सर्व साधनात ज्या शोधी व सुधारणा
झाल्या आहेत त्याचा उपयोग करून भांडवलदारानी जगातील अगदीं मागास-
लेली रानटी राष्ट्रेंसुद्धा सुधारणेच्या कक्षेत आणून सोडलीं आहेत. भांडवल-
दारांनी आपल्या मालाच्या किंमती स्वस्त ठेवल्या असून या स्वस्त किंमत-
रूपी जड तोफांनी मागासलेल्या लोकांच्या राष्ट्राभोवतीं बांधलेले चिनी तट
फोडून टाकले आहेत. भांडवलदारानीं याच साधनाच्या साहाय्यानें मागास-
लेल्या राष्ट्रांना परक्या राष्ट्रासंबंधानें वाटणारा कट्टर द्वेष विसरावयास लावलें
आहे व त्यांना शरण जाण्यास भाग पाडलें आहे. भांडवलदारांनी सर्व
राष्ट्रांना उत्पादनाची सुधारलेली साधनें स्वीकारावयास लावलीं आहेत आणि
असें न केल्यास आपले अस्तित्वच नष्ट होईल अशी भीति त्यानीं या राष्ट्रांच्या
मनात उत्पन्न केली आहे. आपल्या समाजाची सुधारणा करण्यास म्हणजे
स्वतःच भांडवलदार होण्यास या राष्ट्रांना भांडवलदारानीं भाग पाडलें आहे.

तात्पर्य त्यांनी सर्व जगाला आपणासारखें करून सोडलें आहे.

सर्व राष्ट्रांवर आज शहरें राज्य करीत आहेत. ही परिस्थिति भांडवल-शाहीनें निर्माण केली आहे. भांडवलशाहीनें प्रचंड शहरें निर्माण केलीं असून खेड्यांत राहाणाऱ्या लोकांपेक्षा शहरांत राहाणाऱ्या लोकांची संख्या तिनें वाढविली आहे आणि या लोकांना खेडेगांवच्या अडाणी राहणींतून शहरांतील सुधारलेल्या राहणींत आणून सोडलें आहे. ज्याप्रमाणें भांडवल-शाहीनें अशिक्षित राष्ट्राला शहरावर अवलंबून राहावयास लावलें आहे त्याच-प्रमाणें रानटी व अर्धवट रानटी राष्ट्रांना सुधारलेल्या राष्ट्रांवर व पौर्वात्य राष्ट्रांना पाश्चात्य राष्ट्रांवर अवलंबून राहावयास लावलें आहे.

बहुजनसमाजाची, उत्पादनाच्या साधनाची व मालमत्तेची विस्कळित परिस्थिति भांडवलशाहीनें नष्ट केली आहे. सर्व जनतेला त्यानें एकत्रित केलें आहे आणि तसेंच थोड्या लोकांच्या हातांत भांडवल केंद्रीभूत केलें आहे. याचा अवश्यक परिणाम असा झाला आहे कीं, राजकीय सत्ताही केंद्रीभूत झाली आहे. स्वतंत्र व परस्परांशीं फारसा निकट संबंध नसलेले प्रांत आतां एका राष्ट्रांत समाविष्ट झाले आहेत. या प्रांतांचे पूर्वींचे निर-निराळे हितसंबंध, कायदे व त्यांच्या अम्मलबजावणीची पद्धति व त्यांचीं निरनिराळीं सरकारें हें सर्व नष्ट होऊन त्यांच्या जागीं एकच सरकार, एकच राष्ट्रीय हितसंबंध, एकच सरहद्द व करवसुलीची एकच पद्धति निर्माण झाली आहे.

भांडवलशाहीची सत्ता प्रस्थापित होऊन अद्यापि शंभर वर्षें लोटलेलीं नाहींत तोंच मागच्या सर्व पिढ्यांना मिळून जें करतां आलें नाहीं असें प्रचंड प्रमाणावर भांडवलशाहीनें उत्पादनसामर्थ्य निर्माण केलीं आहेत. निसर्गावरील माणसाची सत्ता, यंत्रसामुग्री, उद्योग व शेतकी यांच्या बाब-तींत शास्त्रीय शोधाची योजना, वाफेचीं गलबतें, आगगाड्या, तारायंत्रें, खंडेच्या खंडें लागवडीखालीं आणणें, नद्यांचे कालवे काढणें अशा प्रका-रचीं प्रचंड उत्पादनसामर्थ्यें सामाजिक श्रमशक्तीच्या उदरांत दडून राहिलीं आहेत अशी कल्पना तरी मागच्या शतकांत कोणाला आली होती !

ज्या उत्पादनाच्या व विनिमयाच्या साधनांवर भांडवलशाहीची इमारत उभारली गेली तीं सर्व साधनें जमिनदारी समाजांतच निर्माण झालीं होतीं,

हे आपण पाहिले आहे. उत्पादनाच्या व विनिमयाच्या साधनांची वाढ एका निश्चित प्रमाणापर्यंत पोंचल्याबरोबर पूर्वीची शेतीची व औद्योगिक पैदाशीची पद्धति अगदीं निरुपयोगी ठरली. पूर्वीची सरंजामी पद्धति म्हणजे या वाढीच्या पायांत तिला अडथळा करणारी जणूं काय एक बेडीच आहे असें वाटूं लागलें. सरंजामी पद्धतीच्या जागीं आता अनिर्बंध चुरशीचा अमल सुरू होऊन तिला पोषक अशीच भांडवलशाहीची आर्थिक व राजकीय सत्ता प्रस्थापित झाली आहे.

उत्पादन, विनिमय व मालमत्ता याच्या बाबतीत घडून आलेल्या क्रांतीमुळें निर्माण झालेला भांडवलदाराचा वर्ग एकाद्या जादूगारासारखा बनला आहे. या जादूगाराने उत्पादनाची व विनिमयाचीं प्रचंड राक्षसी साधनें निर्माण केलीं आहेत. पण गंमत अशी आहे कीं, भांडवलदारानी निर्माण केलेला हा राक्षस आतां त्याच्याच बोकांडी बसला आहे. मालाचें उत्पादन व खासगी मालमत्ता याच्यामुळें उत्पन्न झालेल्या हितसंबंधाविरुद्ध उत्पादकवर्गानें म्हणजे श्रमजीवी वर्गानें सारखें युद्ध चालविलें आहे, असें गेल्या बऱ्याच वर्षांच्या उद्योग व व्यापारधंदे याच्या इतिहासावरून दिसत आहे. या परिस्थितीत व्यापारधंद्याच्या बाबतींत पुनःपुन्हां आणीबाणीचे प्रसंग उत्पन्न व्हावे, हे साहजिक असतें. या प्रसंगानीं भांडवलशाहीच्या सत्तेला कसाला लावलें आहे इतकेंच नव्हे तर तिचें अस्तित्वच धोक्यांत आणलें आहे. या आणीबाणीच्या प्रसंगी केवळ उत्पन्न झालेला मालच नव्हे तर तो माल ज्यात उत्पन्न झाला ते कारखाने व त्यांत काम करणारा मजूरवर्गही नष्ट झाला आहे. उद्योगधंद्याच्या मुळावर आलेल्या या अरिष्टातून वेळोवेळीं एक साथ निर्माण होत असते व ती म्हणजे मालाची फाजील पैदास ही होय. असल्या साथीची कल्पनादेखील मागच्या युगांत वेडेपणाची वाटली असती. अशा प्रसंगीं सर्व समाजच एकाएकीं रानटी अवस्थेला पोंचलेला आढळून येतो. जणूं काय दुष्काळानें व सर्वनाशक विश्वव्यापी युद्धानें जीवननिर्वाहाचें प्रत्येक साधन नष्ट केलें आहे व उद्योगधंदे व व्यापार यांचा सत्यानास केला आहे, असें या साथीच्या वेळीं आढळून येतें. आणि या सर्वांचें कारण काय तर सुधारणेची परमावधि झाली, निर्वाहाच्या साधनांची वाजवीपेक्षां फाजील पैदास होऊं लागली आणि

उद्योगधंदा वाजवीपेक्षा फाजील वाढला! समाजाला उपलब्ध असलेलीं उत्पादनाचीं साधनें भाडवलदारांच्या मालमत्तेची वाढ करण्यास आतां असमर्थ झालीं आहेत. परिस्थितीच्या ज्या विशिष्ट मर्यादेंत या साधनांचा उपयोग करावा लागतो तिचें उल्लंघन करणें कठिण झालें आहे. ज्याक्षणीं ही मर्यादा सुटते, या साधनांचा दुरुपयोग करण्यात येऊं लागतो, आणि वाजवीपेक्षां फाजील माल उत्पन्न करण्यात येऊं लागतो त्याक्षणीं भाडवलदार समाजात अस्वस्थता माजू लागते व त्यांच्या मालमत्तेचें अस्तित्वच नष्ट होण्याचा प्रसंग येतो. भाडवलदार समाज शेवटी अशा स्थितीला जाऊन पोंचतो कीं, स्वतः उत्पन्न केलेली संपत्ति स्वतः आपल्या हातांत राखून ठेवणें त्याला अशक्य होऊन जाते. मग या अरिष्टातून हा समाज निभावून तरी कसा निघतो? यांतून निभावण्याकरिता एका बाजूला त्याला उत्पादनसाधनांचाच नाश करावा लागतो आणि दुसऱ्या बाजूला नवीन नवीन बाजार त्याला काबीज करावे लागतात व जुन्या बाजारांतील गिऱ्हाइकाना पिळून काढावें लागतें. यामुळें होतें काय तर अधिक मोठ्या प्रमाणावर व अधिक घातक अशी अरिष्टेंच तो आपल्यावर ओढवून घेतो आणि त्यांचा प्रतिबंध होईल अशा साधनांचा तो नाश करतो.

भाडवलदार समाजानें ज्या शस्त्रांनीं सरंजामी पद्धतीला धुळीला मिळविलें तीं शस्त्रेंच उलट त्याच्या आतां बोकांडीं बसलीं आहेत.

भाडवलदार समाजानें आपल्या मृत्यूला कारणीभूत होतील अशीं शस्त्रेंच तेवढी बनविलीं आहेत असें नव्हे तर ही शस्त्रें परजणारा अर्वाचीन मजूर समाजही— रोजंदारीवर राहाणारा समाज— निर्माण केला आहे.

जसजसा भाडवलदारवर्ग व त्याचें भांडवल ही वाढत चाललीं तसतसा अर्वाचीन मजूरवर्गही वाढत चालला आहे. जोंपर्यंत काम मिळतें तोंपर्यंत हा वर्ग जिवंत राहूं शकतो आणि या वर्गाला तोंपर्यंतच काम मिळतें कीं, जोंपर्यंत त्यांची श्रमशक्ति भाडवलाची वाढ करूं शकते. या मजूरांना आपले स्वतःचे देह अंशाअंशानें विकावे लागतात त्यामुळें बाजारांतील कोणत्याही पदार्थाप्रमाणें यांचे देहही विनिमययोग्य पदार्थ बनतात अर्थातच बाजारांतील स्पर्धा व भावाचे चढउतार यांचे नियमही या बाबतीत सारखेच लागू पडतात.

यात्रिक साधनाचा मोठ्या प्रमाणावर उपयोग होऊं लागल्यामुळें व श्रम-विभागणीमुळें मजूरवर्गाचें व्यक्तित्वच पूर्णपणें नष्ट झालें आहे आणि काम करण्यांत जो एक प्रकारचा आनंद वाटावयाचा तो त्याला वाटेनासा झाला आहे. कामकरी हा यंत्राचा एक पूरक बनला आहे. त्याचें काम अगदीं साधें झालें आहे पण कंटाळवाणें झालें आहे. आणि कोणतेंही नवीन काम करावयाचें म्हणजे मजूराला त्याचें कांहींच वाटेनासें झालें आहे. म्हणून मजूरवर्गाच्या उत्पादनाची किंमत म्हणजे त्याच्या उदरनिर्वाहाला लागणाऱ्या व त्याच्या वंशवृद्धीला जरूर असणाऱ्या साधनांची किंमत बनली आहे. परंतु पदार्थाची किंमत नेहमी त्याच्या उत्पादनमूल्याइतकीच असते. म्हणून कामाचें स्वरूप जितकें जितके हलकें व तिरस्करणीय तितका तितका मजुरीचा भावही कमी कमी होत जातो. इतकेंच नव्हे तर ज्या प्रमाणांत यंत्रांचा उपयोग वाढतो त्याच प्रमाणांत श्रमविभागणीही वाढते आणि त्याच प्रमाणांत श्रमशक्तीवर जास्त जास्त ताणही पडतो. कामाचे तास वाढविणे, ठराविक वेळात अधिक काम करून घेणें, यंत्रांची गति वाढविणें, इत्यादि अनेक प्रकारांनीं मजूरांच्या श्रमशक्तीवर बोजा लादण्यात येत असतो. अर्वाचीन उद्योगधंद्यानें पूर्वीच्या लहान लहान कारखान्यांच्या मालकांना मोठमोठ्या गिरण्यांचे भांडवलदार मालक बनविलें आहे. मजुराचे समूहचे समूह गिरण्यांतून गर्दी करून काम करूं लागले असून लष्करांतील शिपाया-प्रमाणें त्यांच्याकडून शिस्तीनें काम करून घेण्यांत येत आहे. औद्योगिक लष्करातील हे शिपाई कारखान्यांतील हपिसरांच्या व सार्जेंटांच्या हुकमती-खालीं देण्यांत आले आहेत. हे शिपाई भांडवलदार वर्गाचे व सरकारचेच केवळ गुलाम राहिले नसून तासचे तास काय तर दिवसाचे दिवस ते यंत्रांचे व फोरमनांचे गुलाम बनले आहेत. सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे व्यक्तिशः कारखान्यांतील मालकांचेच ते गुलाम बनले आहेत. नफा हेंच आपल्या कर्तबगारीचें अंतिम ध्येय होय, असें हे जुलमी भांडवलदार उघडपणें सांगूं लागले आहेत व त्यामुळें त्याचें वर्तन अधिकाधिक नीच, किळसवाणें व तिरस्करणीय बनलें आहे.

हातकामाच्या बाबतींत जितकें जितकें कमी कौशल्य व कमी श्रमशक्ति उप-योगांत येऊं लागते तसतसे पुरुषांचें काम करण्यास बायकाही पुढें सरसावू

लागतात. मजूरवर्गात लिंग व वय यांच्यांतील भेदाचें फारसें महत्त्व राहात नाहीं. लिंग व वय यांच्या भेदानुसार सर्वत्र कमीअधिक खर्चाचीं मजूरीचीं यंत्रें बनतात.

मजूराला रोजंदारीवर कामाला लावून कारखानदार त्याच्या श्रमाचें अपहरण करीत असतो. मजूर अशा रीतीनें रोजंदारीवर राहूं लागला म्हणजे त्याला पुन्हां लुटण्याकरितां जमीनदार, सावकार, दुकानदार, असे दुसऱ्या जातीचे भांडवलदार त्याच्यावर हल्ला चढवितात.

अर्वाचीन औद्योगिक युगांत लहान लहान व्यापारी, दुकानदार, धंदेवाले, कारागीर व शेतकरी हे सर्व रोजंदारवर्गात सामील होतात. कारण अर्वाचीन कारखाने ज्या प्रमाणावर चालविले जातात तितक्या मोठ्या प्रमाणावर ते चालविण्यास लागणारें प्रचंड भांडवल त्यांच्यापाशीं नसतें. मालाच्या उत्पत्तीच्या व व्यापाराच्या बाबतींत ते मोठमोठ्या भांडवलदारांशीं टक्कर देऊं शकत नाहींत. आणि उत्पादनाचीं नवीन नवीन साधनें अस्तित्वांत येऊं लागल्यामुळें त्यांची कारागिरी व हस्तकौशल्य निरुपयोगी ठरतें. याप्रमाणें जनतेच्या सर्व वर्गांतून रोजंदारवर्गात लोकांची जास्त जास्त भरती होऊं लागते.

रोजंदारवर्ग अशा रीतीनें एकदां निर्माण झाल्यावर निरनिराळ्या प्रकारें त्याची प्रगतीही होऊं लागते. जन्माबरोबरच भांडवलदारवर्गाशीं त्याचा लढा सुरू होतो. जो भांडवलदार मजुरांच्या श्रमाचें अपहरण प्रत्यक्ष व्यक्तिशः करीत असतो त्याच्याविरुद्धच अर्थात् हा लढा सुरू होतो. कामकरी व्यक्तिशःच प्रथम या लढ्याला तोंड पाडतो. नंतर सबंध कारखान्यांचे कामकरी मिळून ही लढत चालवूं लागतात आणि नंतर एका विशिष्ट क्षेत्रांतील कारखान्यांचे कामकरी संघटित होतात व या लढ्याला उग्र स्वरूप प्राप्त होतें. उत्पादनाला जें भांडवलदारी स्वरूप प्राप्त झालेलें असतें त्याविरुद्ध ते हल्ला चढवीत नाहींत तर उत्पादनसाधनें ज्या एका विशिष्ट वर्गाच्या ताब्यांत गेलेलीं असतात त्यांच्याविरुद्ध त्यांची मुख्य तक्रार असते. स्वस्त मजूरीवर पैदा केलेल्या आयात मालांच्या वखारींचा ते नाश करतात, यंत्रांची मोडतोड करतात, कारखान्यांना आगी लावतात.

व मध्ययुगातील कारागिराला समाजात जो दर्जा प्राप्त झालेला होता तो पुन्हा संपादन करण्याचा ते प्रयत्न करतात.

या परिस्थितीमुळें मजूरवर्ग अद्यापीही सर्व देशभर विस्कळित व परस्पर-स्पर्धेमुळें असंघटित असलेला आढळून येतो. जर एकाद्या ठिकाणीं ते आपला संघ बनवून संघटित झालेले दिसले तरी केवळ स्वतःच्याच स्फूर्तीनें हे लोक संघटित होतात असें नाहीं, तर भांडवलवाल्यांच्या एकीमुळें मजूरवर्गालाही एक व्हावें लागतें. आपले राजकीय हेतु साध्य करण्याकरितां भांडवलदारही रोजंदारवर्गांत चळवळ उडवून देत असतात आणि भांडवलदारांच्या कारस्थानाला हा वर्ग बळी पडतो. अशा परिस्थितींत रोजंदारवर्ग आपल्या शत्रूशीं लढत नाहीं तर आपल्या शत्रूच्या शत्रूंशीं लढत असतो. एकतंत्री राज्यसत्ता चालविणारापैकीं अवशेष राहिलेले राजघराण्यांतील लोक, जमीनदार, निरुद्योगी धनिक व सावकार हेच या रोजंदारवर्गाच्या शत्रूचे शत्रू होत. याप्रमाणें सर्व ऐतिहासिक घटना घडवून आणण्याचें काम भांडवलदारवर्गाच्या हातीं असतें. रोजंदार जनतेच्या साहाय्यानें मिळविलेला प्रत्येक विजय हा भांडवलदार वर्गाचाच विजय होतो.

पण उद्योगधंद्याच्या प्रगतीमुळें रोजंदारवर्गाच्या लोकाची संख्या वाढते इतकेंच नव्हे तर त्याचा अधिकाधिक मोठा समूह बनत जातो. त्याचें सामर्थ्य वाढत जातें आणि त्याची जाणीवही त्यांना अधिकाधिक होऊं लागतें. यंत्र ज्या प्रमाणात श्रमशक्तीला समानता प्राप्त करून देतें त्या प्रमाणात मजूरवर्गाच्या अनेक प्रकारच्या हितसंबंधांत व जीवनाच्या परिस्थितींतही अधिकाधिक साम्य आढळून येऊं लागतें व जवळ जवळ सर्वत्रच मजूरीच्या दराचें प्रमाण सारखेंच होऊं लागतें. भांडवलदारवर्गातील स्पर्धा वाढत असल्यामुळें व व्यापारधंद्यांत आणीबाणीचे प्रसंग येऊं लागल्यामुळें मजूरीच्या दराचें प्रमाण अस्थिर होऊं लागतें. अप्रतिहतपणें यंत्रांत सारख्या सुधारणा होत असल्यामुळें मजूरांचें जीवन अधिकाधिकच संकटमय होत जातें. मजूर व मालक यांच्यामधील व्यक्तिगत झगडे वाढूं लागतात व या झगड्यांनाच शेवटीं वर्गयुद्धाचें स्वरूप प्राप्त होतें. म्हणून कामकरीवर्ग भांडवलदारांविरुद्ध आपले संघ बनवूं लागतात. आपले मजूरीचे दर कायम टेवण्याकरिता ते चळवळ करतात व प्रसंगोपात्त कराव्या लागणाऱ्या

संपासारख्या बंडांतून तगून राहण्याकरितां आपल्या संघांना कायमची बळकटी आणतात. अशा रीतीनें ही चळवळ सुरू झाली म्हणजे इकडे तिकडे कोठें तरी सुरू झालेल्या या आपसांतील झगड्याला दंग्याचें स्वरूप प्राप्त होतें.

मजूरांना कधीं कधीं या लढ्यांत विजय प्राप्त होतो, पण तो कांहीं दिवसच टिकतो. तावडतोब दिसून येणाऱ्या परिणामावरून या झगड्याचें फळ अजमावयाचें नसतें तर मजूरांच्या सारख्या वाढत जाणाऱ्या संघबलावरूनच तें अजमावयाचें असतें. अर्वाचीन औद्योगिक युगांत दळणवळणाच्या साधनांत सारख्या सुधारणा होत असल्यामुळें ठिकठिकाणीं राहाणाऱ्या मजूरांचें परस्परांशीं संघटन वाढूं लागतें व त्यांचें संघबल वाढविण्यासही त्यामुळें मदत होते. ठिकठिकाणीं चालू असलेल्या स्थानिक झगड्यांना एकसूत्रांत गोंवण्यास असल्या परस्परसंघटनांची जरूरी असते. हे सर्व झगडे एकच स्वरूपाचे असल्यामुळें वर्गावर्गांतील या लढ्यांचें राष्ट्रीय झगड्यात रूपांतर होतें आणि प्रत्येक वर्गयुद्ध अशा रीतीनें राजकीय युद्धच होतें. मध्ययुगांत रस्त्यांच्या अभावामुळें दळणवळणांच्या साधनांची कांहींच सोय नव्हती. अशा कालांत त्यावेळच्या सरदारवर्गाला अडचणींच्या चोरवाटांच्या साहाय्यानें संघशक्ति वाढवून युद्धाची तयारी करण्यास शेंकडों वर्षे लागत असत. तें कार्य अर्वाचीन रोजंदारसमाजाला रेल्वेच्या व इतर दळणवळणाच्या सोयीमुळें कांहीं थोड्या वर्षांत साध्य करतां येऊं लागलें आहे.

अशा रीतीनें रोजंदारसमाजाची एक स्वतंत्र वर्ग किंवा एक स्वतंत्र राजकीय पक्ष या दृष्टीनें संघटना होऊं लागते. परंतु मजूरवर्गांतील परस्परस्पर्धेमुळें ही संघटना सारखी टिकूं शकत नाहीं. हा समाज पुन्हां पुन्हां विस्कळित होतो. पण ज्यावेळीं तो आपलें डोकें वर काढतो त्यावेळीं तो पूर्वीपेक्षां अधिक दृढनिश्चयी, एकनिष्ठ व बलशाली झालेला आढळून येतो. आणि भांडवलदार वर्गांतील दुफळीचा फायदा घेऊन आपल्या हक्कांचें व हितसंबंधांचें रक्षण होईल असे कायदे तो करून घेतो. मजूराकडून रोज दहा तासच काम करून घ्यावें असा कायदा इंग्लंडमध्यें याच मार्गानें पास करून घेण्यांत आला.

एकंदरींत जुन्या समाजांतील निरनिराळ्या वर्गांच्या परस्परसंघर्षणामुळें अनेक मार्गांनीं रोजंदारी समाजाचा विकास होत जातो. भांडवलदार-

वर्गाला प्रथम पूर्वीच्या सरदाराशीं व पुढे पुढे देशाच्या औद्योगिक प्रगतीच्या आड येणाऱ्या भांडवलदाराशींही सारखें युद्ध चालू ठेवावें लागतें आणि परदेशांतून आलेल्या भांडवलदाराशीं तर त्याना नेहमींच झगडावें लागत असतें. रोजंदारसमाजाच्या मनोभावनाना जागृत करून या लढायांतून भाग घेण्यास त्याना प्रवृत्त करण्याचें काम भांडवलदार वर्गातील लोकांना करावें लागतें व रोजंदारसमाजाची मदत मागावी लागते. याप्रमाणें राजकीय चळवळीच्या रणक्षेत्रांत बहुजनसमाज ओढला जातो. राजनीति युद्ध चालविण्याकरिता लागणारें राजकीय व सामान्य शिक्षण रोजंदार जनतेला भांडवलदार समाजाकडून दिलें जातें. हीच गोष्ट निराळ्या शब्दात सांगावयाची म्हणजे भांडवलदार समाजाशीं लढण्याकरिता लागणारीं सर्व युद्धाचीं साधनें बहुजनसमाजाला आयतींच प्राप्त होतात.

याशिवाय आणखी एक गोष्ट आपल्याला आढळून आली आहे ती ही कीं, औद्योगिक प्रगतीमुळे राज्यसत्ता हातीं असलेल्या वर्गातील पुष्कळ लोकांना झपाट्यानें रोजंदार जनतेंत सामील व्हावें लागतें किंवा सामान्य जनता ज्या निकृष्ट स्थितीत दिवस कंठित आहे तशी स्थिति आपल्यालाही प्राप्त झाल्याशिवाय राहाणार नाहीं असें भय त्याना वाटू लागतें. यामुळे हे लोकसुद्धा रोजंदार जनतेंत नवीन नवीन विचाराचा प्रसार करतात व त्याचीं मनें सुसंस्कृत करून त्याना कार्यक्षम बनवितात.

शेवटीं वर्गयुद्धाला ज्यावेळीं आणीबाणीचें स्वरूप प्राप्त होते त्यावेळीं जुन्यापुराण्या राज्यसत्ता चालविणाऱ्या वर्गातही दुफळी होते. त्यातील एक लहानसा वर्ग आपल्या समाजातून फुटून बाहेर पडतो व भविष्यकालीन राज्यसत्तेची सूत्रें ज्याच्या हातात येणार आहेत अशा क्रांतिकारी लोकाना येऊन मिळतो. ज्याप्रमाणें प्राचीन काळीं सरदार घराण्यातील कांहीं लोक राज्यक्रांतीच्या प्रसंगीं जमीनदार व भांडवलदार क्रांतिकारकाना येऊन मिळत असत त्याचप्रमाणें आतांही कांहीं ध्येयनिष्ठ भांडवलदार बहुजनसमाजाला येऊन मिळतात व सर्व चळवळीचा ऐतिहासिक दृष्ट्या सांगोपांग विचार करून क्रांतिकारक युद्धें चालविण्यास तयार होतात.

भांडवलदारवर्गाविरुद्ध प्रतिकार करण्याकरितां उभ्या असलेल्या सर्व वर्गांपैकी रोजंदारसमाजच फक्त खरा खरा क्रांतिकारी असतो. दुसरे सर्व

वर्ग हळूंहळूं निःशक्त होऊन अर्वाचीन औद्योगिक युगांत अखेर नष्ट होतात. रोजंदारसमाजाची उत्पत्ति वरील सर्व वर्गांतूनच झालेली असते.

कनिष्ठ मध्यमवर्गांतील लोक, दुकानदार, लहान लहान कारखानदार, कारागीर शेतकरी हे सर्व लोक मध्यमवर्गांतील घटक या नात्यानें आपलें अस्तित्व नष्ट होऊं नये म्हणून भांडवलशाहीविरुद्ध लढत असतात. यामुळेंच ते प्रत्यक्ष क्रांतिकारी होत नाहींत तर ते पहिल्यासारखेच पुराणमताभिमानी राहातात. इतकेंच नव्हे तर प्रसंगीं ते क्रांतिविरोधीही होतात, आणि इतिहासाचा पुढें चाललेला गाडा मागें ओढण्याचाही प्रयत्न करतात. कदाचित् ते क्रांतिकारी झालेच तर भविष्यत्कालीं आपणही रोजंदार समाजांत सामील होणार, हें त्यांना माहीत झालेलें असतें म्हणून ते तसे होतात. यामुळें केवळ आपले आजचे हितसंबंध रक्षण करण्याकरितांच हे लोक क्रांतिकारी बनत नाहींत तर आपले भावी हितसंबंध रक्षण करण्याकरितां ते क्रांतियुद्धाला तयार होतात.

समाजांतील अत्यंत निकृष्टावस्थेस पोंचलेला वर्ग या सामाजिक क्रांतींत कांहीं कांहीं प्रसंगीं सामील होतो. परंतु असल्या क्रांतींत भाग घेण्याऐवजीं क्रांतिविरोधी लोकांनीं दाखविलेल्या आमिषांना व लाचलुचपतींनाच तो जास्त भुलून जातो व क्रांतिविरोधी चळवळ चालविण्यास मदत करतो.

औद्योगिक युगांत रोजंदार जनतेच्या परिस्थितींतही बदल झालेला असतो. पुराण्या समाजांतील हा वर्ग तर निखालसच नष्ट झालेला असतो. आजच्या युगांतील रोजंदारसमाजांतील मनुष्यापाशीं कांहींच मालमत्ता राहिलेली नसते. भांडवलदारसमाजांतील मनुष्याची कौटुंबिक परिस्थिति व त्याचे आपल्या बायकामुलांशीं असलेले कौटुंबिक संबंध आणि रोजंदार समाजांतील मनुष्याची कौटुंबिक परिस्थिति व त्याचे आपल्या बायकांमुलांशीं असलेले कौटुंबिक संबंध यांत मुळींच साम्य असलेलें आढळून येत नाहीं. अर्वाचीन मजूरवर्ग व भांडवलशाहीशीं असलेले त्याचे गुलामगिरीचे संबंध हे मात्र इंग्लंड, फ्रान्स, अमेरिका, जर्मनी वगैरे सर्वच देशांतून एकसारखेच आढळून येतात. राष्ट्रीय वैशिष्ट्य व संस्कृति यांचा लवलेशही या मजुरांच्या ठायीं असलेला आढळून येत नाहीं. कायदा, नीति, धर्म या सर्वांची रचना

भांडवलदारसमाजानें कांहीं विशिष्ट हेतूनें केलेली असते व या सर्वांच्या मागें आपले हितसंबंध रक्षण करण्याचा लोभ दडून राहिलेला आढळून येतो.

समाजातील वरिष्ठ वर्गाचे हे लोक मजूरांच्या श्रमाचा अपहार करून आपल्याला प्राप्त झालेला दर्जा राखून ठेवण्याचा प्रयत्न करतात. अपहार करण्याच्या तत्त्वावर उभारलेली ही पद्धति नष्ट केल्याशिवाय रोजंदारांना उत्पादनाच्या साधनाची मालकी प्राप्त होत नाहीं. कांहीं तरी प्राप्त करून घ्यावयाचें व त्याचें रक्षण करावयाचें असें या रोजंदारसमाजापाशीं कांहींच राहिलेलें नसतें. सर्व व्यक्तिगत मालमत्ता व तिचें रक्षण करण्याची सर्व साधनें नष्ट करणें हेंच या समाजाचे जीवितकार्य होऊन बसतें.

पूर्वीच्या सर्व ऐतिहासिक चळवळी अल्पसंख्याक लोकांनीं चालविल्या व त्याही अल्पसंख्याक लोकांचे हितसंबंध रक्षण करण्याकरिताच चालविल्या असें दिसून येतें. रोजंदारसमाजानें चालविलेली चळवळ म्हणजे प्रचंड बहुजनसमाजानें आत्मजागृतीनें व स्वयंस्फूर्तीनें चालविलेली चळवळ होय. समाजाच्या वरच्या थरावर असलेल्या सत्ताधाऱ्याचा वर्ग हवेंत पार उडून गेल्याशिवाय आजच्या समाजाच्या तळाशीं असलेला रोजंदारवर्ग कोणत्याच प्रकारची हालचाल करूं शकणार नाहीं व आपला उद्धारही करूं शकणार नाही.

भांडवलदाराविरुद्ध रोजंदारांनीं चालविलेलें युद्ध प्रत्यक्ष नसलें तरी अप्रत्यक्ष रीतीनें प्रथम राष्ट्रीय स्वरूपाचेंच असतें. प्रत्येक राष्ट्रांतील रोजंदार जनतेला प्रथम स्वतःच्या देशांतीलच भांडवलदाराशीं दोन हात करावे लागतात व आपल्यावर होत असलेले जुलूम व अन्याय नाहींसे करून घ्यावे लागतात.

रोजंदारसमाजाच्या विकासाचें सामान्य स्वरूप दाखविण्याच्या हेतूनें आपसांतील या गुप्त कलहाचें वर्णन करण्यांत आलें आहे. आपसांतील हें युद्ध पुढे इतक्या मोठ्या प्रमाणात सुरू होतें कीं, त्याचें पर्यवसान क्रांतियुद्धात होतें. या युद्धात भांडवलदारवर्गाला उलथून पाडण्यांत येतें व रोजंदारवर्गाच्या सत्तेचा पाया घालण्यांत येतो.

जुलूम करणारे व जुलुमानें गांजलेले यांच्यांतील विरोधांतूनच नवीन

नवीन समाजरचना प्रस्थापित झाल्या आहेत. परंतु समाजांतील एकाद्या वर्गावर जुलूम करावयाचा असेल तर अगदीं गुलामासारखें कां होईना त्याला राहतां आलें पाहिजे इतकी तरी निश्चितता निर्माण करावी लागते. खंड देण्याची पद्धति अमलांत होती अशा कालांत खंडकरीसमाजांतील मनुष्य आपला दर्जा वाढवून घेण्याचा प्रयत्न करीत असे व जातीपंचायतीचा सभासद होत असे. तसाच एकतंत्री जमीनदारी सत्तेच्या जुवाखालीं मान देणारा मध्यम सुखवस्तुवर्गातील मनुष्यही भांडवलदारवर्गाशीं एकरूप होण्याचा प्रयत्न करीत असे. अर्वाचीन मजूराची परिस्थिति याच्या उलट आहे. उद्योगधंद्यांच्या प्रगतीबरोबर त्याची परिस्थिति सुधारण्याऐवजीं त्याचें रोजंदारी जीवित अधिकाअधिक निकृष्टच होत जातें. तो कंगाल बनत जातो. लोकसंख्येच्या व संपत्तीच्या वाढीच्या प्रमाणापेक्षा ही त्याची कंगाली अधिकाअधिक प्रमाणांत वाढत जाते. या परिस्थितीमुळें समाजांतील एक सत्ताधारी वर्ग म्हणून राहाण्यास व कायद्याच्या जोरावर जनतेच्या जीवावर चरत राहाण्यास भांडवलदारवर्ग नालायक ठरला आहे, हें लक्षांत ठेविलें पाहिजे. गुलामगिरीच्या युगांत गुलामाला जीवंत ठेवणें मालकाला प्राप्तच होतें व गुलामालाही आपल्या जीविताची निश्चिति प्राप्त झाली होती. आजच्या रोजंदारी गुलामगिरीच्या कालांत मालकवर्गाला मजूररूपी गुलामाचें जीवित निश्चित करतां आलेलें नाहीं. या कालांत मालक मजूररूपी गुलामाचें पोषण करत नाहींत तर हा गुलामच मालकाचें पोषण करीत आहे. मालकाची संपत्ति हा गुलामच वाढवीत आहे. यामुळें भांडवलदार वर्गाची सत्ताधारी वर्ग म्हणून राहण्याची नालायकी जास्तच वाढली आहे. अर्थातच असल्या भांडवलदार वर्गाच्या हाताखालीं राहणें समाजाला आतां अशक्य झालें आहे. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे भांडवलदार वर्गाचें समाजांतील अस्तित्वच अनुचित ठरलें आहे.

भांडवलदारवर्गाला जगावयाचें असेल तर त्याला भांडवलाची उभारणी केली पाहिजे व तें वाढविलें पाहिजे आणि भांडवलाची निर्मिति व वृद्धि करावयाची असेल तर रोजंदार निर्माण झाला पाहिजे. रोजंदारवर्गाचें अस्तित्व तर त्यांच्यांतील परस्परस्पर्धेवरच सर्वस्वीं अवलंबून असतें. भांडवलदारवर्ग अनिश्चितपणें कां होईना उद्योगधंद्याच्या प्रगतीस कारणीभूत होत असतो.

या प्रगतीमुळे विस्कळीत झालेला मजूरवर्ग एकत्रित येतो व त्याचा क्रांतिकारी संघ बनतो. याप्रमाणें ज्याच्या आधारावर भांडवलदारवर्ग मालाची उत्पत्ति करतो, औद्योगिक प्रगति घडवून आणतो आणि मालाची उत्पत्ति करून त्याच्यावर आपली मालकी गाजवूं पाहतो तो पायाच डासळून पडतो. एकंदरीत भांडवलदारवर्ग ज्यांना निर्माण करतो तेच त्याच्या नाशास कारणीभूत होतात व त्याचें दफन करण्यास लागणारा खड्डा खणून तयार करतात. यामुळें भांडवलशाहीचा नाश व रोजदारसमाजाचा विजय या दोन्ही गोष्टी सारख्याच अपरिहार्य होतात.

## २ रोजंदार व समाजसत्तावादी —

रोजंदारसमाजाशीं समाजवाद्यांचा कशा प्रकारचा संबंध आहे तें आतां आपण पाहूं.

मजूरसमाजातील अनेक दुसऱ्या पक्षांना विरोध करण्याकरिता म्हणून समाजसत्तावाद्यांनी आपला एक वेगळाच पक्ष निर्माण केलेला नाहीं. रोजदारसमाजाचे हितसंबंध व समाजसत्तावाद्यांचे हितसंबंध यांच्यातही कांहीं फरक नाहीं.

रोजदारवर्गाच्या चळवळीला कांहीं विशिष्ट वळण देण्याकरितां म्हणूनच त्यांनी एखादा स्वतंत्र पक्ष निर्माण केलेला नाहीं.

कम्युनिस्ट — समाजसत्तावादी — व मजूरांचे इतर पक्ष यांच्यात फक्त पुढील फरक आढळून येतोः— ( १ ) निरनिराळ्या राष्ट्रांतून रोजंदारसमाजानें चालविलेल्या राष्ट्रीय चळवळीच्या वेळीं रोजंदारसमाजाच्या हितसंबंधालाच समाजसत्तावादी प्राधान्य देतात. राष्ट्रीयत्वाच्या भावनेला ते विशेष महत्त्व देत नाहीत.

( २ ) भांडवलदारवर्गाविरुद्ध रोजंदारवर्गानें जी चळवळ चालविलेली असते तिच्या विकासाच्या निरनिराळ्या अवस्थांच्या प्रसंगीं या वर्गाच्या हितसंबंधांनाच ते विशेष जपतात.

प्रत्येक देशातील इतर सर्व मजूरपक्षापेक्षां कम्युनिस्ट पक्षाचे लोक आपली चळवळ अधिक नेटानें चालवितात. इतर सर्व पक्षांपेक्षां ते स्वतः अधिक पुढारलेले असतात. इतकेंच नव्हे तर इतर पक्षानाही ते प्रगतीचा

मार्ग दाखवून देतात. रोजंदारवर्गाची चळवळ कोणत्या धोरणानें चालवावी, वेळोवेळीं या धोरणांत कसा फेरबदल करावा तसेंच या चळवळीचें अंतिम ध्येय काय व तिचा अखेर परिणाम काय होईल या सर्व गोष्टींची जाणीव या पक्षांतील लोकांना झालेली असते; म्हणूनच अखिल रोजंदार जनतेला त्यांच्या उद्धाराचा मार्ग दाखविण्यास ते समर्थ झालेले असतात.

रोजंदारी मजूरांचा एक स्वतंत्र वर्ग बनविणें, भांडवलदारांचें वर्चस्व उलथून पाडणें व रोजंदारवर्गाला राजकीय सत्ता प्राप्त करून देणें हें इतर मजूरपक्षांप्रमाणें कम्युनिस्ट पक्षाचेंही ध्येय आहे.

सामान्यपणें सर्वांच्याच मालमत्तेचा नाश करणें हें नव्हे तर भांडवल-दारांच्या मालमत्तेचा नाश करणें, हाच समाजसत्तावादांतील विशेष आहे. मालाची पैदास करावी व त्याचा अपहार करावा हेंच अर्वाचीन भांडवल-दारांच्या खाजगी मालमत्तेचें दृश्य स्वरूप आहे. समाजांतील एका वर्गाला दुसऱ्याविरुद्ध उठवावें व पुष्कळ लोकांनीं काम करून निर्माण केलेल्या मालाचा थोड्या लोकांनीं अपहार करावा, हेंच भांडवलदारवर्गाच्या अपहार-नीतीचें मुख्य लक्षण होय.

या दृष्टीनेंच समाजसत्तावाद्यांच्या सिद्धान्ताचा एका लहानशा सूत्रांत निर्देश करतां येईल. तें हें सूत्र —" खाजगी मालमत्तेचा नाश."

प्रत्येक व्यक्तीला खाजगी जिंदगी संपादण्याचा हक्क असल्यामुळें त्याचें स्वातंत्र्य, त्याची स्वावलंबनाची वृत्ति व स्वतंत्रपणें काम करीत राहाण्याची त्याची आवड यांचें रक्षण होतें, अशी समजूत असून मनुष्यच्या या हक्काचाच नाश करण्यास कम्युनिस्ट लोक उद्युक्त झाले आहेत, असा त्यांच्यावर जो आक्षेप आहे तो खोटा आहे. छोट्या छोट्या कारागिरांनीं व शेतकऱ्यांनीं संपादन केलेल्या मालमत्तेचा नाश केला पाहिजे अशी आवश्यकता कम्युनिस्टांना कधींच वाटत नाहीं. या लहान लहान मालमत्तांतूनच श्रीमंतांची प्रचंड मालमत्ता निर्माण झाली आहे ही गोष्ट कम्युनिस्टांना माहीत असूनही तिचा नाश करण्याची जरूरी कम्युनिस्टांना वाटत नाहीं. कारण दिवसेंदिवस वाढत असलेल्या अर्वाचीन कारखान्यांनीं कारागिरांच्या व शेतकऱ्यांच्या छोट्या छोट्या माल-

मत्ताचा अगोदरच नाश केलेला आहे व रोजच्या रोज तिचा सारखा नाश होत चालला आहे.

रोजचें वेतन मिळवून मजुराला खाजगी जिन्दगी मुळीच संपादन करता येत नाहीं. रोजंदारीनें भांडवलाला जन्म दिला आहे. भांडवल म्हणजे अशा प्रकारची मालमत्ता होय कीं, जिच्या साहाय्यानें रोजंदाराच्या श्रमाचा अपहार करण्यांत येतो. अपहाराचें कार्य चालू राहाण्याकरितां सतत नवीन नवीन रोजंदार मजुरांची भरती झाल्याशिवाय हें भांडवल वाढतच नाहीं. आजकाल ज्याला मालमत्ता म्हणण्यात येते तिची उभारणी भांडवल व रोजंदारी यांच्या विरोधांतूनच झाली आहे. परस्परविरोधी असलेल्या या दोन्ही बाजूंचा आपण आता विचार करूं.

उत्पादनाच्या दृष्टीनें भांडवलदारी ही व्यक्तिगत बाब राहिली नसून सामाजिक बाब बनली आहे. भांडवलाची उत्पत्ति सामुदायिक प्रयत्नानें झालेली असते. पुष्कळ लोकांच्या संकलित प्रयत्नानेच नव्हे तर समाजातील सर्व घटकांच्या संकलित प्रयत्नानें भांडवलाला गति प्राप्त होते.

भांडवल याप्रमाणें वैयक्तिक नव्हे तर सामाजिक सामर्थ्य प्राप्त करून देण्याचें एक साधन आहे.

भांडवलाला सामाजिक मालमत्तेचें स्वरूप दिल्यानें किंवा तें समाजाच्या मालकीचें केल्यानें वैयक्तिक मालमत्तेचें सामुदायिक मालमत्तेंत स्थित्यंतर होतें असें नाहीं. जें कांहीं होतें ते एवढेंच कीं भांडवलाला सामाजिक स्वरूप प्राप्त होऊन त्याचे वर्गविषयक वैशिष्टय नष्ट होतें.

आता मजुराच्या प्रश्नाकडे वळूं.

कमींत कमी मजूरी हेंच रोजीच्या श्रमाचें सामान्य मूल्य होय. म्हणून रोजंदारीचा मजूर आपले श्रम खर्ची घालून जें कांहीं मिळवितो तें केवळ त्याचे जीवन कसेंबसें टिकून धरण्यापुरतें व तें वाढविण्यापुरतेंच असतें. मजुरानें स्वकष्टार्जित धन नष्ट करावें असा कम्युनिस्टांचा मुळींच हेतु नाहीं. मजुराची ही स्वकष्टार्जित मिळकत मानवी जीवनाचें रक्षण करण्यापुरती व त्याची पुनर्निर्मिति करण्यापुरतीच असते. दुसऱ्याला राबवावयास लावण्याइतकी शिल्लक त्याच्यापाशीं उरत नाहीं. मजूरीपैकीं थोडीफार शिल्लक बाजूला

ठेवून मजूर जीवंत राहात असतो. मजुराच्या जीवंत राहण्याचा उपयोग फक्त भांडवलदारांचें भांडवल वाढविण्याकरितांच होत असतो आणि या सत्ताधारी वर्गाच्या हितसंबंधांचें जोंपर्यंत रक्षण होत असतें, तोंपर्यंतच मजूरवर्गाला जीवंत राहता येतें. मजूरवर्गाच्या मिळकतीचें हें निकृष्ट स्वरूप नष्ट करावें, असाच कम्युनिस्टांचा हेतु आहे. कम्युनिस्टांना जें कांहीं पाहिजे आहे तें हेंच.

भांडवलशाही समाजांत मजुरीकरितां राबणाऱ्या मजुरांचा उपयोग भांडवल वाढविण्याकडेच होत असतो. समाजसत्तावादी समाजांत एकत्रित आलेला हा मजूरवर्ग मजुरांचें जीवन सुखसमृद्ध व आनंदमय करण्यास साधनीभूत होत असतो.

म्हणून भांडवलशाही समाजांत भूतकालाचा वर्तमानकालावर पगडा असतो व समाजसत्तावादी समाजांत वर्तमानकाल भूतकालावर सत्ता गाजवितो. भांडवलशाही समाजांत अचेतन भांडवलाला स्वतंत्र व व्यक्तिगत जीवन प्राप्त झालेलें असतें आणि जीवंत मनुष्य मात्र या समाजांत परतंत्र होतो व त्याचें वैयक्तिक जीवन नष्ट होतें.

अशा प्रकारची परिस्थिति नष्ट झाली पाहिजे असें कोणी म्हटलें कीं, व्यक्तिस्वातंत्र्य व वैयक्तिक जीवन नष्ट करण्यांत येत आहे अशी ओरड भांडवलदारवर्ग करूं लागतो आणि हें खरेंच आहे. भांडवलदारांचें वैयक्तिक जीवन व त्यांचें स्वातंत्र्य नष्ट करण्याचा कम्युनिस्टांचा निःसंशय हेतु आहे.

आजच्या भांडवलशाही युगात खुला व्यापार व स्वतंत्र खरेदीविक्री अशीच स्वातंत्र्याची व्याख्या केली जाते.

पण खरेदी आणि विक्रीच जेथें अस्तित्वांत राहात नाहीं तेथें खुला व्यापार व खुला क्रयविक्रयही नष्ट होतो. मध्ययुगांत उद्योगधंदे व व्यापार यांच्यावर सर्व बाजूंनीं नियंत्रण घालण्यांत आलें होतें. या परिस्थितींत खुल्या व्यापाराच्या तत्त्वाला कांहीं तरी महत्त्व होतें पण समाजसत्तावादी समाजांत ज्यावेळीं क्रयविक्रयाचें व उत्पादनाचें भांडवलशाही स्वरूपच नष्ट झालेलें असतें व भांडवलशाहीही नष्ट झालेली असते, त्यावेळीं या शब्दांना कांहींच अर्थ राहात नाहीं.

खासगी जिंदगीचा नाश करण्याचा आमचा उद्देश आहे असें पाहताच तुमच्या उरात धस्स होतें. परंतु आजच्या अस्तित्वात असलेल्या समाजातील शें. ९९ लोकाची मालमत्ता अगोदरच नष्ट झालेली आहे. कांहीं थोड्या लोकाच्या हातात ही मालमत्ता आज समाविष्ट झाली आहे याचाच अर्थ या शे. ९९ लोकांच्या हातांतून ती नाहींशी झाली आहे. प्रचंड बहुजनसमाजाच्या हातांत जी जिंदगी राहावयास पाहिजे ती कांही थोड्या लोकांच्या हातात गेली आहे, तेव्हां तिचें स्वरूप बदलावें व ती पुन्हा समाजाच्या मालकीची करावी अशी कम्युनिस्टाची इच्छा आहे. मालमत्तेच्या नाशासंबंधानें कम्युनिस्टांवर जो दोषारोप ठेवण्यात येतो तो त्याच्या या वरील हेतूबद्दलच ठेवण्यात येतो.

थोडक्यांत सागावयाचें म्हणजे भांडवलदारांच्या मालमत्तेचा नाश करण्याचा आरोप कम्युनिस्टांवर ठेवण्यात येतो आणि तो खराही आहे. आम्हा कम्युनिस्टांचा हाच हेतु आहे.

ज्या क्षणापासून मजूराच्या श्रमाचे भांडवल, नफा व खंड वगैरेंत रूपांतर होत नाहीं व ज्या क्षणापासून व्यक्तिगत मालमत्तेला भांडवलाचें स्वरूप प्राप्त होत नाहीं त्या क्षणापासून मनुष्याचें वैयक्तिक वैशिष्ट्य नष्ट होऊन जाईल असें तुम्हां भांडवलदाराचें म्हणणें आहे. यावरून ' व्यक्ति ' म्हणजे भांडवलदार असेंच तुमचें म्हणणें असलें पाहिजे हें उघड आहे. असल्या व्यक्तीची अडचण दूर सारिली पाहिजे, नव्हे ती निर्माण होणेंच अशक्य करून टाकलें पाहिजे.

कोणी कोणताही माल निर्माण करूं नये व त्याचा उपभोग घेऊं नये असे कम्युनिस्टाचें म्हणणें नाहीं. उलटपक्षीं कोणालाही या उत्पादनाच्या जोरावर दुसऱ्याला राबावयास लावून त्याच्या श्रमाचा अपहार करता येऊं नये अशी परिस्थिति निर्माण करण्यात आली पाहिजे. कम्युनिस्टांना जें काय करावयाचें आहे तें हेंच आहे.

खासगी मालमत्तेचा नाश करण्यात आला तर सर्व व्यवहारच बंद पडेल आणि सर्व समाजावर आळसाचा पगडा बसेल असाही आक्षेप कोणी कोणी घेत असतात. हा आक्षेप खरा असेल तर आळसात बुडून गेलेल्या भांडवलदार समाजाचा यापूर्वी केव्हाच नाश होऊन जावयास

पाहिजे होता. कारण या भांडवलशाहीच्या युगांत जो राबतो त्याला कांहींच मिळत नाहीं व ज्यांना खूप फलप्राप्ति होते ते राबत नाहींत. वरील आक्षेप घेणें म्हणजे भांडवल असेल तर रोजंदारी राहील, तें नसेल तर रोजंदार मजुराला कोणी विचारणार नाहीं असे पुन्हां पुन्हां तेंच तेंच रडगाणें गाण्यासारखें आहे.

शारीरिक श्रम करून प्राप्त होणाऱ्या मालाचें उत्पादन कसें करावें व त्याचा उपभोग कसा घ्यावा या बाबतींत कम्युनिस्टांनीं जी पद्धति ठरविली आहे तिच्यावर ज्या प्रकारचे आक्षेप घेण्यांत येतात तशाच प्रकारचे आक्षेप बौद्धिक श्रमानें प्राप्त होणाऱ्या संपत्तीच्या उत्पादनासंबंधानें व तिच्या उपभोगासंबंधानें त्यांनीं ठरविलेल्या पद्धतीवरही घेण्यांत येतात. एका विशिष्ट वर्गाच्या हातांत सांठून राहिलेली संपत्ति नष्ट झाल्याबरोबर उत्पादनाचें सर्वच कार्य बंद पडेल असें भांडवलदाराला वाटत असतें. त्याचप्रमाणें एकाद्या विशिष्ट वर्गात आढळून येणारी संस्कृति नष्ट झाल्याबरोबर समाजांतील सर्वच संस्कृतीचा नाश होईल, असेंही त्याला वाटते. ज्या संस्कृतीच्या नाशासंबंधानें भांडवलदार शोक करीत असतो ती संस्कृति म्हणजे प्रचंड बहुजनसमाजाच्या दृष्टीनें मनुष्याला यंत्राप्रमाणें वागण्यास शिकविण्याचें एक साधनच होऊन बसली असते.

स्वातंत्र्य, संस्कृति, कायदा वगैरेंच्या संबंधानें भांडवलदारवर्गानें कांहीं विशिष्ट कल्पना करून घेतलेल्या आहेत. भांडवलदारांच्या मालमत्तेचा नाश करावा, असें समाजसत्तावादी कां म्हणतात, असें करण्यांत त्यांचा काय हेतु आहे, हें पाहावयाचें असेल तर वरील कल्पनांची कसोटी लावून त्यांचा विचार करण्यांत अर्थ नाहीं. भांडवलदारसमाजांत ज्या प्रकारची उत्पादनाची व मालमत्ता संपादन करण्याचीं साधनें अस्तित्वांत आलीं आहेत व त्यांमुळें जी एक विशिष्ट परिस्थिति निर्माण झाली आहे तींतूनच वरील कल्पनांचा उगम झालेला आहे. भांडवलदारांच्या न्यायदानासंबंधाच्या कल्पनाही अशाच प्रकारच्या आहेत. भांडवलदाराची इच्छा म्हणजेच कायदा. भांडवलदारवर्गाचें अस्तित्व कायम राहील, अशा प्रकारची आर्थिक परिस्थिति निर्माण करण्याच्या हेतूनेंच हे कायदे बनविण्यांत आलेले असतात.

भांडवलशाही समाजातील धनोत्पादनाच्या पद्धतीमुळें जी समाजरचना अस्तित्वात येते तिलाच कायमचें स्वरूप प्राप्त करून देण्याचा प्रयत्न करण्यांत येतो. निसर्गाच्या सनातन कायद्याप्रमाणें आपल्याही कायद्यांना सनातन व शाश्वत स्वरूप देण्याच्या खुळचट कल्पनेनें ते भारून गेलेले असतात. पूर्वीचा राज्यकर्त्यांचा वर्ग आपली सत्ता कायम करण्याकरितां अशाच प्रकारचा खुळचट प्रयत्न करीत असे. भांडवलदारांचा वर्गही त्याच चुकीच्या कल्पनेनें निसर्गाचे शाश्वत कायदेही बदलूं पाहात आहे. प्राचीन कालांतील राजेरजवाड्यांच्या मालमत्तेची जी अवस्था झाली व जमीनदारांच्या जिंदगीचेही जे धिंडवडे निघाले ते सर्व पाहात असतांनासुद्धां भांडवलदारसमाजाला आपली मालमत्ता मात्र नष्ट होणार नाहीं, असें वाटत असतें.

कौटुंबिक संस्थेचा नाश! कम्युनिस्टांची ही घाणेरडी कल्पना ऐकून जहाल क्रांतिवादीदेखील संतापानें बेहोष होतात.

भांडवलदाराची आजची कौटुंबिक संस्था ज्या कोणत्या पायावर प्रस्थापित झाली असेल तर ती भांडवल व नफा यावर होय. अशा कौटुंबिक संस्थेचा पूर्ण विकास व्हावयाचा असेल तर तो भांडवलशाही समाजातच होणार. ही परिस्थिति निर्माण व्हावयाची म्हणजे रोजंदार जनतेंतील कुटुंबांचा नाशच झाला पाहिजे व वेश्याव्यवसायाची वाढ झाली पाहिजे. ज्या परिस्थितीनें भांडवलदारी कुटुंबसंस्थेला जन्म दिला ती परिस्थितीच नष्ट झाली म्हणजे ही कुटुंबसंस्थाही नष्ट होईल आणि भांडवलच नष्ट झालें म्हणजे या दोन्ही कार्यकारणांचाही नाश होईल.

आईबापांना मुलांच्या श्रमाचा अपहार करूं देण्यात येणार नाहीं असा कम्युनिस्टांवर आणखी एक आरोप आहे. हा आरोप आम्हां कम्युनिस्टांना कबूल आहे.

आईबापांकडून मुलांना घरांतून जें शिक्षण मिळते तें बंद करावयाचें, आईबापाशीं मुलांचा असलेला पवित्र संबंध नष्ट करावयाचा व शिक्षणाकरिता मुलांना सामाजिक संस्थांच्या स्वाधीन करावयाचें, हें योग्य आहे काय असें विचारण्यांत येतें.

पण आजच्या भांडवलशाही युगांत तरी कशा प्रकारचें शिक्षण देण्यांत येत

आहे! मुलांना आज जें शिक्षण मिळत आहे तेंसुद्धां सामाजिक शिक्षण-संस्थांतूनच मिळत नाहीं काय! आजच्या सामाजिक परिस्थितीचा या शिक्षणसंस्थांवरही परिणाम झालेला नाहीं काय! शाळा, कॉलेजें वगैरे-सारख्या सामाजिक शिक्षणसंस्थांच्या द्वारेंच मुलांना शिक्षण देण्यांत येत नाहीं काय! सामाजिक संस्थांच्या द्वारें मुलांना शिक्षण देण्यांत यावें, हा नवाच शोध कम्युनिस्टांनीं लाविलेला नाहीं.

या शिक्षणाचें धोरण बदलावें एवढाच कम्युनिस्टांचा हेतु आहे व शिक्षणसंस्थांच्या धोरणावर राज्यसत्ताधाऱ्यांचा जो पगडा बसला आहे तो नाहींसा करावा, एवढीच कम्युनिस्टांची इच्छा आहे.

कौटुंबिक संस्था, गृहशिक्षण, आईबाप व मुलें यांचा पवित्र संबंध वगैरेंचा जो महिमा भांडवलदारसमाज गात असतो तो तर अत्यंत तिरस्करणीय आहे. अर्वाचीन औद्योगिक युगांत जी सामाजिक परिस्थिति निर्माण झाली आहे ती पाहिली म्हणजे तर तो अधिकच तिरस्करणीय वाटल्याशिवाय रहात नाहीं. भांडवलशाहीच्या या युगात रोजंदार जनतें-तील सर्व कौटुंबिक संबंध नष्ट झाले आहेत. रोजंदारांचीं मुलें तर बाजारां-तील विक्रीचे पदार्थ व श्रम करणारीं यंत्रें बनलीं आहेत.

तुम्हीं कम्युनिस्टांनीं बायकांना तर समाजाच्या मालकीच्याच बनविल्या आहेत, असा सर्व भांडवलदारसमाज एकमुखानें टाहो फोडत आहे. आपली पत्नी म्हणजे केवळ प्रजोत्पादनाचें साधन आहे, असें भांडवलदार समजतो. हीं प्रजोत्पत्तीचीं साधनें सर्वांनीं सारखींच उपयोगांत आणाव-याचीं आहेत, असें जेव्हां तो ऐकतो तेव्हां स्त्रियांवर सर्वांच्या आहारीं पड-ण्याचा प्रसंग येणार, अशी त्याची साहजिकच कल्पना होते.

प्रजोत्पत्तीचें केवळ एक साधन असा जो स्त्रियांचा दर्जा बनला आहे तो नाहींसा करावयाचा असा कम्युनिस्टांचा उद्देश आहे, ही गोष्ट चुकून-सुद्धां भांडवलदारांच्या लक्ष्यांत येत नाहीं.

अगदीं उघडपणें व सरकारी रीतीनें कम्युनिस्टांनीं स्त्रियांना समाजाच्या मालकीचें करून टाकलें आहे याबद्दल भांडवलदारसमाज आपला संताप व्यक्त करीत असतो. पण या गोष्टीसारखी हास्यास्पद गोष्ट दुसरी कोणतीच नाहीं. स्त्रियांनीं समाजाच्या मालकीचें व्हावें, त्यांना वेश्याव्यवसाय करणें

भाग पडावें असें करण्याची कम्युनिस्टाना गरज नाहीं. अनादि कालापासून ही प्रथा चालत आलेली आहे.

आजचा भांडवलदार आपल्या मजुराच्या बायका व मुली यांच्यावर मालकी गाजवितो. सर्वसामान्य वेश्यांची गोष्ट तर बोलावयासच नको. पण एवढ्यानें त्याच्या वासनांची तृप्ति होत नाहीं तर आपल्या समाजांतील परस्परांच्या स्त्रियाना वश करून घेण्यात तो आनंद मानतो.

खरें, पाहिलें असतां स्त्रियांना समाजाच्या सामान्य मालकीचें समजूनच भांडवलदार समाजातील आजची विवाहाची प्रथा प्रचारात आली आहे. कम्युनिस्टांना दोषच द्यावयाचा असेल तर तो एवढ्याचकरता देता येईल की, ते असल्या दांभिक व गुप्त व्यवहाराचा नाश करण्यास प्रवृत्त झाले आहेत. ज्या स्त्रियाना वेश्याव्यवसायच करावयाचा आहे त्याना उघड उघड कायदेशीर मदत देण्यास ते तयार झाले आहेत. परंतु बाकीच्याच्या बाबतींत ही गोष्ट स्वयंसिद्ध आहे की, आजची उत्पादनाची रूढीच नष्ट करण्यात आली तर स्त्रियाना समाजाच्या मालकीचें समजण्याची कल्पनाच नष्ट होईल म्हणजे सार्वजनिक व खाजगी रीत्या चालू असलेला वेश्याव्यवसाय बंद पडेल.

कम्युनिस्ट लोक राष्ट्र व राष्ट्रीयत्वाच्या कल्पना या दोहींचाही नाश करण्यास प्रवृत्त झाले आहेत असा त्याच्यावर आणखी एक आरोप आहे.

मजुराना देशच नाहीं. मुळातच जें त्याचें नाहीं तें त्यांच्याकडून आम्ही कम्युनिस्ट घेऊं शकत नाहीं. रोजंदारसमाजानें अगदीं प्रथम राजकीय सत्ता हस्तगत केली पाहिजे, राष्ट्रातील पुढारलेल्या सत्ताधारी वर्गाचा दर्जा त्याने प्राप्त करून घेतला पाहिजे, त्याने स्वतःच राष्ट्र बनलें पाहिजे. अशा दृष्टीने राष्ट्रीयत्वाचा उदय या समाजात झालेला दिसला तरी भांडवलदारसमाजाची या बाबतीत जी भावना दिसून येते तशा प्रकारची भावना रोजंदारसमाजाची असणार नाहीं.

भांडवलशाहीची वाढ, व्यापाराचें स्वातंत्र्य, दुनियेचा बाजार, उत्पादनाच्या पद्धतींतील साम्य आणि त्यामुळें मानवी जीवनात उत्पन्न झालेलें साम्य, यामुळें राष्ट्राराष्ट्रांतील भेदभाव व वैमनस्यें दिवसेंदिवस नष्ट होत चालली आहेत. रोजंदारसमाजाचें वर्चस्व वाढलें तर हा नाश अधिक लवकर होईल.

रोजंदारवर्गाचा उद्धार करावयाचा असेल तर पुढारलेल्या संस्कृत राष्ट्रांनीं तरी निदान एकजुटीनें या बाबतींत प्रयत्न केला पाहिजे.

ज्या प्रमाणांत एका व्यक्तीनें दुसऱ्याच्या श्रमाचा अपहार करण्याची प्रथा नष्ट होईल त्याच प्रमाणांत एका राष्ट्रानें दुसऱ्या राष्ट्राला लुटण्याची प्रथाही नष्ट होत जाईल. समाजांत अस्तित्वात असलेलीं वर्गावर्गांतील वैमनस्यें ज्या प्रमाणांत नष्ट होतील त्याच प्रमाणांत राष्ट्राराष्ट्रांतील वैमनस्येंही नष्ट होतील.

धार्मिक, तत्त्वज्ञानात्मक व सामान्यतः ध्येयात्मक दृष्टीनें कम्युनिस्टांवर जो आरोप लादण्यांत येतो त्याचा फारसा गंभीरपणानें विचार करावयास पाहिजे असें नाहीं.

मनुष्याच्या कल्पना, त्याचे विचार, त्याच्या भावना, या सर्व मनुष्याच्या ऐहिक जीवनांत व त्याच्या सामाजिक संबंधांत जशा प्रकारचे बदल घडून येतात त्याप्रमाणें बदलत असतात, हें समजण्याकरितां आंतरिक गूढ स्फूर्तीची मुळींच गरज नाहीं.

मनुष्याचें व्यावहारिक जीवन जसजसें बदलतें तसतसें त्याचें बौद्धिक जीवनही बदलतें. मनुष्याच्या उपजीविकेच्या साधनांत जसे बदल घडून येतात तसे मनुष्याचे विचारही बदलतात. मानवी कल्पनांचा व भावनांचा इतिहास तरी काय सांगतो? सत्ताधारी वर्गाच्या विचारांचाच पगडा प्रत्येक युगांतील समाजाच्या विचारांवर बसलेला असतो.

समाजांत क्रांति घडून येईल अशा प्रकारचे विचार लोक जेव्हां बोलूं-लागतात त्यावेळीं जुन्या सामाजिक कल्पनांतच या नव्या क्रांतीच्या विचारांची वाढ झालेली होती, असेंच ते सांगत असतात. मानवी जीवनाची जुनी घडी जसजशी मोडत जाते तसतसा जुन्या विचारांचाही नाश होत जातो, या सत्य तत्त्वाचेंच ते प्रतिपादन करीत असतात.

प्राचीन राष्ट्रें ज्यावेळीं नष्ट होण्याच्या पंथास लागलीं त्यावेळीं प्राचीन धर्मकल्पनांना खिस्ती धर्मकल्पनांनीं मागें टाकिलें. खिस्ती धर्मतत्त्वांचा लोकांच्या मनावर पगडा बसला. १८ व्या शतकांतील बुद्धिवादानें खिस्ती धर्मकल्पनांचा नाश केला त्यावेळीं सरंजामदारसमाजाला त्यावेळच्या क्रांतिकारी भांडवल-

दाराबरोबर आपलें मरणांतिक युद्ध लढावें लागलें. ज्ञानाच्या क्षेत्रांतील स्वतंत्र स्पर्धेनेंच धर्मस्वातंत्र्याच्या व विचारस्वातंत्र्याच्या कल्पनांना जन्म दिला.

" धार्मिक, नैतिक, तत्त्वज्ञानात्मक व न्यायविषयक कल्पना समाजाचा जसजसा विकास होत गेला तसतशा बदलत चालल्या, हें निःसंशय खरें आहे. पण धर्म, नीति, तत्त्वज्ञान, राजकारण, कायदा या सर्वांनीं या क्रांतीला सारखें तोंड दिलें आहे व आपलें अस्तित्व कायम राखलें आहे.

" याशिवाय स्वातंत्र्य, न्याय वगैरे कांहीं सनातन सत्य तत्त्वें आहेत व समाजाच्या सगळ्या अवस्थांत तीं सारखींच लागूं पडणारीं आहेत. परंतु समाजसत्तावादी या सर्व सनातन सत्याचा नाश करण्यास प्रवृत्त झाले आहेत. सर्व धर्म, सर्व नीति यांचाच ते नाश करीत आहेत. एकाद्या नवीन तत्त्वावर या सर्वांची प्रस्थापना करून त्यांना नवीन वळण देण्याऐवजीं ते त्यांचा समूळ नाशच करूं पाहात आहेत म्हणून समाजसत्तावाद्यांचें हें कृत्य मागील सर्व ऐतिहासिक अनुभवांविरुद्ध आहे."

समाजसत्तावाद्यावर केलेल्या या आरोपांत कितपत तथ्य आहे ! सर्व प्राचीन समाजाचा इतिहास म्हणजे दुसरें कांहीं नसून निरनिराळ्या काळीं निरनिराळ्या स्वरूपात प्रकट झालेलें वर्गयुद्धच होय, हेंच या इतिहासानें सिद्ध केलेले नाहीं काय !

या युद्धानें वेळोवेळीं कसल्याही प्रकारचें स्वरूप धारण केलेलें असो. सर्व प्राचीन युगातून एक गोष्ट मात्र सामान्यतः एकसारखीच दिसून येते व ती म्हणजे समाजातील एक वर्ग दुसऱ्या वर्गाला लुबाडतो ही होय. प्राचीन युगातील सर्व सामाजिक समजुती सर्वत्र सारख्याच आढळून येतात, यांत कांहींच आश्चर्य नाहीं. त्यांच्यांत कितीही भिन्नता व नावीन्य उत्पन्न झालें तरी त्यांचें एक विशिष्ट प्रकारचें सामान्य स्वरूप बदलत नाहीं. या समजुती तेव्हांच पूर्णपणें नष्ट होतात कीं, ज्यावेळीं वर्गयुद्धाचाही पूर्णपणें नाश होतो.

परंपरागत प्राप्त झालेल्या खासगी मालमत्तेच्या हितसंबंधातील स्वाभाविक विरोधामुळे होणारा खाजगी मालमत्तेचा समूळ उच्छेद म्हणजेच समाजसत्तावादी क्रांति होय. क्रांतिकारक कल्पनांचा जसजसा फैलाव होतो

वसलेल्या परंपरागत चालत आलेल्या रूढ समजुतीही नष्ट होऊं लागतात, यांत कांहींच आश्चर्य नाहीं.

समाजसत्तावादावर भांडवलदारसमाजातर्फे जे निरनिराळे आक्षेप घेण्यांत येतात त्यांचा विचार आतां पुरे झाला.

रोजंदारसमाजाला सत्ताधारी वर्गाचा दर्जा प्राप्त करून द्यावा व लोकसत्तेच्या लढयात त्यांना विजयी करावें हीच कामगारक्रांतीच्या युद्धांतील पहिली पायरी होय.

रोजंदारवर्ग आपल्या हातांतील राज्यसत्तेच्या जोरावर सर्व भांडवल भांडवलदारांच्या हातून हळूंहळूं हिसकावून घेईल. उत्पादनाची सर्व साधनें सरकारी मालकीची करील म्हणजेच रोजंदारसमाजाला संघटित करून राज्यसत्ताधारी बनवील आणि सर्वच उत्पादक शक्तींची शक्य तितक्या जलद वाढ करील.

अर्थात् मालमत्तेवरील हक्क व उत्पादनाच्या बाबतींतील भांडवलदारी पद्धति नष्ट करण्याकरितां प्रथम प्रथम जबरदस्तीचे उपाय योजावे लागतील. या उपायाच्या योगानें आर्थिक दृष्ट्या जरी फारसा फायदा झाला नाहीं तरी जुन्या समाजरचनेंत व उत्पादनाच्या पद्धतींत क्रांति घडवून आणण्याकरितां असले उपाय योजणें अगदीं अपरिहार्यच होतें.

अर्थात् देशपरत्वें हे उपाय भिन्नभिन्नही असूं शकतील.

असें असलें तरी चांगल्या बऱ्याच पुढारलेल्या देशांतून पुढील कार्यक्रमाचा सर्वसामान्यपणें अवलंब करता येईलः—

१ जमिनीवरील मालमत्तेचे हक्क नष्ट करण्यांत यावे व जमिनीवरील साऱ्याचा व खंडाचा उपयोग सार्वजनिक कामांत करण्यांत यावा.

२ प्राप्तीवर जबरदस्त व क्रमशः वाढता कर लादण्यांत यावा.

३ वारसाचे सर्व प्रकारचे हक्क नष्ट करण्यांत यावे.

४ देशत्याग केलेल्या सर्व लोकांची व बंडखोरांची मालमत्ता जप्त करण्यांत यावी.

५ राष्ट्रीय बँकेच्या साहाय्यानें राष्ट्राची सर्व पत सरकारच्या हातीं केंद्रीभूत करण्यांत यावी. या बँकेंतील सर्व भांडवल सरकारी असावें व बँका स्थापण्याचा सर्व अधिकार पूर्णपणें सरकारच्याच हातीं असावा.

६ दळणवळणाची व वाहतुकीची सर्व साधनें सरकारच्या हातांत केंद्रीभूत करण्यांत यावी.

७ सरकारच्या ताब्यांत असलेल्या उत्पादनाच्या साधनांची व कारखान्याची वाढ करण्यांत यावी. पडीत जमिनी लागवडीस आणाव्या. सर्वसामान्य ठरीव योजनेप्रमाणें जमिनींत सुधारणा करण्यांत याव्या.

८ काम करण्याची सर्वांना सारखीच आवश्यकता पडेल अशी कायद्यानें योजना करण्यांत यावी. कामगाराच्या सेना निर्माण करण्यांत याव्या. विशेषतः शेतकीकरितां या सेनेचा उपयोग करावा.

९ शेती व उद्योगधंदे यांचें एकीकरण करण्यात यावें. खेडयातून लोकसंख्येची अधिक सारखी वांटणी करून देऊन शहर व खेडेगाव याच्यातील भिन्नता हळूहळू नष्ट करण्यात यावी.

१० सरकारी शाळांतून सर्व मुलांना मोफत शिक्षण देण्यात यावें. कारखान्यात मुलांकडून जें काम करून घेण्यांत येतें त्याचें आजचें स्वरूप नष्ट करण्यात यावें. औद्योगिक उत्पादन व शिक्षण यांचें एकीकरण करण्यात यावें.

समाजाचा विकास होता होतां ज्यावेळीं वर्गभेद नष्ट होतील आणि समाजाच्या हातांत उत्पादनाचीं सर्व साधनें केंद्रीभूत होतील त्यावेळीं समाजाच्या हातीं असलेल्या सत्तेचें राजकीय स्वरूपही नष्ट होऊन जाईल. राज्यसत्ता म्हणजे सामान्यतः एका वर्गानें दुसऱ्या वर्गावर जुलूम करण्याकरितां मिळविलेली संघटित सत्ता होय. भांडवलशाहीबरोबर चालविलेल्या युद्धांत अपरिहार्य झाल्यामुळें रोजंदार आपला एक स्वतंत्र वर्ग या दृष्टीनें जर संघटित होईल, क्रांतीचा आश्रय करून हा वर्ग जर सत्ताधारी बनेल व जबरदस्तीनें उत्पादनाची जुनी परिस्थिति नष्ट करील तर वर्गविरोधाचीं सर्व कारणेच नष्ट होतील, समाजातील सर्व वर्ग सामान्यतः नामशेष होतील आणि शेवटीं एक स्वतंत्र वर्ग या दृष्टीनें रोजंदारवर्गाचेंही वर्चस्व नष्ट होईल.

जुना भांडवलशाही समाज, त्याच्यातील अनेक वर्ग व वर्गकलह नष्ट होऊन त्याच्या जागीं असा एक समाज निर्माण होईल कीं, ज्यांत प्रत्येक व्यक्तीच्या स्वैर विकासाला अवकाश मिळेल आणि यामुळें सर्वांचाच स्वतंत्रपणें विकास होईल.

जाहीरनाम्याच्या तिसऱ्या भागांत त्या कालांत प्रचलित असलेल्या अनेक समाज़वादांचा विचार करण्यांत आला आहे. सरंजामी समाजवाद, मध्यम वर्गीय समाजवाद, जर्मन समाजवाद अथवा सत्य समाजवाद, भाडवलदारी समाजवाद, वगैरे सर्व समाजवाद समाजसत्तावादाला विरोधी होते. या सर्व समाजवाद्यांचे पुरस्कर्ते समाजांतील अपहृत व अपहारक हे दोन्ही वर्ग कायम राखून अपहृत वर्गावर होणारे जुल्म शक्य तितके कमी करण्यांत आले पाहिजेत, असें प्रतिपादन करीत होते. या सर्वांचे कार्यक्रम भूतदयामूलक होते. म्हणून समाजसत्तावादाला विरोधी असणाऱ्या पंथांत मार्क्सनें त्यांची गणना केली आहे. या सर्व समाजवादांचा विचार करतांना त्यासंबंधानें वेळोंवेळीं जें वाङ्मय निर्माण झालें त्याचाही ऊहापोह या भागांत करण्यांत आला आहे. या सर्व समाजवादांत कल्पनामय समाजवादाला या जाहीरनाम्यांत सर्वांत जास्त महत्त्व दिलें आहे. तथापि हे कल्पनावादी एका दृष्टीनें समाजसत्तावादी समाजाच्या प्रस्थापनेला कसे विरोधी आहेत, हें दाखविलें आहे. विश्वव्यापी वैराग्याची व समाजसमतेची जी कल्पना या समाजवाद्यांनीं मांडली आहे ती मार्क्स व एंजल्स यांना अर्थातच मान्य नाहीं. समाजांतील प्रत्येक व्यक्तीनें स्वावलंबी बनलें पाहिजे, स्वतःची सुधारणा त्यानें स्वतःच करून घेतली पाहिजे, असे हे कल्पनावादी तत्त्ववेत्ते समाजांतील सर्व व्यक्तींना आग्रहानें सांगत असतात. राज्यसत्ताधारीवर्गाला तर ते याकरितां फारच कळकळीनें आळवितात. कल्पनावाद्यांची अशा प्रकारची विचारसरणी असल्यामुळें सर्वच राजकीय विशेषतः क्रांतिकारक चळवळींचा ते निषेध करतात. शांतिमय मार्गांनीं व लहान लहान प्रमाणांवर प्रयोग करून आपलें ध्येय साध्य होईल, अशी त्यांची कल्पना असते. स्वतःच उदाहरण घालून देऊन जनतेला हा संदेश पटवून द्यावा, असें त्यांना वाटत असतें. पण कल्पनावाद्यांचे हे प्रयोग कोठेंही यशस्वी झालेले नाहींत. त्यांच्या या विचित्र कल्पना फोल ठरल्या आहेत. कल्पनावाद्यांचें मुळचे संस्थापक पुष्कळ अंशीं क्रांतिकारी असले तरी त्यांच्या चेल्यांनीं मात्र समाजसत्तावादाला विरोधी असे पंथ निर्माण केले आहेत. वर्गकलह व वर्गविरोध ह्यांची तीव्रता कमी करण्याचा त्यांनीं एकसारखा प्रयत्न केला आहे. आपल्या या प्रयोगांनीं सामाजिक सत्ययुगाची प्रस्थापना होईल,

अशीं स्वप्नें या चेल्याना पडत असतात. नव्या जेरुसलेमच्या आवृत्त्यावर आवृत्त्या निर्माण कराव्या व आकाशातील हीं गंधर्वनगरें पृथ्वीवर अस्तित्वात यावीं, म्हणून भांडवलदाराची ते पायधरणी करतात व त्यांच्यापाशीं पैशाची मदत मागतात. अशा रितीनें हे लोक कल्पनावादी असले तरी हळूंहळूं प्रतिरोधी पुराणसमाजवाद्यातच याची गणना होऊ लागते.

याप्रमाणें निरनिराळ्या जुन्या व प्रचलित समाजवादी मतांचा विचार करून मार्क्स व एंजल्स यांनी जाहीरनाम्याच्या शेवटच्या चौथ्या प्रकरणात समाजसत्तावाद्याच्या कार्यपद्धतीची दिशा दाखवून दिली आहे. मजूरसंघावर रोजच्या रोज होणारे जुल्म नाहींसे करावे व त्यांच्या निकटवर्ती हितसंबंधाचें–ते क्षणिक असले तरी–रक्षण करावें, याकरिता समाजसत्तावादी लोक प्रतिपक्षाशीं सारखा झगडा चालूं ठेवतात व हा वर्तमानकालीन झगडा चालू असता आपल्या भावी ध्येयावरील विश्वास ते ढळूं देत नाहीत. या दृष्टीनेच फ्रान्स, स्विट्झर्लंड, पोलंड व विशेषतः जर्मनी या राष्ट्रातून लोकपक्षातर्फे झालेल्या क्रांतिकारक चळवळीत ते भाग घेतात व थोडक्यात सांगावयाचें म्हणजे प्रचलित राजकीय सत्तेविरुद्ध व सामाजिक रचनेविरुद्ध झालेल्या क्रांतिकारी झगड्याना ते मदत करतात.

या सर्व चळवळींतून खाजगी मालमत्ता नष्ट करून टाकण्याच्या प्रश्नाला ते नेहमीं प्राधान्य देत असतात. शेवटीं सर्व राष्ट्रांतील लोकसत्तावादी पक्षाचें एकीकरण व सहमत करण्याचा ते प्रयत्न करतात.

आपले हेतू व ध्येयें लपवून ठेवावीं, असें समाजसत्तावाद्यांना केव्हांही वाटत नाहीं. या गोष्टीचा ते तिरस्कार करतात. प्रचलित समाजपद्धति जबरदस्तीनें उलथून टाकल्याशिवाय आपली ध्येयें साध्य होणार नाहींत, असें ते उघडपणे जाहीर करून सांगतात. समाजसत्तावाद्याच्या या क्रांतिकारी चळवळीकडे पाहून राज्यसत्ताधारी वर्गाच्या अंगात कापरें भरतें. या चळवळीमुळें रोजंदारसमाजाचे कांहींच नुकसान होत नाहीं. नुकसान झालें तर तें एवढेंच होतें कीं, त्याच्या पायातील गुलामगिरीच्या शृंखला तुटून पडतात. सर्व जग त्याला जिंकावयाचें असतें.

**सर्व जगांतील कामकऱ्यांनों एक व्हा !**

# १८४८ ची क्रांति

कम्युनिस्ट जाहीरनामा प्रसिद्ध झाला व थोड्याच दिवसांत फ्रान्समधील कामगारसमाजानें क्रांतीचें निशाण उभारलें. ही क्रांति 'फेब्रुवारी रेव्हो-ल्यूशन' या नांवानें प्रसिद्ध आहे. या क्रांतीची आग जर्मनींतील कित्येक संस्थानांतून पसरली व तिची झळ बेल्जममधीलही कित्येक शहरांना लागली. ब्रुसेल्समधील सामान्य जनतेनें अधिकारारूढ पक्षाच्या पुढाऱ्यांवर हल्ले चढविले. या क्रांतिकारकांचा निःपात करण्याकरितां जर्मन व बेल्जम सरकारांनीं कमर कसली व आपल्या हातांत असलेल्या सर्व साधनांचा उपयोग करून हें बंड मोडून टाकण्याचा त्यांनीं प्रयत्न केला. सरकारच्या या रोषास आपणही बळी पडणार ही गोष्ट यावेळीं मार्क्सनें पूर्णपणें जाणली व अधिकाऱ्यांच्या कचाट्यांत सांपडण्यापूर्वीच त्यानें जर्मनींतून पाय काढला आणि तो ब्रुसेल्समध्यें येऊन राहिला. थोड्याच दिवसानंतर बेल्जम सरकारनेंही त्याला ब्रुसेल्समधून हांकून लाविलें. सरकारच्या या दडपशाहीमुळें मार्क्स मुळींच गांगरून गेला नाहीं. भांडवलशाहीचा पुरस्कार करणारीं हीं सरकारें आपल्याला कोठेंही स्वस्थ बसूं देणार नाहींत, हें जाणून पॅरिसला जाऊन राहण्याची तयारीही त्यानें केली होती. यावेळीं फ्रान्समध्यें प्रजासत्तावादी लोकांच्या हातांत पूर्णपणें राज्याधिकाराचीं सूत्रें आलीं होतीं. विशेष महत्त्वाची गोष्ट म्हणजे या प्रजासत्तावादी हंगामी सरकारनें पॅरिसमध्यें येऊन राहण्याची मार्क्सला विनंतीही केली होती. "फ्रेंच लोकसत्तावाद्यांची ही भूमि सर्व देशांतील स्वातंत्र्याकरितां लढणाऱ्या लोकांना आश्रय देण्यास तयार आहे," अशा आशयाचें एक विनंतिपत्रही या हंगामी सरकारच्या एका जबाबदार सभासदाकडून मार्क्सला आलें होतें. यानंतर मार्क्स कांहीं दिवस पॅरिसमध्यें येऊन राहिला. या ठिकाणीं त्यानें एंजल्सच्या साहाय्यानें समाजसत्तावादी संघाच्या सभासदांना एकत्र आणण्याचा प्रयत्न केला. जर्मनींतील क्रातिकारकांना या संघातर्फे कशी मदत करतां येईल, याचाही विचार ते करीत होते व तो प्रत्यक्ष आचरणांत आणण्याकरितां जर्मनींतील ऱ्हाईन प्रांतांत त्यानें प्रवेश केला. यावेळीं सामान्य जनतेच्या

हिताचा पुरस्कार करणारें एक वर्तमानपत्र काढण्याचा विचार कलोन येथील कामगारसमाजाचे पुढारी करीत होते. अर्थात् हें पत्र चालविण्याची सर्व जबाबदारी मार्क्स व एंजल्स यांनींच आपल्या अंगावर घेण्याचें ठरविलें. १८४८ च्या पहिल्या जूनला न्यू व्हायनिश गॅझिटचा पहिला अंक बाहेर पडला. या पत्राच्या मुख्य संपादकाचें काम मार्क्सकडे सोंपविण्यांत आलें होतें व एंजल्स, वूल्फ व वीथ वगैरे त्यावेळचे प्रसिद्ध विद्वान् पुढारी या पत्राच्या संपादकवर्गांत सामील झाले होते. हें दैनिक फारच व्यवस्थित रीतीनें चालविण्यात येत असे. यामुळें थोड्याच दिवसांत तें लोकप्रिय झालें. लॅसेलचेही कांहीं लेख या पत्रांतून प्रसिद्ध झाले होते. या पत्राच्या द्वारें मार्क्सनें व त्याच्या सहकाऱ्यांनीं सामाजिक क्रांतीचा पुरस्कार केला. फ्रान्समध्यें दोनतीन वेळां राज्यक्रान्त्या झाल्या खऱ्या पण क्रांतीनंतर ज्या जनतेच्या साहाय्यानें या क्रान्त्या घडून आल्या तिच्या हितसंबंधाचे रक्षण करण्याकडे मुळींच लक्ष देण्यांत आलें नाहीं. उलट जनतेच्या आकांक्षा दडपून टाकण्यांत आल्या. आपली उपासमार नष्ट होईल, आपल्याला पोटभर भाकरी खावयास सापडेल, या आशेनें फ्रान्समधील कामकरी व शेतकरी क्रांतींत सामील झाले. क्रातीनंतर या जनतेला भाकरी मिळण्याची व्यवस्था करण्यात आली नाहीं. उलट राज्यसत्ता काबीज करून बसलेल्या क्रांतिकारक पुढाऱ्यांनीं भाकरीकरिता या जनतेनें चालविलेल्या चळवळी दडपून टाकल्या. मजुराच्या मिरवणुकींवर गोळीबार करण्यात आले. या अत्याचारामुळें शेंकडों मजूर ठार झाले व शेंकडों जखमी झाले. फ्रान्समधील शेतकऱ्यांनीं भाकरीकरिता ठिकठिकाणीं बंडाचा उठाव केला. पण त्याचाही नायनाट करण्यांत आला. मार्क्सनें या सर्व अत्याचारांचा आपल्या पत्रांतून निषेध केला. क्रांतीनंतर पुनः मध्यमवर्गाच्या व परश्रमजीवी वर्गाच्या हातीं राज्यसूत्रें जाऊं देता कामा नये, सर्व राज्यसत्ता जनतेच्या पुढाऱ्यांनीं काबीज केली पाहिजे व सामान्य जनतेच्या सुखाची सोय हा जो क्रांतीचा हेतु तो पूर्णपणें अमलांत आणून दाखविला पाहिजे, अशी योग्य सल्ला मार्क्स व त्याचे सहकारी यांनीं क्रांतीच्या पुरस्कर्त्यांना दिली. मार्क्सच्या या सल्लयाचा उपयोग फ्रेंच जनतेला व तिच्या कैवाऱ्यांना झाला नाहीं. पण रशियांतील क्रांतीच्या वेळी मात्र

त्याच्या या उपदेशांतील शब्द न शब्द अ‍मलांत आणला गेला. रशियन क्रांती-नंतर मजूर व शेतकरी यांच्या पुढाऱ्यांनी सर्व राज्यसत्ता आपल्याच हातांत राखण्याचा जोराचा प्रयत्न केला व त्यांत त्यांना यशही आलें. फ्रान्सच्या ऐवजीं रशिया व पॅरिसच्या ऐवजीं मास्को एवढा फरक करून मार्क्सचे न्यू ऱ्हायनिश ग्याझिटमधील लेख वाचले म्हणजे लेनिन व ट्रॉट्स्की यांना स्फूर्ति देणारा महात्मा दुसरा कोणी नसून तो कार्ल मार्क्सच होता, असेंच म्हणावें लागतें. १८४८–१८४९ मध्यें मार्क्सनें या क्रांतीसंबंधीं जे अनेक लेख या ग्याझिटांत लिहिले त्यापैकीं पुढें दिलेला लेख अत्यंत महत्त्वाचा असून क्रांतीच्या चळवळींत भाग घेतांना कामगारपक्षाच्या पुढाऱ्यांनीं कोणतें धोरण ठेविलें पाहिजे, याचें स्पष्ट दिग्दर्शन मार्क्सनें या लेखांत केलें आहे.

जूनमधील दिवस—

कलोन

२८ जून, १८४८

पॅरिसमधील कामगारांच्या चळवळीचा त्यांच्यापेक्षां अधिक बलशाली शक्तीनें नायनाट केला आहे. या चळवळीचा नायनाट करण्यांत आला असला तरी तिचा कायमचा नाश झालेला नाहीं. पॅरिसमधील कामकऱ्यांचा पराभव झाला आहे, पण खरें पाहिलें असतां त्यांच्या शत्रूंचीच धूळधाण उडालेली आहे. फेब्रुवारीमधील क्रांतीनें ज्या अनेक मोहक आशा निर्माण केल्या होत्या त्या सर्व या पाशवी शक्तीच्या क्षणिक विजयानें पूर्ण नष्ट केल्या आहेत. सर्व प्रजासत्तावादी लोकांच्या शहाणपणाचें दिवाळें निघालें आहे, असें या विजयानें सिद्ध केलें आहे. पाशवी शक्तीच्या या विजयानें मालिक लोकांचें राष्ट्र व मजूरांचें राष्ट्र असे फ्रेंच राष्ट्राचे दोन तुकडे करून सोडले आहेत. यापुढें प्रजासत्तावादी फ्रेंच राष्ट्राच्या निशाणाचे तीन रंग राहाणार नाहींत. हें तिरंगी निशाण आतां फक्त एकरंगी होईल. हा रंग म्हणजे अन्यायाखालीं व जुलमाखालीं दडपून गेलेल्या लोकांच्या रक्ताचा रंग होय. फ्रान्स हें आतां प्रजासत्तावादी लाल राष्ट्र बनलें आहे.

प्रजासत्तात्मक तत्त्वांचा पुरस्कार करणारा एकही नांवाजलेला पुढारी आतां बहुजनसमाजाला मदत करण्यास तयार नाहीं. राष्ट्रीय पक्षांतील अनेक मंडळी-

पैकीं एकही मनुष्य किंवा सुधारणावादी लोकांपैकीं एकही मनुष्य त्याला पाठिंबा देण्यास तयार नाहीं. नावाजलेले असे कोणतेही पुढारी कामकरी जनतेपाशीं नव्हते तरी तिनें बंडाचें निशाण उभारलें. बंडाशिवाय दुसरें कोणतेंही साधन तिला उरलेलें नव्हतें. इतकें असूनही भांडवलदारवर्गाच्या संयुक्त बलाला तिनें जोरानें तोंड दिलें. फ्रेंच राजानीं ज्या शिपायाच्या बळावर प्रजासत्तावादी भांडवलदाराना जेरीस आणलें त्या लष्करी शिपायाबरोबरही फ्रान्समधील कामकरीवर्गानें दोन हात केले व बरेच दिवस त्याना जोराचा प्रतिकार केला. तिरंगी टोप्या वापरणारे फ्रेंच शाळाकॉलेजांतील विद्यार्थी फ्रान्समध्ये बंडाचें निशाण उभारलें गेलें कीं, त्याला मोठ्या उत्साहानें मदत करण्यास पुढें पण कामगारानीं क्रांतीचें निशाण उभारल्याबरोबर हे सर्व विद्यार्थी या वर्गाला दडपून टाकणाऱ्या भांडवलदारांच्या पक्षाला जाऊन मिळाले. जें जें जुनें तें ते सर्व नष्ट करण्यात आले पाहिजे असा घोष हे विद्यार्थी करीत असत; पण कसोटीची वेळ आल्याबरोबर या तरुण विद्यार्थ्यांच्या अंतःकरणाचा खरा ओढा कोणाकडे आहे, हें कळून आलें. कामगार जनतेला त्याच्या कर्तृत्वासंबंधानें वाटणारा मोह नष्ट झाला. पॅरिस युनिव्हर्सिटी-मधील विद्यार्थी तर यापुढेही गेले. त्यानीं या बंडांत जखमी झालेल्या मजु-रांची शुश्रूषा करण्याचेंही नाकारलें. सर्वसामान्य जनतेच्या सुखाकरितां वैद्य-कांतील शास्त्रीय शोध लावण्यांत आलेले नाहीत, हें या विद्यार्थ्यांनीं या प्रसंगीं सिद्ध करून दाखविलें. बंडवाल्या मजुरानीं विशेषच अपराध केला होता व तो हा की, ते देशांतील भांडवलदाराविरुद्ध उठले होते! ते केवळ लुई फिलिपच्या भाल्याची काठी तोडून टाकण्यास तयार झालेले नव्हते तर भांडवलदाराच्या सामर्थ्याचें मूळच उखडून टाकण्यास ते तयार झाले होते!

फेब्रुवारीमधील क्रांतीच्या वेळीं प्रस्थापित झालेली कार्यकारी कमिटी आतां धुळीस मिळाली आहे. "बंधुभाव" हें फेब्रुवारीक्रांतीमधील एक मुख्य तत्त्व होतें. परस्परविरोधी अशा दोन पक्षात बंधुभाव कसा प्रस्थापित होणार! एक पक्ष जोंपर्यंत दुसऱ्याला लुबाडीत आहे तोंपर्यंत बंधुत्वाच्या गप्पा व्यर्थच होत. फेब्रुवारीमध्यें पॅरिसमधील मोठमोठ्या विशाल भिंतीवर, तुरुंगाच्या व बराकींच्या सर्व दरवाजावर "बंधुभाव" अशीं प्रचंड अक्षरें रंगविण्यांत आली होतीं. पण या बंधुत्वाचा खरा अर्थ काय होता! हें

बंधुत्व म्हणजे आपसांतील युद्धच नव्हतें काय? जूनच्या २५ तारखेस पॅरिसमध्यें या बंधुत्वाचें खरेंखुरें प्रदर्शन झालें. या दिवशीं पॅरिसमधील मालिकवर्गानें ज्यावेळीं घरोघरीं दिवाळी केली व आपल्या वाड्यांच्या खिडक्यांतून दिवे लावले त्याच वेळीं मजुरांच्या चाळींना आगी लावण्यांत आल्या. शेंकडों मजूर गोळीबारांत ठार झाले व त्यांच्या चाळीमधील पटांगण रक्तानें भरून गेलें आणि तेथील वातावरण विव्हळणाऱ्या मजुरांच्या करुणामय आर्त नादांनीं भरून गेलें. भांडवलदारांचे मजूरवर्गाशीं जोंपर्यंत सख्यत्वाचें संबंध होते तोंपर्यंत बंधुत्वाची भावना टिकून राहिली होती. १७९३ सालीं मोठमोठे पंडित राज्यक्रांतीचा पुरस्कार करीत होते. समाजसत्तावादाचा पुरस्कार करणारे लोक जनतेवर मेहेरबानी करण्याबद्दल भांडवलदारांना विनवीत होते. हे लोक मोठीं लांबलचक प्रार्थनागीतें लोकांना सुनवीत होते. तसें करण्याला त्यांना पूर्ण मोकळीक देण्यांत आली होती. मजूरवर्गानें आपल्या हक्कांचा विचार करूं नये. अज्ञाननिद्रेंत त्यांनीं सुखानें मग्न होऊन राहावें, असा प्रयत्न हे लोक करीत होते. प्रजासत्तावादी लोकांना भांडवलशाही असली तरी चालेल फक्त राजमुकुट धारण करणारा राजा त्यांना नको होता. नोकरशाहींतल्या लोकांना आपल्या हातांतील सत्ता नष्ट व्हावी, असें वाटत नव्हतें. फक्त वरचे अधिकारी तेवढे बदलावे, अशी त्यांची इच्छा होती. फेब्रुवारीमधील क्रांतीच्या वेळीं याच लोकांनीं जनतेला साहाय्य केलें होतें, तथापि सामान्य जनतेच्या मनाची स्थिति कशा प्रकारची होती? सामान्य लोक लुइ फिलिपचा द्वेष करीत नव्हते तर भांडवलदारवर्गाची सत्ता त्यांना नको होती. लुई फिलिपची सत्ता नष्ट झाली तरी भांडवलदारांच्या सत्तेच्या जुवाखालीं मान वांकविण्यास बहुजनसमाज तयार नव्हता. राज्यक्रांतीचें हें कृत्य अत्यंत भव्य होतें. आपल्या शत्रूंचा आपण नायनाट केला, असें सामान्य जनतेला वाटलें पण खरी गोष्ट तशी नव्हती. त्यांनीं केवळ आपल्या शत्रूंच्या शत्रूचा नाश केला होता. बहुजनसमाजाचा सामान्य शत्रु जो भांडवलदारवर्ग तो अद्याप राज्यसत्ताधिष्ठितच होता. फेब्रुवारीमध्यें क्रांति झाली त्यावेळीं या क्रांतिदेवीचे लोकांनीं सर्वत्र उत्सव केले. सर्वच लोकांनीं या क्रांतींत भाग घेतला होता. एक तंत्री राज्यसत्तेविरुद्ध जी विरोधी शक्ति

निर्माण झाली होती तिचा अद्याप व्हावा तसा विकास झालेला नव्हता. आर्थिक दुःस्थितीमुळें निर्माण झालेली ही शक्ति अद्याप निद्रित होती. सामाजिक लढ्याच्या बीजाचा अंतर्भाव या विरोधी शक्तींत झाला होता. या सर्व लढ्याच्या मुळाशीं समाजसत्तावादच होता. पण समाजसत्तेची ही कल्पना अद्याप वातावरणांतच वावरत होती. समाजसत्तावादाचा हा शब्द-प्रयोग केवळ सर्वतोमुखी झाला होता. पण जूनमधील राज्यक्रांतीचें तसें नव्हते. या क्रांतींत उत्सव करण्याजोगें कांहीच नव्हतें. भांडवलदारवर्गाला ही क्रांति मुळींच आवडली नाही. त्याना ती तिरस्कारार्ह वाटली. कारण ती शब्दाचा पोषाख फेकून देऊन प्रत्यक्ष कृतींत प्रकट झाली होती. या क्रांतिमुळें प्रजासत्ताक राज्याची प्रस्थापना झाली आणि धनिकसत्तारूपी राक्षसाचें विक्राळ मस्तक या क्रांतीमुळें स्पष्ट दिसूं लागलें. फरक एवढाच झाला कीं, या मस्तकावरील चकाकणारा राजमुकुट तेवढाच नष्ट झाला होता. "व्यवस्था" हा गिझटचा आवडता शब्द होता. रशियनानीं पोल लोकाच्या स्वातंत्र्याचा नायनाट केला त्यावेळी गिझटचा शिष्य सेबा-स्टीयानी याने हाच शब्द उच्चारला होता. फ्रेंच नॅशनल असेंब्लीचा प्रति-ध्वनिरुप असलेला सभासद कॅव्हेन आज याच शब्दाचा उच्चार करीत आहे. मजूरवर्गावर गोळीबार करण्यात आले त्यावेळीं 'व्यवस्था' 'व्यवस्था' याच शब्दाचा उच्चार बंदुकाच्या नळ्यातून बाहेर पडला. मजूरसमाजाच्या रक्ताचे पाट वाहिले त्यावेळीं हाच शब्द आकाशांत घुमत होता.

१७८९ नंतर भांडवलदारवर्गातर्फे ज्या ज्या क्रांत्या घडून आल्या त्यानी या व्यवस्थेत कोणत्याही प्रकारचा अडथळा उत्पन्न केलेला नव्हता. कारण धनिकवर्गाच्या सत्तेला त्यानीं स्पर्शही केला नव्हता. मजूर-वर्गाच्या गुलामगिरीला त्यानीं यत्किंचितही धक्का लावला नव्हता आणि भांडवलदाराची लुटारूपणाची वृत्ति जशीच्या तशीच चालू राहील, अशी काळजी या क्रांत्याच्या वेळीं घेण्यात आली होती. या क्रांत्यानीं केलें काय तर एक राजकीय सत्ता घालवून त्या ठिकाणीं दुसरी राजकीय सत्ता प्रस्था-पित केली. मजुराची गुलामगिरी कायम केली. जूनमधील क्रांतीवर एवढा राग का तर या क्रांतीनें भांडवलदाराच्या पोटावर पाय आणले.

इंगामी सरकार प्रस्थापित झालें त्यावेळीं उदार अंतःकरणाच्या मजुरांना असें सांगण्यात आलें कीं, फेब्रुवारींत जी क्रांति करण्यांत आली ती मजूरवर्गाच्याही हितसंबंधांचें रक्षण करण्याकरितांच झाली आहे. यांत दुसरा कोणताही हेतु नाहीं. मजूरवर्गाची अशा प्रकारची समजूत करून देणें हें त्यावेळीं उचित होतें व सोयीचेंही होतें. भाकरी मिळावी म्हणून ही क्रांति करण्यांत आली, पण आपली ही हलाखीची स्थिति आणखी तीन महिने राहिली तरी हरकत नाहीं, प्रजासत्ताक सरकारला आपण या बाबतींत त्रास देणार नाहीं, असें कामगारवर्गानें जाहीर केलें होतें. पण नॅशनल असेंब्लीच्या बैठकीनंतर काय झालें ! फ्रेंच मुत्सद्यांच्या तोंडून बेपर्वाईचे उद्गार बाहेर पडूं लागले. मॉनशर ट्रेलेटनें तर मजूरवर्गाच्या परिस्थितींत कोणत्याही प्रकारचा फरक होणें शक्य नाहीं, असें जाहीर केलें. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे फेब्रुवारीच्या राज्यक्रांतींत मजूरवर्गानें भाग घेऊन मिळविलें काय तर त्यांनीं आपण होऊनच आपणांवर संकट ओढवून घेतलें.

नॅशनल असेंब्लीपुढें आतां एकच प्रश्न होता व तो म्हणजे क्रांति झाली तरी जणूं काय ती झालीच नाहीं अशा प्रकारची परिस्थिति निर्माण करावयाची. कामकरीवर्गाच्या बाबतींत बोलायचें म्हणजे गुलामगिरीच्या त्यांच्या पूर्वस्थितींत त्यांना तसेंच दडपून ठेवावयाचें. नॅशनल असेंब्लीनें १७ ते २५ वर्षें वयाच्या कामकऱ्यांची लष्करांत सक्तीनें भरती केली आणि आपलें काम झाल्यानंतर त्यांना लष्करांतून हांकून लावलें. बेकार होऊन हे मजूर फूटपाथवर आपलें कष्टमय जीवित कंठूं लागले तरी त्यांच्याकडे लक्ष दिलें नाहीं. क्रांतीच्या वेळीं मदतीकरितां आलेल्या परराष्ट्रांतील लोकांना तिनें बाहेर हांकून लावलें व पोलंडमध्यें हद्दपार केलें. या लोकांना कामावरून काढून टाकले त्यावेळीं त्या दिवसापर्यंतचा पगारदेखील देण्यांत आला नाहीं. वयांत आलेल्या पॅरिसमधील कांहीं मजुरांना पोटापुरतें अन्न देण्याची हमी घेण्यात आली. लष्करी बंदोबस्ताखालीं ठेवलेल्या वर्कशॉपमधून हें अन्न देण्याची व्यवस्था करण्यांत आली होती पण सरकारकडून रेशन घेणाऱ्या लोकांनीं सार्वजनिक सभांतून हजर राहता कामा नये, अशी त्यांच्यावर अट लादण्यांत आली होती. म्हणजे प्रजासत्ताक राज्यांतील प्रत्येक मनुष्याला असलेला जन्मसिद्ध हक्कच हिरावून घेण्यांत आला.

होता. सामान्य जनतेच्या मनांत ज्या भावना उद्दीपित करून फेब्रुवारींतील क्रांति घडवून आणली होती त्या भावना आतां फेब्रुवारीनंतर निरुपयोगी ठरल्या होत्या. "हे बाजारबुणग्यांनों, फेब्रुवारींत तुम्ही जी क्रांति केली ती तुमच्याकरितां कीं आमच्याकरितां?" असाच प्रश्न ही नॅशनल असेंब्ली मजूरवर्गाला विचारीत होती. मजूरांना ठिकठिकाणीं थोपवून धरून त्याच्यावर गोळीबार करूनच या प्रश्नाचें उत्तर घ्यावयाचें असेंच जणूं काय भांडवलदारवर्गानें ठरविलें होतें.

इतकें सर्व असूनसुद्धां जूनमध्यें नॅशनल असेंब्लीची गाळणच उडाली. जून २५ रोजीं असेंब्लींतील एका प्रतिनिधीनें तसें बोलूनही दाखविलें. पॅरिसच्या रस्त्यामध्यें असेंब्लींत प्रश्न विचारणारे व त्यांना उत्तर देणारे हे दोघेही जेव्हां रक्तानें न्हाऊन निघाले त्यावेळीं नॅशनल असेंब्लीची घाबरगुंडीच उडाली. कामकऱ्यांनीं कितीही गडबड केली तरी ते काय करणार? त्यांना केव्हांच दडपून टाकूं, अशा भ्रमांत असेंब्लीचे कांहीं प्रतिनिधी होते. गोळीबाराच्या धुराबरोबर त्यांचा भ्रमही नष्ट झाला. आपल्या रोजच्या भाकरीकरितां, आपले निकटवर्ती आर्थिक संबंध रक्षण करण्याकरितां, लोक इतके तिरीमिरीवर येऊन बंड करण्यास कसे प्रवृत्त होतात, याचेंच कित्येकांना आश्चर्य वाटलें. रशियन व इंग्लिश सरकारांनीं द्रव्याची मदत केल्याशिवाय असली चमत्कारिक घटना घडून यावयाची नाहीं, असेही तर्क कांहीं लोकांनीं केले. बोनापार्ट गटानें या लोकांना उठविलें असलें पाहिजे, राजपक्षाच्या लोकांनीं किंवा दुसऱ्या कोणी सरदारानें या लोकांना कांहीं तरी आमिष दाखविलें असलें पाहिजे, असेही तर्क पुष्कळांनीं केले. कांहींही असलें तरी एक गोष्ट मात्र स्पष्ट झाली ती ही कीं, नॅशनल असेंब्ली व मजूरवर्ग यांच्यांत आतां कायमचाच बेबनाव झाला आहे, हें असेंब्लींतील दोन्ही पक्षांना कळून चुकलें. कल्पनावादी तत्त्वज्ञान्यांनीं बंधुत्वाच्या तत्त्वावर आतां फ्रान्समध्यें सत्ययुगाची प्रस्थापना होणार अशी आशा केली होती, पण त्या बिचाऱ्यांची आशा नष्ट झाली. कांहीं ढोंगी व दांभिक माणसें बंधुत्वाचीं स्तोत्रें गात फिरत होतीं त्यांचीं तर डोकींच सडकलीं गेलीं. कामकऱ्यांच्या पुढें आतां बंधुत्वाच्या गप्पा कोणी मारणार नाहीं व साध्या भोळ्या जनतेच्या अंतःकरणांत भ्रम उत्पन्न करणार नाहीं, हें मात्र नक्की झालें. जूनमधील

या क्रांतिकारकांचा पराभव झाला असला तरी वास्तविक हा आपलाच पराभव झाला आहे, असें असेंब्लींतील मुत्सद्दयांना वाटूं लागलें आहे. कामकरीवर्ग अशा रीतीनें खवळला व असंतुष्ट झाला तर या संतापाग्नींत आपला तरी नाश होईल किंवा प्रजासत्ताक राज्याची तरी आहुति पडेल, असें त्यांना वाटूं लागलें आहे. म्हणूनच " प्रजासत्ताक राज्य चिरायु होवो" अशी हाकाटी हे लोक आतां करूं लागले आहेत. प्रजासत्ताक राज्याचे पुरस्कर्ते व कामकरीसमाज यांच्यामध्यें कधींही न बुजणारा असा हा खड्डा पडला आहे, असें पाहून आपण आपल्या ध्येयापासून च्युत व्हावें काय असा प्रश्न कांहीं लोक करूं लागले आहेत. केवळ भ्याड व दुर्बल लोक असला विचार मनांत बाळगितील. पुंजी-पद्धतीमुळें जी बिकट परिस्थिति निर्माण होईल व भांडवलदारवर्गाशीं ज्या झकापकी होण्याचा प्रसंग येईल त्यावेळीं हा झगडा जनतेला शेवटपर्यंत जोरानें लढवावा लागेल. या परिस्थितीकडे कानाडोळा करून चालावयाचें नाहीं. तीच राज्यपद्धति उत्तम प्रकारची होय कीं, जींत सामाजिक लढयाकडे दुर्लक्ष करण्यात येत नाहीं व या लढयांना कृत्रिम अडथळा करण्यात येत नाहीं. या लढयांना पूर्ण वाव देण्यात येऊन त्याचा जेथें चांगल्या रीतीनें निकाल लावण्यात येतो तीच राज्यपद्धति उत्तम प्रकारची होय. 'लोकक्षोभाला जे लोक बळी पडले त्यांच्याबद्दल तुमच्या डोळ्यांत अश्रू उभे राहात नाहींत काय! त्यांच्यासंबंधानें तुम्हाला सहानुभूति वाटत नाहीं काय! नॅशनल गार्ड, मोबाइल गार्ड, रिपब्लिकन गार्ड, व लाइन यांमधील जे लोक मृत्युमुखीं पडले त्याबद्दल कांहींसुद्धां फिकीर तुम्हांला कशी वाटत नाही!" असें या लोकसत्तावाद्यांना विचारण्यांत येईल त्यावेळीं साहजिकच पुढील उत्तर मिळेल.

या लोकाच्या विधवा स्त्रिया व त्यांचीं अनाथ मुलें यांची काळजी सरकार घेईल. त्यांचीं मोठमोठीं स्मारकें करण्यात येतील. मोठ्या थाटानें त्यांच्या स्मशानयात्रा काढण्यांत येतील. ते चिरंजीव झाले आहेत, अशीं स्तुतिस्तोत्रें सरकारी वर्तमानपत्रांतून गाण्यांत येतील. कामकऱ्यांनीं केलेल्या या क्रांतीविरुद्ध असणारे लोकसत्तावादी पुढारीच पूर्वेपासून पश्चिमेपर्यंत सर्व युरोपखंडांत त्यांची कीर्ति गात राहतील.

परंतु याच्या उलट प्रत्यक्ष हयात असलेल्या कामकरीवर्गाची आज

काय परिस्थिति आहे ! उपासमारीनें ते गांजले आहेत. भुकेच्या वेदना त्यांना सहन कराव्या लागत आहेत. सर्व वर्तमानपत्रांतून त्यांची निर्भर्त्सना करण्यांत येत आहे. लढाईंत जखमी झालेल्या कामकऱ्याची शुश्रूषा करण्यास कोणी तयार नाहीं, शस्त्रवैद्य त्यांच्याकडे लक्ष देण्यास तयार नाहींत. चोर, आगलावे, दरवडेखोर अशीं नांवें सर्व प्रामाणिक लोक त्यांना देत आहेत. त्यांचीं बायकामुलें पूर्वीपेक्षांही अधिक हलाखीच्या स्थितींत दिवस काढीत आहेत. कुत्राही त्यांचे हाल खाईनासा झाला आहे. लढाईतून जे कांहीं थोडे लोक जगून वाचून राहिले त्यांपैकीं चांगल्या चांगल्या लोकांना हद्दपार करण्यांत आलें आहे. प्रजासत्तावादी लोकांना ही परिस्थिति भूषणावह नाहीं काय ! ”

१८४८ च्या जूनमध्यें क्रांतिकाऱ्यांवर जे अत्याचार करण्यांत आले त्यासंबंधानें मार्क्सचे वरील लेखासारखे अनेक लेख न्यू ऱ्हायनिश ग्याझिटमध्ये प्रसिद्ध झाले. अशा परिस्थितींत हें वर्तमानपत्र फार दिवस चालूं शकलें नाहीं. सेन्सॉरखात्यांतील अधिकाऱ्यांनीं संपादकांना अतिशय त्रास दिला, त्यांच्यावर अनेक वेळां खटले करण्यांत आले व सर्वांत अनिष्ट गोष्ट म्हणजे क्रांतीच्या चळवळीला उतरती कळा लागली. या सर्व कारणांमुळें हे वर्तमानपत्र कटाकटी एक वर्षभर कसें तरी चाललें. मार्क्सनें हें पत्र जगविण्याकरता आपलें सर्वस्व खर्ची घातलें, आपल्याजवळ असलेला सर्व पैसा, दागदागिने मिळून जवळ जवळ १०,००० रु. ची मिळकत त्यानें कर्जदारांचें कर्ज वारण्याकरितां, लेखकांना मोबदला देण्याकरितां व छापखान्याचीं बिलें चुकविण्याकरितां खर्ची घातली. हें पत्र बंद झाल्यावर मार्क्सला जर्मनी सोडावी लागली. तेथून तो पॅरिसला आला. यावेळीं फ्रान्सची परिस्थिति अगदीं बदलून गेली होती. रेड रिपब्लिकच्या क्रांतिवाद्यांचा सर्वत्र पराजय होत चालला होता. क्रांतिकारकांविरुद्ध सर्वत्र बंडें उभारण्यांत आलीं होतीं. यामुळें फ्रान्समध्ये राहणें मार्क्सला अगदीं अशक्य होऊन गेलें होतें. १८४९ च्या जुलई महिन्यांत फ्रेंच सरकारनेंच खुद्द मार्क्सला हद्दपार करून ब्रिटनीमधील मॉरबिहनच्या दलदलीच्या प्रांतांत नेऊन सोडलें. मार्क्सनें येथें राहण्यापेक्षां खुद्द लंडन येथें राहण्याचेंच पसंत केलें व आपल्या आयुष्याचीं अखेरचीं तीस वर्षें त्यानें याच ठिकाणीं काढलीं.

१८४८ ची क्रांति अयशस्वी ठरली तरी रोजंदार जनतेनें केलेली ही शेवटचीच क्रांति नव्हे. या जनतेंत धुमसत असलेला असंतोषाचा अग्नि पुन्हां केव्हां पेट घेईल याचा नियम नाहीं, अशा आशयाचें एक भाषण मार्क्सनें लंडनमध्यें असतांना 'पीपल्स पेपर' या पत्राच्या एका वार्षिक समारंभाच्या वेळीं केलें. या प्रसंगीं इंग्लंड, फ्रान्स व जर्मनीमधील कामकरी जनतेचे लंडनमध्यें असलेले पुढारी हजर होते. मार्क्स लंडनमध्यें येऊन राहिला होता तरी रोजंदार जनतेंत जागृति करण्याचें व त्यांच्या हृदयांत क्रांतीची ज्योत तेवत ठेवण्याचें काम तो कसा करीत होता, त्याचा एक नमुना म्हणून वरील भाषणाचा सारांश पुढें दिला आहे :—

१८४८ची क्रांति व रोजंदार जनता—

"१८४८ च्या क्रांतीच्या वेळीं घडून आलेल्या हकीकती म्हणजे युरोपियन समाजरूपी शुष्क वालुका मैदानांत उडालेल्या धुळीचे क्षुल्लक रजःकण होत. तथापि या घडामोडीमुळें युरोपियन समाजांत सांचून राहिलेली घाण वर उसळून आली, यांत शंका नाहीं. या समाजाचा वरचा थर वरून खडकासारखा भरभक्कम दिसत असला तरी त्याच्याखालीं ज्वालाग्राही रसाचे प्रवाह वहात असून ते केव्हां फोफावतील व या कठीण पाषाणमय खंडाचे केव्हां तुकडे तुकडे उडून जातील, याचा नियम राहिलेला नाहीं. हे क्रांतिकारक असंघटित होते. त्यांच्यांत बेशिस्त व गोंधळ माजलेला होता. तथापि क्रांतीचा प्रयत्न करून श्रमजीवी जनतेचा उद्धार होणार, असें उच्च स्वरानें त्यांनीं जाहीर केलें होतें. एकोणिसाव्या शतकांत घडून आलेल्या औद्योगिक क्रांतीचें हेंच रहस्य आहे. सामाजिक क्रांति हा १८४८ सालांतील नवा शोध नाहीं. बार्बेस, रासपेल व ब्लँकी या क्रांतिकारकापेक्षा वाष्प, विद्युत् व स्वतः होऊनच काम करणारें म्यूलयंत्र यांच्या बाबतींतील शोध अधिक क्रांतिकारक स्वरूपाचे आहेत. आपण ज्या वातावरणांत राहात आहों त्याचें वजन आपणा प्रत्येकावर २० हजार पौंड आहे. इतकें प्रचंड वजन आपण सहन करीत असलों तरी आपणाला त्याचें कांहीं वाटतें काय? १८४८ पूर्वी युरोपियन समाजाचें असेंच झालें होतें. आपल्या सभोंवतीं क्रांतिमय वातावरण उत्पन्न झालें असून त्याच्या वजनाखालीं आपण चोहोंकडून दडपून जात आहों याची जाणीव युरोपियन समाजाला झाली नव्हती.

एकोणिसाव्या शतकाची आठवण राहील, अशी एक महत्त्वाची गोष्ट घडून आली आहे. कोणत्याही पक्षाला ही गोष्ट नाकारता येणार नाही. मानवी इतिहासाच्या कोणत्याही युगात ज्याची कल्पनाही करता आली नाहीं अशा औद्योगिक व वैज्ञानिक शक्ति या युगात एका बाजूला प्रचारात आल्या आहेत, तर रोमन साम्राज्याच्या उतरत्या कालांत बहुजनसमाजाचे जे भयंकर छळ झाले त्यापेक्षाही मानवी समाजाचें जास्त अधःपतन होण्याचीं लक्षणें दुसऱ्या बाजूला दिसूं लागलीं आहेत. आजच्या युगांत प्रत्येक शक्तीच्या गर्भात तिच्या विरोधी शक्तीचा अंतर्भाव झालेला स्पष्टपणें दिसून येत आहे. यंत्रानीं आपलें आश्चर्यकारक सामर्थ्य आज प्रकट केलें आहे. थोड्या श्रमात अधिक फळ मिळवून देण्याचें सामर्थ्य यंत्रात आहे, तथापि त्याबरोबरच मनुष्याची उपासमार होत आहे व त्याला वाजवीपेक्षा जास्त काम करावें लागत आहे. संपत्तीची वाढ होण्याचीं साधनें एकीकडे वाढली आहेत व अदृश्य, विलक्षण मंत्रांचा प्रभाव दिसून यावा त्याप्रमाणें दुसरीकडे मानवी समाजातील दारिद्र्यही वाढत आहे. कलेच्या वैभवाला आज हीन चारित्र्याचे लोक लुटीत आहेत. ज्या वेगानें मनुष्य निसर्गावर ताबा मिळवीत चालला आहे त्याच वेगानें तो दुसऱ्या मनुष्याचा व आपल्या हीन विकाराचा गुलाम होत चालला आहे. विज्ञानाचें जीवन दिवसेंदिवस शुद्ध बनत चाललें आहे पण त्याबरोबरच अज्ञानाचा वरचा पापुद्रादेखील दूर करण्यास तें असमर्थ झालें आहे. आमची प्रगति व आम्ही लावलेले शोध यामुळें भौतिक शक्तीवर बौद्धिक शक्तीनें विजय मिळविला आहे, ही गोष्ट एकीकडे सिद्ध झाली आहे तर दुसरीकडे मानवी जीवन भौतिक शक्तींच्या आधीन होऊन कुजत चाललें आहे, असें दिसून येत आहे. एकीकडे अर्वाचीन उद्योगधंदे व विज्ञान तर दुसरीकडे अर्वाचीन दारिद्र्य व धूळदाण! याप्रमाणें उत्पादनसाधनें व सामाजिक संबंध यांमध्यें उत्पन्न झालेला हा विरोध दुर्लक्ष करण्याजोगा नाहीं. कांहीं लोक ही हीन परिस्थिति पाहून शोक प्रदर्शित करतील व रडगाणें गातील तर दुसरे काहीं लोक यातून मुक्त होण्याकरिता आधुनिक वैज्ञानिक व यांत्रिक शोधापासून अलिप्त राहावें, असें सुचवितील अथवा उद्योगधंद्यांच्या बाबतींत जर एका बाजूनें प्रगति होत आहे तर राजकीय बाबतींत परागति झाली तरी कांहीं हरकत नाहीं, असेंही म्हणण्यास ते तयार होतील, आपण मात्र

या विरोधाकडे दुर्लक्ष करतां कामा नये. समाजानें संपादन केलेल्या या नव-शक्तीचा समाधानकारक रीतीनें उपयोग व्हावा, असें वाटत असेल तर या शक्तीवर नव्या लोकांचीच —कामगार लोकांचीच— सत्ता असली पाहिजे. आधुनिक कालांत ज्याप्रमाणें निरनिराळे यांत्रिक शोध लागत चालले आहेत त्याप्रमाणेंच उत्पादनाच्या साधनांवर कामकरीवर्गाची सत्ता असली पाहिजे, हा शोधही आधुनिक कालांतलाच आहे. हीं लक्षणें पाहून मध्यमवर्गाचे व सरदार व जमीनदार वर्गाचे लोक आणि राजकीय दृष्टीनें मानवी समाजाचा अधःपात होणार, अशी भविष्यवाणी वदणारे लोक भिऊन गेले आहेत तर आपल्याला आपल्या जुन्या मैत्रिणीची-क्रांतीची-ओळख पटत चालली आहे. इंग्रज कामगार हा अर्वाचीन औद्योगिक सुधारणेचें पहिलें संतान आहे. तेव्हां अशा प्रकारची क्रांति घडून येईल त्यावेळीं तिला मदत करण्यास इंग्रज कामगारवर्गाचे लोक पुढें आल्याशिवाय खात्रीनें राहाणार नाहींत. गेल्या शतकाच्या मध्यकालांत इंग्रज कामगारवर्गानें जो शौर्याचा व धाडसाचा झगडा चालविला होता तो अत्यंत प्रशंसनीय होता यांत शंका नाहीं. पण मध्यमवर्गातील इतिहासकारांनीं हाःश हुःश करून या झगड्याचें महत्त्व कमी केलें आहे. सत्ताधारी वर्गाच्या दुष्कृत्यांचा सूड घेण्याकरितां जर्मनींत मध्ययुगामध्यें एक गुप्तमंडळ नेमण्यांत आलें होतें. एकाद्या घरावर लाल क्रॉसचें चिन्ह दिसलें कीं, त्याच्या मालकाचा काल समीप आला आहे व हें गुप्त मंडळ त्याचा निकाल लावणार आहे, असें लोक समजत असत. युरोपांतील सर्व घरांवर आतां अशाच प्रकारचे लाल क्रॉस रंगविलेले आहेत. इतिहास हा त्यांचा न्यायाधीश आहे व या न्यायाधिशानें दिलेला निकाल अमलांत आणण्याचें काम रोजंदारीवर जगणाऱ्या जनतेला करावयाचें आहे."

# अंतरांष्ट्रीय चळवळ

कार्ल मार्क्स लंडन येथें जवळ जवळ तीस वर्षे राहिला. लंडनसारख्या मोठ्या शहरांत मार्क्स आतां सकुटुंब येऊन राहिला होता. मासिक किंवा वार्षिक निश्चित मिळकत होईल असा कोणताही उद्योग मार्क्सला करता येत नव्हता, यामुळें हे अखेरचे दिवस मार्क्सला अत्यंत कष्टानें काढावे लागले. मार्क्स अशा बिकट परिस्थितींत होता तथापि कामगार चळवळींत प्रत्यक्ष भाग घ्यावयाचा व या चळवळीला शिस्त लावून द्यावयाची, हीं कामें तो करीतच होता. याशिवाय त्याचें ग्रंथलेखनाचें कार्यही तितकेंच चिकाटीनें चालू होते. ' कॅपिटल ' ( भांडवल ) हा मार्क्सचा अत्यंत सुप्रसिद्ध ग्रंथ होय. आपल्यापाशीं असलेलें सर्व बुद्धिचातुर्य त्यानें हा ग्रंथ लिहिण्याकरितां खर्ची घातलें आहे. निश्चित मिळकत होईल असें कोणतेंही काम करतां येत नाहीं, खर्चाची ओढाताण सारखी चालू आहे, त्याचबरोबर कामगार चळवळी चालविण्याची जबाबदारी अंगावर घेतलेली, अशा परिस्थितींतही या ग्रंथाकरितां लागणारी सामुग्री मिळविण्याचे परिश्रम मार्क्सनें अत्यंत चिकाटीनें व अव्याहतपणें चालविले होते.

'कॅपिटल' हा सोशियालिस्टांचा प्रमाणग्रंथ मानला जातो. समाजसत्तावादी व मजूरपक्षाच्या नियतकालिकानीं या ग्रंथांतील सिद्धांतांचा बहुजनसमाजांत प्रसार केला आहे. युरोप व अमेरिकेंतील मोठमोठ्या शहरांत मजूरांचे संप होतात त्यावेळीं हे संप चालू ठेवण्याकरितां या ग्रंथातील उतारे छापून त्यांचीं पत्रकें सर्वत्र वाटलीं जातात. जगांतील सर्व मुख्य मुख्य भाषांतून या ग्रंथाचें भाषांतर झालें आहे. मार्क्सच्या सिद्धातांवर टीकेची झोड उठवून तें अप्रिय करण्याचें युरोप व अमेरिकेंत जेव्हां जेव्हां प्रयत्न होतात त्या त्या वेळीं परिणामकारक उत्तरें देऊन प्रतिपक्षाचा हल्ला परतविण्यास समाजसत्तावाद्यांना या ग्रंथाचा अत्यंत उपयोग होतो. म्हणूनच सर्व सोशियालिस्टांना 'कॅपिटल'संबंधानें अत्यंत पूज्य भाव वाटतो.

मार्क्स ज्यावेळीं आपल्या पत्रांतून जहाल व क्रांतिकारक मतांचा प्रसार करूं लागला त्यावेळीं पूर्वीच्या त्याच्या सर्व मित्रांनीं त्याचा त्याग केला.

'एटीन्थ ब्रुमायर' 'ऑन लुई बोनापार्ट,' 'तत्त्व  चें दारिद्र्य' 'अर्थशास्त्रावरील टीकाकारांना उत्तर' हीं पुस्तकें त्यानें लिहिलीं. पण त्यासंबंधीं कोणीही कांहींहीसुद्धां लिहावयाचें नाहीं, असा जणूं काय कटच करण्यांत आला होता, असें दिसून आलें. यापुढें पंधरा वर्षांनीं अंतर्राष्ट्रीय कामगारसंघ स्थापन झाल्यावर मार्क्सची खरी किंमत लोकांना कळूं लागली. 'कॅपिटल' ग्रंथ प्रसिद्ध झाल्यावर तर मार्क्सच्या प्रतिपक्षीयांना त्याची हेळसांड करणें अशक्यच होऊन बसलें. त्याच्या ग्रंथावर सर्वत्र टीका होऊं लागल्याबरोबर मजूरसमाजाचें या ग्रंथाकडे लक्ष गेलें व तो लवकरच लोकप्रिय झाला. पुढें पुढें मजूरसमाजाची या ग्रंथावरील भक्ति इतकी वाढली कीं, अंतर्राष्ट्रीय मजूरसंघाच्या एका परिषदेंत 'कॅपिटल' ग्रंथ हा मजूरवर्गाचें बायबल आहे अशा आशयाचा एक ठराव सर्वानुमतें पास करण्यांत आला.

लंडन येथें आल्यानंतर पहिलीं दहा वर्षें तर मार्क्सला अत्यंत कष्टांत काढावीं लागलीं. 'न्यू न्हायनिश ग्याझिट' बंद पडलें होतें, पण हेंच पत्र 'न्यू न्हायनिश रिव्हू' या नांवाखालीं चालविण्याचा प्रयत्न मार्क्स व त्याचे दोस्त यांनीं केला. पण तो मुळींच यशस्वी झाला नाहीं. यामुळें फायदा तर कांहींच झाला नाहीं तर उलट मार्क्सपाशीं जो कांहीं रुका अडका शिल्लक होता तोही या नवीन प्रयत्नांत नाहींसा झाला व मार्क्स पुरा भुकेबंगाल बनला. १८५२ च्या अखेरीस कलोन येथील कोर्टांत कांहीं कम्युनिस्ट लोकांवर खटला चालू होता. या खटल्याच्या बाबतींत झालेले गैरसमज दूर करण्याकरितां मार्क्सनें एक हस्तपत्रक काढलें. यावेळीं मार्क्स इतका दरिद्री झाला होता कीं, या पत्रकाला लागणारा कागद विकत घेण्याकरितां थंडीसाठीं जपून ठेवलेला कोट त्याला गहाण टाकावा लागला. अत्यंत दुःखाची गोष्ट म्हणजे त्याच्या दोन मुलांपैकीं एक मुलगा आजारी झाला व औषध घेण्यासाठीं त्याच्याजवळ दमडीही शिल्लक नव्हती तेव्हां योग्य वेळीं योग्य तें औषध पैशाच्या अभावीं त्याला देतां आलें नाहीं, आणि बिचारें पोर मृत्युमुखीं पडलें, हें पाहून त्याचें अंतःकरण कळवळून गेलें. असल्या प्रसंगीं मार्क्सनें आपल्या शोकग्रस्त पत्नीचें सांत्वन करावयाचें, पण उलट त्याची पत्नी जेनी हिनेंच मार्क्सचें सांत्वन केलें. जेनी गर्भ-

श्रीमंत होती. पण ती अत्यंत प्रेमळ व धीराची स्त्री होती. आपल्या दुखणाइत मुलाला पैशाच्या अभावीं योग्य औषध मिळालें नाहीं व तें आपल्याला कायमचें सोडून गेलें, हें पाहून त्या माउलीची काय अवस्था झाली असेल! पण अशा प्रसंगींही अत्यंत धीरानें तिनें या प्रसंगाला तोंड दिलें. तिनें आपल्या चित्ताची समता कायम राखिली इतकेंच नव्हे तर पतीच्या शोकग्रस्त मनाचेंही तिनें सांत्वन केलें.

जेनीनें मार्क्ससारख्या दरिद्री माणसाला प्रेमानें वरलें पण मार्क्सबरोबर लग्न लावण्यात आपण चूक केली, असें तिला स्वप्नात देखील कधीं वाटलें नाही. कार्ल मार्क्स व फ्राऊ ( जेनीचें आवडतें नांव ) यांच्यामधील प्रेम अवर्णनीय होतें. या दोघाच्या लग्नाचा वाङ्निश्चय झाला त्यावेळीं मार्क्स अवघा १८ वर्षांचा होता. प्रत्यक्ष लग्न होईपर्यंत या प्रेमी जोडप्याला ७ वर्षेपर्यंत थाबावें लागलें. जेनीच्या सौंदर्याबद्दल मार्क्सला फार अभिमान वाटे. तिचा साधा, सरळ, शांत स्वभाव व तिचें एकनिष्ठ प्रेम पाहून तर त्याच्या मनाला अधिकच समाधान वाटत असे, यामुळें क्रांतिकारकांच्या पाचवीला पुजलेले दारिद्र्याचे खडतर हाल सहन करणें त्याला सोपें गेलें. मार्क्सपेक्षा जेनी चार वर्षांनीं मोठी होती. यामुळें केवळ बरोबरीच्या नात्यानेंच नव्हे तर केव्हां केव्हा वडीलधाऱ्या माणसाप्रमाणेंसुद्धां ती मार्क्सशीं वागत होती. वडील बहीण धाकट्या भावाशीं ज्याप्रमाणें वागते, प्रसंगीं चार उपदेशाच्या गोष्टी सागून त्याला सन्मार्गापासून च्युत होऊं देत नाहीं त्याचप्रमाणें जेनीसुद्धां मार्क्सच्या उच्छृंखल वृत्तीना व उसळणाऱ्या भावनाना संयमात ठेवण्यास उपयोगी पडत असे. ती नेहमीं प्रसन्नचित्त असे. हंसतमुखानें आपल्या घरीं आलेल्या पाहुण्याचें ती स्वागत करीत असे. कामगारवर्गांत मार्क्स मोठ्या प्रेमानें मिसळत असे. यामुळें त्याच्या ओळखीचे लोक, त्याचे मित्र व त्याचे अनुयायी यांचा जमाव मार्क्सच्या घरी नेहमीं थाटलेला असे. मार्क्सचा हा वाढता परिवार पाहून जेनीला आनंद वाटे. जेनीचें हें प्रेमाचें वर्तन पाहून या सर्व मंडळींना जेनीबद्दल मोठा आदर वाटत असे. प्रतिपक्षी म्हटला कीं, त्याचा सर्व बाजूंनीं शक्य तितका पाडाव करावयाचा अशी मार्क्सची वृत्ति होती. प्रतिपक्षाच्या माणसाला तो अत्यंत तिरस्कारानें वागवीत असे. मार्क्सच्या टीकाकाराचा

वर्गांत सुरूं झाला म्हणजे प्रतिपक्षी अगदीं गांगरून जात असे. आणि मार्क्स-बरोबर प्रत्यक्ष संबंध आला म्हणजे तर तो जास्तच घाबरून जात असे. पण जेनीबरोबर या प्रतिपक्षीयांचें वर्तन प्रेमळपणाचें असे. प्रतिपक्षी झाला म्हणून काय झालें ! त्याच्याबरोबर तिरस्कारानें व तुसडेपणानेंच वागलें पाहिजे, असें नाहीं. सार्वजनिक कार्याच्या बाबतींतील मतभेदाचा आपल्या खासगी जीवनाशीं काय संबंध ! प्रतिपक्षीयावर सडकून टीका करावी, त्याच्या मतांचा प्रसार होऊं नये म्हणून जोराचा प्रयत्न करावा; पण खासगी व्यवहारांत त्याच्या-बरोबर सभ्यतेनें, आदरानें व प्रेमानें वागलें असतां त्यांत आपल्या कार्याची कोणत्याही प्रकारची हानि होत नाहीं, असें तिला वाटत असे. जेनीचा हा उदात्त व भावनाप्रधान स्वभाव पाहून मार्क्सच्या प्रतिपक्षी मंडळींनासुद्धां तिच्याबद्दल आदर व कौतुक वाटे. जेनी मार्क्सशीं पूर्ण सहमत होती. प्रतिपक्षीयांच्या सिद्धांता-संबंधानें ती आपलें मत ज्या ज्या वेळीं प्रकट करीत असे त्या त्या वेळीं तिच्या बुद्धीची तीव्रता व सूक्ष्मता दिसून येत असे. जेनीचें बुद्धिसामर्थ्य पाहून मार्क्सलाही तिच्याबद्दल सादर अभिमान वाटत असे. " माझीं सर्व हस्त-लिखितें मी जेनीला वांचावयास देत असे. हीं हस्तलिखितें ती अत्यंत लक्षपूर्वक वाची व त्यांतील विचारसरणीवर व मतावर आपलें मत प्रकट करी. तिच्या सूचना महत्त्वाच्या असत व त्याप्रमाणें मी लेखांत फेरफारही करीत असे; " असें मार्क्सनें आपला जांवई पॉल लाफार्ग याच्याशीं एकदां बोलूनही दाखविलें होतें. जेनीला एकंदर सहा मुलें झालीं. त्यांतैकीं दोन मुलगे व एक मुलगी लहानपणीं वारलीं. तीन मुली चांगल्या मोठ्या झाल्या. मार्क्स पतिपत्नींच्या समाजसत्तात्मक विचाराच्या सहवासांतच त्या वाढल्या व मोठेपणीं मार्क्सचीं मतें मान्य असलेल्या व त्यांचा प्रसार कर-ण्यास आपलें आयुष्य वाहून घेतलेल्या कम्युनिस्ट तरुणांशींच त्यांनीं विवाह केले. या मुलींपैकीं इलिनॉर अत्यंत बुद्धिमान् होती व तिच्यावर मार्क्सचें फार प्रेम होतें. याप्रमाणें कौटुंबिक दृष्टीनें व मनाच्या स्वास्थ्याच्या दृष्टीनें मार्क्सला हे दिवस थोडे सुखाचे गेले तरी कामगार चळवळीला मात्र या दिवसांत उतरती कळा लागली होती. समाजसत्तावादी क्रांतिकारी चळ-वळीचा हा पडता काळ होता. पण असल्या परिस्थितींतही मार्क्स कधीं निरुद्यम झाला नाहीं. जेथें जेथें संधि सांपडली तिचा त्यानें पूर्ण उपयोग

करून घेतला व समाजसत्तावादी चळवळीचा पाया अधिक दृढ केला.

पैशाच्या अभावामुळें उत्पन्न झालेल्या अनेक कौटुंबिक अडचणींना मार्क्सला तोंड द्यावें लागत होतेंच. पण त्यांतल्या त्यांत त्याच्या मनाला व्यथित करणारी आणखी एक परिस्थिति निर्माण झाली होती. कम्युनिस्ट क्रांतिकारकांनीं आतापर्यंत जे जे प्रयत्न केले ते ते सर्व फसले होते. क्रांतीच्या रम्य कल्पनांनीं ज्यांचीं मनें भारून गेलीं होतीं, असे पुष्कळ जर्मन तरुण आता हताश होऊन गेले होते. हे तरुण अर्थातच जर्मनीतून हद्दपार झाले होते. तेव्हा अशा रीतीने पराजित झालेल्या व परदेशांत कष्टांत दिवस कंठणाऱ्या या क्रांतिकारकांत क्रांति अयशस्वी का झाली, याविषयी जोराचे वादविवाद सुरु झाले. साहजिकच या वादांत पुष्कळांनीं परस्परांवर अपशब्दाचे प्रहार केले. दुष्ट हेतूंचा आरोप केला, परस्परांचीं व्यक्तिव्यंगें उकरून काढलीं. मार्क्सच्या आयुष्यावर आलेल्या कौटुंबिक अडचणींचें कांहींच वाटलें नाहीं पण आपसांत सुरूं झालेल्या या लाथाळीमुळे त्याला फार दुःख झाले. १८६० च्या सुमारास ‘ हर व्होग ’ या नावाचें चोपडें मार्क्सने प्रसिद्ध केले. या पत्रकांत कम्युनिस्ट क्रांतिकारकांच्या मनःस्थितीचा विचार करून या पडत्या काळांत आपसांतील दुही वाढवून आपले सामर्थ्य कमी करणे हें बहुजनसमाजाच्या हिताच्या दृष्टीनें योग्य नाही, असा सल्ला त्यानें आपल्या सहकाऱ्यांना दिला आहे. “मजूरांकडून पैसे घेऊन त्या फंडावर मार्क्स हवी तशी चैन चालवितो; ” अशा प्रकारचे घाणेरडे आरोप ‘ हर व्होग ’ नावाच्या एका कामगार पुढाऱ्यानें केले होते. हर व्होग हा स्वतःच नेपोलियनकडून लाच खाऊन कामगारचळवळीला विरोध करीत होता. पण ही गोष्ट पुराव्यानिशी सिद्ध करणें कठीण होतें. हर व्होग वर्तमानपत्रामध्यें आपलीं जीं मतें प्रदर्शित करीत असे त्याच्यातील विसंगति दाखवून त्याचें खरें स्वरूप उघड करणें याशिवाय दुसरा काहीं उपायच या बाबतींत शिल्लक राहिलेला नव्हता. हर व्होग याच्या लेखांतीलच उतारे देऊन तो बोनापार्टांच्या मताचा अनुवाद करणारा एक खुळचट व घमेंडानंदन पोपट तरी असला पाहिजे किंवा बोनापार्टच्या पक्षांतील लोकांनीं त्याला विकत घेतलें असलें पाहिजे, असें मार्क्सने मोठ्या कुशलतेने सिद्ध करून दाखविलें. ‘ हर व्होग ” हें पत्रक

प्रसिद्ध करण्यात मार्क्सचा हाच मुख्य हेतु होता. वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध झालेल्या लेखांबद्दल मिळालेला मोबदला, हीच काय ती मार्क्सची या दिवसांतील मिळकत होती. ही मिळकत निश्चित थोडीच असणार! सगळेच संचालक सगळ्याच लेखांबद्दल थोडाच मोबदला देणार व तो भरपूरही थोडाच मिळणार! नाहीं म्हणावयास अमेरिकेंतील 'न्यू यॉर्क ट्रायब्यून' मध्यें 'बातमीदार' या नांवाखालीं प्रसिद्ध होणाऱ्या प्रत्येक लेखाबद्दल त्याला प्रथम १० व पुढें १५ डॉलर नियमानें मिळत असत. १८५१ ते १८६० पर्यंत मार्क्सची निश्चित अशी मिळकत एवढीच होती. जागेचें भाडें, वर्तमानपत्रांची वर्गणी व टपालखर्च इतकादेखील या मिळकतींतून मोठ्या मुष्किलीनें भागत असे. 'न्यू यॉर्क ट्रायब्यून' मध्यें प्रसिद्ध होणारे लेख एकेका स्वतंत्र विषयावर लिहिलेले माहितीपूर्ण निबंधच असत. या लेखांकरितां सामुग्री गोळा करावयाची, ती वाचून त्यांतील टिपणें काढून ठेवावयाचीं व विषयांची व्यवस्थित व चटकदार मांडणी करावयाची यांत त्याचा बराच वेळ जात असे. अशा रीतीनें वर्तमानपत्रांकरितां लेख लिहिण्यांत मार्क्सचा बराच वेळ जात होता, यामुळें ग्रंथलेखनाचें काम मागें पडत असे. समाजसत्तावादाच्या दृष्टीनें अर्थशास्त्रावर एक विस्तृत विवेचनात्मक निबंध लिहावयाचा व तो ग्रंथरूपानें प्रसिद्ध करवयाचा, ही मार्क्सची पुष्कळ दिवसांची इच्छा होती पण ती शेवटीं अपुरीच राहिली.

१८६० नंतरचीं दहा वर्षें मात्र मार्क्सच्या आयुष्यांत थोडीशीं बरीं गेलीं. मार्क्सचा एक मित्र वुइल्यम वॉफ यानें आपली आठशें पौंडांची इस्टेट मार्क्सच्या स्वाधीन केली. तसेंच एंजल्सही यावेळीं मार्क्सला नियमितपणें पैशाची मदत करूं लागला. एंजल्स यावेळीं लंडन येथेंच येऊन राहिला होता. त्याच्याकडून दरसाल साडेतीनशें पौंड अगदीं नियमितपणें मिळूं लागल्यामुळें मार्क्सला निर्धास्तपणें आपलें ग्रंथलेखनाचें काम चालू ठेवितां आलें. 'कॅपिटल' हा ग्रंथ मार्क्सनें या दिवसांतच लिहिला. या ग्रंथाची पहिली आवृत्ति त्यानें आपला मित्र वुइल्यम वॉफ याला समर्पण केली.

याच सुमारास १८६२ सालीं लंडन येथें एक अंतर्राष्ट्रीय प्रदर्शन भरलें. त्यावेळीं युरोपांतील निरनिराळ्या राष्ट्रांचे कामगार पुढारी तेथें आले होते.

विशेषतः फ्रान्समधील कामगार चळवळींतील पुढाऱ्यांनीं ही संधि सा लंडनमधील कामगार पुढाऱ्यांशीं समाजसत्तावादी चळवळीच्या प्रचारासंबंधानें चर्चा केली. कामगार चळवळीला अंतर्राष्ट्रीय स्वरूप कसं देतां येईल, हा या चर्चेतील एक मुख्य प्रश्न होता. ही चर्चा येथेंच थांबली नाहीं. १८६३ व १८६४ हीं दोन वर्षें पत्रव्यवहाराच्या साधनानें या दोन्ही राष्ट्रांतील कामगार पुढाऱ्यात ही चर्चा चालू होती. इतक्या दिवसाच्या या वाटाघाटीनंतर या मंडळींनीं मजूरांचा एक अंतर्राष्ट्रीय संघ प्रस्थापित करण्याचें ठरविलें व १८६४ च्या सप्टेंबर महिन्यात हा निर्णय अंमलांतही आणला. पॅरिस व लंडन येथील कामगार प्रतिनिधी याची सप्टेंबर ता. २५ ते २८ पर्यंत एक परिषद भरविण्यात आली. या बैठकींतून संघाच्या नियमासंबंधानें व कार्यक्रमासंबंधानें चर्चा झाली व ता. २८ रोजीं सेंट मार्टिन हॉलमध्यें एक सार्वजनिक सभा भरवून या संघाची प्रतिष्ठापना करण्यात आली व 'अंतर्राष्ट्रीय कामगारसंघ' असें या संघास नाव देण्यांत आलें. 'फर्स्ट इंटरनॅशनल' या नावानें हा संघ पुढें प्रसिद्ध झाला. या परिषदेस हजर राहण्याबद्दल कार्ल मार्क्सला विनंति करण्यात आली होती व मार्क्सनें मोठ्या उत्साहानें या परिषदेच्या कामात भाग घेतला होता. संघाचें ध्येय, धोरण, कार्यक्रम व संघटनेचे नियम वगैरे निश्चित करण्याबद्दल कमिट्या व पोटकमिट्या या परिषदेंत निवडण्यांत आल्या. मॅझिनीच्या अनुयायांनीं व कांहीं कल्पनावादी फ्रेंच सभासदांनीं आपल्या योजना परिषदेपुढें मांडल्या. या योजनांचे कागद विचाराकरितां मार्क्सच्या स्वाधीन करण्यात आले त्यावेळीं त्यानें या सर्व योजनांना कचऱ्याची टोपली दाखविली. मार्क्सनें स्वतःच परिषदेचें प्रास्ताविक भाषण तयार केलें होतें. या भाषणात १८२५ पासून १८६४ पर्यंत इंग्लंडमधील कामगारवर्गाच्या परिस्थितींत कसकशीं स्थित्यंतरें घडून आलीं, कामगारवर्गाचा उद्धार होण्यास कोणत्या उपायांची योजना केली पाहिजे, याचाही निर्णय या इतिहासाच्या साधनानें मार्क्सनें केला होता. या संस्थेचें काम कोणत्या तत्त्वावर चालावयाचें, हें मार्क्सनेंच मुख्यतः ठरविलें व तें सर्वांना मान्य झालें. ध्येय, धोरण व कार्यक्रम या सर्व गोष्टींचा समावेश त्यानें या लेखात इतक्या कुशलतेनें केला होता कीं, हा लेख इंग्लंड व फ्रान्स या दोन्हीही देशातील प्रतिनिधींना आवडला. कामगार चळवळीच्या

पडत्या काळांत तिच्यांत नवीन जीवन घालावयाचें व तिला कार्यक्षम करावयाचें हें काम अत्यंत कठीण होतें. मनांत असेल तें बाहेरही बोलून दाखवावयाचें यालाही धैर्य लागत असतें, पण हें काम मार्क्सनें अत्यंत धिटाईनें व चातुर्यानें केलें. या कामगारसंघाचें धोरण कशा प्रकारचें असावें यासंबंधानें मार्क्सनें आपले पुढील विचार एंजल्स याला कळविले होते. "कामगारवर्गानें आपली आर्थिक स्थिति सुधारण्याकरितां व राजकीय हक्क संपादन करण्याकरितां स्वतंत्र रीतीनें चळवळ करावी, संघटनेच्या जोरावर जे सुधारणेचे हक्क कामगारवर्गानें संपादन केले आहेत त्यांची अंमलबजावणी करावयास लावावी, सामाजिक क्रांति घडवून आणण्याकरितां जगांतील सर्व कामगारांनीं संघटित प्रयत्न करावा व साम्राज्यवादी राष्ट्रीय सरकारच्या गुप्त व लष्करी मुत्सद्दीगिरीला प्रतिरोध करावा." परिषदेपुढें झालेल्या आपल्या प्रास्ताविक भाषणांत मार्क्सनें याच धोरणाचा पुरस्कार केला होता.

अंतर्राष्ट्रीय कामगारसंघ प्रस्थापण्यांत आला त्यावेळचें प्रास्ताविक भाषण मार्क्सनें ज्याप्रमाणें तयार केलें त्याचप्रमाणें संघाची नियमावलीही मार्क्सनेंच तयार केली. संघाचे पुढील उद्देश या नियमावलींत विशद रीतीनें मांडले आहेत:—

"कामगारवर्गाचा उद्धार कामगारवर्गानेंच केला पाहिजे. कामगारवर्गाच्या उद्धाराची चळवळ त्या वर्गाला विशेष सवलती मिळवून द्याव्या, म्हणून करण्यांत येत नाहीं तर कामगारवर्गाला समाजांतील इतर घटकांप्रमाणें समान हक्क प्राप्त व्हावे, आपलीं योग्य तीं कर्तव्यें बजावण्यास तो समर्थ व्हावा, समाजांतील कोणत्याही वर्गाला दुसऱ्या कोणत्याही वर्गावर कोणत्याही रीतीनें सत्ता गाजवितां येऊं नये म्हणून करण्यांत येत आहे.

"निर्वाहाचीं सर्व साधनें एका विशिष्ट वर्गाच्या हातीं गेलीं आहेत. कामगारसमाजास भोगाव्या लागणाऱ्या सर्व आपत्तींचें मूळ यांतच आहे. या समाजाची बौद्धिक अवनति होण्यास हीच परिस्थिति कारणीभूत झाली आहे आणि या वर्गसत्तेमुळेंच राजकीय दृष्ट्या हा वर्ग परतंत्र झाला आहे.

"कामगारवर्गाचा आर्थिक उद्धार हें या चळवळीचें साध्य आहे व राजकीय चळवळ हें त्याचें साधन आहे.

" देशांतील कामगारवर्गात अनेक कारणामुळें दुही माजली आहे व निरनिराळ्या देशांतील कामगारवर्गांना परस्परांसंबंधानें प्रेम व सहानुभूति वाटत नाहीं, यामुळेच कामगारवर्गाच्या उद्धाराचें उदात्त ध्येय आजवर सिद्धीस गेलेलें नाहीं.

" कामगारवर्गाचा उद्धार ही स्थानिक व राष्ट्रीय बाब नाहीं तर मानवी समाजापुढील हा एक महत्त्वाचा प्रश्न आहे. जगांतील सर्व राष्ट्रांनीं विशेषतः पुढारलेल्या राष्ट्रांनीं हा प्रश्न सोडवावयाचा कसा याचा तात्विक व व्यावहारिक दृष्टया विचार केला पाहिजे.

" युरोपमधील निरनिराळ्या उद्योगशील राष्ट्रांतील कामगारवर्गात जी जागृति झाली आहे ती आशाजनक असली तरी राष्ट्राराष्ट्रांतून चाललेल्या कामगारचळवळींचा परस्परसंबंध येत नसल्यामुळें या बाबतींत झालेल्या पूर्वीच्या चुका पुन्हा होऊं नयेत याकरितांच हा अंतर्राष्ट्रीय संघ प्रस्थापित करण्यांत येत आहे."

१८६४ सालीं लंडन येथें झालेली ही पहिली अंतर्राष्ट्रीय परिषद यशस्वी होण्यास मार्क्सचे प्रयत्नच कारणीभूत झाले. परिषदेस आलेल्या कामगार प्रतिनिधींचें विशेषतः इंग्रज व फ्रेंच कामगार प्रतिनिधींचें एकमत होईल, असा कार्यक्रम या परिषदेंत ठरविण्यात आला. मार्क्स या परिषदेंत हजर नसता तर ही गोष्ट शक्य झाली नसती. आपल्या तत्त्वास बाध येतां कामा नये व त्याबरोबर सर्वांची मान्यता मिळाली पाहिजे, अशा रीतीनें परिषदेपुढें आलेल्या ठरावात योग्य त्या शब्दांचा फेरफार करण्याचें काम मार्क्सनें मोठ्या कुशलतेनें केलें. यामुळें या संस्थेच्या संचालकवर्गात मार्क्सची निवडणूक झाली व त्याला सेक्रेटरीचें काम देण्यांत आलें. यापुढें १८६५ ते १८७१ पर्यंत मार्क्सनें या अंतर्राष्ट्रीय कामगारसंघाचें काम केलें. मार्क्सचा बराच वेळ या कामांत जाऊं लागला व त्याचें ग्रंथलेखनाचे काम पुन्हा मागें पडूं लागलें. या दिवसात संघाच्या कार्याची प्रगति मोठ्या झपाट्यानें झालेली पाहून त्याचें अंतःकरण पुन्हां आशायुक्त बनलें. ग्रंथलेखनाचें काम मागें पडल्याबद्दल त्याला कांहीच वाटलें नाहीं. उलट थोड्याच दिवसांत पुन्हा एक क्रांतीची चळवळ आपल्याला करता येईल या कल्पनेनें त्याचें अंतःकरण उत्साहपूर्ण झालें. " संघाची प्रगति इतकी

जोरानें होत आहे, व त्याचें सामर्थ्य इतकें वाढत आहे कीं, थोड्याच दिवसात क्रांतीची तयारी होईल, असें मला वाटूं लागलें आहे. १८४८ नंतर पुन्हां इतक्या लवकर आपली अशी तयारी होईल ही कल्पना मला नव्हती." मार्क्सचे हे विचार वाचून एंजल्सचेंही अंतःकरण भरून गेलें. हे दोन्ही मित्र जेव्हां लंडनमध्येंच असत त्यावेळीं एकही दिवस असा जात नसे कीं, ज्या दिवशीं हे दोघेजण परस्परांना भेटले नाहींत व एखाद्या विषयावर दोनतीन तासपर्यंत त्यांच्यांत चर्चा झाली नाहीं. एंजल्सला त्याच्या कामकाजामुळें लंडनमध्यें राहाणें अशक्य होई. अशा प्रसंगीं या दोन्ही मित्रांत सारखा अविरत पत्रव्यवहार चालत असे. या दोघा मित्रांत झालेला पत्रव्यवहार पुस्तकरूपानें तीन ग्रंथांत प्रसिद्ध झाला आहे.

अंतर्राष्ट्रीय कामगारसंघाच्या सर्व सभांना मार्क्स हजर होता. या बाबतींत त्याचा विशेष कटाक्ष असे. असल्या सभा बरखास्त झाल्यानंतर आपल्या मित्रमंडळींबरोबर बाजूस असलेल्या एका शांत हॉटेलमध्यें तो फराळाकरितां जात असे. परराष्ट्रीय लोकांच्या वस्तींतील एका रस्त्यावर हें हॉटेल होतें. १८४० मध्यें लंडन येथें स्थापित झालेल्या 'कामगार शिक्षण समाज' या संस्थेच्या चालकांतर्फे हें हॉटेल चालविण्यांत येत असे. हें हॉटेल म्हणजे परराष्ट्रीय चळवळ्यांचा एक अड्डाच बनलें होतें. गेल्या महायुद्धापर्यंत हें हॉटेल अस्तित्वांत होतें. १९१४ मध्यें महायुद्ध जाहीर झाल्याबरोबर इंग्रज सरकारनें तें तावडतोब बंद केलें. फराळाकरितां जमलेल्या या मंडळींत सभेंत झालेल्या ठरावांसंबंधानें मोठ्या जोराची चर्चा चाले. तेथून घराकडे निघाले तरी ही चर्चा चालूच असावयाची. पण या चर्चेंत विशेषतः रोजचे कामाचे तास किती असावे, यासंबंधानेंच वाटाघाट होत असे. १८६६ पासूनच रोजचे कामाचे तास आठ असावे, यासंबंधानें मार्क्स व त्याचे दोस्त यानीं चळवळ चालू ठेविली होती. १८६६ सप्टेंबरमध्यें जिनिव्हा येथें भरलेल्या मजूरसंघाच्या काँग्रेसमध्यें आठ तासाच्या दिवसासंबंधानें चळवळ करावी, असा कार्यक्रम ठरविण्यांत आला होता. 'सामान्यतः कामाचे तास आठ असावे अशी आम्ही चळवळ करीत आहों, पण रोजचे याच्या दुप्पट तास काम करण्याचें आमच्या अंगवळणींच पडलें आहे,' असे या चर्चेच्या वेळीं मार्क्स नेहमीं बोलून दाखवीत असे. मार्क्सला

याप्रमाणें वाजवीपेक्षा फारच जास्त वेळ काम करावें लागत असे, हें खरें आहे. असें जबरदस्त काम पडल्यामुळें मार्क्सची प्रकृतीही बिघडली होती. अंतर्राष्ट्रीय कामगारसंघाचा सेक्रेटरी या नात्यानें इतकें खूप काम मार्क्सला करावें लागत होतें कीं, इतराना त्याची कल्पनाच करतां यावयाची नाहीं. याशिवाय स्वतःच्या कुटुंबाचें जीवन चालविण्याकरिताही त्याला किती तरी तास काम करावें लागे. ब्रिटिश म्युझियमच्या वाचनालयांत तर तासचे तास तो वाचनात गढलेला दिसत असे. या ठिकाणी अनेक ग्रंथ चाळून आपल्या ऐतिहासिक व अर्थशास्त्रविषयक लेखाबद्दलची सामुग्री गोळा करण्यात चोवीस तासापैकीं किती तास गेले याचें त्याला भानही राहात नसे.

१८६५ ते १८६७ हीं पहिलीं दोन वर्षे 'अंतर्राष्ट्रीय कामगारसंघ' ही संस्था प्राउधनच्या अनुयायाच्या ताब्यात गेली. ज्याचें बहुमत त्याची संस्था. अशा परिस्थितीत मार्क्सला अर्थातच आपला कार्यक्रम अंमलात आणता आला नाहीं. संघानें कोणत्याही राजकीय चळवळींत भाग घेता कामा नये, असें प्राउधनच्या अनुयायाचें मत होतें. समाजसत्तावादाच्या तर ते विरुद्धच होते. प्राउधन व मार्क्स यांच्या मतात बरेंच साम्य असलें तरी प्राउधन हा कल्पनावादी असल्यामुळें प्रत्यक्ष व्यवहारांतील अडचणींची कोंडी कशी फोडावी, याचा मार्ग तो दाखवूं शकला नाहीं. प्राउधनच्या अनुयायाचीही अशीच स्थिति झाली. अंतर्राष्ट्रीय संघ बहुमताच्या जोरावर ताब्यात ठेवतां आला तरी मजुराच्या हलाखीच्या परिस्थितींत सुधारणा होईल, असा कोणताही कार्यक्रम त्यांना यशस्वी करून दाखविता आला नाही. यामुळें प्राउधनच्या अनुयायाचा पक्ष हतबल झाला व संघाचीं सर्व सूत्रें मार्क्स व त्याचे स्नेही याच्या ताब्यांत आलीं. कामगारसमाजावर जे रोजच्या रोज अन्याय होत आहेत ते दूर करण्याचा प्रयत्न करावा, त्यांच्या आर्थिक परिस्थितींत सुधारणा घडवून आणावी, हें कामगार चळवळीचें धोरण असावयास पाहिजे ही गोष्ट मार्क्सलाही पूर्ण मान्य होती. पण असें करतांना राजकारणाकडेही आपलें लक्ष असलें पाहिजे, असें मार्क्सचें मत असे. अर्थशास्त्र व राजकारण हीं दोन्हीं जुळीं भावंडें आहेत, तेव्हां कामगारसमाजाचें अंतिम हित साधावयाचें असल्यास राजकीय सत्तेचीं

सूत्रेंही त्याच्या ताब्यांत आलीं पाहिजेत, असें मार्क्सचें म्हणणें होतें. अंतर्राष्ट्रीय संघ आपल्या पक्षाच्या ताब्यांत आल्यानंतर वरील धोरणानेंच त्याच्या सर्व चळवळी मार्क्सनें चालविल्या होत्या. मार्क्सच्या पक्षानें संघाचें कार्य नांवारूपास आणलें, त्याचें संख्याबल वाढविलें, तशीच त्याची लोकप्रियताही वाढविली. विशेष महत्त्वाची गोष्ट म्हणजे शेवटीं संघातर्फे फ्रान्समध्यें राज्यक्रांति घडवून आणण्याचा प्रयत्नही करण्यांत आला.

१८६६, १८६७ व १८६८ मध्यें सप्टेंबर महिन्यांत अनुक्रमें जिनिव्हा, लॉसेन व ब्रुसेल्स येथें या संघाच्या परिषदा झाल्या. पुढील वर्षाची परिषद कोठें व केव्हां भरवावयाची हें आदल्या परिषदेंत ठरविण्यांत येत असे. परिषदेची वेळ तर नक्कीच ठरविण्यांत आली होती. यामुळें प्रतिनिधींना निमंत्रणें वगैरे पाठविण्याचें कारणच पडत नव्हतें. सर्व प्रतिनिधी अगदीं वेळेवर हजर होत व परिषदेचें काम सुरू होई. या तीन वर्षांत या संघाच्या सभासदांची संख्या सारखी वाढत होती व अंतर्राष्ट्रीय राजकारणांत त्याचें महत्त्वही वाढत चाललें होतें. ब्रुसेल्सच्या परिषदेंत प्राउधनच्या अनुयायांनीं आपला कार्यक्रम मंजूर करून घेण्यासंबंधानें पुन्हा एकदां खटपट करून पाहिली, पण ३० विरुद्ध ४ मतांनीं त्यांचा ठराव नामंजूर झाला. जगांतील निरनिराळ्या राष्ट्रांमधील कामगारसंघांना या अंतर्राष्ट्रीय संघांत सामील करून घेण्यांत येत असे. १८६८ मध्यें या संघांत सामील झालेल्या जर्मन कामगारसंघांच्या सभासदांची संख्या १,१०,००० होती. फ्रान्स व अमेरिका या राष्ट्रांतील सभासदांची संख्या ८,००,००० होती. इंग्लंडमधील बहुतेक सर्व कामगारसंघ या अंतर्राष्ट्रीय संघांत सामील झाले होते. नेपल्स फेडरल ट्रेड कमिटीनें इटलीमध्यें कामगारसंघटनेचें कार्य सुरू केलें होतें व हॉलंड व स्पेनमध्येंही या कामाला सुरवात झाली होती. १८६९ मध्यें बेसल येथें झालेल्या परिषदेंत या संघाचें सामर्थ्य अधिकच वाढलेलें दिसून आलें. प्राउधनच्या अनुयायांनीं आपला कार्यक्रम मंजूर करून घेण्याकरितां पुन्हां एकदां खटपट करून पाहिली पण या खेपेस ५४ विरुद्ध ४ मतांनीं तो नामंजूर झाला.

परंतु यश हें कधींही निर्भेळ असूं शकत नाहीं. लपून छपून असलेल्या विघ्नांची त्याला बाधा होते. बाकुनिन व त्याचे अनुयायी यांनीं आपला

हागणाभार समाजव्यवस्थेचा कार्यक्रम सभाकडून मंजूर करून घेण्याचा जो त्यांचा प्रयत्न केला त्यामुळेंच अंतर्राष्ट्रीय कामगारसंघाच्या कार्यात विघ्न उत्पन्न झालें, एवढेंच नव्हे तर या लोकांशी सहमत नसलेल्या मार्क्स वगैरे इतर प्रतिनिधींचा बाकुनिनच्या पक्षाशीं भयंकर झगडा सुरू झाला व त्या झगड्यानंतर शेवटीं या संघाची इतिश्री झाली.

बाकुनिनचा कार्यक्रम पुढील तीन तत्त्वांवर अधिष्ठित झाला होता:—

( १ ) क्रांतीनंतर तावडतोब राज्यसंस्था नष्ट करण्यात यावी.

( २ ) भल्याभल्याची आपल्या शत्रूला पर्वा नसल्यामुळे आपणही त्याच्याशीं तसेंच वागावें. प्रसंगीं चोरी व खून वगैरे उपाय योजावे लागले तरी मागें पुढें पाहूं नये. तसें करणें म्हणजे आपल्या शत्रूंची ध्येयें आपल्याला मान्य आहेत, असें कबूल करण्यासारखेंच आहे.

( ३ ) क्रांतीनंतर प्रस्थापित होणाऱ्या समाजात सर्व व्यक्तींना स्वैर स्वातंत्र्य मिळावयाचें असलें तरी हें क्रांतीचें युद्ध चालवितांना या चळवळींतील सर्व लोकांनीं कडक शिस्तीखालीं वागलें पाहिजे. ध्येयसिद्धीकरिता आपल्या सर्वस्वाचा त्याग करण्यास तयार असलें पाहिजे. दिलेले हुकुम अगदी मुकाट्यानें व आंधळेपणानें पाळले पाहिजेत व त्यांची बजावणी करतांना मुळींच मागें पुढें पाहतां कामा नये. ही चळवळ करीत असताना मधूनमधून आपल्या मतांचा प्रचार करण्याकरितां इतर चळवळींतूनही भाग घ्यावा व पार्लमेंट-सारख्या संस्थांतून आपले सभासद निवडून आणण्याचा प्रयत्न करावा. मतें मिळविण्याच्या या चळवळींत सूसासूक विचार कधींही करूं नये. मतदारांच्या खोट्या याद्या बनविणें, खोटीं नावें धारण करणें, खोटेच मतदार-संघ उभे करणें, एक ना दोन दुसऱ्या उमेदवारांना हाणून पाडण्याकरिता लागेल त्या व सुचेल त्या उपायांचा अवलंब करावा.

बंड उभारून राज्यसंस्थेचा पूर्ण नाश करावा व पार्लमेंटात शिरून कामगारवर्गाच्या हितरक्षणाची चळवळ करता येईल, ही कल्पनाही मनांत आणूं नये. ईश्वर व राज्यसंस्था ह्या दोन्हींविरुद्ध आपली चळवळ चालविली पाहिजे. बाकुनिनचा वरील कार्यक्रम व त्याची ही सर्वच मतें मार्क्सला अर्थातच पसंत पडली नाहींत. गुप्तमंडळें स्थापून

सशस्त्र कटवाल्याच्या साहाय्यानें ठिकठिकाणीं खून व मारामाऱ्या करून बंडें उठवावयाचीं व दंगाधोपा करावयाचा हा बाकुनिनचा कार्यक्रम तर मार्क्सला मुळींच मान्य नव्हता. अंतर्राष्ट्रीय कामगारसंघांतील स्विस प्रतिनिधींच्या साहाय्यानें बाकुनिननें आपला हा कार्यक्रम मंजूर करून घेण्यासंबंधाचा लढा चालविला होता. १८६९ च्या परिषदेंत या प्रश्नाचा निकाल लागला नाहीं म्हणून १८७० सालीं "समाजसत्तावाद विरुद्ध शासनाभाववाद" हा झगडा चालविण्याची जोराची तयारी उभय पक्षांनीं चालविली होती. परंतु फ्रान्समधील क्रांतीमुळें पुढील दोन वर्षें ही परिषद भरूंच शकली नाहीं.

१८७० सप्टेंबरच्या पहिल्या तारखेस फ्रेंच सैन्याच्या एका तुकडीचा सेडान येथें पराभव झाला व ही सर्व तुकडी पाडाव करण्यांत आली. या तुकडींत कर्मधर्मसंयोगानें फ्रेंच बादशहा लुई बोनापार्ट हाही पकडला गेला व त्याला कैद करण्यांत आलें. ता. ४ सप्टेंबर रोजीं फ्रान्समधील साम्राज्य नष्ट झालें असून तेथें प्रजासत्ताक राज्य प्रस्थापित झालें आहे, असें जाहीर करण्यांत आलें आणि लोकसत्तावाद्यांचें हंगामी सरकार राज्यकारभाराचें कामकाज पाहूं लागलें. फ्रान्समध्यें अशा रीतीनें राज्यक्रांति घडून येत असलेली पाहून अंतर्राष्ट्रीय कामगारसंघांतील फ्रेंच सभासदांना कामगारांचें राज्य प्रस्थापित करण्यास हीच योग्य संधि आहे असें वाटलें. कोणत्याही राष्ट्रांतील राज्यसत्ता अखेर कामगारवर्गाच्या ताब्यांत आली पाहिजे, ही गोष्ट मार्क्सला मान्य होती. तथापि संघांतील फ्रेंच सभासदांचें हें धोरण मार्क्सला पसंत पडलें नाहीं. संघाचें बल वाढलें आहे व तो लोकप्रियही झाला आहे, तथापि क्रांतीच्या वेळीं पुढें सरून सर्व राज्यसूत्रें आपल्याच ताब्यांत घेण्याइतकें व पुढें तीं तशींच आपल्या हातांत टिकविण्याइतकें संघाचें सामर्थ्य वाढलेलें नाहीं, असें मार्क्सला वाटत होतें व सप्टेंबर ६, १८७० रोजीं मार्क्सनें एंजल्सला पाठविलेल्या पत्रांत त्यानें आपलें हें मत प्रकट केलें होतें. क्रांतीनंतर प्रस्थापित झालेल्या या नव्या हंगामी लोकसत्ताक राज्याचे पुरस्कर्ते लोकसत्तेला शेवटपर्यंत उचलून धरतीलच असें नाहीं, ही गोष्ट मार्क्स जाणून होता. एंजल्सचेंही मत असेंच होतें. तथापि पॅरिसमधील कामगारांनीं हें सरकार उलथून पाडण्याच्या नादीं

लागणें चांगले नव्हे, स्वपरबलाबल न पाहता असल्या कामास हात घालणें हें मूर्खपणाचें होईल, असें या दोघा मित्रांनी फ्रेंच कामगार पुढाऱ्यांना परोपरीनें लिहून मागितलें. पण त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. "राज्यक्रांति हें कामगारसंघाचें ध्येयच आहे, पण या क्रांतीला हात घालण्याची ही वेळ नव्हे. फ्रान्समधील १८४८ च्या क्रांतीनंतर कामगारवर्गावर अनेक प्रकारचे अत्याचार झाले हें खरें आहे. कामगारवर्गाच्या त्या वेळच्या परिस्थितीत व आजच्या परिस्थितींत फारसा फरक पडलेला आहे अशांतला भाग नाहीं. पण वरील क्रांतीनंतर फ्रान्समधील पक्षोपपक्षांत जें रणकंदन माजलें त्याचीच पुनरावृत्ति आताही करण्यांत अर्थ नाहीं. मागच्या अनुभवानें मागच्यांनी शहाणे व्हावें व पुन्हा तसें घडून न येईल असा प्रयत्न करावा. फ्रान्समध्यें आज प्रजासत्ताक राज्य प्रस्थापित झालें आहे. या क्रांतीमुळें जें स्वातंत्र्य फ्रान्समधील जनतेला आज मिळालें आहे त्याचा पूर्ण फायदा फ्रेंच कामगारांनीं घ्यावा व आपली संघशक्ति वाढविण्याचा प्रयत्न करावा. नाहींतर प्रतिक्रांति घडवून आणण्याचा प्रयत्न करू नये. शांततेच्या मार्गाचा अवलंब करण्यानें फ्रेंच कामगारांचेच काय तर अंतर्राष्ट्रीय कामगारसंघाचेही बळ वाढेल व कामगारवर्गाचाही उद्धार होईल." अंतर्राष्ट्रीय संघाच्या सर्वसाधारण सभेपुढें भाषण करताना मार्क्सनें वरील आशयाचे विचार प्रदर्शित केले. पण मार्क्सच्या या उपदेशाला फ्रेंच कामगारांनी मुळींच मानलें नाहीं. फ्रान्समधील त्यावेळची परिस्थितीही तशी नव्हती. क्रांतीनंतर प्रस्थापित झालेलें हंगामी सरकार लोकसत्तेचें बल वाढविण्याऐवजीं तिला पायबंद कसा घालता येईल याचाच विचार करूं लागलें होतें. सरकारच्या या धोरणामुळें कामगारवर्ग अधिकच प्रक्षुब्ध झाला. फ्रान्समधील भांडवलवाल्यांच्या लोकसत्ताविरोधी धोरणामुळें तर कामगारांच्या या संतापाग्नींत तेल ओतल्यासारखेंच झालें. अशा परिस्थितींत शांतीच्या मंत्राचा काय उपयोग होणार! १८७१ मार्च १८ रोजी फ्रेंच कामगारांनी क्रांतीचें निशाण उभारलें व फ्रान्समध्यें साम्यवादी प्रजासत्ताक राज्य प्रस्थापित झालें असल्याचें जाहीर केलें. पॅरिस हीच या नवीन समाजसत्तावादी सरकारची राजधानी ठरविण्यांत आली. फ्रान्समधील ही क्रांतीची चळवळ इतिहासांत 'पॅरिस कम्यून' या नावानें प्रसिद्ध आहे. पॅरिसमधील हा

क्रांतीचा प्रयत्न अर्थातच यशस्वी झाला नाहीं. सात आठवड्यांत य चळवळीची धुळदाण उडविण्यांत आली. "फ्रान्समधील यादवी १८७१" या नांवाची एक पुस्तिका मार्क्सनें यानंतर प्रसिद्ध केली फ्रान्समधील कामगारांनीं मार्क्सचा शांतीचा उपदेश मानला नाहीं म्हणून तो त्यांच्यावर मुळींच रागावला नाहीं, किंवा क्रांतिकारकांशीं असलेला आपला संबंधही त्यानें तोडला नाहीं. हंगामी सरकारचे मुत्सद्दी विचारानें वागले असते, स्वातंत्र्य, समता व बंधुभाव या तत्त्वांचें प्रत्यक्ष पालन होईल, अशा प्रकारचें उदात्त वर्तन त्यांनीं ठेविलें असतें, प्रजासत्ताक राज्याचा उपयोग फ्रान्समधील भांडवलदारांची सत्ता वाढविण्याकडे न करतां कामगार जनतेचें कल्याण कशानें होईल व तिचें सामर्थ्य कसें वाढेल, याचा विचार त्यांनीं केला असता तर या नवीन आपसांतील युद्धाचा प्रसंगच आला नसता. अशा आशयाचे आपले विचार मार्क्सनें या पुस्तिकेंत प्रदर्शित केले होते. मार्क्सच्या आयुष्यात याप्रमाणें युरोपांतील कामगार जनतेनें दोनतीन वेळां क्रांतीचे प्रयत्न केले पण त्यांत यश आलें नाहीं. युरोपांतील एकतंत्री राज्यसत्तेला उतरती कळा लागली होती, लोकसत्तेचा सर्वत्र पुरस्कार होत होता, पण भांडवलदारवर्गाच्या वाढत्या सामर्थ्यामुळें समाजांतील अर्थिक विषमता नष्ट होऊन बहुजनसमाज पूर्ण स्वतंत्र व आत्मोद्धारक्षम होण्याचा काळ अद्याप आला नव्हता, हेंच खरें.

क्रांतीच्या या चळवळीनंतर १८७२ सालीं हेग येथें झालेल्या परिषदेंत बाकुनिन हजर नव्हता. पण त्याचा दोस्त शासनाभाववादी गिलॉमी यानें आपल्या पक्षाचा कार्यक्रम मंजूर करून घेण्याचा प्रयत्न केला, पण तो ठराव बहुमतानें नापास झाला. मार्क्स व त्याचे अनुयायी यांनीं या प्रश्नावर चर्चा करण्याचेंच नाकारलें व त्याच्या ऐवजीं बाकुनिन व गिलॉमी यांना संघांतून काढून टाकण्याचा ठराव परिषदेपुढें मांडला व तो बहुमतानें पास झाला. ठराव बहुमतानें पास झाला खरा, पण अंतर्राष्ट्रीय कामगारसंघांत मात्र त्यामुळें फूट पडली. संघाचें बल अर्थातच कमी झालें. आपल्याला पुन्हां संघांत घेण्यासंबंधानें बाकुनिनच्या पक्षानें त्याच्या जनरल कौन्सिलकडे अर्ज केला पण त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. खुद्द बाकुनिननेंही मार्क्सला पत्र पाठवून आपल्या पूर्वीच्या वर्तणुकीबद्दल पश्चाताप व्यक्त केला होता, पण

मार्क्सनें त्याला पुन्हां संघांत घेण्याचें साफ नाकारलें. १८७३ सालीं स्पेनमध्यें झालेल्या दंगलींत बाकुनिनचा पक्ष नामोहरम झाला. हेग येथील परिषदेंतच एंजल्सनें संघाची कचेरी न्यूयॉर्कला न्यावी, अशी सूचना मांडली होती. फ्रान्समध्यें या संघाची परिषद भरविण्यास कायद्यानें मनाई करण्यात आली होती. जर्मनी व इंग्लंडमधील सरकारांनींही असेंच मनाई हुकूम काढले होते. संघाची कचेरी न्यूयॉर्कला नेण्यांत आली पण १८७६ सालीं संघाच्या जनरल कौन्सिलनें "अंतर्राष्ट्रीय कामगारसंघ" ('फर्स्ट इंटरनॅशनल') बंद करण्यात आला आहे, अशी नोटीस संघाच्या कचेरीवर लाविली.

# अखेरचे दिवस

आयुष्याच्या अखेरच्या बारा वर्षांत अनेक शारीरिक व्याधींशीं मार्क्सला झगडावें लागलें. अविश्रांत श्रम हें या सर्व रोगाचें मूळ होतें. त्याचें यकृत् बिघडलें होतें. त्याचीं फुप्फुसें सुजलीं होतीं. दम्यानें व खोकल्यानें तो बेजार होऊन गेला होता. आरोग्य, सुख व कुटुंब याचा ज्या कार्याकरितां मार्क्सनें यज्ञ केला तें अद्याप अपूर्णच राहिलें होतें. मार्क्स याप्रमाणें अनेक व्याधींनीं गांजला होता तरी त्याचा अभ्यास करण्याचा उत्साह कमी झाला नव्हता. रशियांतील शेतकरीवर्गाची परिस्थिति समजून घेण्यासाठीं त्यानें रशियन भाषेचा अभ्यास केला. अमेरिकेंतील शेती कसकशी वाढत गेली याची त्यानें माहिती करून घेतली. त्याचप्रमाणें बँकिंग, स्टॉक एक्चेंज, हायर मॅथॅमॅटिक्स, पदार्थविज्ञानशास्त्र, भूगर्भशास्त्र याचाही त्यानें सूक्ष्म रीतीनें अभ्यास केला. 'गोथा कार्यक्रमावर टीका' हें पुस्तक मार्क्सनें याच दिवसात लिहिलें. सरकार कसें असावें, भांडवलशाही नष्ट होऊन समाजसत्तावादी राज्य प्रस्थापित होण्याच्या संक्रमणकालात समाजाची परिस्थिति कशा प्रकारची राहील, खुद्द समाजसत्तावादी समाज म्हणजे काय व तो कशा प्रकारचा असेल, या संबंधांची स्पष्ट कल्पना मार्क्सनें या पुस्तकांत मांडली आहे. पण हे श्रम त्याला झेपले नाहींत. प्रकृतीला आराम पडावा म्हणून हवापालट करण्याकरितां तो कार्ल्सबाद येथें जाऊन राहिला. या नव्या जागेंत त्याला थोडें बरें वाटलें व हातीं घेतलेलें काम त्यानें कसेंबसें पुरें केलें. 'कॅपिटल' या ग्रंथाच्या दुसऱ्या भागाचीं हस्तलिखितें त्यानें या ठिकाणीं जुळवून लाविलीं व छापखान्यांत देण्याकरिता अखेरची पक्की प्रत तयार करण्याच्या प्रयत्नास तो लागला. पण हें काम आपल्या हातून आतां होत नाहीं असें त्याला आढळून आलें. कार्ल्सबाद येथें तो १८७७ व ७८ अशीं दोन वर्षे होता. आपल्या शारीरिक व मानसिक शक्ति आतां झपाट्यानें क्षीण होत चालल्या आहेत, असें या दिवसांत त्याला वाटूं लागलें होतें. रुचकर व पाचक पाणी असलेल्या फ्रान्स व अल्जीरियामधील आरामस्थानांतूनही तो कांहीं दिवस

राहिला पण तेथेंही त्याच्या प्रकृतीला आराम पडेना. मार्क्सची शारीरिक व मानसिक काम करण्याची शक्ति इकडे अशा रीतीनें र्‍हास पावत होती तर फ्रान्स व इंग्लंडमध्यें त्याच्या तत्त्वज्ञानाचा प्रसार होत चालला होता व त्याची कीर्ति वाढत होती. जूल्स गोरदे, हेन्री हिंडमन व बेलफर्ट बॅक्स वगैरे प्रसिद्ध कार्यकर्त्या पुढाऱ्यांनीं हें कार्य आपल्या अंगावर घेतलें होतें. मार्क्सच्या तत्त्वज्ञानासंबंधानें अनुकूल व प्रतिकूल अशीं दोन्हीं प्रकारचीं चर्चा करणारीं मंडळें सर्वत्र प्रस्थापित होत होतीं. मार्क्स व त्याची शिकवण याप्रमाणें लोकप्रिय होत चालली होती पण त्याचा फायदा घेण्यास लागणारी शक्ति आतां त्याच्या अंगीं राहिली नव्हती. मार्क्सचे बाहेरचे शत्रु आतां नष्ट होत चालले पण शारीरिक व मानसिक व्याधिरूपी शत्रूंनीं त्याला पूर्णपणें घेरलें होतें आणि त्यांना तोंड देण्याचें सामर्थ्य मार्क्सच्या अंगीं आतां उरलें नव्हतें. या परिस्थितींतच त्याची प्रिय पत्नी जेनी त्याला १८८१ डिसेंबर ता. २ रोजीं कायमची सोडून गेली. नवऱ्याप्रमाणें तीही कट्टी कम्युनिस्ट व भौतिकवादी होती. मरेपर्यंत तिचींही मतें कायम राहिलीं होतीं. मृत्यु जवळ आलेला पाहून तिला मुळींच भीति वाटली नाहीं. "कार्ल, माझी शक्ति आतां अगदीं नष्ट झाली" हे तिचे अखेरचे शब्द होते. हायगेट कबरस्थानांत ता. ५ रोजीं कोणत्याही प्रकारचा धर्मविधी न करतां तिला पुरण्यांत आलें. तिनें व तिच्या नवऱ्यानें जीं मतें आपल्या हृदयाशीं घट्ट धरून ठेवलीं होतीं त्यांना अनुसरून तिचा और्ध्वदेहिक विधी अगदीं खासगी रीतीनें करण्यात आला. फक्त घरची कांहीं थोडी मंडळीच या प्रसंगीं हजर होती. तिला दफन करण्यापूर्वी फ्रेडरिक एंजल्स याने पुढील आशयाचें भाषण केलें:—

"ज्या स्त्रीचें आपण आज दफन करीत आहों तिचा जन्म साझवेडेल येथे १८१४ सालीं झाला. ट्रीव्हज् येथें तिचा बाप बॅरन वेस्ट फालन याची कौन्सिलर ऑफ स्टेट या जागेवर नेमणूक झाल्यावर मार्क्सच्या कुटुंबाबरोबर त्याच्या कुटुंबाचा प्रेमाचा संबंध वाढत चालला. हीं दोन्हीं मुलें (मार्क्स व जेनी) एकाच ठिकाणीं लहानाचीं मोठीं झालीं. निसर्गदत्त अशा असामान्य गुणांनीं युक्त असलेलीं हीं मुलें परस्परांवर प्रेम करूं लागलीं. विश्वविद्यालयांत राहून मार्क्स शिक्षण घेत असतानाच सर्व आयुष्य-

भर दोघांनीं एकत्र राहण्याचें ठरविलें होतें. १८४३ सालीं या दोघांचें लग्न झालें. ऱ्हायनिश ग्याझिट सरकारनें बंद पाडलें होतें. मार्क्सला यावेळीं उदरनिर्वाहाचा असा कांहीं उद्योग राहिलेला नव्हता. मार्क्सशीं लग्न लावणें म्हणजे प्रत्यक्ष दारिद्र्याशींच लग्न लावणें होय, ही गोष्ट जेनीला माहित होती. असें असूनही मार्क्सबरोबर तिनें लग्न लावलें व मार्क्सच्या सर्व आयुष्यांत त्याच्यावर जे अनेक बिकट प्रसंग आले त्या सर्व प्रसंगीं मार्क्सला तिनें धैर्य दिलें. मार्क्सचीं दुःखें तींच आपलीं दुःखें असें तिनें मानलें.

हें प्रेमी जोडपें प्रथम पॅरिस येथें गेलें. ही हद्दपारी त्यांनीं स्वतः होऊनच पतकरली होती; पण पुढें लवकरच त्यांच्यावर ती जबरदस्तीनें लादण्यांत आली. पुढें यांना कांहीं दिवस ब्रुसेल्स येथें राहावें लागलें. यानंतर फेब्रुवारीच्या क्रांतीचा प्रसंग आला. ब्रुसेल्स येथें यावेळी जी गडबड झाली तींत बेल्जियम सरकारनें फक्त मार्क्सलाच तेवढें पकडलें असें नाहीं तर जेनीविरुद्ध यत्किंचितही पुरावा सांपडला नसतां तिलाही तुरुंगांत टाकण्यांत आलें.

क्रांतीची ही चळवळ १८४८ त सुरू झाली व १८४९ सालीं तिचा अंत झाला. मार्क्स पतिपत्नींवर पुन्हां हद्दपारीचा प्रसंग आला. हीं दोघेजण प्रथम पॅरिसला गेलीं पण फ्रेंच सरकारनेंही त्यांना हद्दपारीचा हुकूम दिल्यामुळें त्यांना लंडनला जावें लागलें. हे हद्दपारीचे दिवस जेनीला फारच कष्टाचे गेले. दारिद्र्यानें हें कुटुंब अत्यंत गांजलें होतें. त्यांतच तिचीं तीन मुलें– दोन मुलगे व एक मुलगी– आजारी पडून मरण पावलीं. या मुलांना औषधपाणी करण्याकरितां लागणारे पैसेही मार्क्सपाशीं नव्हते. हें अनिवार दुःख जेनीनें कसें तरी सहन केलें पण यापुढचा दुःखाचा प्रसंग तिला असह्य झाला. प्रशियन सरकार व त्याचे साथीदार– लिबरल व डेमोक्रॅट पक्षाचे लोक– या दोघांनीं संगनमत करून मार्क्सवर निंद्य व घाणेरडे आरोप केले व त्याची लोकप्रियता नष्ट करण्याचा अत्यंत दुष्ट प्रयत्न केला. या आरोपांचें निराकरण करावें तर जर्मनींतील एकही पत्र त्याचें म्हणणें प्रसिद्ध करण्यास तयार नव्हतें. यामुळें बरेच दिवस शत्रूंनीं केलेलें सर्व हल्ले मार्क्सला मुकाट्यानें सहन करावे लागले. ही परिस्थिति कायम टिकणें शक्यच नव्हतें. युरोपांतील मजूरवर्गाची संघटना पुन्हां जोरावत चालली व

अंतर्राष्ट्रीय कामगारसंघही स्थापन करण्यांत आला. वर्गयुद्धाचा प्रसार एका देशांतून दुसऱ्या देशात जोरानें होऊं लागला, आणि या संघाची सर्व चळवळ मार्क्सच्याच नेतृत्वाखालीं सुरू झाली.. मार्क्सच्या कुटुंबाला आता थोडे बरे दिवस आले. जेनीनें आजवर जीं अनेक खडतर दुःखें सहन केलीं त्यांची सर्व भरपाई तिला मिळाली. मार्क्सवर जे अनेक निंद्य आरोप करण्यात आले होते ते सर्व वाऱ्यापुढे भूस उडून जातें त्याप्रमाणें नष्ट झाले. सर्व मतांचे व पक्षांचे लोक मार्क्सच्या ज्या तत्त्वांना दडपून नष्ट करूं पाहात होते त्याचा प्रसार घरोघरीं होत असलेला तिला दिसून आला. सर्व सुधारलेल्या राष्ट्रभाषांतून मार्क्सच्या तत्त्वांचा पुरस्कार करणारीं पुस्तकें प्रसिद्ध होऊं लागलीं. पूर्वेस रशियापासून ते पश्चिमेस अमेरिकेपर्यंत जुन्यापुराण्या समाजरचनेचा नाश होऊन त्या ठिकाणी नवीन क्रांतीचें बीज रुजूं होत आहे, असें तिला दिसून आलें. राइकस्टॅगमध्ये मार्क्सच्या मताचा पुरस्कार करणारे बरेच लोक जर्मन मजुरांनीं निवडून दिलेले पाहून तर तिच्या आनंदास पारावार राहिला नाहीं.

" जेनीची बुद्धि फार तीव्र व सूक्ष्म होती. तिचा उत्साह फार दांडगा होता. ती अत्यंत व्यवहारचतुर होती. मजूर चळवळीला तिनें आपलें सर्वस्व वाहिलें होतें. अंगावर घेतलेलें काम ती एकनिष्ठेनें करीत असे. याप्रमाणें अनेक गुणानीं युक्त असलेल्यां या साध्वीनें गेल्या चाळीस वर्षांत जें कार्य केलें त्याचा उल्लेख त्यावेळच्या वर्तमानपत्रातून किंवा पुस्तकांतून झालेला आढळावयाचा नाहीं. ज्या लोकांनीं तिच्याबरोबर काम केलें आहे व ज्यांनीं तिचें हें कार्य प्रत्यक्ष पाहिले आहे त्यांनाच फक्त तें माहित आहे. पण एक गोष्ट मात्र सांगावयास हरकत नाही ती ही कीं, पॅरिसच्या क्रांती नंतर जे लोक इंग्लंडला पळून आले त्यांना तर तिची वारंवार आठवण झाल्याशिवाय राहाणारच नाहीं. अत्यंत दूरदर्शीपणानें व धिटाईनें या लोकाना ती योग्य तो सल्ला देत असे. आपलें वर्तन धिटाईचें असावें पण त्यात गर्व नसावा, आपण दूरदर्शीपणानें वागावें पण कधींही अपमान सहन करूं नये, असें ती या लोकाना सांगत असे. तिच्या ठिकाणीं असलेल्या आणखीही कित्येक व्यक्तिविषयक गुणाचें मी वर्णन करीत नाहीं. तिच्या सर्व मित्राना ते माहित आहेत. थोडक्यांत सागावयाचें म्हणजे ती एक अशी महासाध्वी

स्त्री होती कीं, जिला दुसऱ्याला सुखी करण्यांत व त्याला सुखी झालेले पाहाण्यांत परमानंद वाटत असे."

पत्नीवियोगाचें दुःख मार्क्सला सहन होणें शक्य नव्हतें. त्याची प्रकृति जास्तच ढासळत चालली. आपत्तीमागून आपत्ति येणें हा निसर्गधर्मच आहे. प्रिय पत्नी जेनी वारून वर्ष लोटतें न लोटतें इतक्यांत त्याची सर्वांत लाडकी मुलगी जेनी १८८३ च्या जानेवारींत मृत्युमुखीं पडली. जेनी, लॉरा व इलिनॉर या आपल्या तिघी मुलींनीं आपलीं मतें मान्य असलेल्या समाजसत्तावादी तरुणांना वरलें, हें पाहून मार्क्सला अत्यंत समाधान वाटत असे. जेनीचा पति चार्लस् लॉंगेट, लॉराचा पति पॉल लाफार्ग व इलिनॉरचा पति एडवर्ड ॲव्हलिंग हे तिघेही तरुण अत्यंत उत्साही होते. मार्क्सची समाजसत्तावादी मतें त्यांना पूर्णपणें मान्य होतीं व कामगारवर्गांत मिळून मिसळून त्यांना वर्गजागृत करण्याचें व त्यांची संघटना करण्याचें कार्य त्यांनीं अत्यंत चिकाटीनें चालविलें होतें. बापाचीं मतें मुलाला पटावयाचीं नाहींत, पति वैराग्यशील व थोर मनाचा तर पत्नी चैनी व स्वार्थपरायण असावयाची. पण हा सामान्य अनुभव मार्क्सच्या बाबतींत खोटा ठरला होता. मार्क्सच्या तिन्ही मुली व त्याचे जांवई म्हणजे आपल्या कुटुंबांतील साही माणसें आपल्याच मताचा व कार्याचा पुरस्कार करीत आहेत, हें पाहून मार्क्सला अत्यंत आनंद व धन्यता वाटत होती. पण मार्क्सचा आनंद जशाचा तसा टिकावयाचा नव्हता. जेनीच्या अकालीं मृत्यूनें त्याच्या या आनंदांत विरजण पडलें. जेनी ही मार्क्सची सर्वांत मोठी मुलगी. तिच्यावर मार्क्सचें सर्वांहून जास्त प्रेम होतें व जेनीनेंही आपल्या बापाची त्याच्या सर्व आयुष्यभर अत्यंत प्रेमानें सेवा केली होती. जेनीचा स्वभाव थेट तिच्या आईप्रमाणेंच होता. उदार, सहनशील, प्रेमळ अशी आपली जेनी म्हातारपणीं आपल्याला सोडून गेली, हें दुःख मार्क्सला सहन करवलें नाहीं. मार्क्सचा खोकला वाढत चालला होता. या दुःखानें तर तो फारच वाढला. खोकल्याचा एकदां उमाळा आला कीं, तो अत्यंत तीव्रतेनें वाढे व मार्क्सचीं गात्रें न गात्रें तो अगदीं खिळखिळीं करून टाकीत असे. जेनीच्या मरणानंतर मार्क्सनें जें एकदां आंथरूण धरलें तें कायमचेंच धरलें. १८८३ मार्च १४ रोजीं दोन प्रहरीं लंडन येथें त्याचें देहावसान झालें.

कार्ल मार्क्स याच्या अखेरच्या प्रकृतिमानासंबंधानें त्याचा प्रिय मित्र एंजल्स याच्या खालीं दिलेल्या पत्रावरून चांगली कल्पना येईल. हे पत्र एंजल्सनें आपल्या एका स्नेह्याला लिहिलें होतें.

लंडन

मार्च १५, १८८३

दोन प्रहरीं ११-४५ वाजता

प्रिय सोर्ज,

तुमची तार पोंचली. मी आपला आभारी आहे. मार्क्सचें प्रकृतिमान मी तुम्हाला नियमितपणें कळवूं शकलों नाहीं. त्याच्या प्रकृतींत सारखा चढउतार होत असल्यामुळें तसें करणें अगदीं अशक्य झाले आहे. परंतु पुढें दिलेल्या हकीकतीवरून त्याच्या प्रकृतिसंबंधानें आपल्याला थोडी तरी कल्पना येईल.

आक्टोबर ( १८८१ )मध्यें त्याला प्ल्यूरसीचा विकार झाला. यानंतर थोडक्याच दिवसांत त्याची पत्नी वारली. यांतून तो वाचला व बरा होत चालला त्यावेळीं त्याच्या प्रकृतीला जास्ती आराम मिळावा म्हणून फेब्रुवारी ( १८८२ ) मध्यें त्याला अल्जीर्स येथें पाठविण्यांत आलें. तो तिकडे जात असतांना प्रवासांतील दगदग त्याला सहन झाली नाहीं व या भागांतील थंड व सर्द हवेचा त्याच्या प्रकृतीवर परिणाम झाला व तो मुक्कामाला जाऊन पोंचेतोंपर्यंत त्याला पुन्हां प्ल्यूरसीनें गांठलें. हवा तशीच सर्द राहिली तथापि तो बरा होत चालला आणि गरमीचे दिवस जवळ येत चाललेले पाहून त्याला मॉंटी कारलो येथें पाठविण्यांत आलें. या ठिकाणीं त्याला प्ल्यूरसीनें तिसऱ्यांदा गांठलें. पण हा हल्ला थोडासा सौम्य स्वरूपाचा होता. हवेची त्याला कांहीं मदत झाली नाहीं. ती पूर्वीसारखीच भिकारडी राहिली. या हल्ल्यापासून बचाव झाल्यानंतर तो आपल्या मुलीच्या ( मॅडम लॉंगेट ) घरीं राहण्याकरितां पॅरिसजवळील अर्जेंटील या गांवीं गेला. याच्या आसपासच गंधकमिश्रित पाण्याचे झरे वहात आहेत. बरेच दिवस त्याची पाठ पुरवून राहिलेला खोकला बरा व्हावा म्हणून या पाण्याचा त्यानें उपयोग केला. हवा खराब होती तरी वरील प्रयोगानें त्याच्या प्रकृतीवर चांगला परिणाम झाला. शेवटीं तो व्हिवे येथें सहा आठवडे राहिला व तेथें त्याला आपली प्रकृति पुन्हां पहिल्यासारखी

सुधारली, असें वाटूं लागलें व सप्टेंबर महिन्यांत तो पुन्हां लंडनला परत आला. हिंवाळ्याचे दिवस त्यानें लंडनच्या दक्षिण किनाऱ्यावरील भागांत काढले तरी हरकत नाहीं अशी डॉक्टरांनीं त्याला सल्ला दिली. वस्तुस्थिति अशी होती कीं, उगाच निर्हेतुकपणें इकडे तिकडे भटकत राहण्याचा त्याला कंटाळा आला होता. लंडनमध्यें धुकें पडूं लागलें त्यावेळीं त्याला आइल ऑफ वाइट येथें पाठविण्यांत आलें. येथें तर पावसानें तोंडच बाहेर काढूं दिलें नाहीं. यामुळें त्याला पुन्हां सर्दी झाली. नव्या वर्षाच्या आरंभीं त्याच्या भेटीकरितां जाण्याच्या मी तयारींत होतो. इतक्यात मार्क्सची तब्येत फार बिघडली आहे व त्यानें टुसीला (इलिनॉर मार्क्सचें आवडतें नांव) भेटीकरितां बोलावलें आहे, अशी बातमी मला समजली. पुढें थोडक्याच दिवसांत जेनी (मॅडम लॅंगेट) मरण पावली आणि खोकल्याच्या विकारानें त्याच्यावर पुन्हां हल्ला चढविला. असल्या उतारवयांत नुकतेच जे त्याच्यावर दुःखाचे प्रसंग आले त्याचा विचार केला असता ही स्थिति भयप्रद होती. अनेक रोगांनीं आपलें डोकें वर काढलें होतें व सर्वांत वाईट गोष्ट म्हणजे त्याच्या फुप्फुसाला एक गळूं झालें होतें व त्याचा भयंकर शक्तिपात झाला होता. इतकें असूनही त्याचा आजार विकोपाला गेला नाहीं. त्यांतूनही तो बरा होण्याचीं लक्षणें दिसूं लागलीं. त्याची प्रकृति सुधारूं लागली आणि परवां नुकतेंच गेल्या शुक्रवारीं डॉक्टरांनीं जेव्हां त्याची प्रकृति तपासली तेव्हां ती आशाजनक आहे असें त्यांनीं आपलें मत दिलें. पण फुप्फुसाचे धातु सूक्ष्मदर्शक यंत्राखालीं ज्यांनीं पाहिले आहेत त्या प्रत्येकाला एवढें माहित असतें कीं, फुप्फुसावर फोड येऊन त्यांतील पू पसरण्याची क्रिया एकदां सुरूं झाली म्हणजे रक्तस्राव केव्हां सुरूं होईल, याचा कांहीं नियम नसतो. म्हणून गेले सहा आठवडे रोज सकाळीं मार्क्सच्या घरीं जाण्याकरितां मी रस्त्याच्या कोपऱ्यावर जेव्हां वळत असे त्यावेळीं त्याच्या घराच्या खिडक्यांवरचे पडदे खालीं सोडलेले मला पहावे लागतील कीं काय अशी मला भीति वाटत असे. काल तिसरे प्रहरीं —मार्क्सला भेटण्यास ही वेळ सोयीची होती —मी २–३० वाजतां जेव्हां त्याच्या घरीं दाखल झालों त्यावेळीं प्रत्येकाचे डोळे अश्रूंनीं भरलेले मला दिसून आले व अखेरची वेळ जवळ आली असें मला वाटलें. “काय झालें आहे,” याची तेथील

मंडळींमार्गी मी विचारपूस केली व घाबरून जाण्याचें कारण नाहीं असें सांगून त्यानें सांत्वन करण्याचा मी प्रयत्न केला. मार्क्सच्या फुफुसांतून रक्तस्राव थोडाच होत होता पण त्याचा अतिशय शक्तिपात झाला होता. आईप्रमाणें काळजी घेणारी म्हातारी लेन्शेन वर माडीवर जाऊन आली व मार्क्सला झोंपेची गुंगी आली आहे, वर जाऊन त्याला पाहून येण्यास हरकत नाहीं, " असें म्हणाली. मी वर जाऊन पाहिलें तों तो खराच झोंपून गेला होता. जींतून पुन्हा कोणीही उठत नाहीं अशा निद्रेच्या तो स्वाधीन झाला होता. त्याची नाडी थांबली होती व त्याचा श्वासोच्छ्वासही बंद झाला होता. लेन्शेन दोनच मिनिटें त्याच्याजवळ नव्हती व तितक्या अवकाशात तो शांतपणें व सुखानें इहलोक सोडून गेला होता.

नैसर्गिक आवश्यकतेमुळे एखादी गोष्ट घडून आली म्हणजे मनुष्य त्यांतल्या त्यात समाधानाची वाट शोधून काढतो. प्रसंग कितीही भयंकर स्वरूपाचा असला तरी तो आपलें धैर्य खचूं देत नाहीं. या बाबतींतही असेंच झालें. कदाचित् डॉक्टरी कौशल्यानें त्याला आणखीं कांहीं वर्षें अधिक आयुष्य लाभलें असतें. म्हणजे एवढेंच झालें असतें कीं, डॉक्टराच्या हातून एकाएकी निसटून जाण्यापेक्षा इंचाइंचानें त्याला मरत राहावें लागलें असतें, आणि डॉक्टरांच्या कीर्तीत अधिक भर पडली असती. पण आमच्या मार्क्सला ही गोष्ट सहन झाली नसती. सुरू केलेलीं पुष्कळ कामें अपूर्ण राहिलेलीं डोळ्यांनी पाहात असावें व तीं आज नाहीं तर उद्यां पुरीं होतील या आशेवर स्वस्थ राहून आयुष्याचे दिवस कंठीत असावें ही गोष्ट सुलभ व शीघ्र मरणापेक्षां मार्क्सला अधिक असह्य झाली असती. मरणानें मरणाराचें दुर्दैव ओढवत नाहीं तर मागें जिवंत राहणाऱ्या माणसाचें दुर्दैव ओढवतें, हें एपिक्यूरसचें वचन तो मोठ्या आवडीनें म्हणत असे. हा महापुरुष, अलौकिक बुद्धीचा हा महापुरुष, निकामी होऊन जिवंत राहावा, त्यानें वैद्यकीय कौशल्याला या जिवंत राहण्याचें श्रेय द्यावें परंतु ज्या ढोंगी लोकांना आपल्या भरज्वानीच्या दिवसांत त्यानें ' दे माय धरणी ठाय ' करून सोडिलें होतें त्यांच्या तिरस्काराला पात्र व्हावें ही गोष्ट आपल्याला तरी कशी सहन झाली असती ! ज्या घटना नैसर्गिक रीतीनें जशा घडून येतात तशाच त्या घडून येणें हें इतर कोणत्याही घडामोडीपेक्षां सहस्रपटीनें

बरें असतें, अशा दृष्टीनें विचार केला असतां त्याची पत्नी ज्या ठिकाणीं विश्रांति घेत पडून राहिली आहे त्याच कबरेंत त्यालाही आणखी दोन दिवसानीं नेऊन ठेवणें हेंच हजारोंपटीनें अधिक सुखाचें आहे.

एकंदरींत मागें जें जें घडून आलें त्यांवरून मी खात्रीलायक रीतीनें सांगूं शकतों कीं,—कारण कोणत्याही डॉक्टरपेक्षां मला या बाबतींत जास्त माहिती आहे—मार्क्सला यापुढें आतां फक्त दोनच मार्ग शिल्लक राहिले होते. ते म्हणजे एक मरून जावें किंवा दुसरे निकामी होऊन जीवित कंठित राहावें. कसेंही असो मनुष्यजात एका बुद्धिमान् पुरुषाला, आजच्या युगांतील एका श्रेष्ठ अलौकिक बुद्धिमान् पुरुषाला मुकली आहे.

कामगारवर्गाची चळवळ याच्यापुढें चालू राहीलच. पण फ्रेंच, रशियन, अमेरिकन व जर्मन कामगार आणीबाणीच्या प्रसंगीं ज्याच्याकडे ओढले जात व विवेकपूर्ण व आक्षेपरहित असा ज्याचा सल्ला घेत तो महापुरुष आतां राहिलेला नाहीं.

ठिकठिकाणचीं अल्पबुद्धीचीं पण अगदींच क्षुद्र नव्हेत अशीं माणसें आतां पुढें येतील व अनिर्बंधपणें वागूं लागतील. या चळवळीला अखेर विजयच प्राप्त होणार ही गोष्ट निश्चित आहे. पण या बाबतींत दिसून येणारे दोष व चुका मात्र आतां वारंवार नजरेला आल्यावांचून राहणार नाहींत.

बरें, आतां काळजी करण्याशिवाय आपल्याला दुसरा कोणता मार्ग शिल्लक राहिला आहे ! याशिवाय या जगात आपल्याला दुसरें काय करतां येईल ! पण असें असलें तरी आपण आपलें धैर्य मात्र सोडतां कामा नये.

आपला,

एंजल्स.

१८८३ मार्च १७ शनिवार रोजीं मार्क्सचें प्रेत हायग्रेट सिमेट्रीमध्यें १५ महिन्यापूर्वी पुरण्यांत आलेल्या त्याच्या पत्नीच्या प्रेताशेजारींच पुरण्यांत आलें. यूरिच येथील सोशल डेमोक्रॅट व लंडन येथील कम्युनिस्ट वर्कर्स एज्यूकेशनल सोसायटी या संस्थांतर्फे आलेले लाल फितींनीं गुंफलेले हार कॉम्रेड लेम्के यानें त्याच्या शवपेटिकेवर घातले. यानंतर कॉ. एंजल्स यानें पुढीलप्रमाणें भाषण केलें:—

"१४ मार्च रोजीं तिसऱ्या प्रहरीं पावणेतीन वाजता आजच्या युगांतील एका अत्यंत श्रेष्ठ विचारशील विद्वानानें आपले विचार करण्याचें कार्य बंद केलें. शेवटीं अगदीं केवळ दोन मिनिटेंच त्याच्याजवळ कोणी नव्हतें. परंतु आम्ही पुन्हां त्याच्या खोलींत शिरलों त्यावेळीं तो आपल्या खुर्चीवरच शांतपणें कायमचा निद्रिस्थ झालेला दिसला. युरोप व अमेरिकेमधील आपल्या हितरक्षणाकरितां झगडणाऱ्या कामगार जनतेचें व इतिहासशास्त्राचें याच्या मृत्यूनें अतुलनीय नुकसान झालें आहे. या अलौकिक पुरुषाच्या मृत्यूनें या बाबतींत मोठा खड्डा पडला आहे त्याची जाणीव लोकाना लवकरच झाल्याशिवाय राहणार नाहीं.

"सचेतन सृष्टीच्या विकासाच्या कायद्याचें संशोधन ज्याप्रमाणें डार्विननें केलें त्याचप्रमाणें मानवी इतिहासाच्या विकासाच्या कायद्याचे संशोधन मार्क्सनें केलें आहे. राजकारण, विज्ञान, कला, धर्म वगैरे विषयांचा विचार करण्यापूर्वी प्रत्येक मनुष्यप्राण्याला खावयास अन्न, प्यावयास पाणी, ल्यावयास वस्त्र व राहावयास जागा असलीच पाहिजे, या सरळ सत्याचा मार्क्सनें शोध लावला आहे. यावरून रोजच्या उदरनिर्वाहाचीं जरूरीचीं भौतिक साधनें व त्या त्या युगांतील व राष्ट्रांतील आर्थिक विकासाची परिस्थिति हींच सर्व राजकारण, नीति, कायदा, कलाकौशल्य व धर्मकल्पना, यांच्या मुळाशीं आहेत, हें त्यानें सिद्ध केलें आहे. रोजची भाकरी मिळविण्यास कारणीभूत होणारी आर्थिक परिस्थिति हीच राजकारण, धर्म, व नीतिविषयक कल्पनांच्या मुळाशीं आहे ही सहजसिद्ध गोष्ट आहे, पण सर्वसामान्य समजूत मात्र याच्या अगदीं उलट म्हणजे राजकारण, धर्म वगैरे कल्पना प्रथम आणि भाकरी मिळविण्याचीं साधनें नंतर अशी झाली आहे.

"एवढ्यानेंच भागलें नाहीं तर प्रचलित पुंजीपद्धतींत व भांडवलशाही समाजांत उपलब्ध असलेल्या उत्पादनसाधनांना गति देणाऱ्या खास कायद्यांचें संशोधन मार्क्सनें केलें आहे. अतिरिक्त मूल्य सिद्धांताच्या संशोधनानें या बाबतींत एकदम लख्ख प्रकाश पाडला आहे. पण या पूर्वीचे संशोधक अद्याप अंधारांतच चांचपडत आहेत. एका मनुष्याच्या जीवनमर्यादेचा विचार केला असतां असले हे दोनच शोध त्याची कीर्ति कायम राहण्यास पुरेसे आहेत. अशा प्रकारचा एकच अलौकिक शोध एकाद्याला

लावता आला असतां तर तीदेखील मोठ्या सौभाग्याचीच गोष्ट झाली असती. परंतु मार्क्सचें तसें नव्हतें. ज्या ज्या क्षेत्रांत त्यानें प्रवेश केला त्या त्या विषयाचा त्यानें कसून अभ्यास केला. गणितशास्त्रांतदेखील त्यानें स्वतंत्र शोध लावले.

"एक शास्त्रज्ञ पुरुष या दृष्टीनें मार्क्सचें मी आतांपर्यंत वर्णन केलें. पण त्याचें संपूर्ण वर्णन एवढ्यानें होऊं शकत नाहीं. हें केवळ अर्धेंच वर्णन झालें आहे, असें फार तर म्हणतां येईल. कारण विज्ञान ही इतिहासाला गति देणारी एक हेतुगर्भशक्ति –क्रांतिकारक शक्ति– आहे, असें मार्क्सचें मत होतें. प्रत्यक्ष व्यवहारांत ज्याचा कधींही उपयोग होणार नाहीं, असल्या शुद्ध तात्त्विक सिद्धांतांचें संशोधन करण्यांत मार्क्सला आनंद होत असेच, पण त्यापेक्षाही उद्योगधंद्यावर व ऐतिहासिक विकासावर क्रांतिकारक परिणाम घडवून आणणाऱ्या एकाद्या प्रमेयाचा तो शोध लावूं लागला म्हणजे त्याला वरच्यापेक्षांही कांहीं निराळ्याच प्रकारच्या निरतिशय आनंदाचा लाभ होत असे. विद्युच्छास्त्राची प्रगति कशी होत आहे, याचें व मार्सेल डेप्रेझ याच्या शोधांचें सूक्ष्म रीतीनें निरीक्षण करण्यांत तो किती एकाग्र होत असे, हें पाहिलें म्हणजे त्याच्या वरील मनःस्थितीची कल्पना आल्या-खेरीज राहात नसे.

"इतक्या विविध विषयांकडे मार्क्सचें लक्ष असलें तरी तो एक क्रांति-कारक पुरुष होता, असें म्हटल्याशिवाय राहवत नाहीं. पुंजीप्रधान समाजाची व त्या समाजानें निर्माण केलेल्या राजकीय संस्थाची सत्ता उलथून टाकावी व आधुनिक कामगार जनतेला पूर्ण स्वतंत्र करावें, हें त्याचें खरें खरें जीवितकार्य होतें. बहुजनसमाजाच्या खऱ्या गरजा काय आहेत व त्या पूर्ण होऊन त्याचा उद्धार होण्यास कशा प्रकारची परिस्थिति निर्माण करण्यात आली पाहिजे, याची जाणीव त्याच्यांत निर्माण करण्याच्या कामीं मार्क्सनें प्रथम पुढाकार घेतला होता. सारखे लढत राहावें हा मार्क्सचा सहजधर्म होता. र्‍हायनिश झीटुंग ( १८४२ ), पॅरिसमध्यें निघालेलें 'व्हार्वटस्' ( १८४४ ), डुइश ब्रुसेलर झीटुंग ( १८४७ ), न्यू र्‍हायनिश झीटुंग ( १८४८–४९ ), न्यूयॉर्क ट्रायब्यून ( १८५२–१८६१ ), या सर्व वर्तमानपत्रांतून मार्क्सनें किती तरी लेख लिहिले. वेळोंवेळीं किती तरी पुस्तिका

त्यानें प्रसिद्ध केल्या. पॅरिस, ब्रुसेल्स, लंडन येथें त्यानें कित्येक तरी अनेक प्रकारच्या चळवळी केल्या आणि या सर्वांवर कळस म्हणून त्यानें अंतर्राष्ट्रीय कामगारसंघाची प्रस्थापना केली. मार्क्सच्या कामगिरीची ही जंत्री आहे. मार्क्सनें दुसरें कांहींच केलें नसतें व केवळ अंतर्राष्ट्रीय कामगारसंघाची प्रस्थापना केली असती तरी या कामगिरीबद्दल योग्य तो अभिमान त्याला बाळगता आला असता.

"मार्क्स हा बोलका नव्हे तर कर्ता क्रांतिकारक असल्यामुळें त्याचा अतिशय द्वेष करण्यात येत असे व त्याच्यावर अत्यंत निंद्य आरोप करण्यांत येत असत. बहुतेक सगळ्या सरकारांनीं– मग ती प्रजासत्ताक असोत वा एकतंत्री असोत– त्याला हद्दपार केलें होतें. भांडवलदार मग ते कट्टर प्रजासत्तावादी असोत वा पुराणमतवादी असोत अहमहमिकेनें त्याची बेअब्रू करणाऱ्या कंड्या उठवीत असत. कोळिष्टकांप्रमाणें या सर्वांना कधीं त्यानें बाजूला सारलें तर कधीं त्यानें त्याच्याकडे दुर्लक्ष केलें आणि जेव्हा अगदीं जरूर पडली त्यावेळींच त्यानें त्याना उत्तरें दिलीं. तथापि युरोप व आशियाच्या अगदीं पूर्वेकडील सैबेरियाच्या खाणीमय प्रदेशापासून ते अमेरिकेच्या अगदीं पश्चिमेकडील कॅलिफोर्निया प्रांतापर्यंतच्या कोट्यावधी कामगारांना मार्क्सच्या मृत्यूमुळें अत्यंत दुःख वाटत आहे व त्याच्याबद्दल त्यानीं आपलें प्रेम व आदर व्यक्त केला आहे. मार्क्सचीं मतें पसंत नसणारे पुष्कळ प्रतिपक्षी असतील पण त्याचा व्यक्तिविषयक द्वेष करून त्याला पाण्यात पाहाणारा कोणी शत्रु राहिला असेल, असें मला वाटत नाहीं. त्याचें नाव व त्याचे ग्रंथ अनेक शतकेंपर्यंत जगावर आपला प्रभाव गाजवीत राहतील."

# कांहीं आठवणी

मार्क्सनें आपल्या जन्मभूमीलाच आपल्या सर्व चळवळींचें केंद्र बनविलें नव्हतें. " मी जगाचा रहिवाशी आहें, मी जेथें जेथें जाईन तेथें तेथें काम करीत राहीन. " असें तो नेहमीं म्हणत असे. खरोखरी पाहिलें असतां असेंच झालें. फ्रान्स, बेल्जम, इंग्लंड वगैरे ज्या ज्या देशांतून मजुरांच्या क्रांतिकारक चळवळी झाल्या त्या त्या सर्व चळवळीत त्यानें प्रमुखत्वानें भाग घेतला होता आणि त्यामुळें त्याला त्या त्या सरकारकडून झालेला छळही सोसावा लागला होता.

* * *

मार्क्सला बहुतेक सर्व युरोपियन भाषा वाचतां येत होत्या. जर्मन, फ्रेंच व इंग्रजी या भाषांतून तर तो लेखही लिहित असे. या भाषांशी ज्यांचा परिचय आहे त्या लोकांना मार्क्सची या भाषांतील प्रगति व लेखनशैली पाहून फारच आश्चर्य वाटत असे. " जीवनाचा झगडा यशस्वीरीतीनें झगडावयाचा असेल तर परभाषाज्ञानाचें शस्त्र अवश्य हातीं असलें पाहिजे, " असें त्याचें मत असे. रशियन भाषा जेव्हां तो शिकूं लागला त्यावेळीं त्याचें वय ५० वर्षांचें होतें व सहा महिन्यांत या भाषेंत त्यानें इतकी प्रगति केली कीं, पुष्किन, गोगोल, शेडरिन यांचे मूळ रशियन भाषेंतील ग्रंथ तो वाचूं लागला. कांहीं विशेष सरकारी रिपोर्ट वाचतां यावे, या हेतूनें मार्क्सनें ही भाषा हस्तगत करण्याचें ठरविलें होतें. हे रिपोर्ट कोणाच्या हातीं लागूं नयेत, अशी झार सरकारनें अत्यंत काळजी घेतली होती. लोकांचीं मनें प्रक्षुब्ध होतील अशा किती तरी हकिकती या रिपोर्टांतून होत्या. मार्क्सच्या कांहीं कट्टया भक्तांनीं त्याला या रिपोर्टांच्या नकला मिळवून दिल्या. त्यांतील गोष्टी माहित असलेला असा मार्क्स हा एकच पाश्चात्य अर्थशास्त्रज्ञ होता, असें म्हणण्यास हरकत नाहीं. बौद्धिक काम करुन कंटाळा आला असतां तो विश्रांतिसुखाकरितां गणितशास्त्राकडे धाव घेत असे. बीजगणितांत तर मानसिक स्वास्थ्याची प्राप्ति त्याला होत असे. अनेक संकटांच्या वादळांनीं भरलेल्या आयुष्यांत त्याच्यावर ज्यावेळीं अत्यंत कष्टप्रद प्रसंग येत

त्यावेळी तो गणितशास्त्रांत बुडी मारीत असे. त्याच्या पत्नीच्या शेवटच्या दुखण्यांत नेहमींचीं सर्वसाधारण अशीं रोजचीं कामेंही करणें त्याला अशक्य वाटूं लागलें त्यावेळीं बीजगणितांतील ' इन्‌फिनिटिसिमल कॅल्क्यूलस ' या विषयावर त्यानें एक निबंध लिहून काढला. ज्या प्रसिद्ध गणितशास्त्रज्ञांनीं हा निबंध वाचला आहे त्यांनीं या विषयावरील हा एक अत्यंत महत्त्वाचा निबंध झाला आहे असा अभिप्राय दिला आहे.

* * *

मार्क्सचा मेंदु म्हणजे ज्ञानाचें भांडार होतें. अनेक ऐतिहासिक घटना, शास्त्रीय अनुभव व तत्त्वज्ञानविषयक सिद्धांत यानीं हें भांडार भरलेलें होतें. आणि या शस्त्रागारांतून कोणतें शस्त्र केव्हां बाहेर काढावयाचें या कामांत तो अत्यंत निष्णात होता. कोणत्याही वेळीं व कोणत्याही विषयासंबंधानें त्याला कोणी प्रश्न विचारला म्हणजे त्यावर तो असें नेमकें उत्तर द्यावयाचा कीं, त्यामुळें पूर्ण समाधान व्हावयाचें. हें त्याचें उत्तर अत्यंत गूढ व तात्त्विक अर्थानें भरलेलें असावयाचें. ' कॅपिटल ' ग्रंथात त्याचें सर्व बुद्धिवैभव प्रकट झालें आहे. 'कॅपिटल' ग्रंथांत त्यानें ज्या ग्रंथांचा, रिपोर्टोचा व मासिकांचा आधारादाखल उल्लेख केला आहे त्याची संख्या ३५२ भरते.'कॅपिटल' असो वा त्याचा दुसरा कोणताही ग्रंथ असो त्याच्या बुद्धीचा अफाट विस्तार व तिच्यांत साठविलेलीं अनेक रहस्यें पूर्णपणें प्रकट होणें शक्यच नव्हतें. त्याचें ज्ञान शब्दातीत होतें.

* * *

मार्क्स हा दांडगा लेखक होता. तो जें जें कांहीं लिहीत असे तें तें सर्व लेखक या दृष्टीनें आपली जबाबदारी काय आहे, याची पूर्ण जाणीव ठेवू-नच लिहीत असे. योग्य व भरपूर आधाराशिवाय तो कोणतीही माहिती किंवा आंकडे देत नसे. दुसऱ्यांच्या माहितीच्या आधारानें त्याचें समाधान होत नसे. मूळ शोधून काढल्याशिवाय त्याला चैन पडत नसे व हें मूळ शोधून काढण्याकरितां कितीही श्रम पडले तरी तो त्यांची पर्वा करीत नसे. एकादी साधी व कमी महत्त्वाची गोष्ट असली तरी तिचें मूळ शोधण्याकरितां तो ब्रिटिश म्यूझियमकडे धांव घेत असे. या त्याच्या संवयीमुळें कोणत्याही टीकाकाराला त्याच्यावर बेपर्वाईपणाचा आरोप करतां येत नसे.

* * *

मूळ आधार असल्याशिवाय व तो पूर्णपणें समजून घेतल्याशिवाय मार्क्स ज्याप्रमाणें आपल्या लेखांतून कोणतीही माहिती किंवा आकडे देत नसे त्याचप्रमाणें कोणत्याही विषयाचें प्रतिपादन करावयाचें असो किंवा कोणताही सिद्धांत मांडावयाचा असो तो त्याचें प्रथम पूर्ण अध्ययन करून व त्यावर पूर्ण विचार करून तो चांगला समजून घेत असे व नंतर तो त्याचें विवेचन आपल्या लेखांतून करीत असे. अर्धे कच्चे विचार लोकांपुढें मांडावयाचे, ही गोष्ट त्याला मुळींच सहन होत नसे. आपलें हस्तलिखित पूर्णपणें तपासल्याशिवाय व त्यावर अखेरची नजर टाकल्याशिवाय तें दुसऱ्याला दाखवावयाचें त्याच्या जीवावर येत असे. त्याची ही भावना इतकी तीव्र होती कीं, "बिन तपासलेले व अपूर्ण असें हस्तलिखित माझ्या पाठीमागें ठेवण्यापेक्षां तें मी जाळून टाकीन." असे उद्गार तो आपल्या मित्रमंडळीजवळ काढीत असे.

* * *

ब्रिटिश फॅक्टरी लेजिस्लेशन या विषयासंबंधानें कॅपिटलमध्ये लिहितांना इंग्लिश व स्कॉटिश फॅक्टरी इन्स्पेक्टरांच्या चौकशी कमिशनांचे सर्व रिपोर्ट त्यानें वाचून काढले होते. या ब्ल्यू बुकांतून मार्क्सला पुष्कळच महत्त्वाची माहिती सांपडली. उत्पादनाची पुंजीपद्धति समजून घेण्याच्या दृष्टीनें मार्क्सला या पुस्तकांचा फार उपयोग झाला. दुसरे लोक रद्दी म्हणून हीं पुस्तकें विकून टाकीत असत. अशा रीतीनें रद्दी म्हणून विकतां आलीं एवढा तरी या पुस्तकांचा उपयोग झाला, असें या लोकांचें म्हणणें होतें. पण लोकांची ही कल्पना मार्क्सला फार उपयोगी पडली. कागदाच्या व्यापाऱ्याकडे मार्क्सला हीं पुस्तकें फारच स्वस्तांत मिळालीं.

* * *

जेव्हां पाहावें त्यावेळीं मार्क्स हा कामांत गुंतलेला आढळून येई. कामांत बदल करणें, विशेषतः बौद्धिक कामांत बदल करणें म्हणजे एक प्रकारची विश्रांतीच होय, असें त्याचें मत होतें. कंटाळा आला कीं, तो आपल्या जागेवरून उठे व दरवाज्यापासून ते खिडकीपर्यंत येरझारा घालूं लागे. त्याची लिहावयास बसण्याची जागा खोलींतील एका खिडकीजवळ होती. तेव्हां या खिडकीपासून ते दरवाजापर्यंत खालीं सतरंजीवर

एक पायथाच पडून गेली होती. चालतां चालतां विचार करीत राह- ण्याचा कंटाळा आला म्हणजे तो एका कोचावर पडून कादंबरी वाचीत असे. मार्क्स तीनचार कादंबऱ्या एकदम वाचावयास सुरू करीत असे व आळीपाळीनें वाचून त्या संपवीत असे. डार्विनप्रमाणें मार्क्सलाही कादं- बऱ्या वाचण्याचा फार नाद असे. अठराव्या शतकातील कादंबऱ्या त्याला विशेष आवडत. फील्डिंगची 'टॉम जोन्स' ही कादंबरी त्याला फार आवडत असे. अर्वाचीन कादंबरीकारांपैकीं पॉल डी कॉक, चार्ल्स लीव्हर, डयूमास, सर वॉल्टर स्कॉट हे कादंबरीकार त्याच्या विशेष आव- डीचे होते. स्कॉटची 'ओल्ड मॉर्टॅलिटी' ही कादंबरी म्हणजे एक अप्र- तिम ग्रंथच आहे, असें तो म्हणत असे. बालझाकवर त्याचें फारच प्रेम होतें. आपला अर्थशास्त्रविषयक अभ्यास संपल्यावर या कादंबरीलेखकावर एक टीकात्मक ग्रंथ लिहिण्याचें त्यानें ठरविलें होतें.

* * *

आपल्या ग्रंथालयांतील पुस्तकांची किंवा कागदपत्रांची व्यवस्था कोणी लावून देतो असें म्हटल्यास, तो त्यांना तसें करूं देत नसे. लोकानी केलेली व्यवस्था व शिस्त ही त्याच्या दृष्टीनें अव्यवस्था व बेशिस्तच होती. त्याच्या ग्रंथालयात अव्यवस्था तर उघड उघडच दिसत होती. ग्रंथालयातील शेल्फ- वर चांगल्या उभ्या व व्यवस्थित ठेवलेल्या अशा पुस्तकांपेक्षा त्यावर वांकडी- तिकडी पडलेली पुस्तकेंच जास्त असायचीं व त्यांतून खुणेकरिता सिगारे- टाचे तुकडे, आगपेट्या, तंबाकूचीं देठें, पेपरवेट, त्याच्या मुली, पत्नी, एंजल्स, वुइल्यम वुल्फ याच्या फोटोचे तुकडे घातलेलें असायचे. खरोखरी मार्क्सच्या दृष्टीनें ही व्यवस्थाच होती. प्रत्येक वस्तु योग्य ठिकाणींच होती. यामुळें आपल्याला लागलेल्या पुस्तकांवर व हस्तलिखितावर तो एकदम हात टाकूं शकत असे. बोलतां बोलतां एकादा विषय निघाला तर त्यावेळीं आपल्या मताच्या पुष्ट्यर्थ चटकन् तो एकादें पुस्तक उचलून घेत असे व त्यांतील जरूर ते पान काढून त्यांतील भाग तो बरोबर वाचून दाखवीत असे. तो आपल्या पुस्तकाशीं एकरूप होऊन गेलेला होता व शरीराच्या अवयवा- प्रमाणें ही पुस्तकेंही त्याची आज्ञाधारक बनलेलीं होतीं. केवळ एक चैन म्हणून तो पुस्तकें जमा करीत नसे. विचाराला चालना देणारीं व आप-

त्याला साहाय्य करणारीं तीं साधनें आहेत असे तो मानीत असे. "पुस्तकें हीं माझीं गुलाम आहेत, माझ्या म्हणण्याप्रमाणें त्यांनीं माझ्याशीं वागलें पाहिजे," असें तो म्हणे. पुस्तकाचा आकार कसा आहे, त्याचें बाइंडिंग कसें आहे, त्याचा कागद कसा आहे, त्याची छपाई कशी आहे, याच्याकडे त्याची दृष्टि नसे. खुणेकरितां एकादे वेळीं पानाचे कोपरेही तो मोडून ठेवीत असे, वाटेल तेथें अंडरलाईन करीत असे, मार्जिनवर पेन्सिलीच्या खुणा करीत असे, आपलीं नोटबुकें व निरनिराळ्या पुस्तकांतील निवडक भाग पुन्हां पुन्हां वाचीत असे. स्वभावतः असामान्य, सूक्ष्म व तीव्र असलेली त्याची स्मरणशक्ति या त्याच्या संवयींमुळें अधिक ताजी व कार्यक्षम होत असे.

* * *

मार्क्सच्या ग्रंथालयांत अवघीं एक हजारच पुस्तकें होतीं. त्याच्या जरूरीच्या दृष्टीनें त्याला हा संग्रह अगदींच अपुरा पडत असे. यामुळें कितीतरी वर्षें तो ब्रिटिश म्युझिअम रीडिंगरूममध्यें अगदीं नियमितपणें वाचावयास जात असे. त्याचें वाचन दांडगें होतें. केवळ अर्थशास्त्रावरील पुस्तकेंच तेवढीं तो वाचीत असे असें नाहीं तर इतिहास, तत्त्वज्ञान, काव्य, नाटक वगैरे विषयांवरीलही पुस्तकें तो वाचीत असे.

* * *

हीन व गटे यांची पुष्कळशी कविता मार्क्सनें तोंडपाठ केली होती. नेहमीं वादविवादांत तो या कवींचे उतारे भराभर म्हणून दाखवीत असे. शेक्सपियरबद्दल तर त्याला अमर्याद आदर वाटत असे. मार्क्सच्या कुटुंबांत शेक्सपियरची कविता वाचण्याचा जणूं काय संप्रदायच बनला होता. त्यानें आपल्या तिन्हीं मुलींकडून बार्डचें बरेंच काव्य तोंडपाठ करून घेतलें होतें. डांटे व बर्न हे त्याचे प्रेमांतले कवी होते. बर्नची व्यंग्यार्थक कविता व स्कॉटिश कवींचीं प्रेमगीतें आपल्या मुलींच्या तोंडून म्हणवून घेण्यांत त्याला अत्यंत आनंद वाटत असे.

* * *

तो रात्रीं फार उशीरां निजत असे, तरी सकाळीं ८ ते ९ च्या दरम्यान तो उठत असे. काळ्या कॉफीचा एक कप घेऊन व वर्तमानपत्रांकडे

थोडीशी नजर टाकून तो एकदा जो अभ्यासाच्या खोलीत जात असे तो पुन्हा दुसरे दिवशीं पहाटे दोनतीन वाजेपर्यंत फक्त जेवण्याकरितां जो काय थोडा वेळ लागेल तो सोडून लेखनवाचनाचे काम करीत असे. तारुण्याच्या दिवसात तर बहुतेक सर्व रात्र तो कामात गढलेला असावयाचा. काम करीत राहणें हा मार्क्सचा एक आवडता विषयच बनला होता. कामात गुंतला म्हणजे जेवणाची आठवणही त्याला व्हावयाची नाहीं. लोकांनीं सारखे बोलावून बोलावून डोके उठवावें त्यावेळीं तो भोजनगृहात मोठ्या जुलमानें जावयाचा व शेवटचा घास संपतो न संपतो इतक्यात पुन्हा तो अभ्यासाच्या खोलीत दाखल व्हावयाचा. विचार करीत राहण्यात तर त्याला परमानंद होत असे. "यापुढे कोणता व कसा गुन्हा करावा यासंबंधानें विचार करीत असताना बदमाशाला मिळणारें विचारसौख्य स्वर्गातील अनेक आश्चर्यजनक सुखापेक्षा अधिक श्रेष्ठ असतें," हे हेगेलचे उद्गार तो केव्हा केव्हा बोलून दाखवीत असे. मार्क्स हा स्वाभाविकच प्रकृतीने चांगला धडधाकट असल्यामुळें त्याचा दिनक्रम कितीही अनियमित असला तरी त्याची प्रकृति फारशी बिघडत नसे. मार्क्स हा मध्यम बांध्याचा व मध्यम उंचीचा होता. त्याचे खांदे मजबूत व छाती भरलेली होती. त्याचे सर्व अवयव प्रमाणबद्ध होते. त्याचे पाय इतर अवयवांच्या मानाने लहान होते. ज्यू लोकांमध्ये बहुतेक असेंच आढळून येते. भरज्वानीत तो काहीं दिवस तालीमही करीत असे. या व्यायामाचा पुढें त्याला उपयोगही झाला. कामाचा बोजा जसजसा जास्त पडूं लागला तसतसा त्याने सर्व व्यायाम सोडून दिला. फक्त चालण्याचा व्यायाम तेवढा त्याने कायम ठेवला होता. तासचे तास चालला तरी तो दमत नसे. टेकड्या चढून जाणें हा त्याचा आवडता व्यायाम होता. यावेळीं तो सारखा बोलत असावयाचा. तोंडानें तर सिगारेट फुंकणें चालूंच असावयाचें. त्यानें आपल्या लेखनाचें बहुतेक सर्व काम अभ्यासाच्या खोलीत भराभर येरझाऱ्या घालतानाच संपविलें आहे. एखादा विचार नक्की झाला म्हणजे तो कागदावर टिपून टाकावयाचा व पुन्हा विचार करीत तासन्तास चालत राहावयाचे हा त्याचा नेहमीचा क्रम असे. दुसऱ्याबरोबर एखाद्या विषयावर वादविवाद व चर्चा करण्याची त्याला फार हौस होती. हा वादविवादही

असाच येरझारा घालीत असतांनाच चालत असे. एकादा गूढ व महत्त्वाचा विचार मनांत आला म्हणजेच मात्र तो कांहीं वेळ उभा राहात असे.

* * *

फेब्रुवारी १८६५ च्या सुमारास मार्क्सची प्रकृति फारच ढासळली होती. 'कॅपिटल' ग्रंथाचा पहिला भाग लिहून काढण्याच्या कामांत तो मग्न झाला होता. आपल्या हातून हें पुस्तक लिहून होतें कीं नाहीं, याबद्दल त्याला शंका वाटत होती. अशा परिस्थितींत कोणी तरुण मनुष्य भेटीला आला म्हणजे त्याला मोठा आनंद वाटत असे. "माझ्या पाठीमागें कम्युनिस्टाची चळवळ चालविण्याकरितां मला तरुण मंडळींना शिकवून तयार केलें पाहिजे," असें तो या भेटीच्या वेळीं म्हणत असे. "स्वार्थ साधण्याकरितां किंवा व्यक्तिविषयक सुखात भर घालण्याकरिता कोणीही शास्त्रीय संशोधन करतां कामा नये. शास्त्रीय संशोधनाच्या मार्गे लागण्याइतकी सुस्थिति ज्यांना सुदैवानें प्राप्त झाली आहे व अशी सुसंधि ज्याना मिळाली आहे त्यांनीं आपल्या सर्व संशोधनाचा उपयोग मानवी समाजाच्या कल्याणाकरितां केला पाहिजे," असें त्याचें मत असे. "जगाकरिता काम करा." ही त्याची आवडती शिकवण होती.

* * *

मार्क्स हा जबरदस्त तंबाकू ओढणारा होता. 'भांडवल' लिहितांना मी जितक्या सिगारेट ओढल्या त्यांची किंमत भरून येईल इतका पैसा 'भांडवल' ग्रंथ विकून मला मिळणार नाहीं, असें तो आपल्या मित्रमंडळींपाशीं बोलून दाखवीत असे. सिगारेट पेटविण्याकरितां आगकाड्यांचा तर तो धुव्वा उडवीत असे. वाचण्याच्या व लिहिण्याच्या नादांत चिलीम किंवा सिगारेट केव्हां विझून गेली, याचें त्याला भानही रहात नसे व त्या पुन्हां पुन्हां पेटवितांना एक एक सबंध आगपेटी केव्हाच संपून जात असे.

* * *

मार्क्सचे प्रतिपक्षी त्याच्यावर टीकांचा वर्षाव करूं लागले म्हणजे त्याला ती एक करमणूकच वाटे. त्यांच्यासंबंधानें तो व्यंग्यार्थानें बोलूं लागला म्हणजे त्याचें तें भाषण ऐकण्याची मोठी मौज वाटत असे. एकदां एकादें

पुस्तक किंवा लेख लिहिला व ज्या उद्देशानें तो लिहिला तो उद्देश सफल झाला म्हणजे मार्क्सला त्याची आठवणसुद्धां होत नसे. सहज बोलतां बोलतां त्यानें पूर्वी लिहिलेल्या एकाद्या पुस्तकाचें नांव निघालें म्हणजे तो म्हणत असे कीं, "माझ्या लेखांचा पूर्ण संग्रह तुम्हाला पाहावयाचा असेल तर तुम्ही लॅसेलला विचारा. त्यानें ते सर्व जपून ठेवले आहेत. मला विचाराल तर त्यापैकीं बहुतेक लेखाची व पुस्तकांची एकही प्रत मजपाशीं मिळावयाची नाहीं." हें त्याचें बोलणें केवळ अलंकारिक नव्हतें तर अगदीं खरें होतें. त्याला सहज एकादें त्यानें लिहिलेलें पुस्तक लागलें म्हणजे आपल्या मित्रमंडळीं-जवळ त्याबद्दल तो चौकशी करीत असे व त्यांच्यापैकीं कोणापाशीं तें असल्यास मोठ्या मिनतवारीनें त्याच्याजवळून तो तें कांहीं दिवसाकरितां मागून घेत असे.

* * *

भांडवलदाराशीं झगडा चालू असतां मजूरवर्गाचा पराभव होई तेव्हां ती गोष्ट मार्क्सच्या मनाला चटका लावून सोडीत असे. तो नेहमीं या पराजित व दुःखीकष्टी लोकाचा पक्ष घेत असे. मजुरांना दडपून टाकण्याला ही चांगली संधि आहे अशा समजुतीनें भांडवलदारानीं व त्याच्या दोस्तानीं त्याच्यावर टीकाचा भडिमार सुरू केला म्हणजे मार्क्सचा संताप अनिवार होत असे व तो आपलीं राखून ठेवलेलीं शस्त्रास्त्रें काढून मजूर-वर्गाच्या या शत्रूंवर तुटून पडत असे. आपला खरा मित्र कोण याची परीक्षा आपला जेव्हां पराजय होतो त्याच वेळी होते, असें तो नेहमीं म्हणत असे.

* * *

रविवारच्या दिवशीं मार्क्सच्या मुली त्याला मुळीच काम करूं देत नसत. तोही या दिवशीं पूर्ण सुट्टी घेत असे व सर्व दिवस त्यांची व स्वतःची करमणूक करण्यांत तो घालवीत असे. हवा स्वच्छ असेल त्या दिवशीं कुटुंबांतील सर्व मंडळी बरोबर घेऊन तो रानावनांतून फिरावयास जात असे. लहान मुलांना वाटेचे श्रम होऊं नयेत म्हणून तो त्यांना अनेक अद्भुत व चमत्कारपूर्ण गोष्टी सांगावयाचा. या गोष्टी कधीच संपत नसत. एका गोष्टीतून दुसरी गोष्ट बाहेर पडावयाची व रस्ता जितका जवळ किंवा

दूर असेल त्याप्रमाणें ती लांब किंवा आंखूड व्हावयाची. मार्क्सची कल्पनाशक्ति दांडगी होती. असल्या गोष्टी सांगणें ही त्याची केवळ एक करमणूक होती. आपल्या तारुण्याच्या दिवसांत त्यानें बऱ्याच कविताही केल्या होत्या. त्यापैकीं ज्या थोड्या कवितांचीं टांचणें त्याच्या पत्नीला सांपडलीं तीं तिनें फार जपून ठेवलीं होतीं. तीं दुसऱ्या कोणालाही ती दाखवीत नसे. आपल्या मुलींच्या मनोरंजनाकरितां एक नाटकही लिहिण्याचें अभिवचन त्यानें दिलें होतें. पण हा त्याचा बेत सिद्धीस गेला नाहीं.

* * *

लहान मुलें पाहिलीं म्हणजे तर मार्क्सला अगदीं प्रेमाचें भरतें येत असे. जीझसच्या चरित्रांतील एक गोष्ट मार्क्सला फार आवडली व ती म्हणजे जीझसचें लहान मुलांवरील प्रेम ही होय. लंडन शहरात त्याला कांहीं जरूरीचें काम नसलें म्हणजे 'कॅपिटल' ग्रंथाचा हा प्रसिद्ध लेखक हॅम्फर्ड हीथवर फिरावयास जात असे व तेथें मुलांच्या गर्दींत खेळत राहात असे.

* * *

काम करतांना फारच कंटाळा आला व कांहीं सुचेनासें झालें म्हणजे मार्क्स लहान मुलांत मिसळत असे व त्यांच्यांत खेळूं लागत असे. अशा रीतीनें कांहीं वेळ घालविला म्हणजे तो पुन्हां ताजातवाना होई व जोरानें पुन्हां कामास लागे. मार्क्सचीं मुलें लहान होतीं तेव्हां त्याची ही गरज भागत असे. हीं मुलें मोठीं झाल्यावर त्याची जागा त्याच्या नातवंडांनीं भरून काढली. मार्क्सची एक मुलगी लिट्ल् जेनी हिनें चार्ल्स लाँगेट (एक हद्दपार झालेला कम्युनिस्ट) याच्याशीं लग्न केलें होतें व तिनें मार्क्सचें घर नातवंडांनीं भरून सोडलें होतें. या मुलांबरोबर मार्क्स व त्याचे दोस्त एंजल्स व लिब्नेिश हे घोडागाडीचा खेळ खेळत असत आणि मुलांच्याकडून मिळालेले चाबकाचे तडाखे आनंदानें सहन करीत असत.

* * *

मार्क्सचें अंतःकरण अतिशय कोमल होतें. कोणी कोणावर जुलूम चालविला आहे, कोणी कोणावर अत्याचार चालविला आहे, असें आढळून

येतांच तो नेहमीं झटदिशीं त्याचा प्रतिकार करण्यास तयार होत असे. अशा प्रसंगीं होणारा भावनेचा उद्रेक त्याला सहन होत नसे. हॅम्पस्टीडच्या रस्त्यावरून एके दिवशीं मार्क्स आपल्या एका दोस्तासह बगींतून चालला होता. एका गल्लीच्या टोकाशीं त्याची बगी आली, त्यावेळीं 'खून' 'खून' असे शब्द एकाएकीं त्यानें ऐकले. विद्युल्लतेच्या वेगानें मार्क्सनें बगींतून बाहेर उडी टाकली व जिकडून आवाज ऐकूं आला तिकडे धाव मारली. त्याचा दोस्त बगींत थोडाच बसून राहणार! मार्क्सला आवरून धरावें, असें त्याच्या मनात होतें पण बंदुकींतून गोळी सुटावी त्याप्रमाणें धावून गेलेल्या मार्क्सला तो आवरूं शकला नाहीं. एका निमिषार्धांत हे दोघेजण ज्या ठिकाणीं झगडा चालू होता त्या ठिकाणीं दाखल झाले. पण पाहतात तों तेथें आहे काय! एका दारू प्यालेल्या भिकारणीनें आपल्या नवऱ्याशीं झोंबाझोंबी सुरू केली होती. नवरा तिला घरीं नेऊं पाहात होता व ती त्याचें ऐकत नव्हती. एकाद्या अंगात आलेल्या स्त्रीप्रमाणें ती त्याचा प्रतिकार करीत होती. या नवराबायकोच्या भांडणांत मध्यें पडणें फजूल होतें. मार्क्स व त्याचा दोस्त त्या ठिकाणीं गेल्यावरोबर दोघांनीं आपलें भांडण थांबविलें व मार्क्सवरच हल्ला चढविण्याची तयारी केली. लोकांची गर्दी जास्त जास्तच जमूं लागली व 'धिक्कार असो या परकीयांना' अशा आरोळ्या जिकडून तिकडून उठल्या. त्या भिकारणीनें मार्क्सच्या सुंदर तुळतुळीत दाढीला हातसुद्धा घातला. इतक्यांत दोन पोलीस त्या ठिकाणीं धावत आले म्हणून बरें झालें. नाहीं तर मार्क्सला व त्याच्या दोस्ताला बेदम मार मिळाला असता. असल्या भांडणांत एकदम मध्यें पडणें बरें नव्हे असा अनुभव मार्क्सला या प्रसंगीं आला व तो यापुढें सावधगिरीनें वागूं लागला.

* * *

प्रतिपक्षाशीं दोन हात करतांना कोणत्या व कसल्या शब्दांची योजना करावी याचा तो फारसा विचार करीत नसे. पण लहान मुलें व बायका यांच्यापुढे मात्र तो फार जपून बोलत असे. या बाबतींत तो इतकी नम्रतेची व सभ्यतेची भाषा वापरीत असे कीं, त्याच्या घरीं आलेल्या इंग्लिश दासीलासुद्धा त्याच्याविरुद्ध तक्रार करण्याला जागा मिळत नसे. क्वचित् प्रसंगीं एखादा वेडावाकडा शब्द त्याच्या तोंडून चुकून बाहेर पडला कीं,

सोळा वर्षाच्या एकाद्या मुलीप्रमाणें तो लाजून जात असे. मार्क्सचें घर म्हणजे निर्वासित तरुणांचें माहेरघरच बनलें होतें.. हे सगळे तरुण स्वभावतःच आडदांड असावयाचे. कोठें कसें बोलावें हें त्यांना समजावयाचें नाहीं. गाण्याचा नाद तर या मंडळींना खूपच असावयाचा. या लोकांपैकीं एकाचा तरी आवाज सुरेल होता म्हणावें तर तेंही नाहीं. राजकीय चळवळींत पडलेले उत्साही तरुण विशेषतः सोशियालिस्ट व कम्युनिस्ट यांचे आवाज तर नेहमीं भसाडेच असावयाचे. वीन धारण करणाऱ्या सरस्वतीदेवीची या विचाऱ्यांवर कधींच कृपा नसावयाची. एके दिवशीं या मंडळींपैकीं थोडासा बरा आवाज असलेला एक तरुण मार्क्सच्या खोलींत बसून एक गाणें गाऊं लागला. बायकामंडळी व मुली याच्यापैकीं कोणीही घरांत नव्हतें. या गाण्यांत–गाणें कसलें गोंगाटच–मार्क्सनेंही प्रथम थोडा वेळ भाग घेतला होता. परंतु एकाएकीं मार्क्स अस्वस्थ झालेला दिसला. तो अगदीं गोंधळून गेला. जवळच्या खोलींत कोणी तरी आल्याची चाहूल त्याला ऐकूं आली. मार्क्स तावडतोब उठला. त्याचा चेहरा गोरामोरा झाला. "हुःश, हुःश, मुली! मुली!" असें तो म्हणाला व गाणें लगेंच बंद झालें. मंडळी जें गाणें म्हणत होती त्यामुळें मुलींच्या मनावर कांहीं वाईट परिणाम होईल, असें मुळींच नव्हतें. गाण्यांतील मर्म समजण्याइतकें त्यांचें वय झालेलें नव्हतें. पण मार्क्सला ही गोष्ट आवडत नसे. "लहान मुलांच्या कानांवर अशीं गाणीं जाऊं देऊं नयेत," असें तो नेहमीं म्हणत असे.

* * *

लंडन येथें डीनस्ट्रीटवर चर्चस्ट्रीटपासून थोडीं घरें टाकून मार्क्सचें घर असे. रविवारच्या दिवशीं मार्क्स आपल्या कुटुंबांतील सर्व मंडळीसह हॅम्पस्टेड हीथवर फिरावयास जात असे. हीथवर रविवारीं फिरावयास जाणें हा मार्क्सच्या कुटुंबांत सर्व आठवडाभर चर्चेचा विषयच होत असे. हीथवर सबंध रविवारचा दिवस मोठ्या मजेंत जावयाचा; यामुळें मुलें तर हीथवर अमुक अमुक मौजा करावयाच्या, याचा बेत करीत असत. ही मंडळी कधीं कधीं सबंध दिवस हीथवर घालवीत असत. अर्थात् त्यावेळीं फराळाचे जिन्नसही बरोबर घेण्यांत येत असत व त्याबरोबर लहान मुलांच्या खेळ-

ण्यांचाही एक हार असे. हीथवर जाण्याकरिता निघाल्यापासून ते पुन्हां घरीं येईपर्यंत मार्क्सच्या भोंवतीं मुलांचा घोळका असावयाचा. मार्क्स त्यांच्याबरोबर नाना प्रकारचे खेळ खेळावयाचा व खेळण्याचा कंटाळा आला कीं गोष्टी सांगावयाचा. हीथवर एकदा असेंच फिरत असताना एका बोरीच्या झाडावरील बोरें दगड मारून खालीं पाडण्याची टूम निघाली. झालें! सर्व मुले दगड मारूं लागलीं. मोठीं माणसेंही त्यांत सामील झालीं. मार्क्सनें तर त्या दिवशी इतके दगड मारले कीं, पुढें दोन दिवस त्याचा उजवा हात दुखत होता.

* * *

अनेक खोटीनाटीं सोंगे घेऊन भिक्षा मागणाऱ्या लोकाचा मार्क्सला फार राग येत असे. अशा रीतीनें अनेक ठकबाजीच्या युक्त्या करून भिक्षा मागत फिरणें ही एक सुंदर कलाच बनली होती. लंडनच्या रस्त्यात या कलेचें दर्शन नेहमीं होत असे. या लोकाना भिक्षेंत तांब्याचें नाणे मिळत असे. तरी सोन्याच्या नाण्यांनीं यानीं आपल्या तिजोऱ्या भरून ठेवल्या होत्या. जवळ पैसा असला व कोणी भिक्षेकऱ्यानें हात पुढें पसरला म्हणजे त्याच्या हातात तो एकादें नाणें टाकीत असे. पण त्यानंतर त्याचें त्यालाच वाईट वाटत असे. अंगाला रंग लावून किंवा दुसऱ्या कांहीं युक्त्यांनीं आपल्याला भयंकर रोग झाला आहे, असें हे भिक्षेकरी दाखवीत असत. त्यावेळी मार्क्सला त्याची अतिशय चीड येत असे. मनुष्याच्या ठिकाणीं असलेली सहानुभूति अशा रीतीनें बेशरमपणानें लुबाडली जाते, हें पाहून मार्क्सला फार वाईट वाटत असे. गरीबाच्या पैशाची ही एक चोरीच आहे, असें तो मानीत असे. परंतु जेव्हां एकादा पुरुष किंवा स्त्री भिकारी भिक्षा मागणारें मूल घेऊन त्याच्यापुढें येई त्यावेळीं त्याचे हे विचार कोणीकडच्या कोणीकडेच नाहींसे होत. या भिकाऱ्याचें हें सोंग त्याला समजत नसे असें नाही. पण लहान मुलाच्या मोहक नेत्राना तो भाळून जाऊन आपलें देहभान विसरत असे.

* * *

सर्व निर्वासित कम्युनिस्ट दोस्तांचें मार्क्सच्या घरी नेहमीं अगदीं मोकळे-पणानें स्वागत करण्यात येत असे. घरी पाहुणा आला म्हणजे त्याला संतुष्ट ठेवण्याची कला जेनीला फार चांगली साधली होती. सर्व पाहुण्यांना ती

थाईप्रमाणें किंवा बहिणीप्रमाणें वाटत असे. तिचें ममताळुपणाचें वागणें, तिचें प्रेमळ अंतःकरण व सर्वांना आपलेसें करून टाकण्याची तिची हातोटी, हें सर्व पाहिलें म्हणजे " मनुष्याला रिझविण्याकरितां स्त्रीला निर्माण करणाऱ्या निसर्गाचें कौतुक वाटतें, " हें एका कवीचें वचन सार्थ वाटल्याशिवाय राहात नाहीं. मजूरवर्गाच्या चळवळींत ती अत्यंत उत्साहानें भाग घेत असे. भांडवलवाल्यांशीं लढत असतांना मजुरांना एखादा अगदीं लहान विजय जरी संपादतां आला तरी तिचें अंतःकरण आनंदानें भरून जात असे.

* * *

मार्क्सच्या तिघी मुलीही मजुरांच्या चळवळींत लहानपणापासूनच भाग घेऊं लागल्या होत्या. मार्क्सच्या घरांत यासंबंधानें सारखीच वाटाघाट चालू असावयाची. यामुळें या चळवळीचें महत्त्वही त्यांना चागलें समजलें होतें. बापाप्रमाणें नव्हे तर भावाप्रमाणें किंवा मित्राप्रमाणें त्या मार्क्सशीं वागत असत. बाप या नात्यानें मुलीवर सत्ता गाजवावी असें मार्क्सला कधींही वाटत नसे. महत्त्वाच्या प्रश्नाच्या बाबतींत तो मुलींचा सल्लागार बनत असे. आणि जेव्हां त्याला वेळ मिळत असे त्यावेळीं तो त्यांच्याशीं एखाद्या खेळगडयाप्रमाणें खेळत असे.

* * *

मार्क्सच्या घरीं एक नांवाजण्याजोगें माणूस होतें. मार्क्सच्या कुटुंबावर अनेक बरेवाईट प्रसंग आले पण हेलेन डीमथनें त्यांना कधींही सोडलें नाहीं. वेस्ट फालन कुटुंबांत ही मोलकरीण होती. मार्क्सचें लग्न झाल्यावर जेनीबरोबर ती मार्क्सच्या कुटुंबांत सामील झाली. शेतकरी कुटुंबांत तिचा जन्म झाला होता. ती स्वभावतः अत्यंत कष्टाळू, प्रेमळ व एकनिष्ठ होती. मार्क्सच्या घरचा सर्व कारभार ती करीत असे. काटकसरीच्या वृत्तीमुळें कोंडयाचा मांडा करून तिनें मार्क्सचा संसार सुखाचा करून सोडला होता. मार्क्स तिच्याशीं बुद्धिबळें खेळत असे व पुष्कळ वेळां ती मार्क्सवर डाव करीत असे. मार्क्सवर हेलेनचें अगदीं निष्पाप प्रेम होतें. कार्ल व जेनी जें जें काम करीत तें तें सर्व योग्य व रास्तच असलें पाहिजे अशी तिची समजूत होती व त्यांच्या वर्तनाचें ती मोठ्या जोरानें समर्थन करीत असे.

* * *

जे लोक निर्भीडपणें आपल्याला विरोध करतात व आपलीं स्वतःचीं मतें स्पष्टपणें बोलून दाखवितात ते लोक मार्क्सला फार आवडत असत. असल्या लोकांचा तो तिरस्कार करीत नसे तर तो उलट त्यांच्याशीं निकट संबंध येईल व त्याचा जास्त परिचय होईल असा प्रयत्न करीत असे. या लोकांशीं तात्त्विक चर्चा करण्यात त्याला फार आनंद वाटत असे. खुशामत करणाऱ्या लोकांचा तर तो तिरस्कारच करी. कामकरी लोक आपल्या चळवळीत मनःपूर्वक भाग घेऊं लागले म्हणजे तर त्याचा आनंद गगनांत मावेनासा होई. या कामकरी लोकांशीं तो फारच मोकळ्या मनानें चर्चा करीत असे. वादविवादांत भाग घेणारी ही कामकरी मंडळी ज्या विषयासंबंधानें बोलत आहेत तो त्यांना पूर्णपणें कळला आहे असें जेव्हां त्याला आढळून येई तेव्हा तर त्याच्या विषयप्रतिपादनाला अधिकच स्फुरण चढत असे.

* * *

केवळ विचारांतच नव्हे तर कृतींतही मार्क्स क्रांतिकारक होता. तो केवळ विद्वानच नव्हता तर तो द्रष्टाही होता. अनेक प्रमाणांनी युक्त अशी पद्धतशीर ग्रंथरचना करण्यांत तो ज्याप्रमाणें कुशल होता त्याचप्रमाणें आपल्या मतांचा प्रसार करण्याकरितां अत्यंत परिणामकारक अशीं पत्रकें काढण्यांतही त्याचा हातखंडा होता. ब्रिटिश म्यूझियम जितका वेळ उघडें ठेवण्यात येत असे तितका सर्व वेळ त्यात रोजच्या रोज बसून वर्षानुवर्षे अत्यंत श्रमपूर्वक अभ्यास करणारा मार्क्स आवेशयुक्त भाषणें करून चळवळी चालवीत असे व अन्यायी, जुलमी प्रतिपक्षाशीं झगडत असे. मार्क्सच्या स्वभावांतील या दोन्ही गोष्टी एकमेकांना पूरक आहेत हें खरें असलें तरी हे दोन्ही गुण कधीं कधीं परस्परविरोधीही असतात, असेंही आढळून येतें.

* * *

रात्रंदिवस राब राब राबावे पण हातांत तर एक कवडीही नाहीं, या परिस्थितीला मार्क्स अगदीं कंटाळून गेला होता. उद्यांची सामुग्री घरांत नाहीं असा एकदां प्रसंग आला त्यावेळीं ही कटकट मिटविण्याकरितां मार्क्सनें रेल्वे खात्यांत कारकुनाच्या जागेकरितां अर्ज करण्याचें ठरविलें

होतें. त्याचप्रमाणें आपल्या मुलींना मोलकरणीच्या कामावर व नाटकांतून नटींचीं कामें करण्यास पाठवून देण्याचा त्यानें विचार केला होता. लंडनमधील थोडया बऱ्या वस्तींत असलेलें घर सोडून व्हाइट चॅपेलमधील मजुरांच्या गलिच्छ चाळींतील कमी भाडयाच्या खोल्यांतून जाऊन राहण्याचाही त्यानें यावेळीं विचार केला होता.

* * *

घरखर्च चालविण्याकरितां जवळ कांहीं शिल्लक राहिलेली नाहीं असें पाहतांच घरांतील कांहीं चांदीचीं भांडीं गहाण टाकण्याचा मार्क्सनें विचार केला. हीं चांदीचीं भांडीं जेनीला तिच्या माहेरच्या माणसांनीं देणगीदाखल दिलीं होतीं. या भांड्यांपैकीं एक चमचा गहाण टाकण्याकरितां मार्क्सनें तो एका सराफाच्या दुकानीं नेला. या चमच्यावर जेनीच्या माहेरचें 'ड्यूक ऑफ अरगाइल' या सरदार घराण्याचें नांव कोरलेलें होतें. फाटका व मळकासळका पोषाख केलेल्या एका जर्मन इसमापाशीं असला चमचा पाहिल्याबरोबर या सराफाला चोरीचा वहीम आला व त्यानें लगेच पोलिसमध्यें वर्दी दिली. चोर म्हणून मार्क्सला गिरफदारच करण्यांत यावयाचें पण चमच्याचा मालक 'डॉ. कार्ल मार्क्स' आहे, असें पोलिसला समजल्याबरोबर त्यांनीं मार्क्सला अटक केली नाहीं.

* * *

मार्क्सच्या मरणानंतर जे अनेक प्रकारचे कागदपत्र हातीं आले त्यांतील एका कागदावर खालील प्रश्नोत्तरें लिहिलेलीं होतीं. मार्क्सच्या मुली लॉरा व जेनी यांनीं हे प्रश्न आपल्या वडिलांना सहज विचारले होतेः—

तुमचा आवडता सद्गुण— साधेपणा.

मनुष्यांत कोणता सद्गुण असावा असें तुम्हांला वाटतें— शक्ति.

स्त्रियांच्या ठिकाणीं कोणता गुण असावा— दुर्बलता.

तुमच्यातला विशेष गुण— उद्दिष्ट कार्यासंबंधींची उत्कटता.

तुमची सुखाची कल्पना— युद्ध.

तुमची दुःखाची कल्पना— पडतें घेणें.

कानाडोळा करण्याजोगा दुर्गुण— धादरटपणा.

अत्यंत तिरस्करणीय दुर्गुण— गुलामगिरी.

आवडता व्यवसाय— वाचन.

कवी— शेक्स्पीयर, आशायलस, गटे.

गद्यलेखक— डिडेरॉट.

रंग— लाल.

नाव— लॉरा, जेनी.

पक्वान्न— मासा.

आवडती म्हण—मला करता न येईल असें मानवी जगांत काही नाही.

नेहमी मनात घोळणारा आवडता विचार— प्रत्येक गोष्टीबद्दल शंका घ्या.

या प्रश्नोत्तरात फारसा गंभीरपणा नाहीं व ही चर्चा केवळ थट्टेच्या स्वरूपाची असली तरी त्यातील गोष्टी बऱ्याच महत्त्वाच्या आहेत.

# भाग दुसरा

# का र्ल मा र्क्स

## शिकवण

### विरोधविकासवाद

अखिल विश्वाला कोणी तरी निर्माण केलें आहे. कोणी तरी दिव्य सगुण विश्वव्यापी शक्ति विश्वाचें पालन करीत आहे. अखिल विश्व पूर्णा-तून निर्माण झालें असून पूर्णांतच त्याचा लय व्हावयाचा आहे. विश्वाचे सर्व व्यवहार कांहीं विशिष्ट हेतूनें चालू आहेत, या सर्वांच्या मुळाशी पूर्ण व सनातन तत्त्वाचें अधिष्ठान आहे. अखिल विश्व स्थिर, शाश्वत व अनादि आहे. सृष्टींतील सर्व व्यवहार अनादिकालापासून एकसारखेच चालत आले आहेत. विश्व पूर्वी जसें निर्माण झालें व पूर्वी ज्याप्रमाणे त्याचे व्यवहार चालूं होते त्याचप्रमाणें ते आताही निर्माण करण्यांत आलें आहे व त्याचे व्यवहारही तसेच चालूं आहेत. "धाता यथापूर्वमकल्पयत्" ब्रह्मदेवाने पूर्वी ज्याप्रमाणें योजिलें होते त्याचप्रमाणें विश्वाची निर्मिति झाली आहे. इतिहासांतील सर्व सामाजिक, आर्थिक व राजकीय घटना याच न्यायाने घडून येत असतात. सूर्याच्या प्रकाशाखालीं नवीन असें कांहींच घडत नाहीं. इतिहासाची पुनरावृत्ति होते. सर्व आत्मवादी किंवा कल्पनावादी तत्त्व-ज्ञान्यांची हीच विचारसरणी आहे.

विश्वाला कोणीही निर्माण केलेलें नाहीं. एकाद्या नाजुक यंत्राप्रमाणे निसर्गतःच त्याचे व्यवहार चालूं आहेत. त्याच्या व्यवहाराच्या मुळाशी कोणताही हेतु नाहीं. विश्वांत स्थिर व शाश्वत असें कांही नाहीं. त्याचा सारखा विकास होत आहे. विश्वांतील सर्व घटना याच नियमानें चालूं आहेत. सृष्टींतील सर्व व्यवहारांत सारखे नवीन नवीन बदल घडून येत आहेत. 'क्रांति' हाच विश्वाचा धर्म आहे. सर्व अनात्म-

वादी किंवा भौतिकवादी याच मताचे आहेत. आपलें हें मत तर्कप्रतिष्ठित आहे, असें त्यांचें म्हणणें आहे. यांत गूढ असें कांहीं नाहीं. "बुद्धीला जें पटतें तेंच सत्य होय आणि सत्य असेल तर तें बुद्धीला पटलें पाहिजे." जें जें कांहीं आहे त्याचें सत्य स्वरूप बुद्धीला पटवून देणें हेंच खऱ्या तत्त्ववेत्त्यांचें काम आहे. अनात्मवादी लोक हीच गोष्ट वारंवार आग्रहानें सांगत असतात.

याप्रमाणें आत्मवादी किंवा कल्पनावादी व अनात्मवादी किंवा भौतिकवादी अशीं तत्त्वज्ञानविषयक भिन्न मतें प्राचीन कालापासून प्रचलित आहेत. मानवी समाजांत तत्त्वज्ञानविषयक विचारांची प्रगति होऊं लागली, आपल्या भोंवतालच्या जगाकडे मनुष्य पाहूं लागला, त्यासंबंधानें तो विचार करूं लागला, हे विचार तो इतरांना सांगूं लागला. आपले विचार दुसऱ्याच्या बुद्धीला पटतील अशा विशिष्ट पद्धतीनें तो मांडूं लागला, आणि दुसऱ्यानें काढलेल्या शंकांचें निरसन करूं लागला, तेव्हांच तर्कशास्त्र निर्माण झालें. आपल्या बुद्धीचा कसा उपयोग करावा, बुद्धीला पटतील अशा शास्त्रशुद्ध रीतीनें आपले विचार कसे मांडावे, ही गोष्ट तर्कशास्त्रानें माणसाला शिकविली. माणसाच्या मनांत कल्पनांचा प्रादुर्भाव कसा होतो, दगड, झाडें, मनुष्य, पशु, पुरुष, स्त्री, धन, द्रव, सद्गुण, दुर्गुण, सत्य, असत्य, इ. विविध कल्पना माणसाच्या मनांत कशा येतात, कल्पनांचें एकीकरण कसें होतें व त्यापासून मनुष्य कसकसे निरनिराळे निर्णय काढतो यांचा विचार करणें हाच तर्कशास्त्राचा विषय आहे. विचार करण्याचें हें काम बुद्धि सामान्यपणें पुढील नियमाप्रमाणें करीत असते. (१) अभिन्नता– 'क' हा 'क' आहे. प्रत्येक वस्तु ही प्रत्येक वस्तूसारखी आहे. ती दुसरें कांहीं नाहीं. पृथ्वी ही पृथ्वी आहे. मनुष्य हा मनुष्य आहे, संपत्ति ही संपत्ति आहे. (२) विरोध–'क' हा 'क' आणि 'क' चा अभाव असूं शकणार नाहीं. पृथ्वी ही पृथ्वी आणि अग्नीचा गोळा असूं शकणार नाहीं. मनुष्य हा मनुष्य आणि पशु असूं शकणार नाहीं. (३) मधल्या स्थितीचा अभाव—'क' हा 'क' आहे किंवा 'क' चा अभाव आहे. म्हणजे 'क' हा 'क' आहे असें म्हणा किंवा 'क' नाहीं असें

म्हणा. याशिवाय दुसरें कांहीं असूं शकणार नाहीं. पृथ्वी ही पृथ्वी असली पाहिजे किंवा अग्नीचा गोळा असली पाहिजे, मनुष्य हा मनुष्य असला पाहिजे किंवा तो पशु तरी असला पाहिजे अमुक एक चागलें आहे किंवा अमुक एक वाईट आहे. तें चागलेंही आहे व वाईटही आहे अशी त्याची मधली अवस्था असूं शकणार नाहीं. तर्कशास्त्रातील अगदीं सामान्य असे हे तीन नियम असून ते कोणालाही सहज समजण्या-सारखे आहेत. अमुक वस्तु अशीच आहे ( अभिन्नता ), अमुक एक वस्तु अशी नाहीं ( विरोध ) व अमुक एक वस्तु अशीच आहे, ती तशी नसेल तर दुसरी कांहीं तिची मधली स्थिति असूं शकणार नाहीं ( मधल्या स्थितीचा अभाव ). याप्रमाणें ही विचारपद्धति कांहीं स्थिर व निश्चित प्रमेयावर आरूढ झाली आहे, हें उघड आहे. बहुतेक सर्व जुने तत्त्ववेत्ते याच दृष्टीनें जगाच्या घडामोडीकडे पाहात असत. तसेंच या सर्व घटना अशाच कांहीं तरी स्थिर व सनातन शक्तीच्या आधारावर चालू आहेत. परस्परांशी त्याचा कांहीं संबंध नाहीं. एकाकी व स्वतंत्रपणें त्या घडून येत आहेत व त्या अशाच घडत राहणार अशीच आत्मवादी तत्त्ववेत्याची विचारसरणी असते. जगाकडे पाहण्याची ही एक दृष्टि झाली.

कोणतीही घटना अगदीं स्वतंत्रपणें घडून येत नसते. अमुक एक असें आहे किंवा अमुक एक असें झाले म्हणजे तें तसेंच असलें पाहिजे किंवा तसेंच झालें पाहिजे असें नाहीं. या परिस्थितींत बदलही होऊं शकतो. कोणतीही घटना अगदी स्वतंत्रपणें घडून येत नसते. इतर गोष्टींचा तिच्या-वर परिणाम झालेला असतो व होत असतो. तेव्हां अमुक एक गोष्ट अशीच आहे किंवा ती अशीच घडून आली पाहिजे, असें निश्चितपणें सांगतां येत नाहीं. जगांतील घडामोडीकडे पाहण्याची ही दुसरी दृष्टि होय. अनात्म-वादी तत्त्ववेत्ते या दुसऱ्या दृष्टीनेंच जगाच्या घटनांचा विचार करीत असतात. विश्वविकासाच्या दृष्टीनें या सर्व घटनाकडे ते पाहात असतात. कोणत्याही घटनेसंबंधानें विचार केला असतां केवळ वर्तमानकालातीलच नव्हे तर भूतकालात घडून आलेल्या गोष्टींचाही तिच्यावर परिणाम झालेला असतो, असें दिसून येतें व यामुळें भविष्यकालीही या घटनेला कोणतें स्वरूप प्राप्त होईल, याची कल्पना करतां येते.

कोणत्याही घटनेसंबंधानें आपण जो कांहीं निर्णय करतो किंवा त्यावरून जीं कांहीं प्रमेयें काढतों तीं आपण ज्या पद्धतीनें विचार करतो तिच्यावर अवलंबून असतात. ही गोष्ट समजून येण्याकरितां आपण युद्धाचें उदाहरण घेऊं. युद्ध म्हणजे रक्तपात, खून, जाळपोळ, दुष्काळ, उपासमार होय. तेव्हां युद्ध होणें केव्हांही चांगलें नाहीं. युद्ध ही समाजावरची एक मोठी आपत्ति आहे, ती टाळलीच पाहिजे. आत्मवादी किंवा कल्पनावादी लोक अशा एकांगी दृष्टीनेंच युद्धाच्या या घटनेचा विचार करतील. युद्ध कां होतें, त्याची मागचीं पुढचीं कारणें काय, याचा ते विचार करणार नाहींत. युद्ध हें नेहमींच वाईट असतें, असें ते म्हणणार; पण वस्तुस्थिति तशी नाही. युद्ध हें कधीं कधीं चांगलें व हितकारीही असतें. समाजामध्यें अशी परिस्थिति निर्माण होते कीं, ज्यावेळीं युद्ध होणेंच अपरिहार्य असतें. एकतंत्री राज्यसत्ता नष्ट करण्याकरितां मोठमोठीं युद्धें करावीं लागलीं व त्यामुळें क्रांति घडून आली. गुलामगिरी नष्ट करण्याकरितां अमेरिकेला एक प्रचंड युद्ध लढावें लागलें. या युद्धानें अमेरिकेंतील गुलामगिरी नष्ट झालीच पण त्याबरोबर इतर राष्ट्रांतील गुलामगिरीही नष्ट झाली. युद्धामुळें अशा प्रकारचे फायदे झालेलेही आपण पाहतों. तसेंच 'स्वातंत्र्य' हें चांगलें आहे असा त्यावर कायमचा शिक्का मारून चालावयाचें नाहीं. 'स्वातंत्र्य' हें कधीं कधीं वाईट व हानिकारकही असतें. दुसऱ्याचा खून करण्याकरितां कोणी या स्वातंत्र्याचा उपयोग करूं लागला तर तें स्वातंत्र्य समाजहिताला पोषक होणार नाहीं. सत्य बोलण्याचेंही असेंच आहे. प्राणांतिक अवस्था आली तरी असत्याचा आश्रय करतां कामा नये. 'सत्य' हें सनातन, शाश्वत तत्त्व आहे. सत्याच्या त्यागानें कोणाचें केव्हांही हित होणार नाहीं. पण हें म्हणणें सर्वस्वी खरें नाहीं. क्षय झालेल्या माणसापाशीं व मरणांतिक अवस्थेला पोंचलेल्या रोग्यापाशीं डॉक्टर खरें बोलला नाहीं व त्याला कळलेलें रोगाचें निदान रोग्यापासून त्यानें लपवून ठेवलें तर त्यांत गैर कांहींच नाहीं.

याप्रमाणें कल्पनावादी तत्त्ववेत्ते कोणत्या तरी स्थिर व सनातन तत्त्वावर नीतीच्या तत्त्वांची मांडणी करतात. जगांतील सर्व घडामोडींकडे ते याच दृष्टीनें पाहतात. भौतिकवाद्याची दृष्टि यापेक्षां निराळी आहे. शाश्वत

व सनातन असें कांहीं नाहीं. विश्व अस्थिर आहे तेव्हां त्यात होणाऱ्या घटनाही अस्थिर स्वरूपाच्या आहेत. कोणतेंही नीतितत्त्व शाश्वत नाहीं. तें नेहमीं बदलत असतें असें भौतिकवाद्यांचें म्हणणें आहे.

आपण जें जग पाहतों व ज्याचीं वर्णनें धर्मग्रंथातून केलेलीं आढळतात तें कोणीही निर्माण केलेलें नाहीं किंवा तें अनादिकालापासून जसेंच्या तसे चालत आलेले नाहीं. गेली लाखों वर्षें या जगाचा सारखा विकास होत आहे व अद्यापही त्याचा विकास थांबलेला नाहीं. त्याच्यामध्यें अनेक उलाढाली, संक्रमणें व क्रांत्या घडून आलेल्या आहेत. अत्यंत प्राचीन कालीं पृथ्वी वायुस्वरूपात होती, नंतर ती अग्नीचा गोल बनली. पुढें ही पृथ्वी थंड होण्यास लाखों वर्षें लागलीं आणि नंतर लाखों वर्षांनी तिच्यावर वनस्पति व अनेक प्राणियोनी निर्माण होऊं लागल्या. या वनस्पति व अनेक प्राणियोनीसुद्धा एकाएकीं निर्माण झाल्या नाहीत तर त्याही एकींतून दुसरी व दुसरींतून तिसरी अशा हजारों संक्रमणावस्थेंतून विकास पावल्या. हा विकास कांहीं कांहीं बाबतींत क्रमशः झाला तर कांहीं कांहीं बाबतींत मधल्या पायऱ्या गाळून एकदम झाला. निसर्गात ज्याप्रमाणें अशीं स्थित्यंतरे घडून आलीं त्याचप्रमाणें मानवी इतिहासातही अशींच स्थित्यंतरें घडून आलीं आहेत. कुटुंब, राज्यसत्ता, उत्पादन, धर्म, कायदा इ. चीं स्वरूपें व कल्पना याच पद्धतीनें विकास पावल्या आहेत. विश्वात अचल स्थिर, शाश्वत व सनातन असें कांहीं नाहीं.

विश्व, विश्वातील वस्तु व विश्वातील घटना यासंबंधानें वरीलप्रमाणें नव्या नव्या कल्पनांचा जसजसा प्रादुर्भाव होऊं लागला तसतशी त्यांची मांडणी करण्याकरिता जुन्या तर्कपद्धतीची विचारसरणी अपुरी पडूं लागली. जुन्यापुराण्या तर्कपद्धतीनें विकासवादाचा सिद्धांत प्रस्थापित करणें व विकासातील अनेक अवस्थांतरांचा विचार करणें अशक्य होऊं लागलें. ही गरज पुरी पाडण्याकरितां एकोणिसाव्या शतकाच्या प्रारंभीं एक नवीनच तर्कशास्त्र पुढें आलें. जी. डब्ल्यू. हेगेल हाच या नव्या तर्कपद्धतीचा आद्यप्रणेता होय. विश्वविकासाच्या सिद्धांताचें ज्ञान करून देणारी व्यापक तर्कपद्धति हेगेलनें अत्यंत परिश्रमानें संशोधित केली. सत् व चित् तसेंच चित् व सत् यातील अभिन्नता हेगेलनें आपल्या तर्कपद्धतीनें सिद्ध केली. विश्व

म्हणजे ज्ञानतत्त्वाचाच क्रमशः विकास झालेला आहे, असा सिद्धांत हेगेलनें प्रस्थापित केला आहे. पण यावरून हेगेल हा केवळ एक अव्यक्तवादी तत्त्ववेत्ता होता, असें म्हणतां यावयाचें नाहीं. 'प्रत्यक्ष काय आहे,' याच्या विचारापासून तो अलिप्त नव्हता. अव्यक्ताला– शुद्ध आत्मतत्त्वाला– व्यक्त स्वरूप कसें प्राप्त झालें, हें दाखविण्याचेंच काम त्यानें आपल्या अंगावर घेतलें होतें. व्यक्ताशिवाय अव्यक्त व अव्यक्ताशिवाय व्यक्त हा विचारच त्याला अशक्य वाटत होता. हेगेलच्या तर्कशास्त्रानें केवळ आत्मविषयक विचाराचीच तेवढी मांडणी केलेली नाहीं; तर त्याबरोबरच विश्वविकासाच्या नियमांसंबंधानेंही त्यानें विचार केला आहे. जुन्या तार्किकांप्रमाणें नुसत्या कल्पनांशीं खेळत राहणें व शब्दावडंबर माजविणें ही गोष्ट हेगेलला पसंत नव्हती. अशा रीतीनें शब्दाचें जाळें पसरणें हें केवळ वंध्यामैथुनच होय, असें त्याचें मत होतें. म्हणून विश्वात्म्यांतून सृष्टि कशी प्रकट झाली, एवढेंच इतर आत्मवाद्याप्रमाणें सांगून तो थांबला नाहीं तर अखिल विश्वाचा विकास कसा झाला, याच्या नियमांचा विचार हेगेलनें केला आहे.

हेगेलची विचारपद्धति सामान्यतः पुढीलप्रमाणें होती:—एकानें पूर्वपक्ष मांडावा व दुसऱ्यानें त्याच्याविरुद्ध उत्तरपक्ष करावा व अशी चर्चा करतां करता शेवटीं सिद्धांताला जाऊन पोंचावें. "वादे वादे जायते तत्त्वबोधः" ही म्हण तर प्रसिद्धच आहे. विचाराचा विकास असाच होत असतो. अमुक एक गोष्ट अशीच आहे (अन्वय) असें एकानें म्हणावें तर दुसऱ्यानें ती तशी नाहीं, असें प्रतिपादन करावें व पहिल्या पक्षाला विरोध करावा (विरुद्धान्वय); आणि असें करतां करता दोघांचीही देवघेव होऊन दोघांनींही तिसऱ्याच एका सिद्धांतावर सहमत व्हावें (समन्वय), ही गोष्ट तर अनुभवसिद्ध आहे. हेगेलच्या विरोधविकासवादातील रहस्य हेंच आहे. विश्वविकास म्हणजे आहे–नाहीचाच झगडा होय. पृथ्वी हा अग्नीचा गोळा होता; पण हा अग्नीचा गोळा जसाचा तसाच राहिला असता तर पृथ्वीला आजचें स्वरूप कधींही प्राप्त झालें नसतें. अग्नीचा हा गोळा पुढें थंड पडला इतकेंच नव्हे तर थंड झालेला हा गोळा तसाच निर्जीव न राहता त्यांतूनच असंख्य प्राण्यांची सजीव सृष्टि निर्माण झाली. परिवर्तन हा निसर्गाचा धर्म आहे. प्रत्येक वस्तु अमुक वेळीं अमुकच आहे, असें म्हणतां येत नाहीं,

किंवा ती तशी नाही असेंही म्हणतां येत नाहीं. विश्वात स्थिर असें कांहीं नाहीं. नदीच्या ज्या पाण्यात आपण पाय टेवतों तें पाणी केव्हाच पुढें वाहून गेलेलें असतें. झाडाचें सत्य चित्र कोणालाही रेखाटतां यावयाचें नाहीं. कारण सूक्ष्म दृष्टीनें विचार केला असता हें चित्र रेखाटतांना झाड वाढत तरी असलें पाहिजे किंवा तें वठत तरी असलें पाहिजे. यामुळें झाडाचे हें चित्र कधींही बरोबर असणें शक्य नाहीं. एकादी घटना, वस्तु किंवा प्राणी याची अगदीं अचूक कल्पना करावयाची असेल तर ती वस्तु केवळ वर्तमानकालातच कशी आहे याचा विचार करून चालावयाचें नाहीं तर तिच्या विकासातील अनेक अवस्थांतरांचा विचार करावा लागेल. एकाद्या वस्तूचें बिनचूक ज्ञान करून घ्यावयाचे असेल तर ती कशी आहे व कशी नाही याचा विचार करणें आवश्यक असतें. ज्याला आपण जीवन म्हणतों तें केवळ जीवन नसून जीवनाचा अभावही असते. ज्या असंख्य जीवाणूंच्या साहाय्यानें जीवनशक्तीचे सर्व व्यवहार चालतात त्या जीवाणूंत सारखे बदल होत असतात. प्रत्येक क्षणीं या जीवाणूंपैकी कित्येक जीवाणू मरत असतात व कित्येक-जीवाणू नवीन निर्माण होत असतात. जीवाणूंच्या जन्ममृत्यूंचा झगडा म्हणजेच जीवनाचा व्यवहार होय. यामुळें हा व्यवहार सतत एकाच स्वरूपांत चालणें शक्य नसतें. ही जीवसंस्था सारखी बदलत असते. ती कधींही विश्रांति घेत नाहीं. जननमरणाच्या या झगड्यांत जीवाणू सारखे बदलत असतात यामुळें अर्थात् जीवसंस्थाही बदलत असते. म्हणून जीवनाची कल्पना करतांना मरणाची कल्पना करणेंही प्राप्त असतें. कोणतेंही अस्तित्व नास्तित्वाशिवाय असूं शकत नाहीं. अस्तित्व व नास्तित्व, अन्वय व विरुद्धान्वय, हेंच विश्वाचें स्वरूप होय. विश्वाच्या सर्व घटना या विरोधांतूनच निर्माण होतात. ज्याला आपण चळवळ, सामर्थ्य, परिणाम अशीं नावें देतो तीं सर्व दुसरें काही नसून विरोधाचींच स्वरूपें आहेत. आहे–नाहींचा हा झगडा आहे. हा विरोधात्मक झगडा सर्वसामान्य मनुष्याच्या लक्षांतसुद्धां येत नाहीं. दिवस–रात्र, शीत–उष्ण, घन–द्रव, जड–चेतन, कोमल–कठोर, सुख-दुःख, संपत्ति–विपत्ति, जन्म–मृत्यु, भांडवल–मजूरी, सद्गुण–दुर्गुण, राग–द्वेष वगैरे परस्परविरोधी वस्तूंनीं व गुणांनीं सर्व विश्व व्यापलेलें आहे, असें सामान्य माणूस पाहतो. सर्वसामान्य माणसाला केवळ यांतील विरो-

धांची कल्पना येते पण या विरोधातच प्रगतीची बीजें साठविलेलीं आहेत, हें त्याच्या लक्षांत येत नाहीं. हा परस्परविरोधच विकासाला कारणीभूत होतो. "परस्परविरोधाचें हें युद्ध चालू ठेवण्याचें सामर्थ्य जर या दोन्ही वस्तूंपैकीं एकींत नसेल तर तिचा नाश होईल." एक वस्तु दुसरीला गिळून टाकील. अग्नि व पाणी यांचा झगडा जोरांत चालू राहील असें त्यांचें प्रमाण असेल तरच त्यांतून बाष्पशक्ति निर्माण होईल. नाहीं तर या दोन्हींपैकीं ज्याचें वर्चस्व होईल तें दुसऱ्याचा नाश करील. परस्परविरोधी वस्तूंत विरोधाचा झगडा चालविण्याचें सामर्थ्य असलें पाहिजे, असें हेगेलचें म्हणणें आहे. हेगेलचा हा सिद्धांत म्हणजे विरोधविकासवादाचा आत्माच होय. इतकेंच नव्हे तर मार्क्सच्या सर्व विचारपद्धतीचाच तो आत्मा आहे. समाजाच्या विकासाचा विचार करतांना मार्क्स सर्वत्र विरोधच हुडकून काढीत असतो, असें कोणी म्हणतील पण असा विरोध (वर्गकलह) शोधून काढणें यांत कांहींच गैर नाहीं. कारण या विरोधांतच विकासाचें व प्रगतीचें मूळ आहे, असें मार्क्स-हेगेलचें म्हणणें आहे.

विरोधविकासवादांतील फक्त दोन अवस्थांचाच आतांपर्यंत विचार झाला. अस्तित्व-नास्तित्व, आहे-नाहीं, प्रकृति-विकृति, अन्वय-विरुद्धान्वय, वगैरे विश्वाच्या विकासांतील दोन अवस्था होत. पण एवढ्यानें भागत नाहीं. हा विकास पूर्ण होण्याकरितां तिसऱ्या एका अवस्थेची आवश्यकता असते. या तिसऱ्या अवस्थेला हेगेलनें नकाराचा नकार, विरोधाचा विरोध असें नांव दिलें आहे. म्हणजे असणें, नसणें व नसण्याचें नसणें, शास्त्रीय परिभाषेंत बोलावयाचें म्हणजे अन्वय, विरुद्धान्वय व समन्वय याच त्या तीन अवस्था होत.

ही गोष्ट अधिक स्पष्ट रीतीनें समजण्याकरितां आपण अंड्याचें उदाहरण घेऊं. तें स्वरूपतः एक जड वस्तु आहे (अन्वय). पण त्यांत असा एक जंतु आहे कीं, तो सचेतन होऊं लागतो व असें होतां होतां त्यांतील जडांश खाऊन टाकतो (विरुद्धान्वय).. या जंतूचें हें खाणें म्हणजे विनाश किंवा संहार नसून या विरोधांतूनच एक सचेतन जीव निर्माण करण्याचें कार्य होत असतें. या विरोधाला पूर्णावस्था प्राप्त झाली म्हणजे कोंबड्याचें पिलूं अंड्याचें कवच फोडून बाहेर पडतें. यालाच नकाराचा नकार, विरोधाचा

विरोध असें म्हणता येईल. प्रत्येक वस्तूच्या अंतर्गत तिला विरोधी असलेलें तत्त्व आढळून येतें आणि या दोन्हींच्या झगड्यांतून शेवटी हे विरोधी तत्त्वही नष्ट होऊन तिसरीच एक वस्तु निर्माण होते म्हणजे असणें या पहिल्या कल्पनेंतूनच नसणें या विरोधी कल्पनेची निर्मिती होते व शेवटीं नसणे ही कल्पनाही नष्ट होऊन तिसरीच एक नवीन कल्पना आपलें डोकें वर काढते. या क्रियेलाच नकाराचा नकार किंवा विरोधाचा विरोध असें म्हणतात. पण परस्परविरोधांतून निर्माण झालेल्या या तिसऱ्या वस्तूंत पहिल्या दोन्ही वस्तूंमधील गुणांचा अंतर्भाव झालेला असतो, हें विसरतां कामा नये. वरील अंड्याच्याच उदाहरणाचा आणखी थोडा जास्त स्पष्टपणें विचार करूं. प्रथम अंडें हें स्वरूपतः जड होतें. पण पुढें यातूनच चेतनाची क्रिया सुरू झाली. म्हणजे जडातूनच त्याचा नाश करणारी तदंतर्गत सुप्त चेतनाशक्ति जागृत झाली. आणि या चेतनाशक्तीचें कार्य पूर्ण होताच त्यातूनच पिलूं निर्माण झालें. या पिलांमध्यें पूर्वीच्या दोन्ही वस्तूंतील अंश प्रकट झाला. हें पिलूं जडाचाही अंश आहे व चैतन्याचाही आहे. दोन परस्परविरोधी लिंगधारी जीवाच्या संयोगरूपी झगड्यांतूनच तिसऱ्याच एका जीवाची निर्मिति होते. स्त्रीपुरुषाच्या संयोगांतून सुंदर बालक निर्माण होतें व त्यात आईबापाचे गुण प्रकट झालेले असतात. तसेंच आशानिराशाच्या झगड्यातूनच प्रयत्नाला सुरवात होते. याच पद्धतीनें निरनिराळ्या प्रकारच्या भावना व श्रद्धा याचा विकास होतो. पुढच्या पिढींतल्या लोकांचे विचार व भावना मागच्या पिढींतील लोकांच्या विचारांच्या व भावनाच्या विरोधी असतात व काहीं जुने व काहीं नवे यांच्या मिश्रणानें एक नवीन विचारसरणी सुरू होते. कोणताही विचार तर्कशुद्ध व बरोबर आहे, असें तेव्हांच म्हणतां येईल कीं, ज्यावेळीं विरोधविकासवाददृष्ट्या त्याचा विकास झालेला आहे, असें दिसेल. हेगेल ज्याला विश्वात्मा किंवा विश्वकल्पना असें म्हणतो त्याचा विकासही विरोधविकासदृष्ट्याच झालेला असून विश्वात्म्याचें व्यक्त स्वरूप असलेल्या विश्वातील सर्व घटना विरोधविकासन्यायानेंच घडून आल्या आहेत तरी अगदीं आधुनिक तत्त्वज्ञ बर्गसॉ व लॉइड मॉर्गन यांच्या हेतुगर्भविकासवादानें कल्पिलेल्या सृष्टीच्या विकासाहून विरोधविकासवाद्याचें सृष्टीच्या विकासाचें विवेचन अगदीं भिन्न आहे.

हा विरोधविकास क्रमशः व पायरीपायरीनें होणाऱ्या विकासाहून भिन्न असून मधल्या कांहीं पायऱ्या गाळून हा विकास होत असतो. मंडूकप्लुतिन्यायानें हे विकास होत असतात. विकासाच्या क्रियेंत एका विशिष्ट अवस्थेस पोंचल्याबरोबर क्रांति झालेली आढळून येते, "निसर्गांत एकदम असे कोणतेही फेरफार घडून येत नाहींत. प्रत्येक वस्तूची वृद्धि किंवा क्षय हा अगदीं क्रमशःच होत असतो," अशी एक सामान्य कल्पना आहे. पण हें खरें नाहीं. उदाहरणार्थ "पाणी हळू हळू थंड होतें, नंतर ते थलथलित होऊं लागतें व असें होतां होतां तें घन होतें; त्याचें बर्फ बनतें, असें नाहीं तर पाण्याचें उष्णतामान एका विशिष्ट अंशाखालीं गेल्याबरोबर तें एकदम बर्फ बनतें. पाण्याच्या गुणांतच एकदम परिवर्तन होतें." हेगेलनें वर दिलेल्या उदाहरणाचा दुसऱ्या बाजूनेंही विचार करतां येण्यासारखा आहे. दोनशें डिग्री फॅरेनाइटवर पाण्याची उष्णता वाढल्याबरोबर पाण्याची एकदम वाफ होते. पाण्याचा पाणीपणा नाहींसा होतो. तें वाफ बनतें. तें वायुरूप बनतें. पाण्याचा पहिला गुण नष्ट होतो व त्याला नवीनच गुणधर्म प्राप्त होतात. यालाच संख्यात्मक रूपाचे गुणात्मक रूपांत परिवर्तन होणें असें म्हणतात. निसर्गांत व समाजांत अशा प्रकारचीं अनेक उदाहरणें आढळून येतात. दोरीच्या एका टोंकाला एक वजन अडकवावें आणि पुढें या वजनावर आणखींही दुसरीं वजनें अडकवीत जावें, अशा परिस्थितींत कांहीं एका विशिष्ट मर्यादेपर्यंत ही दोरी टिकून राहील. पण या मर्यादेच्या पलीकडे गेल्याबरोबर ती एकदम तुटून जाईल. बॉयलरमध्यें वाफ भरतां भरतां कांहीं वेळपर्यंत सर्व कांहीं ठीक राहील, वाफेचा दाब दाखविणारा कांटा बॉयलरच्या आंतल्या बाजूवर वाफेचा किती दाब बसत चालला आहे, हें दाखवीत राहील. पण एका विशिष्ट मर्यादेबाहेर हा दाब वाढला कीं, बॉयलरचा एकाएकीं स्फोट होईल. सायकलच्या ट्यूबमध्यें हवा भरतांना हाच अनुभव येतो. एका विशिष्ट मर्यादेबाहेर हवा भरल्याबरोबर ट्यूब एकदम फुटून जाते. कांहीं माणसें एक तुळई उचलीत होती. ती उचलेना तेव्हां आणखी कांहीं माणसें त्यांच्या मदतीला आली. तरीही त्यांना ती उचलली नाहीं. पण नंतर एका म्हातारीनें त्या तुळईला हात लावला व एकदम ती उचलली गेली. मैदानांत खेळत असलेलीं मुलें मध्येंच एके टिकाणीं असलेलें

झुडूप उपटूं लागलीं. बऱ्याच मुलांनी तें उपटण्याचा प्रयत्न केला; पण तें उपटलें गेलें नाहीं. सगळींच मुलें अशा रीतीनें थकल्यावर एका लहान मुलानें त्या झुडपाला हात घातला व ते झटकन् उपटलें गेलें. अशीं आणखीं कितीतरी उदाहरणें देता येतील. या सर्व उदाहरणावरून असें दिसून येईल की, कोणत्याही वस्तूंत एकदम गुणात्मक परिवर्तन होण्यापूर्वी तींत पूर्वी बरेच संख्यात्मक फरक घडून आलेले असतात. आणि ही संख्यात्मक परिवर्तनेंच गुणात्मक परिवर्तनाला कारणीभूत होतात. निसर्गामध्येंही अशाच प्रकारचीं 'आकस्मिक' परिवर्तनें घडून येतात. पण असें उघड उघड दिसत असतांनाही तें तसें होतच नाहीं, सर्व कांहीं क्रमशःच होत असतें असें समजणें दुराग्रहाचें आहे. या 'आकस्मिक' परिवर्तनासंबंधानें भांडवलदाराना भय वाटतें. याचें कारण त्याना क्रांति नको असते. निसर्गात क्रांत्या घडून येत नाहींत तेव्हा बहुजनसमाजाने क्रांति घडवून आणण्याचें धाडस करूं नये, असें ते सांगत असतात. निसर्गातच काय तर मानवी समाजातही पुष्कळ क्रांत्या घडून आल्या आहेत. इंग्लंडमधील राज्यक्रांति, फ्रेंच राज्यक्रांति, १८४८ ची क्रांति व १९१७ मधील क्रांति या क्रांत्या तर कोणालाही नाकारता यावयाच्या नाहींत. अशा प्रचंड क्रांत्या समाजात घडल्या आहेत व अद्यापिही घडत आहेत. तर वैज्ञानिकांनी त्यांना नाकारून चालावयाचें नाहीं. या 'आकस्मिक' परिवर्तनाचें स्वरूप त्यानीं जाणलें पाहिजे व तीं कां व कशीं घडून येतात, याचीं कारणें शोधून काढली पाहिजेत व त्याचें स्पष्टीकरण केलें पाहिजे.

निसर्गात किंवा समाजांत ज्या क्रांत्या घडून येतात त्या आकाशातून खालीं एकदम कोसळत नसतात. उकळणारें पाणी, बॉयलरचा व सायकलच्या ट्यूबचा स्फोट इत्यादि मागें दिलेल्या सर्व उदाहरणांवरून या 'आकस्मिक' परिवर्तनाची पूर्व तयारी कशी झालेली असते, हें दिसून येण्यासारखें आहे. एकादी प्रचंड क्रांति घडून आल्याबरोबर या क्रांतीची तयारी पूर्वी क्रमशः झालेली होती, असें म्हणण्यास हरकत नाहीं. मार्क्सचा विरोधविकासाचा सिद्धात हा उत्क्रांतीचा सिद्धात नसून क्रांतीच्या घटनेचा सिद्धात आहे.

हेगेलच्या या विरोधविकासवादाच्या सिद्धातावरच मार्क्सनें आपल्या ऐतिहासिक विवेचनाचा पाया रचला आहे. इतिहासातील घटनाचीं कारणें

शोधून काढण्याच्या कामीं मार्क्सनें या पद्धतीचा दिवटीसारखा उपयोग केला व सर्व समाजसत्तावादाला शास्त्रीय स्वरूप दिलें. ही पद्धति मार्क्सनें हेगेलकडून घेतली असली तरी मार्क्सच्या हातांत ती गेल्याबरोबर तिला एक निराळेंच स्वरूप प्राप्त झालें. निसर्गांतील प्रत्येक वस्तूचा व समाजाचा विरोधविकासदृष्ट्या विकास होत असतो, याचें कारण काय तर विश्वाच्या मुळाशीं असलेलें आत्मतत्त्वच विरोधविकासात्मक आहे, असा हेगेलचा सिद्धांत आहे. अखिल दृश्य विश्व हें त्या सर्वश्रेष्ठ विश्वव्यापी आत्मतत्त्वाचेंच प्रतिबिंब आहे, असें हेगेल म्हणतो. हेगेलचें हें म्हणणें केवळ आत्मवादीच नसून तें गूढही आहे. वेद, बायबल, कुराण वगैरे धर्मग्रंथांतील कित्येक विधानांप्रमाणें हेगेलचा हा सिद्धांतही मानवी बुद्धीला पटण्याजोगा नाहीं. स्वतंत्रपणें विचार करणाऱ्या मार्क्सचा तर या गूढ कल्पनेवर विश्वास बसला नाहीं. यामुळें हेगेलचा हा सिद्धांत त्यानें अगदीं उलटा करून टाकला. विरोधविकासदृष्ट्या सर्व वस्तूंचा विकास होण्याचें कारण मूळ विश्ववस्तूमध्येंच हा धर्म सांठविलेला आहे, गूढ आत्मतत्त्वांत तो नाहीं. असें मार्क्सचें म्हणणें आहे. आमचीं मतें, आमच्या भावना, आमचे दृढ विश्वास हीं सर्व समाजांतील विरोधविकासाचींच प्रतिबिंबें किंवा प्रतिध्वनि आहेत. जीवनाच्या सर्व व्यापारांवर शुद्ध आत्मतत्त्व सत्ता चालवीत आहे, असें हेगेलचें म्हणणें तर व्यक्त विश्वच त्यांवर सत्ता चालविते असें मार्क्स म्हणतो. हेगेल ज्याला ( आत्मा, भावना, श्रद्धा, विश्वास इ. ) कारण म्हणतो तें मार्क्सच्या दृष्टीनें कार्य ठरतें; आणि हेगेल ज्याला ( दृश्य जगत् ) कार्य म्हणतो तें मार्क्सच्या दृष्टीनें कारण ठरतें. याप्रमाणें हेगेलची विरोधविकासाची कल्पना 'खालीं डोकें वर पाय!' करून उभी होती. मार्क्सनें खालचा भाग खालीं वरचा भाग वर करून तिला नीट आपल्या पायावर उभी केली. एंजल्स लिहितो "मार्क्स व मी असे आम्ही दोघेच काय ते होतो कीं, ज्यांनीं संकल्पवादाच्या गळाठ्यांतून बुद्धीस पटणाऱ्या विरोधविकासाचें रक्षण केलें. हेगेलियन संकल्पवादाचेंही स्वरूप आम्हीं बदलून टाकलें व विश्वाची निर्मिति प्रकृतीपासूनच झालेली आहे, असें आम्ही सिद्ध केलें. निसर्गानें आणि त्याचप्रमाणें अर्वाचीन भौतिक शास्त्रांनींही विरोधविकासवादाला पुष्टि दिली आहे. रोजच्या रोज पुढें येणाऱ्या

पुराव्यावरूनही निसर्गातील विरोधविकासपद्धतीनें होणाऱ्या घटनांच्या मुळाशीं आत्मतत्त्व कारण नसून भौतिक विश्वच कारण आहे, हेंच सिद्ध झालें आहे. ''

कार्ल मार्क्स भौतिकवादी होता तरी अठराव्या शतकांतील भौतिकवाद्यांचीं एकांतिक मतें त्याला मान्य नव्हतीं. सर्व विश्वाच्या मुळाशीं जड प्रकृति आहे. या प्रकृतींतील अनेक द्रव्यांच्या व गुणांच्या संघातानेंच विश्वाची उभारणी झाली आहे, असें या एकांतिक जडवाद्यांचें म्हणणें आहे. आत्मा व मन हींसुद्धा या जड प्रकृतींतूनच निर्माण झालीं आहेत, त्यांना स्वतंत्र अस्तित्व नाहीं. मेंदूचें कार्य सुरू झालें कीं, आत्म्याची निर्मिति होते. मेंदूचें कार्य बंद पडलें कीं, आत्म्याच्याही नाड्या बंद पडतात व तोही नष्ट होतो,[१] असा डिडेरॉट वगैरे कट्टर भौतिकवाद्यांचा सिद्धांत आहे. उलटपक्षीं जगत् असें वास्तविक कांहीं नाहींच. परब्रह्माच्या अज्ञानामुळें तें आपल्याला भासतें. तें असत्, जड व नाशिवंत आहे. रज्जूवर सर्पाचा भास झाला म्हणजे मनुष्याच्या अंगावर भीतीनें शहारे उत्पन्न होतात. दृश्य जगत् हें त्याप्रमाणेंच अज्ञानजनित आहे. जें कांहीं आहे तें सच्चिदानंदस्वरूप असें परब्रह्म आहे. तें दिक्कालाद्यनवच्छिन्न आहे.

---

१ एका फ्रेंच शास्त्रज्ञानें कोंबड्याच्या पिलांचे मेंदू हळूं हळूं बाहेर काढून टाकले व त्या पिलांतील आत्म्याचा नाश करून टाकला आहे, असें सिद्ध करून दाखविलें. या शास्त्रज्ञानें त्या पिलांतील आत्म्याचा नाश करून त्यांना अशा एका अवस्थेला पोंचविलें कीं, क्षुधा, तृषा इ. पूर्ण करण्याची किंवा भयनिवृत्त होण्याची इच्छा दर्शविण्याचें सामान्य मानसिक कार्यसुद्धां हीं पिलें करूं शकत नव्हती. तथापि या प्रयोगानें पिलांतील प्राणज्योति मात्र नष्ट झालेली नव्हती. यापेक्षांही अधिक महत्त्वाची गोष्ट म्हणजे ज्या पिलांवर असे प्रयोग करण्यांत आले होते त्या पिलांचें वजनही वाढलेलें दिसून आलें व या प्राण्यांमधील जीवनशक्ति व वनस्पतीमधील जीवनशक्ति यांत कांहींच फरक नाहीं, असेंही आढळून आलें. ज्या ठिकाणीं ठेवावीं त्याच ठिकाणीं तीं बसून राहात. स्वयंस्फूर्तीनें होणारी त्यांची हालचाल बंद झाली होती व अशा रीतीनें वनस्पतींच्या योनींत तीं समाविष्ट झालीं होतीं. प्रकृतीचा त्याग करून आत्मा स्वतंत्र राहूं शकत नाहीं. आत्म्याला स्वतंत्र असें अस्तित्वच नाहीं. त्याचें अस्तित्व सर्वस्वीं प्रकृतीवरच अवलंबून आहे, हें सिद्ध करण्यास वरील उदाहरणापेक्षां जास्त सबळ पुरावा आणखी कशाला पाहिजे ?

तसच बाह्य, दृश्य, जड विश्व तोंपर्यंतच अस्तित्वांत आहे कीं, जोंपर्यंत आपला आत्मा त्याची प्रतीति करून देत आहे. आपण आहों तर जग आहे, नाहीं तर तें अस्तित्वांतच नाहीं. आपला डोळा घर दाखवितो म्हणून घर आहे, नाहीं तर घर असें कांहीं नाहींच, असें शंकराचार्य व फिश्टे वगैरे कट्टर आत्मवादी–किंवा कल्पनावादी–तत्त्ववेत्त्यांचें म्हणणें आहे. कट्टर जडवादी जड प्रकृतीलाच प्राधान्य देतात तर कट्टर आत्मवादी जें कांहीं आहे तें आत्मरूपच आहे, नामरूप हा केवळ भास आहे. याच्या मागें ब्रह्मचैतन्याचीच सत्ता आहे, असें म्हणतात. अशा रीतीनें हे दोन्ही तत्त्ववेत्ते दोन टोकांवर उभे राहून विश्वउभारणीचा विचार करतात. डार्विनच्या अनुयायांना व कार्ल मार्क्स, एंजल्स वगैरे एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धातील भौतिकवाद्यांना या दोन्हीं पक्षांचीं हीं एकांतिक व कट्टर मतें मान्य नाहींत. आत्मा म्हणून कांहीं तरी चीज आहे, ती विश्वातीत आहे व सर्व विश्व हें त्या वस्तूचेंच स्वरूप आहे, असलें बुद्धीला न पटणारें व तिला अधिकच घोटाळ्यांत घालणारें आत्मवादी मत मार्क्स व एंजल्स वगैरेंना मान्य नाहीं. पण त्याबरोबरच प्रकृति ही केवळ मृत व अचेतन आहे, असेंही मानावयास ते तयार नाहींत. अखिल जगाचें मूलकारण "गतियुक्त प्रकृति" आहे, असें ते प्रतिपादन करतात.

मनुष्याचा आत्मा स्वतंत्र असा पदार्थ किंवा शक्ति नाहीं. तो देहाशींच पूर्णपणें संबद्ध आहे. ज्या नैसर्गिक कायद्यानें शरीराचे व्यवहार चालतात त्याच कायद्यांनीं तोही बद्ध झाला आहे. नैसर्गिक कायदे या आत्म्याला तोडतां येत नाहींत. दैवी चमत्काराला निसर्गात स्थळ नाहीं. देह आहे तर आत्मा आहे आणि आत्मा आहे तर देह आहे. ते दोन्हीही एकरूपच आहेत. पूर्वी ज्याप्रमाणें आपण विचार करीत होतों त्याप्रमाणें आपण आतां विचार करीत नसलों तर त्याचें कारण असें कीं, आपल्या मेंदूतील जीवाणूंच्या घटकांतच फरक झालेला असतो. बाहेरच्या निकटवर्ती परिस्थितीचीं व निर्वाहाचीं जीं साधनें प्रचलित असतील त्यांचा आपल्या मेंदूवर जसजसा बरावाईट परिणाम होतो तसतशी आपल्या विचारांतही क्रांति घडून येते. चेतना व जडता हीं विश्ववस्तूचीं दोन अंगें आहेत. प्रकृति म्हणून कोणी अशी स्वतंत्र वस्तु नाहीं किंवा आत्मशक्ति म्हणूनसुद्धां कोणी स्वतंत्र वस्तु

नाहीं, हीं दोन्हींही एकरूपच आहेत. एकाशिवाय दुसरी असूंच शकत नाहीं, हा सिद्धांत बहुतेक सुप्रसिद्ध निसर्गशास्त्रज्ञांना आतां मान्य झाला आहे. डार्विन व त्याचे अनुयायी यानीं केलेल्या प्रयोगांमुळें तर या सिद्धांताला अलीकडे पुष्टि मिळाली आहे. विशेषतः अर्न्स्ट हेकेल यानें या सिद्धांताची शास्त्रीयदृष्ट्या मांडणी केली आहे. एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात या कल्पनेला शास्त्रीय स्वरूप मिळालें असलें व हा सिद्धांत निसर्गशास्त्रज्ञाना मान्य झाला असला तरी याची मूळ कल्पना सतराव्या शतकांतच स्पिनोझानें काढली होती, हें लक्षात ठेवण्यासारखें आहे. निसर्ग व ईशशक्ति हीं दोन्हींही एकरूपच आहेत. ज्या ठिकाणीं ईश्वर आहे त्या ठिकाणीं निसर्ग आहे. जें जें भौतिक आहे तें तें सर्व एकसमयावच्छेदेकरून आत्मिकही आहे, असें स्पिनोझाचें मत होतें. स्पिनोझा व एकोणिसाव्या शतकातील मार्क्स वगैरे प्रकृतिवादी यांच्यांत फरक एवढाच कीं, स्पिनोझा ज्या शक्तीला 'ईश्वर' या नावानें संबोधितो तिला प्रकृतिवादी ईशसंज्ञेनें संबोधीत नाहींत. ईश्वर, देव या शब्दानें सत्ताधीशत्वाची, चमत्कारपूर्ण गूढत्वाची व अज्ञेयत्वाची जी कल्पना येते ती या अर्वाचीन प्रकृतिवाद्याना मुळींच मान्य नाहीं. निसर्ग व ईश्वर एकच आहे म्हणावयाचे तर त्याला ईश्वर या संज्ञेनें संबोधण्याचें कांहींच कारण नाहीं, असें यांचें म्हणणें आहे. शिवाय स्पिनोझा ज्याला 'अज्ञात वस्तु' म्हणतो व ज्याच्यामध्यें प्रकृति व चैतन्य, देह व आत्मा या दोन्हींचाही समावेश झाला आहे असें सांगतो त्या वस्तूला प्रकृतिवादी 'विश्ववस्तु' या नांवानें संबोधितात. "स्पिनोझा ज्याला ईश्वर असें नाव देतो त्याचें पृथक्करण केल्यास निसर्गाशिवाय त्यांत दुसरें काहींही सांपडणार नाहीं. स्पिनोझाचें तत्त्वज्ञान जरी ईश्वरवादी होतें तरी प्रकृतीचेंही अस्तित्व त्यानें प्रतिपादन केलेलें असल्यामुळें मार्क्स व एंजल्स यांना तें मान्य झालें होतें," असें लडविक फोरबॅक यानें म्हटलें आहे. लडविक फोरबॅक याच्या म्हणण्याप्रमाणें या कल्पनेंत योग्य तो फेरफार करून तिचा त्यानीं स्वीकारही केला होता. सर्व गुणयुक्त निसर्गाला ईश्वराची संज्ञा देऊन स्पिनोझानें देवाचें जें महत्त्व वाढविलें होतें तेवढें मात्र मार्क्स व एंजल्स याना पसंत नव्हतें. "सर्व गुणयुक्त प्रकृति" हीच अखिल विश्वाच्या मुळाशीं आहे. या "विश्ववस्तूचा"

विकास म्हणजेच हें चराचर विश्व होय; आणि हा विकाससुद्धां विरोध-विकासन्यायानेंच होतो," असा मार्क्सचा सिद्धांत आहे. स्पिनोझाचें तत्वज्ञान जीवंत होतें म्हणजे प्रकृतीचेंही अस्तित्व त्यानें मान्य केलें होतें. त्याला मार्क्स व एंजल्स यांनीं विरोधविकासाचा अलंकार चढवून सुशोभित केलें व अर्वाचीन भौतिक युगात तें लोकप्रिय करून सोडलें. ऐतिहासिक घटनांचे कार्यकारण संबंध प्रकृतिवादाच्या दृष्टीनें लावून दाखविण्याच्या कार्मीही या पद्धतींचा त्यांनीं फार उपयोग केला. विरोधविकास-पद्धति हेगेलकडून आत्मसात् केल्यावर सामाजिक घटनाचे कार्यकारणसंबंध उकलून दाखविण्याचें पुढील कार्य मार्क्सनें केलें आहे व विरोधविकासात्मक सामाजिक घटनेचे नियमही त्यानेंच शोधून काढले आहेत.

# ऐतिहासिक प्रकृतिवाद

मानवी समाजात आजवर ज्या अनेक घडामोडी झाल्या, ज्या अनेक संस्था निर्माण झाल्या, धर्म स्थापण्यात आले व कायदे करण्यात आले त्या सर्वांची संगतवार मांडणी म्हणजेच इतिहास होय. पण या सर्व घटना कसकशा घडून आल्या, हे मांडून दाखविण्यानेंच मात्र इतिहासाचें कार्य संपत नाहीं. या घटना कां घडून आल्या, त्यांचीं कारणें काय, हेंही सांगण्यात आलें पाहिजे. ऐतिहासिक मांडणीचें कार्य तेव्हाच पूर्ण झालें, असें म्हणता येईल. पृथ्वीच्या अमुक भागावर अमुक राजांनीं राज्य केले, अमक्याच्या मुलखावर तमक्यानें स्वारी केली, अमक्या राजाने तमक्याला ठार केलें, अमक्यानें तमक्याचा मुलूख बळकावला. अमक्या राजवंशाची सत्ता अमक्या मुलखावर अमुक इतकीं वर्षें होती, याचीं वर्णनें करणें म्हणजे इतिहासकथन होय, अशी आजपर्यंतची समजूत होती. पण ही समजूत आता बदलली आहे. ऐतिहासिक घटनेकडे मनुष्य आता शास्त्रीय दृष्टीने पाहूं लागला आहे. इतिहास हें एक शास्त्र बनलें आहे. अमक्या राजानें किंवा राजवंशानें अमुक एका मुलखावर अमुक इतकीं वर्षे राज्य केलें हा इतिहासशास्त्रांतील एक गौण प्रश्न आहे. मानवी समाजाच्या अनेक स्थित्यंतराच्या कालांत कोणता राजवंश सत्ताधीश होता, कोणता सत्ताधीश नव्हता, हा प्रश्न महत्त्वाचा नसून त्या वेळच्या समाजांत कोणत्या कल्पना वावरत होत्या, समाजाची संस्कृति कशा प्रकारची होती, समाजाची आर्थिक परिस्थिति कशा प्रकारची होती, सामाजिक स्थित्यंतराबरोबर समाजाच्या मानसिक जगांतही कशी स्थित्यंतरें घडून आलीं, याचा विचार करणेंच अत्यंत महत्त्वाचें आहे. ही कारणपरंपरा शोधून काढणे व तिची व्यवस्थित मांडणी करणें म्हणजेच इतिहासशास्त्र होय.

प्रत्येक सामाजिक घटना म्हणजे त्या त्या कालीं समाजांत प्रचलित असलेल्या कल्पनांचाच परिणाम होय. समाजाच्या मनात वावरत असलेल्या इच्छाच अशा घटनेच्या रूपानें नेहमी प्रकट होत असतात. धर्म, नीति, चालीरीति, न्यायाच्या कल्पना, राज्यव्यवस्था, कायदा इ. सर्व घटनांचें

स्वरूपें समाजाच्या इच्छांनुसार व कल्पनांनुसारच निश्चित होत असतात. ' जसे लोक तशी राज्यव्यवस्था, ' ही सामान्य म्हणही वरील कल्पनेचीच द्योतक आहे. रानटी लोकांचा धर्म, त्यांच्या नीतिकल्पना, त्यांच्या चालीरीति, यांच्यांत व सुधारलेल्या लोकांचा धर्म, नीति, चालीरीति, वगैरेंत जो फरक आढळून येतो, त्याचेंही कारण हेंच आहे. रानटी लोकांचें सगळेंच रानटी, सुधारलेल्या लोकांचें सगळेंच सुधारलेलें. रानटी व सुधारलेल्या लोकांच्या सर्वच अंतर्बाह्य व्यवहारांत अशा रीतीनें फरक आढळून येतो. समाज रानटी असो वा सुधारलेला असो, धर्म, नीति, राज्यव्यवस्था वगैरे सामाजिक संस्थांच्या मुळाशीं असलेल्या सामाजिक ध्येयकल्पनांनींच हे सर्व फरक घडून येतात. पण समाज म्हणजे तरी काय ? एक एक व्यक्ति मिळूनच समाज होतो. सामाजिक इच्छा म्हणजे तरी काय ? व्यक्तींच्या इच्छांच्या एकीकरणांतूनच सामाजिक इच्छा निर्माण होतात.

आत्मा म्हणून कांहीं तरी एक स्वतंत्र शक्ति आहे. बाह्य जगावर या अंतर्गत शक्तीची सत्ता चालू आहे, या शक्तीच्या प्रेरणेनेंच मनुष्याचे सर्व व्यवहार चालू आहेत, अशी समजूत जोंपर्यंत अस्तित्वांत होती तोंपर्यंत सर्व ऐतिहासिक प्रगति व सर्व सामाजिक घटना केवळ आत्म्याच्याच कृपेनें घडून येतात व समाजाची जी ध्येयें निश्चित होतात तीही या आत्मशक्तीच्याच कृपेचीं फलें होत, असें साहजिकच मानलें जात होतें. ' सत्यं वद, ' ' धर्मं चर ' यांसारख्या वैदिक आज्ञा किंवा ' आपल्यासारखेंच तूं दुसऱ्यावरही प्रेम कर. ' या बायबलांतील आज्ञासुद्धां आत्मिक शक्तीच्या प्रेरणेनेंच दिल्या गेल्या आहेत. मनुष्य हा परमेश्वराचा अंश आहे. ब्रह्मदेवाच्या सृष्टींत जें जें उत्तम आहे त्याचीच तो मूर्ति आहे. मनुष्य हा स्वभावतःच प्रेमळ व दयाळू असल्यामुळें वरील आज्ञा म्हणजे त्याच्या आत्मस्फूर्तीचे उद्गार होत. धर्माच्या व नीतीच्या कल्पना मानवी अंतःकरणात वसत असलेल्या ईश्वराच्या इच्छेमुळेंच प्रचलित झाल्या. त्याचप्रमाणें चालीरीति, कायदा, राज्यव्यवस्था, हे सर्व त्या आत्मशक्तीचेच खेळ आहेत. मनुष्यांत वसत असलेली ही आत्मशक्ति, सर्व विश्वांत प्रेम, समता, स्वातंत्र्य प्रस्थापित करण्याचा सारखा प्रयत्न करीत आहे. मनुष्याच्या ठिकाणीं दैवी गुणांचा स्वाभावि-

कच वास असून पृथ्वीवर देवांचें राज्य प्रस्थापित करण्याचा, पृथ्वीलाच स्वर्ग बनविण्याचा मनुष्याचा प्रयत्न म्हणजेच मानवी समाजात वेळोवेळीं प्रचलित असलेले धर्म, नीति, कायदे, न्यायपद्धति होत, असें आत्मवादी इतिहासशास्त्रज्ञांचें म्हणणें असतें.

या सामाजिक घटनांकडे पाहण्याची प्रकृतिवादी लोकाची दृष्टि निराळी आहे. विश्वाकडे किंवा विश्वांतील व्यवहाराकडे ते आत्मिक दृष्टीनें पाहात नाहीत. या सर्व व्यवहारांत परमेश्वराचा किंवा त्याच्या शक्तीचा काहीं तरी संबंध आहे, असें त्यांना वाटत नाहीं. सर्व मानवी संस्थात व कल्पनात जे फेरबदल घडून येतात त्यांस त्या समाजाच्या भोंवतालची परिस्थिति कारणीभूत झाली आहे, असें त्याचे मत आहे. मनुष्य काय किंवा मनुष्य-जात काय एका विशिष्ट दृष्टीनेंच विचार करते, असें म्हणतां येत नाहीं. मनुष्य जो विचार करतो तो कोणत्या तरी आत्मशक्तीच्या प्रेरणेनें करतो असे नाहीं. निरनिराळीं माणसें निरनिराळ्या दृष्टीनें विचार करतात. एकाचा विचार दुसऱ्यांशीं जुळत नाहीं; याचें कारण हें कीं, या निरनिराळ्या लोकाची भोवतालची परिस्थिति निरनिराळ्या प्रकारची असते. अमुक एका हवेंत किंवा अमुक एका प्रदेशात माणसे अमुक एकाच दृष्टीनें विचार करतात, असें आढळून येत नाहीं. एकाच हवेतील व एकाच देशातील माणसें भिन्न भिन्न दृष्टीनें आपल्या जीवनाचा विचार करतात. बाह्य घट-नांचा मनुष्याच्या मेंदूवर जसजसा बरावाईट परिणाम घडून येतो तसतसा मनुष्य भिन्न भिन्न दृष्टीनें विचार करतो. व्यक्तीनें स्वतंत्र विचाराच्या कितीही गमजा मारल्या तरी आपल्या भोंवतालच्या विचारकक्षेच्या बाहेर तो जाऊं शकत नाहीं. पक्षी कितीही उंच उडाला किंवा विमा नांनीं गगनाचें चुंबन घेण्याचा कितीही प्रयत्न केला तरी पृथ्वीच्या आक-र्षणकक्षेच्या बाहेर तीं कशीं जाऊं शकणार! व्यक्ति स्वतंत्रपणें विचार करूं शकते पण तिचें स्वातंत्र्य मर्यादित असतें.

व्यक्तीचा समूह म्हणजेच समाज. अनेक व्यक्तींच्या एकवटलेल्या इच्छा म्हणजेच समाजाच्या इच्छा होत, असें आत्मवादी म्हणत असतात खरें, परंतु समाज म्हणजे केवळ व्यक्तींचाच समूह नव्हे. अनेक तुकाराम व अनेक ग्यानबा यांची बेरीज म्हणजे काहीं समाज नव्हे. अनेक घटकाच्या

संमीलनानें समाज बनतो, हें खरें असलें तरी या सम्मीलनांत एक विशिष्ट प्रकारची पद्धति दिसून येते. समाज हा एखाद्या यंत्रासारखा आहे. समाजाचें हें यंत्र साधें नसून अत्यंत भानगडीचें आहे. यंत्राचे सर्व भाग एकत्र आणून त्याचा ढीग रचून ठेवल्यानें यंत्र तयार होत नाहीं. कांहीं तरी विशिष्ट पद्धतीनें त्याची जळणी करावी लागते. आपण घड्याळाचेंच उदाहरण घ्या. या घड्याळांतील सारीं चक्रें, स्क्रू व इतर लहानसहान भाग यांचा केवळ ढीग रचून ठेवल्यानें घड्याळ बनणार नाहीं. कांहीं विशिष्ट कुशलतेनें व पद्धतीनें घड्याळांतील या भिन्न भिन्न भागांची रचना करावी तेव्हांच घड्याळ तयार होतें व वेळ देण्याचें आपलें काम करूं लागतें. समाजाचें तसेंच आहे. समाज व्यक्तींचाच बनलेला असतो पण या व्यक्ति आपापलीं विशिष्ट कामें, विशिष्ट वेळीं करणार नाहींत तर समाजाचें अस्तित्वच नष्ट होईल. भंग्यांनीं व झाडूवाल्यांनीं संप केला तर शहरांत राहणें मुष्किलीचें होऊन जातें. गाडीवाल्यांनीं व टांगेवाल्यांनीं संप केल्याबरोबर शहरांतील लोकांचे सर्व व्यवहारच बंद पडतात. रेल्वेवरील कामगार आपापल्या जागेवर राहून दक्षपणें काम बजावणार नाहींत तर रेल्वेचें काम क्षणभरही चालणें शक्य होणार नाहीं. सर्व कामगारानीं एकजुटीनें व दक्षतेनें आपापलीं कर्तव्यें बजावलीं पाहिजेत तरच रेल्वेचें काम व्यवस्थित चालूं शकेल. पृथ्वीवरील आजच्या मानवी समाजाचे सर्व व्यवहार असेच चालू आहेत. या समाजांत निरनिराळे धंदे करणारे निरनिराळे मानवसंघ बनले आहेत. हे संघ आपापल्या वाट्यास आलेलीं कामें करीत आहेत. या संघांच्या वर्तनाचा परस्परांवर भिन्न भिन्न परिणाम होत आहे. समाजांतील संघांचा जसा परस्परांवर परिणाम होत आहे तसाच या संघांतील व्यक्तींच्या वर्तनाचाही परस्परांवर परिणाम होत आहे. "मनुष्य हा सामाजिक प्राणी आहे." म्हणजे समाज करून राहणारा प्राणी आहे. समाजाच्या बाहेर तो कधींही राहूं शकत नाहीं. अगदी प्राचीनकाळी मनुष्य कसा राहात असेल याचा विचार केला तर इतर कळप करून राहाणाऱ्या प्राण्याप्रमाणें मनुष्यही कळप करूनच राहात होता, असें आढळून येईल. मनुष्याच्या आकाराचे प्राणी भिन्न भिन्न ठिकाणीं निर्माण झाले ते एकाकीच निरनिराळ्या ठिकाणीं राहात होते. पण पुढें एके दिवशीं आपण सर्वांनीं एकत्र राहावें, अशी सुंदर

कल्पना त्यांच्या डोक्यांत आली व तिच्यासंबंधानें या लोकांत वाटाघाट होऊन मग ते एकत्र राहूं लागले, ही कल्पना चुकीची आहे. माणसें एके-ठिकाणीं राहिल्याशिवाय व परस्परांशीं बोलण्याचा प्रयत्न केल्याशिवाय भाषा निर्माण झाली व तिची वाढ झाली, हें म्हणणें जितकें खुळचटपणाचें होईल, तितकेंच मनुष्य समाजाव्यतिरिक्त स्वतंत्रपणें राहूं लागला व वाढूं लागला हें म्हणणेंही खुळचटपणाचें होईल. मनुष्य स्वभावतःच सामाजिक प्राणी आहे. परस्परांच्या संमतीनें किंवा करारानें तो एकत्र राहूं लागला नाहीं. मनुष्य समाज करून राहूं लागला यांचें कारण जीवननिर्वाहाकरितां बाह्य निसर्गाशी व्यक्तिशः झगडणें त्याला अशक्य होतें व सामुदायिक श्रमाच्या ( व्यवहाराच्या ) साहाय्यानेंच त्याला जिवंत राहणें शक्य होतें. सामुदायिक श्रम करण्याची आवश्यकता व त्यांत भाग घेण्याचें व्यक्तीचें सामर्थ्य हाच व्यक्ति व समाज यांमधील व व्यक्तीव्यक्तींमधील संबंधाचा, बंधनाचा व सहकार्याचा दुवा आहे. मनुष्य सामाजिक प्राणी असल्यामुळें त्याच्या सभोंवतालची परिस्थिति म्हणजे त्याच्या सभोंवती असलेला समाजच होय. अर्थात् सभोंवतालच्या समाजांत जशा प्रकारची विचारसरणी प्रचलित असते तिचाच परिणाम त्या व्यक्तीवरही झालेला असतो. कुटुंबांत, गल्लींत, शाळेंत, मनुष्याचें शिक्षण सारखें चालू असतें. आपल्या भोंवतालच्या मंडळींत जी भाषा प्रचलित असेल तीच भाषा तो बोलत असतो, त्याचे वाडवडील ज्या संस्कृतींत वाढले तीच संस्कृति त्यालाही मान्य होते, ज्या चालीरीति त्याच्या भोंवतालच्या समाजांत रूढ असतात त्याच त्याला आवडूं लागतात. क्षणोंक्षणीं त्याच्या भोंवतालच्या परिस्थितीचा त्याच्यावर सारखा परिणाम होत असतो. स्पंजाप्रमाणें नवीन नवीन अनुभवांचा तो सांठा करीत असतो. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे प्रत्येक व्यक्ति ही समाजांत प्रचलित असलेल्या विचारांचें व संस्कृतीचें प्रतिबिंबच होय. एकादें विशिष्ट काम करणारी किंवा एकाद्या विशिष्ट जागेवर असलेली व्यक्ति समाजात क्रांति घडून येईल असें कृत्य करतें, असें आढळून येतें. पण हें कृत्यसुद्धां समाजांत ज्याची कधी कल्पनाही आलेली नाही, असें असूं शकत नाहीं. एकादा संशोधक एकादें नवीन यंत्र शोधून काढतो. पण तें शोधून काढतांना पूर्वींच्या सर्व शास्त्रज्ञांचा अनुभव त्याला जमेस

धरावा लागतो व प्रत्यक्ष प्रचारांत असलेल्या यंत्रांचीं मूलतत्त्वेंही त्याला लक्षांत घ्यावीं लागतात. लष्करात सेनापतीचें व त्याच्या भोवतालच्या मंडळाचें विशेष महत्त्व असतें हें खरें आहे. सेनापतिमंडळांतील हीं माणसें अवघीं हाताच्या बोटावर मोजण्याइतकीं थोडी असतात आणि लष्करांतील शिपायांची संख्या तर लाख दसलाखांवर असते. या परिस्थितींत सेनापतिमंडळाचें किती महत्त्व असतें, हें सांगावयास पाहिजे असें नाहीं. शत्रूनें जर या सेनापतिमंडळाचा पाडाव केला तर प्रसंगोपात्त या सर्व लष्कराचा पराभव व नाश होण्याचाही संभव असतो. उलट या मंडळाचीं सर्व धोरणें यशस्वी झालीं व त्यांनीं केलेले सर्व अंदाज खरे ठरले तर हें सेनापतिमंडळ राष्ट्रेंच्या राष्ट्रें पादाक्रांत करतें व क्रांति घडवून आणतें. पण हें सेनापतिमंडळ म्हणजे तरी काय असतें ! टेलिफोनच्या सर्वत्र पसरलेल्या तारा, मिनिटामिनिटाला रणक्षेत्रांतील भिन्न भिन्न भागांतून निरोप पोंचविणारें निरोप्यांचें दल, त्यांनीं काढलेले जाहीरनामे व हुकूम व ते मानणारे सैनिक, त्याच्याजवळ असलेले नकाशे व लष्करांत ठेवण्यांत आलेली शिस्त इत्यादि सर्व गोष्टींचें अस्तित्व नसेल तर सेनापतिमंडळाला कोणी विचारणार नाहीं. व्यक्तिशः या मंडळांतील लोक कितीही हुशार व कर्तृत्ववान् असले तरी त्यांच्या मागें संघटनेचें, शिस्तीचें व लष्करांतील शिपायांच्या आज्ञाधारकत्वाचें बल नसेल तर त्याचा कांहीं उपयोग होणार नाहीं. समाजांत ज्यांना पुढारी मानण्यांत येतें–विशेषतः राजकीय पुढारी मानण्यांत येतें– त्यांचें महत्त्वही त्याच्या पाठीमागें असलेल्या संघशक्तीवरच अवलंबून असतें. राजकीय पुढारी म्हणून जे लोक पुढें आलेले असतात तेसुद्धां राजकीय असंतोषाच्या परिस्थितीमुळें व आर्थिक घडामोडीमुळेंच पुढें आलेले असतात. तसेंच संशोधक, विद्वान् वगैरे असामान्य लोकांच्या गुणांचा विकास होण्यास व त्यांच्या गुणांचा समाजास उपयोग व्हावयाचा असल्यास त्यांच्या गुणांना पोषक अशी सामाजिक परिस्थितीही निर्माण व्हावी लागते. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे व्यक्ति ही समाजाचें बालक आहे. व्यक्तीमध्यें अनेक गुणधर्म उत्पन्न होण्यास व त्यांचा विकास होण्यास समाजच कारणीभूत होत असतो. पृथ्वीच्या पाठीवर मानवयोनीची उत्पत्ति झाली ती कोठें तरी एकाच प्रदेशांत किंवा एकाच ठिकाणीं झाली, असें म्हणतां येत

नाहीं. मानवप्राण्याचे समूह पृथ्वीवर निरनिराळ्या प्रदेशात उत्पन्न झाले व त्या त्या ठिकाणीं निसर्गाशीं झगडा करीत जिवंत राहिले व वाढूंही लागले. पृथ्वीच्या पाटीवर उत्पन्न झालेल्या अनेक प्राणियोनीप्रमाणेंच मानवप्राण्याचीही एक योनी आहे. जिवंत राहावें व प्रजावृद्धि करावी, हा इतर प्राणियोनींचा जसा स्वाभाविक धर्म असलेला दिसतो त्याच निसर्ग-धर्माला अनुसरून मनुष्यप्राणी जिवंत राहूं लागला व प्रजावृद्धीही करूं लागला. हे मानवसमूह पृथ्वीवर निरनिराळ्या प्रदेशात राहूं लागले व पर्वत, नद्या, समुद्र हे आडवे आल्यामुळें या समूहाची त्या त्या भौगोलिक मर्यादेंत स्वतंत्रपणे वाढ होऊ लागली. हे अडथळे दूर करण्याची त्याच्या ठिकाणीं साहजिकच ताकद नव्हती. या समूहांचा कधीं काळीं यदृच्छेने सहज संबंध घडून आला तर तो फारच क्वचित् प्रसंगी घडून येत असे. या निरनिराळ्या ठिकाणी राहणाऱ्या समाजात संस्कृतिविषयक भिन्न भिन्न कल्पना उत्पन्न झाल्या.

मनुष्याला निसर्गानेंच जन्म दिलेला आहे. म्हणूनच निसर्गात उत्पन्न होणाऱ्या वस्तूंवर त्याला उदरनिर्वाह करावा लागतो. आणि ही जीवननिर्वाहाचीं साधनें जसजशी भिन्न भिन्न प्रकारची असतील त्या त्या प्रमाणें मनुष्याच्या स्वभावांत व त्याच्या राहणीच्या कल्पनेंत फरक होतो. मनुष्य हा कोणी निसर्गश्रेष्ठ प्राणी नव्हे की, त्याला निसर्गातीत होऊन जिवंत राहतां येईल. मनुष्य निसर्गाला आपल्या स्वाधीन करूं शकतो पण हेंसुद्धां निसर्गाचे कायदे लक्षांत घेऊनच त्याला करावें लागतें. निसर्गाशीं झगडताना मनुष्याला निसर्गाच्या कायद्यांचाच उपयोग करावा लागतो. बाष्प, विद्युत्, आकर्षण इ. शक्तीचा उपयोग करूनच मनुष्याला निसर्गाशीं टक्कर देतां येते. अशा परिस्थितीत मनुष्य व निसर्गशक्ति याची फारकत करून चालत नाहीं. मनुष्याच्या सर्व व्यवहारांवर निसर्गाचा सारखा परिणाम होत असतो. शीत, ऊष्ण व समशीतोष्ण अशी निरनिराळ्या प्रकारची हवा, डोंगर, टेंकड्या, नद्या, दऱ्या, यांनी व्यात असलेले प्रदेश, भिन्नभिन्न प्रदेशांत उत्पन्न होणाऱ्या भिन्नभिन्न वनस्पति, निरनिराळ्या प्रदेशांत निरनिराळ्या प्रमाणांत सांपडणारी खनिज द्रव्यें, निरनिराळ्या प्रदेशात मनुष्याला खाण्याला योग्य असे निरनिराळ्या प्रमाणांत सांपडणारे प्राणी, या सर्वांचा मनुष्याच्या

स्वभावावर भिन्नभिन्न प्रकारचा परिणाम घडून येतो. देवमासे व मासे जमिनीवर सांपडत नाहींत. खडकाळ टेकडयांवर शेतकीचा धंदा करतां येत नाहीं. वालुकामय अरण्यांत फलमूलें देणाऱ्या वनस्पति व वृक्ष निर्माण होत नाहींत. थंड प्रदेशांत व थंडीच्या दिवसांत तंबूमध्यें माणसाला राहणें शक्य नाहीं. भूमीमध्यें धातु व रत्नें नसतील तर स्वर्गांतून तीं खालीं पाडतां यावयाचीं नाहीत.

मनुष्य निसर्गाशीं झगडतो व आपलीं उदरनिर्वाहाचीं साधनें व आपल्याला लागणाऱ्या वस्तु मिळवितो. निसर्ग व मनुष्य यांचा संबंध जुळविणारा सामुदायिक श्रमशक्ति हा एक दुवा आहे. या श्रमशक्तीचें प्रमाण जसजसें वाढत जातें तसतसा समाजाचा जास्त जास्त विकास झालेला आढळून येतो. मानवी प्रजा जिवंत राखण्यास व तिची वृद्धि करण्यास निसर्गाशीं झगडणारी ही श्रमशक्तीच कारणीभूत झालेली आहे. समजा, एकाद्या दिवशीं माणसांनी श्रम करण्याचें बंद केलें तर कारखाने, यंत्रागारें, खाणी, रेल्वे, शेतें, जंगलें, जमीन, समुद्र वगैरेंवर होणारे सर्व व्यवहार बंद पडतील आणि मानवसमाज एक आठवडादेखील आपली उपजीविका चालवूं शकणार नाहीं. मनुष्याला जगावयाचें असेल तर त्याला आपल्या उपजीविकेचीं साधनें उत्पन्न करावीं लागतात. तीं भिन्न भिन्न देशांतून आणावीं लागतात आणि सर्वांच्या गरजा पुरवाव्या लागतात. हें सर्व करतांना मनुष्याला आपल्या हातापायांचा व बुद्धिशक्तीचाही उपयोग करावा लागतो. शारीरिक श्रम व बौद्धिक श्रम यांत वास्तविक कांहींच फरक नाहीं. बुद्धि हें मेंदूचें कार्य आहे आणि शरीराच्या इतर अवयवांप्रमाणें मेंदू हा एक अवयवच आहे. जीवनकलहांत श्रमशक्तीचा उपयोग करावयाचा तर तो स्वतंत्रपणें, एकाकी राहून मनुष्याला कधीही करतां यावयाचा नाहीं. जीवनकलहार्थ चालू असलेल्या कामाची वांटणी समाजाला करावी लागते. हा श्रमविभाग जितका चोख, कर्तृत्वपूर्ण व मनुष्यस्वभावाला ओळखून झालेला असतो तितका तितका तो समाज अधिक विकसित, अधिक संस्कृत व अधिक सुधारलेला आहे, असें दिसून येतें. समाजाचा हा विकास कसा होतो, त्याचीं भौतिक व आर्थिक कारणें काय आहेत याचाच शोध कार्ल मार्क्सनें लावला आहे.

सजीव प्राण्याचा विकास कसकसा होत गेला याचे कायदे डार्विननें शोधून काढले. या शोधाबद्दल डार्विनचें नांव ज्याप्रमाणें अजरामर झालें आहे त्याचप्रमाणें मनुष्याच्या सामाजिक विकासाचे नियम शोधून काढल्याबद्दल मार्क्सचें नांवही आज अजरामर झालें आहे. सर्व सजीव प्राणी आपल्या भोंवतालच्या निसर्गाशीं तादात्म्य पावतात. हें कार्य कोणत्याही आत्मशक्तीच्या किंवा देवतांच्या कृपेनें होत नसून निसर्गांतच वावरणाऱ्या भौतिक शक्तीच्या साहाय्यानें होत असतें. भिन्नतेनें व्याप्त असलेल्या निसर्गांत जी "एकत्वाची संवेदना" दिसून येते, ती कोणाही दैवी शक्तीच्या मेहेरनजरेचा परिणाम नाहीं. जीवनकलह चालविण्याकरितां निरनिराळ्या प्राणियोनींना ज्या ज्या गोष्टींची आवश्यकता भासली ती पूर्ण करतां करताच ही "नैसर्गिक ऐक्याची संवेदना" निर्माण झाली आहे. ज्या योनींच्या ठिकाणीं या जीवनकलहात टिकून राहाण्याचें सामर्थ्य नव्हतें व ज्यांना निसर्गाशीं तादात्म्य पावतां आलें नाहीं त्यांचा नाश निसर्गानें अगदीं निष्ठुरपणें केला आहे. मानवी समाजात ज्या अनेक ऐतिहासिक घटना घडून आल्या त्यांच्या मुळाशीं आत्मिक भावना होत्या किंवा आत्म्याच्या इच्छाशक्तीनें त्या घडून आल्या, असें म्हणता येत नाहीं. अशा घटना घडून आल्याच पाहिजेत, अशी आवश्यकता मनुष्याला भासली म्हणूनच त्या घडून आल्या. या घडामोडी होण्यास भौतिक कायदेच कारणीभूत झाले आहेत. आत्मिक इच्छाशक्तीचा या ठिकाणीं कांहींही संबंध नाहीं.

प्रत्येक सजीव वस्तूंत जिवंत राहाण्याची इच्छा साहजिकच असते. जगावें असें प्रत्येक प्राण्याला वाटतच असतें, त्याचप्रमाणें आपल्याला प्रजा व्हावी, असेंही त्याला वाटतें. जगून राहावें व एकाचें अनेक व्हावें असें वाटणें हा प्राणिमात्रांचा सहजधर्म आहे. कोणतीही प्राणियोनी टिकून राहावयाची असल्यास त्या योनीला केवळ जगतां येऊनच भागत नाहीं तर प्रजावृद्धि होऊन त्या योनींतील प्राण्यांची संख्या सारखी वाढत जावी लागते. 'मरणं प्रकृतिः शरीरिणाम् !' शरीरधारी प्राण्याला केव्हां ना केव्हां तरी मरावें हें लागणारच. अशा रीतीनें मरणाच्या स्वाधीन झाल्यामुळें प्राण्यांची जी संख्या कमी होईल ती नवीन जन्मलेल्या प्राण्यानीं भरून काढली नाहीं तर कोणतीही प्राणियोनी अस्तित्वांत राहूं शकणार नाहीं. प्राण्याला आपण

जगून राहावें व प्रजावृद्धि करावी अशी इच्छा तरी कां व्हावी ? ही शंका प्रदर्शित करणें म्हणजे सूर्याच्या ठिकाणीं उष्णता कां असावी, अशी शंका घेण्यासारखेंच आहे. उष्णता पुरविणें हा सूर्याचा सहजधर्म आहे. त्याचप्रमाणें जगावें व वाढावें हा प्राण्यांचाही सहजधर्म आहे. पण प्राण्याचें जीवन व वृद्धि तेव्हांच शक्य होते कीं, ज्यावेळीं जीवननिर्वाहाची साधनें त्याला मुबलक मिळूं शकतात. प्राण्याच्या गरजा पुरविणारीं हीं साधनें निसर्गांत असलीं तरी प्राण्याला तीं आपल्या हस्तगत करून घ्यावीं लागतात. निसर्ग कितीही साधनसंपन्न असला तरी भूक लागली असतां प्राण्याच्या तोंडांत तो घांस भरवीत नाहीं. अन्न मिळविण्याकरितां लागणारीं योग्य तीं इंद्रियें प्रत्येक प्राण्याला असावीं लागतात. ज्या प्राण्यांचीं इंद्रियें विकसित झालेलीं नसतात व भोंवतालच्या परिस्थितीशीं तादात्म्य पावण्याचें सामर्थ्य ज्याच्या ठिकाणीं असत नाहीं त्या प्राणियोनी तावडतोब नष्ट होतात. निष्ठुर निसर्गाला या प्राण्यांची दया येत नाहीं. निसर्ग हा खरोखरीच आंधळा व निष्ठुर आहे. निखाऱ्यावर लहान मुलाचें कोवळें पाऊल चुकून पडलें तर तें भाजल्याशिवाय राहात नाहीं. लहान अजाण पोर निसर्गाला दिसत नाहीं. पाय भाजल्यामुळें पोर कितीही किंचाळूं लागलें तरी निसर्गाला त्याची पर्वा नाहीं. असल्या निसर्गाशीं टक्कर देणें अत्यंत कठीण तर खरेंच पण या झगड्यांत यशस्वी होण्याकरितां प्राणिमात्रांना या निसर्गांतच विकासाचा मार्ग दिसून आला व अनेकविध प्राणियोनींत अनेकविध चित्रविचित्र अवयवांचा विकास झाला. पृथ्वीवर लाखों वर्षे या विकासाचें कार्य चाललें होतें व अद्यापिही तें चाललें आहे. विकासाचें हें कार्यमुद्दां सहेतुकपणें चाललें होतें, असें दिसत नाहीं. कारण अनेक प्राणियोनी निर्माण होत होत्या व त्यांचा कांही विशिष्ट प्रकारचा विकास झाल्याबरोबर नाशही होत होता. याप्रमाणें कांहीं प्राणियोनींतील विकासकार्य सफल व्हावें व कांहींचें विकासकार्य निष्फल व्हावें, असें होतां होतां निसर्गांतील अत्यंत श्रेष्ठ प्राणी मनुष्य निर्माण झाला. एका सूक्ष्म जीवनरसाच्या अणूपासून विकास होतां होतां अत्यंत भानगडीची, गुंतागुंतीची व आश्चर्यजनक शरीररचना असलेला मनुष्यप्राणी विकसित झाला आहे. अत्यंत गुंतागुंतीच्या व अवघड व्यवहाराचें नियंत्रण करण्यास समर्थ असलेला मेंदू

बनण्यापूर्वी किती असंख्य प्राणियोनींचा नाश झाला असेल, हे सांगता येत नाही. पूर्वीच्या प्राण्यांना आपापल्या विकसित अवयवाच्या साहाय्यानें निसर्गाशीं आंधळेपणानें जीवनकलह चालवावा लागत असे. ही त्यांचीं हत्यारें नैसर्गिक व शारीरिक होतीं. मनुष्याला मात्र हा जीवनाचा सनातन झगडा अगदीं निराळ्याच हत्याराच्या साहाय्यानें लढवावा लागला. याकरिता मनुष्याला नवीन विकसित असे अवयव प्राप्त झाले नाहीत तरी आश्चर्यजनक शारीरिक वाढीबरोबरच प्राप्त झालेल्या मानसिक व बौद्धिक हत्याराच्या साहाय्यानें मनुष्यसमाजानें हा लढा चालू ठेवला आहे. मनुष्य आता केवळ निसर्गाचें एक खेळणें राहिलेला नाहीं. निसर्गावर पूर्णपणे मात करणें शक्य नसले तरी तुफानी व लहरी निसर्गाला कांही काहीं प्रसंगीं दाद न देण्याइतकें सामर्थ्य मनुष्यानें प्राप्त करून घेतलें आहे. हा झगडा चालू ठेवण्याकरिता मनुष्यानें आतां संघशक्तीचा आश्रय घेतला आहे. मनुष्याचें जीवन वैयक्तिक नाहीं, तें सामुदायिक आहे. एकाकी व्यक्ति या दृष्टीनें विचार केला तर बलाढ्य निसर्गशक्तीशीं तोंड देण्याच्या कामीं मनुष्य अत्यंत दुर्बल आहे, असें दिसून येईल. अशा परिस्थितीत संघशक्तीचा आश्रय घेऊन त्यानें आपलें सामर्थ्य वाढविलें असल्यास त्यात नवल नाहीं. आत्मसंरक्षणाकरिता व निसर्गाशी टक्कर देण्याकरितां विशिष्ट अवयवाचा विकास होऊन शारीरिक हत्यारें प्राप्त न झाल्यामुळें सामाजिक जीवनाचा अवलंब त्याला करावा लागला; आणि हा झगडा चालविण्याकरितां लागणारीं शरीरबाह्य हत्यारेंही त्याला मिळवावी लागलीं. खुद्द निसर्गातच त्याला ही हत्यारें मिळण्याजोगी होती. निसर्गाची रचनाच अशी आहे. आपणाशी लढण्याला तयार झालेल्या माणसाला खुद्द निसर्गमाताच हत्यारें पुरविते. मातेचे प्रेम असेच काही विलक्षण असतें. वासराने कितीही जोराच्या ढुशा मारल्या तरी गाय प्रेमाचा पान्हा सोडते. मनुष्यानें या निसर्गमातेच्या उदरातूनच आपल्याला अवश्य असलेलीं बाह्य हत्यारें पैदा केलीं आहेत. तो आतां असंरक्षित व दुबळा प्राणी राहिलेला नाही. मानवसमाजरूपी सशस्त्र लष्कराचा तो एक शिपाई बनला आहे व वेळोंवेळीं आलेल्या अनुभवानें शहाणा होऊन आपल्यावर येणाऱ्या संकटांना तोंड देण्यास तो समर्थ झाला आहे. मनुष्याचे सर्व बाह्य अवयव विकसित

होण्याचें थांबलें असून विकासाच्या सर्व क्रिया त्याच्या सामाजिकशक्तींचा विकास करण्यांत एकवटलेल्या आहेत. या शक्तींच्या साहाय्यानें मनुष्यानें अनेकविध संरक्षक साधनें निर्माण केलीं आहेत. हीं मनुष्यनिर्मित संरक्षकसाधनें म्हणजेच मुख्यतः उत्पादनसाधनें होत. शिकारीकरितां लागणारीं हत्यारें, शेतीकरितां लागणारीं आउतें आणि परस्परसहकार्य करण्यास सुलभ व्हावें म्हणून मनुष्यानें निर्माण केलेल्या पद्धति व संस्था म्हणजेच हीं उत्पादनसाधनें किंवा उत्पादनशक्ति होत. या शक्तींच्या साहाय्यानें मनुष्यानें जीवनकलहाचा झगडा चालविला आहे. या उत्पादनशक्ति किंवा साधनें ज्या स्वरूपाचीं असतील, त्याप्रमाणेंच मनुष्यसमाजाचें मन, बुद्धि, इच्छा व भावना बनत असतात. मानवी समाजाच्या मानसिक जगांत ज्या अनेक घटना होतात त्याला या मनुष्यनिर्मित कृत्रिम उत्पादनशक्तीच कारणीभूत झालेल्या असतात. चार माणसें एकत्र आल्याशिवाय उत्पादनसाधनांचा शोध लागत नाहीं व हीं साधनें प्रचारांत असल्याशिवाय मनुष्यें एकत्र येऊं शकत नाहींत, असें असलें तरी उत्पादनसाधनें प्रथम कां समाजघटना प्रथम अशी शंका काढण्यांत अर्थ नाहीं. असा प्रश्न उपस्थित करणें म्हणजे कोंबडी प्रथम कां अंडें प्रथम, असें विचारण्यासारखेंच आहे. उत्पादनसाधनें निसर्गांत असलीं तरी मनुष्याचा निसर्गाशीं संबंध येतो त्यावेळींच तीं व्यक्त होतात आणि त्याच्या आवश्यकतेप्रमाणें निरनिराळीं स्वरूपें त्याना प्राप्त होतात. मनुष्याला उत्पादनसाधनें निर्माण करावीं लागतात, त्याचप्रमाणें उत्पन्न झालेल्या मालाची त्याला विभागणीही करावी लागते व याकरितां दळणवळणाचीं साधनेंही शोधावीं लागतात. अशा रीतीनें सर्व बाजूंनींच निसर्गाशीं झगडा सुरू होतो. मनुष्याला जमीन नांगरावी लागते त्याप्रमाणें जंगल तोडून रस्तेही तयार करावे लागतात व पाण्यावर तरण्याकरितां नावाही बांधाव्या लागतात. अशा रीतीनें मनुष्य पृथ्वीचें बाह्य स्वरूप बदलून टाकतो. हीं साधनें जसजशीं बदलूं लागतात व त्याचा विकास होऊं लागतो तसतशीं माणसाचीं मतें, भावना व इच्छादि बदलूं लागतात व भिन्न भिन्न परिस्थितींत भिन्न भिन्न चालीरीति, कायदे व संस्था निर्माण होतात. हीं साधनें जशींच्या तशीं राहतील तर मनुष्याचा विकासच बंद पडेल. मानवी इतिहासाची गति कुंठित होईल.

भौतिक उत्पादनशक्तींचा विकास म्हणजेच मानवी समाजाचा विकास होय. सर्व ऐतिहासिक घटना या विकासामुळेंच घडून येतात. हाच मार्क्सचा सिद्धांत आहे.

मनुष्य ज्यावेळीं विकासाच्या अगदीं पहिल्या पायरीवर होता व शिकारीवरच मुख्यतः त्याला आपला उदरनिर्वाह करावा लागत होता त्यावेळीं स्वाभाविकच त्याला कळप करून राहावें लागत होतें. त्यावेळची मानवी समाजरचना सामुदायिक समाजसत्तात्मक होती. शिकारीचीं त्याचीं हत्यारें ओबडधोबड होतीं आणि शिकारीच्या कामांत टोळींतील सर्वच लोकांना भाग घ्यावा लागत होता. अर्थात् सर्वांनी मिळून केलेल्या शिकारीवर सर्वांना सारखाच हक्क होता व ती सर्वांना सारखीच वाटून देण्यात येत असे. पण या टोळींमधील लोकसंख्या जसजशी वाढू लागली तसतसे शिकारीवर मनुष्याचें भागेनासें झालें. आपल्या वाढत्या गरजा पुरविण्याकरिता माणसानें सहजच निसर्गाकडे धाव घेतली. निसर्ग हा मोठा कुशल शिक्षक आहे. त्यानें त्याला धान्य कसें निर्माण करावें हें शिकविलें. मनुष्य यापुढें शेतकी करूं लागला व त्याच्या जोडीला गोपाळ व मेंढपाळही बनला. सामुदायिक रीतीनें जीवनाचीं साधनें मिळविण्याची गरज थोडी कमी होऊं लागली. शेतीकरितां त्यानें ओबडधोबड साधनें तयार केलीं होतीं आणि त्यांचा उपयोग करावयाचा म्हणजे त्याला एकेकटें काम करणेंच आवश्यक होतें. मनुष्य आतां थोडासा स्वतंत्र रीतीनें निर्वाहाचीं साधनें मिळवूं लागला तरी परस्परसहकार्याशिवाय त्याचें भागत नव्हतें व त्याचें सामुदायिक जीवनही नष्ट झालें नव्हतें. जो काय फरक झाला तो एवढाच कीं, जमिनीच्या लहान लहान तुकड्यावर तो आतां मेहनतमशागत करूं लागला आणि त्यात जें काय उत्पन्न होईल तें आपल्याकरितां राखून ठेवूं लागला. कुटुंबपद्धतीलाही येथूनच सुरवात झाली. मृगयायुगांत मनुष्य अपरिग्रही होता तो आतां परिग्रही बनत चालला. जमिनींत पिकलेलें धान्य साठवून ठेवतां येतें. मांस सांठवून ठेवतां येत नाहीं. शिकार रोजच्या रोज किंवा केव्हांही करता येतें; पण धान्य तसें पिकत नाहीं. यामुळे आपापल्यापुरतें धान्य साठवून ठेवणें माणसाला भागच पडलें. स्वतः मेहनत करून जें धान्य तो निर्माण करी तेवढें तो स्वतःकरितां

राखून ठेवूं लागला. 'हें माझें व हें तुझें' असा दुजाभाव आतां उत्पन्न झाला. मनुष्याची वृत्ति बदलत चालली. तो खासगी जिंदगी करूं लागला. दुसऱ्याच्या श्रमाचा अपहार करण्याकरितां या जिंदगीचा मात्र तो उपयोग करीत नव्हता. तो काळ अद्याप आला नव्हता. तथापि समाजसत्तावादी सामुदायिक समाजरचना बदलून खासगी जिंदगीच्या कल्पनेवर अधिष्ठित झालेली समाजरचना अस्तित्वांत येऊं लागली. धान्य साटवून ठेवून खासगी जिंदगी करण्याची प्रवृत्ति माणसात एकदां उत्पन्न झाल्यावर हें धान्य ज्याच्या साहाय्यानें निर्माण होतें तीं उत्पादनसाधनेंच आपल्या मालकीचीं करावीं, असें मनुष्याला सहजच वाटूं लागलें. विशेषतः टोळीवरील नायकांच्या मनांत या आकांक्षा उत्पन्न होऊं लागल्या. ज्याच्यापाशीं हीं उत्पादनसाधनें जास्त तो जास्त सुखी. त्यावेळचें उत्पादनाचें मुख्य साधन जमीन हें होतें. तेव्हा ज्याच्यापाशीं जास्त जमीन तो जास्त सुखी होय, असे विचार माणसाच्या मनांत डोकावूं लागले. जास्त मेहनत करून जास्त जमीन तयार करतां आली तरी त्यावर एकट्या माणसानें व किंवा त्याच्या कुटुंबानें राबून जमीन पिकविणें शक्य होईनासें झालें त्यावेळीं आपली जमीन दुसऱ्याला राबावयास द्यावी व त्याच्याकडून उत्पन्न झालेल्या पिकापैकीं कांहीं अंश आपण घ्यावा, ही प्रथा सुरू झाली. टोळ्यांच्या नायकांना तर ही गोष्ट फारच सुखाची वाटूं लागली. मेहनतमशागतकरून जमीन तयार करतां येतें किंवा दुसऱ्यानें मेहनत करून तयार केलेली जमीन जबरदस्तीनें आपलीशी करतां येतें. टोळ्यांच्या नायकांना दुसरा मार्ग अर्थातच पसंत पडला. पण ही जबरदस्ती स्वतःच्या टोळींतच करणें शक्य नव्हतें व हितावहही नव्हतें. तेव्हां आसपास राहिलेल्या दुसऱ्या टोळ्यांवर हल्ले करावे, त्यांचा पाडाव करून त्यांच्या जमिनी व गुरेंढोरें आपलीशीं करून सोडावीं, ही नायकाची कल्पना टोळींतील सर्वच लोकांना पसंत पडण्याजोगी होती. वाढती लोकसंख्या, वाढत्या गरजा व त्याबरोबर वाढती सुखाची इच्छा यांमुळें दुसऱ्याची संपत्ति हरण करण्याची इच्छा माणसाच्या मनांत उत्पन्न झाली असल्यास त्यांत नवल नाहीं. ठिकठिकाणच्या टोळ्यांमधून आतां साहजिकच युद्धें सुरू झालीं. युद्ध म्हटलें कीं युद्धोपयोगीं साधनें निर्माण झालीं, युद्धाबरोबर शिस्त आली, युद्ध करणाऱ्या माणसांना हुकूम करणारे अधिकारी निर्माण झाले. हुकूम देणारे व

हुकूम पाळणारे, असे टोळींत दोन वर्ग झाले. मानवी समाजात एक प्रकारची सत्ता निर्माण झाली आणि अखेर मनुष्यांच्या ठिकठिकाणच्या टोळ्या म्हणजे लहान लहान राज्येंच बनलीं. या टोळ्यामधून युद्धें झालीं म्हणजे जेत्यानीं जित लोकांची संपत्ति हरण करावयाची व त्याचा पाडाव करून त्याना न्यावयाचें हें साहजिक होतें. पण या पाडाव करून आणलेल्या लोकाना स्वस्थ बसून खायला कोण घालणार? म्हणून या लोकाना प्रथम प्रथम ठार मारण्यांत येत असे. पण पुढें या लोकांना राबवून सुखोपभोगाचीं साधनें जास्त जास्त निर्माण करतां येतील, असें वाटल्याबरोबर या लोकांना गुलाम किंवा दास बनविण्यांत आले, आणि हत्ती, घोडे, बैल, गाई यांच्या-प्रमाणें पुष्कळ दासदासी असणें हेंही एक वैभवाचें चिन्ह समजण्यात येऊं लागलें. गुलामगिरीच्या प्रथेला अशा रीतीनें सुरवात झाली. पण या गुलामांकडून शेतीचीं कामें समाधानकारक रीतीनें होईनाशीं झालीं. हाडाचे शेतकरीच या कामाकरितां आवश्यक होते. मानवी समाजातील टोळ्या परस्परांशीं लढूं लागल्या व परस्पराच्या संपत्तीचें हरण करूं लागल्या त्यावेळीं राज्यसत्ता सहजच निर्माण झाली होती. ही सत्ता जसजशी वाढत गेली तसतशी ही सत्ता चालविणारा क्षत्रियांचा व सरदारांचा वर्ग समाजावर आपलें वर्चस्व गाजवूं लागला. लढाई करून मिळविलेल्या जमिनींची मशा-गत करण्याचें काम जेव्हां गुलामांकडून चांगलेंसें होईनासें झालें त्यावेळी मूळच्या शेतकऱ्यांना त्यांनीं आपल्या जमिनीवर राबावयास लावले. क्षत्रिय सरदारानीं शेतकऱ्यांना जबरदस्तीनें आपली शेतें पिकवावयास लावलीं, असें म्हणतां येत नाहीं. तथापि मुलुखचा मुलुख ताब्यांत घेऊन त्यावर आपली मालकी जेव्हां हा सरदाराचा वर्ग गाजवूं लागला त्यावेळीं या प्रदेशातील जमिनीवर शेतकऱ्याना मजूरासारखेच राबावें लागलें. शेतकऱ्यांना याशिवाय गत्यंतरच नव्हतें. जमिनींच्या पूर्वीच्या मालकाना या नवीन क्षत्रिय भूप-तींनीं भूदास—जमीनीवर राबणारीं कुळें—बनवून सोडले व मानवी समाजांत 'जमीनदार व खंडकरी' किंवा 'भूपति व भूदास' असे दोन नवीनच वर्ग निर्माण झाले.

उत्पादनाचीं साधनें ज्याच्या हातांत जातात तोच समाजांतील सत्ता-धीश वर्ग बनतो. जमीनदारवर्ग समाजातील सत्ताधीश वर्ग बनल्यावर

त्यांच्यांतील सर्वांत मोठा जमीनदार जो राजा तो साहजिकच स्वतंत्र बनला व समाजांत एकतंत्री राज्यसत्तेचें स्तोम माजलें. ज्या मुलखांत जमीनदारी पद्धति रूढ आहे त्या ठिकाणीं राजकीय संस्थेचें स्वरूप एकतंत्रीच असावयाचें. ग्रीक राष्ट्रांत व रोमन साम्राज्यांत लोकसत्ता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करण्यांत आला पण तो यशस्वी झाला नाहीं व लोकसत्ता नष्ट होऊन एकतंत्री सत्ताच प्रस्थापित झाली. याचें कारण रोमन नागरिकांच्या भावनेंत व ध्येयांतच क्रांति घडून आली होती. तसेंच रोमन साम्राज्यांतील उत्पादनसाधनांतही क्रांति घडून आल्यामुळें रोमन नागरिकांचे विचारही एकतंत्री राज्यसत्तेला अनुकूल असे बनले होते.

मध्ययुगांत सर्वत्रच लहान लहान प्रमाणावर अनेक प्रकारचे धंदे चालू होते. साध्या ओबडधोबड हत्यारांच्या साहाय्यानें मालाची पैदास करावयाची म्हणजे ती कांहीं नियमित प्रमाणातच होणार. निरनिराळ्या धंदेवाल्यानीं व कारागिरांनीं मोठ्या प्रमाणावर कारखाने चालविणें शक्यच नव्हतें. हे कारागीर फार फार तर १० । १५ लोक हाताखालीं घेऊन आपापले उद्योगधंदे चालवूं शकत. आणि ही मंडळीदेखील बहुधा त्याच्या कुटुंबांतील किंवा नातेवाईकच असावयाची कारखान्यांत घालण्याइतकें भांडवलही या धंदेवाल्यांपाशीं नसे. व्यापारी लोकच कच्चा माल पुरवीत किंवा त्याकरितां लागणारा पैसा पुरवीत. या व्यापारी भांडवलदारांकडून जरूर तें भांडवल घ्यावें व त्यांना पक्का माल पुरवावा, असाच मध्ययुगांतील धंदेवाल्यांचा रिवाज होता. विणकर, सुतार, लोहार, चांभार, सोनार वगैरे धंदेवाल्याच्या लहान लहान जाति त्यावेळीं निर्माण झाल्या होत्या. एकेक धंदा त्या त्या जातीनें करावयाचा अशी पद्धति रूढ असल्यामुळें त्या काळांत वैयक्तिक साहसाला वावच मिळत नव्हता.

अठराव्या शतकाच्या अखेरीस व एकोणिसाव्या शतकाच्या आरंभीच्या कालात ही परिस्थिति बदलून गेली. उद्योगधंद्याच्या क्षेत्रांत एक प्रचंड क्रांति घडून आली. बाष्पशक्तीचा शोध लागला. बाष्पशक्तीचा उपयोग करून घेतां येईल अशा यंत्रांचाही शोध लावण्यांत आला. शेंपन्नास माणसांच्या खटपटीनें जितका माल पूर्वी जितक्या वेळांत पैदा करण्यांत येत होता त्याच्या किती तरी पटीनें तितकींच माणसें तितक्याच वेळांत जास्त

माल निर्माण करूं लागली. मालाची पैदास मोठ्या प्रमाणात होऊं लागली त्याबरोबर व्यापारीक्षेत्रांतही क्रांति घडून आली. रोजच्या रोज नवीन नवीन लागत चाललेल्या शोधांमुळें प्रचंड प्रमाणावर कारखाने उभारणें शक्य होऊं लागले. बाजारात जिकडून तिकडून मालाचा पुरवठा होऊं लागला. व्यापारी वर्गात स्पर्धा सुरू झाली. औद्योगिक क्रांतीच्या या कालात पूर्वीचे लहान लहान धंदे नष्ट झाले. घरोघरीं धंदे चालविणाऱ्या जाति नष्ट झाल्या आणि त्या ठिकाणी प्रचंड भांडवल घालून कारखाने उभारणारे कारखानदार व या कारखान्यात रोजंदारीवर काम करणारे मजूर असे वर्ग समाजात निर्माण झाले. उत्पादनसाधनें बदललीं, नवीन नवीन शोधामुळे उत्पादनशक्तींत क्रांति घडून आली आणि त्याबरोबर समाजरचनेंतही क्रांति घडून आली. राष्ट्रातील जमीनदारवर्ग मागें पडूं लागला. भांडवल घालून मोठमोठे कारखाने उभारणारे भांडवलदार समाजांत पुढारी म्हणून वावरू लागले. हे भांडवलदार मालाची पैदास करीत व तो विकीतही. त्यामुळें व्यापारीवर्गाचें पूर्वीइतकें महत्त्व राहिलें नाहीं. व्यापारीवर्गाला आतां भांडवलदारवर्गावरच अवलंबून राहावें लागलें. त्यावेळचे राजेलोक व त्याचे सहकारी सरदार व जमीनदार यांना भांडवलदाराचें वर्चस्व खपेनासें झालें होतें. यामुळें वाढत्या धंद्यांना आणखी अनिर्बंधपणे वाढूं देण्याकरितां लागणारें राज्यसत्तेचें बळ भांडवलदारवर्गाला मिळत नव्हते. कांहीं कांहीं ठिकाणीं सत्ताधारीवर्गाकडून या धंद्याच्या वाढीला अडथळाच होऊं लागला होता. परक्या देशातून येणाऱ्या कच्च्या मालावर कर बसवून आपलें उत्पन्न वाढविण्याचा प्रयत्नही यावेळचे राजेलोक करूं लागले होते. अशा परिस्थितीत देशांतील सत्ताधारीवर्गाचे सामर्थ्य नष्ट करण्यासंबंधाचे विचार भांडवलदारांच्या मनात उत्पन्न होऊं लागलें यांत कांहीच आश्चर्य नव्हतें. फ्रान्ससारख्या देशात तर तेथील राजेलोकांच्या व सरदार–जमीनदारांच्या जुलमानें सर्वसामान्य जनसमाज अगदीं गांजून गेला होता. शेतकऱ्यांनीं राब राब राबावें आणि त्यांनी उत्पन्न केलेला सर्व माल सत्ताधारी वर्गानें लष्करी सामर्थ्याच्या बळावर अनेक करांच्या व खंडाच्या रूपानें लुटून न्यावा, असा अन्याय फ्रान्समध्ये चालू होता. मजूरवर्गाच्या दैन्यावस्थेला तर सीमाच राहिलेली नव्हती. भांडवलदारवर्गानें नवीन निर्माण झालेल्या या परिस्थितीचा फायदा घेतला

आणि सत्ताधारीवर्गाचें वर्चस्व कमी करण्याचा प्रयत्न केला. या प्रयत्नालाच पुढें क्रांतीचें स्वरूप प्राप्त झालें. या राज्यक्रांतीनंतर फ्रान्समधील अनियंत्रित एकतंत्री सत्ता नष्ट होऊन तिच्या जागीं श्रीमंत व भांडवलदारवर्गाचें ज्यांत वर्चस्व आहे, अशी लोकसत्ता प्रस्थापित झाली. " स्वातंत्र्य, समता व बंधुभाव " हीं लोकसत्तात्मक उदात्त ध्येयें उपदेशिणारे तत्वज्ञानी व पुढारी फ्रान्समध्यें निर्माण झाले म्हणून ही क्रांति झाली, असें कोणी म्हणत असतील तर तें चुकीचें आहे. उत्पादनशक्तीमध्यें जी क्रांति घडून आली होती व तिचा जो विकास झाला होता त्यामुळेंच ही राज्यक्रांति घडून आली. उत्पादनसाधनें यापूर्वी जमीनदारवर्गाच्या ताब्यांत होतीं तीं आतां भांडवलदारवर्गाच्या हातांत आलीं व या नवीन भांडवलदारवर्गाला जमीनदाराचें वर्चस्व खपेनासें झालें. नवीन उत्पादनसाधनाच्या साहाय्यानें जीवननिर्वाह करणारा वर्ग जुन्या जमीनदारी समाजरचनेविरुद्ध बंड करून उठला होता. सामाजिक क्रांति घडवून आणण्याची प्रबल इच्छा या नवीन वर्गांत उत्पन्न झाली होती. जुन्या उत्पादनसाधनावर व शक्तींवर जे ताबा चालवीत होते त्या वर्गांनीं या क्रांतीला जोराचा विरोध केला पण त्यांचें कांहीं चाललें नाहीं. १८४८ च्या या क्रांतीच्या चळवळीमुळें केवळ फ्रान्सच्या राजकीय वातावरणातच उलथापालथ घडून आली, असें नाहीं तर युरोपांतील सर्वच राष्ट्रांत या चळवळीनें खळबळ उडवून दिली व तेथील राजकीय संस्थांत फेरफार घडवून आणले. फ्रेंच राज्यक्रांतीला कारणीभूत झालेला नवीन वर्ग म्हणजे भांडवलदाराचाच वर्ग होता. पुढें १८७० सालीं फ्रान्समधील मजूरवर्गानें पुन्हां क्रांतीचें निशाण उभारलें आणि पॅरिसमध्यें समाजसत्तात्मक राज्य प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला. या प्रयत्नाला यश आलें नाहीं तरी युरोपांतील भांडवलदारवर्गाचे या चळवळीमुळें डोळे उघडले व मजूरवर्ग ही एक शक्ति आहे, असें त्याना मान्य करावें लागलें.

याप्रमाणें मानवी समाजाच्या इतिहासांत जीं अनेक परिवर्तनें व राज्यक्रांत्या घडून आल्या आहेत त्या सर्व घटनांच्या मुळाशीं एकच एक कारण असलेलें दिसून येतें व तें म्हणजे उत्पादनसाधनांवरील सत्ता हें होय. मानवी इतिहासांत जीं युद्धें झालीं तीं सर्व ही सत्ता

कोणाच्या हातीं असावी, याचा निर्णय करण्याकरितांच झालेली आहेत. आणि समाजांतील जो वर्ग ही सत्ता आपल्या हातीं घालूं शकतो तोच शेवटीं सत्ताधारी बनतो व इतरांना आपलें वर्चस्व कबूल करावयास लावतो. हा सत्ताधारी वर्ग आपल्या हातांतील सत्ता कायम राहील या धोरणानेंच राजकीय संस्था निर्माण करतो, कायदे बनवितो आणि त्या त्या वेळीं अस्तित्वांत असलेल्या धर्मसंस्थांतूनही आपल्याला अनुकूल असे फरक तो घडवून आणतो. याकरितांच युरोपमध्यें धर्मसंस्था व राज्यसंस्था यांचें एकीकरण करण्यांत आलें आणि हिंदुस्थानात तर सत्ताधारी वर्गाची सत्ता कायम राखण्याकरितां जन्मतःच मानली जाणारी वर्णव्यवस्था निर्माण झाली व शूद्र व अंत्यज वर्ग निर्माण करण्यात आला. नीतीच्या कल्पनाही याच अनुरोधानें ठरत असतात. उत्पादनसाधनांवरील सत्ता —खासगी जिंदगीवरील सत्ता —कायम राखावयाची हाव या सर्व कल्पनांच्या मुळाशीं हेतु असतो. खासगी जिंदगीवरील आपली सत्ता कायम राहिली पाहिजे. आपल्या वंशजांचाही या जिंदगीवर हक्क राहिला पाहिजे. आपली जिंदगी आपल्या मुलालाच मिळाली पाहिजे. आपलें वतन आपल्या वंशांतच अव्याहत चाललें पाहिजे. आपलेंच रक्त ज्यांच्यांत वाहात आहे अशा आपल्या वंशजांच्या हातांतच तें वतन असलें पाहिजे, या समजुतींना ज्या समाजांत महत्त्व दिलें जातें त्यांत स्त्री ही एक उपभोग्य वस्तु व वंशवृद्धीचें यंत्र मानली जाते. असल्या समाजांत स्त्रियांना स्वातंत्र्य मिळूं शकत नाहीं. स्त्रीवर्गाचा सर्व बाजूंनीं कोंडमारा होतो. धर्मबंधनांनीं व समाजबंधनांनीं त्यांना जखडून टाकण्यात येते. घटस्फोटाला मनाई होते. क्षेत्रशुद्धीच्या कल्पनेमुळें पातिव्रत्याचें स्तोम माजविलें जातें व पति हा देव आहे, त्याची सेवा करण्यांतच मोक्ष आहे, या कल्पना स्त्रीवर्गाच्या मनावर बिंबविल्या जातात. सारांश सर्व नैतिक, धार्मिक व स्वातंत्र्यविषयक कल्पना, समाजांत प्रचलित असलेले सर्व कायदे व रूढी, सर्व राज्यसंस्था व समाजसंस्था यांच्या मुळाशीं मुख्यतः उत्पादनसाधनेंच असून समाजाचा विकास होण्यास देखील हींच साधनें कारणीभूत होत असतात. एंजल्सच्या खालीं दिलेल्या उताऱ्यावरून ही कल्पना अधिक स्पष्टपणे समजण्यास मदत होईल.

"ऐतिहासिक प्रकृतिवादाचें रहस्य समजून घ्यावयाचें असल्यास

समाजांत मुख्यतः कोणतीं उत्पादनसाधनें प्रचलित आहेत व तयार झालेल्या मालाची विभागणी कशा प्रकारें होत आहे, याचें ज्ञान झालें पाहिजे. कारण समाजाला आवश्यक असलेल्या मालाची ज्या साधनांच्या साहाय्यानें निर्मिती होते व या मालाची वांटणी समाजांत ज्या पद्धतीनें करण्यांत येते त्यांवरच सर्व ऐतिहासिक परिवर्तनें व समाजांत उत्पन्न झालेले भेद अवलंबून असतात. ज्या ज्या वेळीं मानवी समाजाच्या विचारसरणींत अनेक परिवर्तनें होतात व त्याच्या इतिहासांत अनेक क्रांत्या घडून येतात त्यांचीं खरीं कारणें मनुष्याच्या मनांतील उच्च विचार किंवा सत्य व न्याय यासंबंधाच्या त्याच्या उदात्त भावना यात सांपडत नाहींत तर मानवी समाजात त्यावेळीं प्रचलित असलेलें उत्पादनशक्तीचें व मालाच्या वांटणीचें स्वरूप ज्या प्रकारचें असतें त्यांतच तीं आढळतात. तात्पर्य, सर्व सामाजिक घटनांचीं मूळ कारणें तत्त्वज्ञानांत आढळत नाहींत तर प्रत्येक पिढींत जें अर्थशास्त्र प्रचलित असतें त्यात आढळतात. समाजांतील प्रचलित संस्था यापुढें फायदेशीर व इष्ट नाहींत, पूर्वी जें हितकर व शहाणपणाचें वाटत होतें तें आतां मूर्खपणाचें व अहितकर आहे, असें माणसाला वाटूं लागतें, याचें कारण मालाचें उत्पादन व विभागणी यांच्या साधनांत न कळत फरक झालेला असतो, हेंच होय. या नव्या परिस्थितींत जुनी समाजरचना व जुनें अर्थशास्त्र टिकून राहूंच शकत नाहीं."

"सामाजिक कायद्यांना किंवा उद्योगधंद्याना आज जें स्वरूप प्राप्त झालें आहे याचें कांहीं कारण सांगतां येत नाहीं. निसर्गाची ती एक स्वाभाविक कृति आहे किंवा मानवी अंतःकरणांत वसत असलेल्या आत्मिक गुणांचा तो एक परिणाम आहे असें कोणी म्हणतील तर तें चुकीचें असून निर्वाहाचीं आर्थिक साधनेंच (उत्पादनसाधनें) या परिस्थितीच्या मुळाशीं आहेत, अशी माझी खात्री झाली आहे." असें मार्क्सचेंही म्हणणें आहे. ऐतिहासिक प्रकृतिवादाच्या सिद्धांतामुळें अनेकविध सामाजिक घटनांच्या मुळाशीं कोणतीं कारणें आहेत हें समजून घेणें सोपें झालें आहे. कोणत्या ऐतिहासिक घटनेला किती महत्त्व आहे, हें या सिद्धांताच्या साहाय्यानें चटकन् समजतें. याप्रमाणें सर्व सामाजिक घटना भौतिक कायद्यांनुसार व उत्पादनसाधनांच्या परिवर्तनानुसार घडून येतात, असें ऐतिहासिक प्रकृतिवाद

सागत असला तरी मनुष्यासारख्या बुद्धिमान् प्राण्याला इतिहासात काहीं स्थानच नाहीं, माणूस हें उत्पादनशक्तीच्या हातातलें केवळ एक बाहुलें आहे, असे मात्र म्हणता येत नाहीं. वर जें विवेचन केलें आहे त्यावरून उलट मनुष्याच्या इच्छा, भावना, जाणीवशक्ति व विशेषतः बौद्धिक प्रयत्नच सामाजिक घटनांचें व संस्थांचे स्वरूप निश्चित करण्याच्या कामीं प्रमुखत्वाने कारणीभूत होतात असेंच दिसून येईल. सर्व मानसिक शक्ति खर्ची घालून मनुष्यानें ज्ञानपूर्वक प्रयत्न न केल्यास समाजाचे कोणतेंही सामान्य कामसुद्धा होऊ शकणार नाहीं. गूढ आत्म्याचें किंवा निसर्गातील अव्यक्त शक्तीचें अस्तित्व ऐतिहासिक प्रकृतिवादी मानीत नसले तरी भौतिक शरीरातून निर्माण झालेल्या मानवी मनाचे महत्त्व ते कमी करीत नाहींत. हें मानवी मन एका विशिष्ट दिशेनेंच का कार्य करतें, अमुक एका प्रसंगीं अमुक एकच प्रवृत्ति माणसाच्या ठिकाणीं का दिसून येते, याच्या उलट दुसऱ्या प्रकारची वृत्ति त्याच्यांत का दिसून येत नाहीं, याची कारणपरंपरा सांगण्याचें सारें काम ऐतिहासिक प्रकृतिवादी करीत असतात. समाजाचा भौतिक विकास कसकसा होत गेला व समाजाच्या मानसिक कार्याची दिशा कसकशी ठरत गेली, हीच गोष्ट ऐतिहासिक प्रकृतिवादावरून निश्चित करता येते. मनःसामर्थ्याला किंवा अंतःप्रवृत्तींना मार्क्स काहीच महत्त्व देत नाहीं, असा जो गैरसमज पसरलेला आहे तो चुकीचा आहे. मनुष्याला आत्मा नाहीं, असें डार्विन व त्याचे अनुयायी म्हणतात, हें म्हणणे जितकें निराधार आहे तितकाच मार्क्सवर वरील आरोप करणेंही निराधार आहे. ऐतिहासिक घटना होण्याला मनुष्याच्या मानसिक व बौद्धिक प्रवृत्ति कारणीभूत होतात का नाहीं, हा येथें प्रश्न नसून अशीं मानसिक परिवर्तनें का घडून येतात, याचीं कारणें शोधून काढणें हा या ठिकाणीं मुख्य प्रश्न आहे. मनुष्य हा एकाकी स्वतंत्र व स्वयंपूर्ण नाही. त्याचीं सर्व मानसिक कार्यें शारीरिक मेंदूवर व भोवतालच्या नैसर्गिक परिस्थितीमुळें उत्पन्न झालेल्या आवश्यकतेवर अवलंबून असतात, असें भौतिकवादी म्हणत असतात. ऐतिहासिक प्रकृतिवादी यापेक्षा थोडें पुढे जातात. भौतिक उत्पादनशक्ति ज्या प्रकारच्या असतील तशाच प्रकारचीं सामाजिक ध्येयेंही बनत असतात. समाजाचा आत्मा या शक्तींनीच बद्ध झालेला असतो. उत्पादन-

शक्तींतील प्रत्येक फरकाबरोबर समाजाच्या मानसिक व भावनात्मक शरीरांतही फरक घडून येत असतो, असें ऐतिहासिक प्रकृतिवाद्यांचें म्हणणें आहे. हवा, पाणी व भौगोलिक परिस्थिति यांचा जसा व्यक्तीच्या मनावर तसा समाजाच्या मनावरही परिणाम होत असतो. कांहीं अपवाद खेरीज करून या नैसर्गिक अवस्था कायम स्वरूपाच्याच असतात तेव्हां व्यष्टीच्या काय किंवा समष्टीच्या काय दोघांच्याही मनःस्थितींत कांहींच परिवर्तन होतां कामा नये. पण प्रत्यक्ष अनुभव तसा नाहीं. व्यक्तीच्या व समाजाच्या मनःस्थितींत वारंवार जे बदल घडून येतात, त्याचीं कारणें प्रत्यक्ष निसर्गांत आढळून येत नसलीं तरी उत्पादनशक्तीमध्यें तीं समाविष्ट असलेलीं दिसून येतात. या कारणांचा एकदां शोध लागला म्हणजे मानवी इतिहासांत अनेक क्रांतिकारक घटना कां होतात, याची समाधानकारकरीतीनें संगति लागते.

ऐतिहासिक प्रकृतिवादाचा सिद्धांत मुळातच हास्यास्पद आहे, असें कांहीं विद्वान् टीकाकारांचें म्हणणें आहे. एकादा बुद्धिमान् पुरुष एकादा शोध लावतो, किंवा एकादा कुशल चित्रकार किंवा शिल्पकार एकादें सुंदर चित्र किंवा पुतळा तयार करतो तेव्हां त्यांची ही कृति, केवळ आर्थिक आवश्यकतेमुळेंच निर्माण होते काय, अशी शंका कोणी घेत असतात. पण ती योग्य नाहीं. यामुळें असल्या शंका घेणाराचें अज्ञान मात्र प्रगट होतें. ऐतिहासिक प्रकृतिवाद एकाद्या व्यक्तीनें लावलेल्या शोधाचा किंवा त्यानें केलेल्या कृतीचा विचार करीत नाहीं तर सर्वसामान्यपणें शास्त्र व कला यांची प्रगति कशी झाली, याचा तो विचार करीत असतो. ऐतिहासिक प्रकृतिवादाच्या दृष्टीनें शास्त्र व कला या ईश्वरी देणग्या नाहींत; तर निसर्गशक्तीशीं मनुष्याचा जो सतत झगडा चालू आहे त्याच्यांतूनच हीं शास्त्रें व कला निर्माण झाल्या आहेत. या झगड्यामुळेंच निसर्गांतील गूढें उकलण्याची प्रबल इच्छा मनुष्याला होत असते. आणि पुढें पुढें या इच्छा मनुष्याच्या मनांत सहजासहजीं उद्भूत होतात व त्याच्या ठिकाणीं असलेल्या शोधक बुद्धीचा विकास होऊं लागतो, एवढें सिद्ध झाल्यावर प्रत्येक शोधाच्या मुळाशीं अमुक एक विशेष आर्थिक कारण आहे, असें दाखविण्याची ऐतिहासिक प्रकृतिवाद्यांना जरूरी भासत नाहीं. या-

शिवाय आणखी एका विशिष्ट दृष्टीनें पाहूं गेल्यास शास्त्र व कला यातील प्रत्येक शोध समाजांत प्रचलित असणाऱ्या व त्यावर सत्ता चालविणाऱ्या उत्पादनशक्तींवरच अवलंबून असतो, असें म्हणण्यास कांहींच हरकत नाहीं. उगाच काही तरी करावयाचें म्हणून कोणताही संशोधक संशोधनाचें कार्य हातीं घेत नाहीं. तसेंच हा संशोधक ज्या कालात राहात असतो व ज्या पिढीशी त्याचा संबंध असतो त्या कालांत अनुपयोगी व त्या पिढींतील लोकांना अहितकर, असें कोणतेंही संशोधनकार्य तो हातीं घेत नाहीं. मागील ज्ञानाचा व अनुभवाचा साठा व कांहीं विशिष्ट यंत्रसामुग्रीची मदत यांच्या पायावरच शास्त्रीय प्रगतीचें प्रत्येक पाऊल पुढें पडत असतें. आवश्यक असलेला हा मागचा अनुभव या विद्वान् संशोधकाला आपल्या भोंवतालच्या परिस्थितीपासूनच संपादन करावा लागतो. आणि या कार्याकरितां त्याला लागणारी उपकरणेंही उत्पादनशक्तींचा जितपत विकास झाला असेल त्यावरच अवलंबून असतात. या मागील अनुभवाची व उपकरणाची मदत या संशोधकाला होणार नाहीं तर त्याच्या हातून कोणताही शोध लागणें शक्य नाहीं. कोणताही रसायनशास्त्रज्ञ त्या कालीं मान्य असलेले रसायनशास्त्रातील सिद्धात व नियम जाणत नसेल तर एकही नवा शोध तो लावूं शकणार नाहीं. अवश्य तीं सूक्ष्मदर्शक यंत्रें जवळ नसतील तर कोणताही सूक्ष्मजंतुशास्त्रज्ञ आपलें संशोधनाचें कार्य पुढें चालवूं शकणार नाहीं. प्रत्येक संशोधकाचा नवा शोध त्यानें पूर्वी संपादन केलेल्या ज्ञानसामुग्रीवर व त्याच्या हाताशीं असलेल्या उपकरणसामुग्रीवरच अवलंबून असतो. यावरून शास्त्रे व कला यातील शोध अगदी स्वतंत्रपणे लागत नसून उत्पादनसाधनाच्या विकासावरच ते अवलंबून असतात. कारण हीं उत्पादनसाधनेंच मानवी बुद्धीला एका विशिष्ट दृष्टीनें विचार करावयास लावीत असतात. “ तळेच नसेल तर मासे धरण्याच्या नवीन युक्तीचा शोध कोणत्याही विद्वान् संशोधकाला लावतां यावयाचा नाहीं,” असे ऐतिहासिक प्रकृतिवादी मार्क्सने म्हटलें आहे व तें अगदीं यथार्थ आहे.

# मूल्याचा श्रमसिद्धांत

वस्तूची किंमत कशी करावी, हा अर्थशास्त्रांतील एक गहन प्रश्न आहे. सकृद्दर्शनीं हा प्रश्न इतका बिकट आहे, असें वाटत नाहीं. विनिमयाची सामान्य प्रचलित पद्धति ज्याला माहीत आहे तो मनुष्य अमुक वस्तूची अमुक किंमत असली पाहिजे, असें सहज सांगू शकतो. बाजारात विकण्याकरिता जी वस्तु मांडलेली असते तिचीच किंमत करावयाची असते. जी वस्तु स्वतःच्या उपयोगाकरितां तयार करण्यात येते तिची किंमत करीत बसण्याचें कारणच नाहीं. घरखर्चाकरितां लागणारें दूध मिळावें म्हणून घरीं गाय ठेवली तर त्या गायीच्या दुधाची किंमत कोणी करीत नाहीं. पण एका गायीच्या ठिकाणीं आणखी चार गायी वाढविल्या व डेअरी काढण्याचें ठरविलें कीं, या गायींच्या दुधाची काय किंमत होईल याचा विचार करावा लागतो. बाजारांत विकण्याकरिता आलेल्या वस्तूची किंमत करणेंही फारसें कठीण नाहीं. एका पैशाला चार पेरू मिळतात व चार आणे दिल्याशिवाय माळी कलिंगडाला हातही लावूं देत नाहीं. मंडईत भाजी आणण्याकरिता जाणाऱ्या लहान मुलालाही या किंमती माहीत असतात. मंडईत जाणाऱ्या मुलालाही समजतील इतक्या या गोष्टी उघड व सोप्या असल्या तरी अर्थशास्त्रज्ञाला मात्र त्या इतक्या सोप्या वाटत नाहींत. बाजारात गेलें व चौकशी केली म्हणजे कोणत्या वस्तूची काय किंमत आहे, हें सहज समजेल पण एवढ्यानें त्याचें समाधान होत नाहीं. या प्रत्यक्ष अनुभवाच्या मुळाशीं कोणतीं कारणें आहेत याचा तो शोध करूं लागतो. वस्तु विकणारा व विकत घेणारा असे दोन पक्ष एकत्र आले तरी वस्तूचें मूल्य अमुकच असलें पाहिजे असें ते निश्चितपणें सांगूं शकत नाहींत. कारण काल व स्थल याच्या परिस्थितीवरही वस्तूचें मूल्य अवलंबून असतें. एकच वस्तु पण निरनिराळ्या वेळीं व निरनिराळ्या स्थळीं तिचें मूल्य निरनिराळें होतें. आंब्याच्या मोसमांत आंब्याला जी किंमत येते त्यापेक्षां कितीतरी जास्त किंमत हा मोसम संपून गेल्यावर त्याला द्यावी लागते. कोंकणांत आंबा जितका स्वस्त मिळतो तितका तो देशावर

स्वस्त मिळत नाहीं. मोटारगाड्या हिंदुस्थानापेक्षां अमेरिकेंत जास्त स्वस्त मिळतात. परंतु पंचवीस तीस वर्षांपूर्वी खुद्द अमेरिकेंतच मोटारगाड्या आजच्या पेक्षां कितीतरी महाग होत्या. यावरून एवढीच गोष्ट सिद्ध होते कीं, वस्तूचें मूल्य व्यापारी व कारखानदार ठरवूं शकत नाहींत. हें मूल्य निश्चित होण्यास अनेक गोष्टी कारणीभूत झालेल्या असतात. शिवाय वस्तु विकणारा व ती विकत घेणारा हे दोन्ही पक्षदेखील दुसऱ्या वस्तूचें जें मूल्य नक्की ठरवितात तेंसुद्धां या वस्तूंतील अंगभूत असलेल्या मूल्यावरूनच ठरवितात असें म्हटलें तर वस्तूंमधील अंतर्गतमूल्याचें स्वरूप काय असावें आणि ज्या एका विशिष्ट प्रमाणात वस्तूंना परस्परविनिमय होतो त्याचें कारण तरी काय असावें, हे प्रश्न सहजच उत्पन्न होतात.

वस्तूच्या मूल्याचें सामान्य लक्षण काय, हें ठरवितांना कोणकोणत्या गोष्टींचा विचार करावा लागतो यासंबंधानें अर्थशास्त्रज्ञांमध्यें बराच मतभेद झालेला असून उपयुक्ततावादी व श्रमवादी असे सामान्यतः दोन मोठे पक्ष त्यांच्यात पडलेले आहेत, असें दिसून येतें. वस्तूच्या ठिकाणीं मनुष्याच्या गरजा पुरविण्याचे जे गुण आहेत त्यावरूनच तिचें मूल्य ठरत असतें, असें उपयुक्ततावाद्यांचें म्हणणें आहे. वस्तूमध्यें उपयुक्ततेचा गुण नसेल तर तिला कोणीही विचारणार नाहीं हें खरें असलें तरी वस्तूचें मूल्य ठरविण्याच्या कामीं एवढी एकच गोष्ट गृहीत धरून चालावयाचें नाहीं तर ही वस्तु निर्माण करण्याकरितां मनुष्याची प्रत्यक्ष श्रमशक्ति किती खर्ची पडली, याचा विचार करणें अत्यंत आवश्यक आहे, असें श्रमवादी म्हणत असतात. वस्तु उपयुक्त खऱ्या पण त्या निर्माण करण्याकरितां मनुष्यानें यत्किंचितही श्रम घेतले नसतील तर त्यांना कांहींसुद्धां मूल्य प्राप्त होणार नाहीं. हवा व पाणी यांना कांहींच किंमत पडत नाहीं कारण यांच्याकरितां मनुष्याची श्रमशक्ति खर्ची पडलेली नसते. बाजारांत त्याच वस्तूला किंमत येते कीं, जिच्याकरितां मनुष्याचे श्रम खर्ची पडलेले असतात; मग हे श्रम वस्तु निर्माण करण्याकरितां पडलेले असोत किंवा ती बाजारांत आणण्याकरितां पडलेले असोत. म्हणून वस्तूचें मूल्य ठरवितांना या श्रमाचा अवश्य विचार केला पाहिजे असें श्रमवादी अर्थशास्त्रज्ञांचें म्हणणें आहे.

प्रसिद्ध फ्रेंच अर्थशास्त्रज्ञ से यानें अर्थशास्त्रांतील उपयुक्तता-

सिद्धांत अत्यंत विस्तृत रीतीनें मांडला आहे. ज्या वस्तूचा मनुष्याला अधिक उपयोग होतो तिला तो अधिक किंमत देतो, जिचा कमी उपयोग होतो तिला तो कमी किंमत देतो, असें से वगैरे जुन्या अर्थशास्त्रज्ञाचें म्हणणें आहे. वस्तूला मूल्य प्राप्त होतें तें केवळ तिच्या उपयुक्ततेमुळेंच प्राप्त होतें असें असेल तर हवा, पाणी व प्रकाश या अत्यंत उपयुक्त वस्तूंना फारच मोटी किंमत पडली पाहिजे. तसेंच धान्य वगैरे मनुष्याला अत्यंत जरूर असलेल्या जिनसांनाही बाजारांत फार मोठी किंमत असली पाहिजे. सोनें लोखंडापेक्षां कमी उपयुक्त आहे पण बाजारांत सोन्याला लोखंडापेक्षां किती तरी पटीनें जास्त किंमत द्यावी लागते. एक शेर भाकरीचा उपयोग बेचव हिऱ्यापेक्षां कितीतरी पटीनें जास्त आहे. भाकरी मनुष्याची भूक शमविते. असली कोणतीही नैसर्गिक गरज हिरा पुरी करीत नाहीं, असें असलें तरी बाजारांत त्याचें मूल्य भाकरीपेक्षां कितीतरी असंख्य पटीनें मोठें असतें. उपयुक्ततावादी जुने अर्थशास्त्रज्ञ या शंकेला समाधानकारक उत्तर देऊं शकत नाहींत. वस्तूचें मूल्य तिच्या उपयुक्ततेवरून ठरतें असें असलें तरी ती निर्माण करण्याकरितां जो खर्च लागला त्याचा अवश्य विचार केला पाहिजे, असें सेनें म्हटलें आहे. या खर्चांत कच्च्या मालाची किंमत व वस्तु तयार करण्याकरितां लागलेले श्रम यांचा समावेश से करतो पण वस्तूंचें मूल्य ठरवितांना सर्व भर उपयुक्ततेवरच दिला पाहिजे, असें तो प्रतिपादितो, हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे.

उपयुक्ततेचा विचार करतांना व तिच्यावरून वस्तूचें मूल्य ठरवितांना तिचा एकंदर पुरवठा किती आहे, हें लक्षांत ठेवलें पाहिजे, असें ब्रूनो व नीज वगैरे उपयुक्ततावादी अर्थशास्त्रज्ञांचें म्हणणें आहे. जीवनाला अत्यंत आवश्यक वस्तु या दृष्टीनें भाकरीची उपयुक्तता व किंमत सोन्यापेक्षां नव्हे तर हिऱ्यापेक्षांही जास्त आहे. कोणत्याही कालांत समाजापाशीं असलेल्या भाकरीच्या पुरवठ्याची किंमत हिऱ्यांच्या एकंदर सर्व निधीपेक्षां केव्हांही जास्त असते. मनुष्य फार तर चार–सहा भाकरी विकत घेतो. भाकरीचा सर्वच्या सर्व पुरवठा तो विकत घेत नसतो. या चार सहा भाकऱ्यांचें मूल्य अर्थात् भाकरीच्या पुरवठ्याच्या मूल्यापेक्षां जास्ती असूं शकणार नाहीं. कारण या एकंदर पुरवठ्याची उपयुक्तता दोन चार भाकऱ्यांच्या उपयुक्ततेपेक्षां

अनंतपटीनें जास्त आहे. एक शेर भाकरीची किंमत एक शेर भाकरीच्या उपयुक्ततेवर ठरविली जाते. भाकरीचा जितका पुरवठा अस्तित्वांत असेल त्याच्या उपयुक्ततेवर ती ठरविली जात नाहीं. एक शेर भाकरीचें मूल्य व अस्तित्वात असलेल्या भाकरीच्या एकंदर पुरवठ्याचें मूल्य याच्यात जो संबंध आहे तोच एक शेर भाकरीची उपयुक्तता व भाकरीच्या एकंदर पुरवठ्याची उपयुक्तता याच्यामध्यें आहे. भाकरीचा पुरवठा जितका जितका अधिक वाढत जातो तितकी तितकी भाकरीच्या एक शेराची किंमत कमी होत जाते व त्याची उपयुक्तताही कमी होत जाते, हा सामान्य अनुभव आहे. एक भाकरी खाऊन माझी भूक शमते परंतु एकापेक्षा अधिक भाकरी माझ्यापाशीं असतील तर त्यांची उपयुक्तता मला कमीच भासणार. एकाद्या वस्तूचे जितके जितके अधिक नग तितके तितके प्रत्येक वैयक्तिक नगाचे महत्त्व कमी होत जाते. शिकलेल्या माणसांची संख्या जितकी अधिक तितकें शिकलेल्या लोकांचें महत्त्व कमी होतें. एक शेर भाकरीची किंमत करावयाची असल्यास भाकरीच्या एकंदर पुरवठ्याच्या किंमतीला, या पुरवठ्यात जितके शेर भाकरी असेल त्या शेरांच्या संख्येनें भागलें पाहिजे. अर्थात् या शेरांची संख्या जितकी जितकी जास्त असेल तितकी तितकी प्रत्येक शेराची किंमत कमी होत जाईल. एक शेर भाकरीला फारच थोडी किंमत पडते याचें कारण भाकरीच्या पुरवठ्यातील शेरांची संख्या अमर्याद असते. उलटपक्षीं सोन्याचा एकंदर पुरवठा भाकरीच्या पुरवठ्याच्या मानाने कितीतरी थोडा असतो. यामुळें सोन्याच्या एकंदर पुरवठ्याच्या किंमतीच्या मानानें सोन्याच्या एका तोळ्याला बरीच किंमत द्यावी लागते. समजा, भाकरीचा पुरवठा १० कोटी शेर आहे व त्याची किंमत २॥ कोटी रु. आहे व सोन्याचा पुरवठा २५,००० तोळे असून त्याची किंमत ६,२५,००० रु. आहे.

सोन्याचा एकंदर पुरवठा = २५,००० तोळे

सोन्याच्या एकंदर पुरवठ्याची किंमत = ६,२५,००० रुपये.

सोन्याच्या एका तोळ्याची किंमत = २५ रुपये.

भाकरीचा एकंदर पुरवठा = १० कोटी शेर

भाकरीच्या पुरवठ्याची किंमत = २॥ कोटी रुपये.

भाकरीच्या एका शेराची किंमत = ४ आणे.

यावरून असें दिसून येईल कीं, सोन्याच्या एकंदर पुरवठयाच्या किंमतीपेक्षां (रु. ६,२५,०००) भाकरीच्या एकंदर पुरवठयाची किंमत (रु. २॥ कोटी) पुष्कळ जास्त असूनही, सोन्याच्या एका तोळ्याची (एका नगाची) किंमत भाकरीच्या एका शेराच्या (नगाच्या) किंमतीपेक्षां पुष्कळच जास्त आहे.

यानंतर उपयुक्ततासिद्धांताचा पुरस्कार करणारा आणखी एक पंथ पुढें आला व त्यानें या सिद्धांताचा पाया पुन्हां थोडा जास्त स्थिर व बळकट करण्याचा प्रयत्न केला. मेंजर, बोह्म बेवर्क व वीझर हे या पंथाचे मुख्य पुरस्कर्ते होत. कोणत्याही वस्तूचें मूल्य केवळ तिच्या उपयुक्ततेवर किंवा तिच्या पुरवठ्यावर अवलंबून नसून तिच्याकरितां वाटणाऱ्या कमी जास्त गरजेवरूनच ठरतें, असें या लोकांचें म्हणणें आहे. मेंजरनें या सिद्धांताच्या पुष्टीकरितां पुढील उदाहरण दिलें आहे. समजा, एक मनुष्य ओसाड बेटांत राहात आहे. या बेटांत पाण्याचा अवघा एकच झरा आहे. या मनुष्याला रोज पिण्याकरितां एक बकेट पाणी लागतें. त्याच्याजवळील जनावरांना पिण्याकरितां १९ बकेटें पाणी लागतें. ४० बकेटें स्नानाकरितां व कपडे धुण्याकरितां लागतात व आणखीं ४० बकेटें त्यानें लावलेल्या फुलझाडांच्या बागेकरितां लागतात. अर्थात् ही बाग त्यानें आपली करमणूक करण्याकरितां लावलेली असते. या बागेची त्याला जरूरच आहे असें नाहीं. याप्रमाणें जास्तींत जास्त त्याला १०० बकेटें पाणी लागतें. समजा, या झऱ्यांतून यापेक्षां जास्त पाणी आलें तर १०० बकेटापेक्षां जास्त आलेल्या पाण्याची त्याला कांहींच किंमत वाटणार नाहीं. पण उलट या झऱ्याचें पाणी आटूं लागलें व त्यांतून ९० बकेटेंच पाणी मिळूं लागलें. आतां त्याला या पाण्याचें महत्त्व वाटूं लागेल. या परिस्थितींत पुरी न केली तरी चालेल अशी गरज पूर्ण करण्याकरितां तो पाणी खर्चणार नाहीं. फुलझाडांना तो कमी पाणी घालूं लागेल. समजा, त्याला हें १० बकेट पाणी दुसरीकडून विकत घेता येईल तर ही कमी महत्त्वाची गरज पुरी करणें त्याला जितकें महत्त्वाचें वाटेल तितकीच किंमत त्यांना तो देईल. तो झरा आटतच चालला व त्यांतून अवघे ४० बकेटेंच पाणी निघूं लागलें तर

पुलझाडें वगैरे करमणुकीच्या साधनाकरितां तो जें पाणी खर्च करीत होता तें खर्च करण्याचें तो कमी करील इतकेंच नव्हे तर तो आतां रोज स्नान करण्याचेंही बंद करील. पाण्याची किंमत त्याला आतां अधिकच वाटेल. स्नानाच्या गरजेला तो जें महत्त्व देतो तितकी किंमत तो बाकीच्या बकेटांना देण्याला तयार होईल. आतां या पुढच्या प्रत्येक बकेटाची किंमत त्याची गरज जितकी जितकी जास्त महत्त्वाची असेल त्या त्याप्रमाणें वाढत जाईल. वस्तूचें जे मूल्य ठरतें तें केवळ तिच्याबद्दल वाटणाऱ्या गरजेवरच अवलंबून नसतें तर त्याबरोबरच त्या वस्तूचा पुरवठा किती आहे व ती वस्तु खरेदी करणाराचें क्रयसामर्थ्य किती आहे, हें पाहावें लागतें. भूक लागलेल्या माणसाला पहिल्या घांसाचें फारच महत्त्व आहे. हा घास खाल्यावर क्षुधा शमविण्याची पहिली गरज तितक्या प्रमाणात कमी होते. दोन चार घास खाल्ल्यावर तर ही गरज फारच कमी होते. अशा परिस्थितीत भाकरीची जी किंमत ठरते ती तिच्या पहिल्या घांसाच्या महत्त्वावरून ठरत नाहीं तर सामान्यतः भूक शमल्यानंतर भाकरीची जी गरज शिल्लक राहते तिच्यावरच तिची किंमत ठरत असते. अर्थशास्त्रातील या सिद्धाताला "सीमान्त उपयुक्ततासिद्धात" असें म्हणतात. सामान्यतः भूक भागेल इतक्या भाकरीला जी किंमत पडते ती देण्याइतकें क्रयसामर्थ्य भाकरी विकत घेणारापाशीं नसेल तर भाकरीचे दोन घास तो कमी खाईल पण आपल्यापाशीं जेवढे पैसे असतील तितक्या पैशामध्येच आपल्याला सामान्यतः लागेल इतकी भाकरी घेण्याचा तो प्रयत्न करील आणि या घासाघासींतच शेवटीं भाकरीची किंमत नक्की होईल. 'सीमान्त उपयुक्ततेच्या' या सिद्धाताचा पुरस्कार करणाऱ्या मेजर वगैरे अर्थशास्त्रज्ञानी मागणी व पुरवठा याचा विचार केला आहे. म्हणजेच बाजारात आलेल्या मालाच्या किंमतींत चढउतार का होतो, याचा विचार केला आहे. श्रमसिद्धाताचा विचार न करता केवळ वस्तूच्या उपयुक्ततेवरच तिचें मूल्य ठरविण्याचा प्रयत्न करणाऱ्या या अर्थशास्त्रज्ञांना अर्थातच भांडवलदारवर्गाकडून पाठिंबा मिळाला व त्याच्या आश्रित वर्गानेंही त्याना उचलून धरलें, यात फारसे नवल नाहीं. या सिद्धांताचा डोलारा अशा रीतीनें कितीही तर्कशुद्ध असला तरी त्याचा पायाच सदोष आहे. ज्या वस्तु प्रत्यक्षच माणसाच्या काहीं गरजा भागवितात त्याचें मूल्य ठरवि-

ण्यांस या सिद्धाताचो मदत होईल, पण ज्या वस्तूची उपयुक्तता प्रत्यक्षपणें समजलेली नाहीं, प्रत्यक्ष गरजा भागविणाऱ्या दुसऱ्याच वस्तु निर्माण करण्याकडे ज्यांचा उपयोग होत असतो अशीं उपकरणें व यंत्रें. वगैरेंची किंमत कशी ठरवितां येणार ? यंत्रांच्या साहाय्यानें ज्या वस्तु निर्माण करण्यांत येतात त्यांच्या उपयुक्ततेवरून यंत्रांची किंमत ठरवितां येईल, असें एका अर्थशास्त्रज्ञानें म्हटलें आहे. पण जो कोणी एकादें यंत्र विकत घेतो त्यावेळीं या यंत्राच्या साहाय्यानें उत्पन्न झालेला किती माल बाजारांत येईल व त्याला मागणी कितपत असेल या सर्व गोष्टींचा अंदाज त्याला कसा करतां येईल ? यंत्रसामुग्रीची किंमत तर ती विकत घ्यावयाच्या वेळींच ठरावयाची असते. त्यावेळीं वरील सर्व गोष्टींचा नक्की अंदाज करतां आला नाहीं तर तिचें मूल्यही ठरविणें अशक्य होऊन जाईल. पण प्रत्यक्ष व्यवहारांत तसें घडून येत नाहीं. या अंदाजाकरितां यंत्रसामुग्रीची खरेदीविक्री थांबून राहात नाहीं. पण केवळ बाजारांतील मागणी-पुरवठ्यावरच मूल्याचा सिद्धांत प्रस्थापित करूं पाहणाऱ्या या अर्थशास्त्रज्ञांना मुळांतच वस्तूची पैदास कमी जास्ती कां होतें, याचें उत्तर देतां येत नाहीं. बुटाच्या जोडीपेक्षां कोटाची किंमत 'बाजारांत' अर्थातच जास्त ठरते. कारण काय तर गरजेच्या मानानें बुटांची पैदास जास्त होते व कोटाची तितकी होत नाहीं. पण कोटापेक्षां बुटांची पैदास जास्त कां व्हावी, हें मात्र उपयुक्ततेचा पुरस्कार करणाऱ्या अर्थशास्त्रज्ञाना सांगतां येत नाहीं. हे सर्व अर्थशास्त्रज्ञ वस्तूचें मूल्य ठरविण्याच्या कामीं खरेदी व विक्री करण्याकरितां आलेल्या लोकांच्या अव्यक्त मानसिक भावनांना व व्यापारांनाच जास्त महत्त्व देतात व त्यांच्या आधारावरच आपला सिद्धांत सिद्ध करूं पाहतात, यामुळें या सिद्धांताला कांहीं शास्त्रीय आधार आहे, असें म्हणतां येत नाहीं.

याकरितां वस्तु निर्माण करतांना जे मानवी श्रम खर्ची पडलेले असतात ते तिचें मूल्य ठरवितांना गृहीत धरले पाहिजेत, हा प्रत्यक्ष अनुभवावर बसविलेला सिद्धांतच या बाबतींत बुद्धीला अधिक पटणारा व सत्याच्या जास्त जवळ आहे. या सिद्धांताचा पहिला पुरस्कर्ता ॲडॅम स्मिथ होय. जी वस्तु आपल्याला सुलभतेनें मिळते त्या वस्तूला मनुष्य कांहींच किंमत देत नाहीं व जी वस्तु प्राप्त करून घेण्याकरितां श्रम पडतात तीं तो जास्त

किमतीची मानतो. या रोजच्या अनुभवावर त्यानें आपल्या सिद्धांताची उभारणी केली आहे. डेव्हिड रिकार्डोनें हा सिद्धांत यापेक्षा अधिक स्पष्ट रीतीनें मांडला आहे. वस्तु निर्माण करण्याकरिता प्रत्यक्ष जे श्रम लागतात त्यावरूनच वस्तूचें मूल्य ठरविता येतें. वस्तु अधिक सुलभतेनें मिळते किंवा ती जवळ असल्यामुळें जे श्रम वांचतात त्यावरून वस्तूचे मूल्य ठरविण्यात अर्थ नाही, असें रिकार्डोचें म्हणणें आहे. रिकार्डोनें आपला हा सिद्धांत पुढील उदाहरण देऊन अधिक स्पष्टपणें मांडून दाखविला आहे. एक कोट तयार करण्यास समजा १०० तास श्रम करावे लागतात आणि बुटाची जोडी करावयास ५० तासाचे श्रम पुरे होतात. बाजारात तर एक कोट व बुटाचा एक जोड यांचें मूल्य सारखेच आहे. म्हणजे एक कोट दिला तर बुटाचा एक जोड मिळतो. अशा परिस्थितीत शिंप्याच्या १०० तासाच्या श्रमाचें मूल्य चांभाराच्या ५० तासाच्या श्रमाच्या मूल्याइतकें आहे. चांभार एक बुटाचा जोड ५० तासात तयार करून चांगल्या सुखानें राहूं शकतो व त्याला त्याच्या श्रमाची योग्य किंमत मिळते. शिंप्यालाही चांभाराइतकेंच सुखी व्हावयाचें असेल तर त्याला चांभारापेक्षा दुप्पट काम करावें लागेल. या गोष्टीचा सहजच असा परिणाम होईल कीं, शिंपीलोक आपल्या मुलांना चांभाराचाच धंदा शिकवतील आणि सर्व समाजात शिंप्याची संख्या फारच थोडी होऊन जिकडे तिकडे चांभारच चांभार दिसूं लागतील. अशा प्रकारची विषम परिस्थिति निर्माण झाली म्हणजे शिंप्याच्या धंद्याला पुन्हां महत्त्व प्राप्त होईल आणि चांभाराच्या धंद्याला उतरती कळा लागेल. अशा 'मुक्तस्पर्धे'मुळें जो तो आपल्या इच्छेप्रमाणें धंद्याची निवड करील.. या परिस्थितीत मनुष्य कोणताही धंदा करो. एका धंद्यात तो जितके श्रम करील तितकेच श्रम त्यानें दुसऱ्या कोणत्याही धंद्याकरितां खर्ची घातले तर त्या दोन्ही श्रमाचें मूल्य एकसारखेच होईल. मुक्तस्पर्धेचा हा सहज परिणाम आहे. यामुळें सर्व धंद्यांतून जरूर तितकी माणसे वांटून दिलीं जातात आणि उद्योगधंद्याच्या बाबतीत एक प्रकारची समानता निर्माण होते.

रिकार्डो व स्मिथ यांच्या सिद्धांतांमध्यें मुख्य फरक असा आढळून येतो कीं, स्मिथ आपल्या सिद्धांताची उभारणी मनुष्याच्या मनोभावनेवर करतो. एखादी वस्तु मिळविणें माणसाला जितकें जितकें कठिण वाटतें तितकी तितकी ती

त्या वस्तूला जास्त जास्त किंमत देण्यास तयार होतो. स्मिथची ही विचारसरणी रिकार्डोला मान्य नाहीं. रिकार्डो स्मिथप्रमाणें वस्तूचें मूल्य ठरविण्याच्या बाबती' व्यक्त मनोभावनेवर विसंबून राहात नाहीं. तो आपला सिद्धांत प्रत्यक्ष रोजच्या अनुभवानेंच सिद्ध करून दाखवितो. समाजाची आजची जी परिस्थिति आहे तीमुळें व मुक्तस्पर्धेमुळें धंदा कोणताहि असो सारख्या श्रमाला सारखेंच मूल्य प्राप्त होतें, तें व्यक्तींच्या मनोभावनांवरून ठरत नाहीं, असें रिकार्डोचें म्हणणें आहे. वस्तूचें मूल्य निश्चित होतें तें आकस्मिक रीतीनें किंवा अप्रत्यक्षपणें निश्चित होत नाहीं. वस्तूचें मूल्य बाजारांत जें अस्थिर असतें तें एका स्थिर मूल्याच्या आसपास असतें व हें स्थिर मूल्य त्या वस्तूच्या उत्पादनाच्या किंमतीनेंच ठरत असतें. अस्थिर मूल्य स्थिर मूल्याच्या कक्षेत राहाण्यास बाजारांतील मुक्तस्पर्धाच कारणीभूत होते. मनोभावनेचा या कामीं कांहीं उपयोग नाहीं, असें स्पष्टपणें सांगणारा रिकार्डो हा पहिला अर्थशास्त्रज्ञ होय.

मग प्रत्येक वस्तु निर्माण करण्याकरितां जे श्रम खर्ची पडले व त्यामुळें तिला जें मूल्य प्राप्त झालें तितकीच त्या वस्तूची किंमत मालकाला बाजारात मिळते काय ? याचें उत्तर नकारार्थीच द्यावें लागतें. कारण बाजारांत ती वस्तु विकण्याकरितां मांडली जाते त्यावेळीं तिच्या अंगभूत मूल्याइतकीच तिची किंमत येईल, असें सांगतां येत नाहीं. कारण वस्तूचें 'मूल्य' म्हणजे वस्तूची 'किंमत' नव्हे. वस्तूची निर्मिति होते त्यावेळीं तिचें 'मूल्य' ठरतें व वस्तूची पैशाच्या रूपांत मोजली जाणारी 'किंमत' बाजारांत निश्चित होते. समाजांत ज्या वस्तूची जितक्या प्रमाणात गरज आहे तितक्याच बरोबर प्रमाणांत ती वस्तु निर्माण करण्याची व्यवस्था करण्यांत आल्यास वस्तूचें 'मूल्य' व वस्तूची 'किंमत' यांत फरक राहणार नाहीं. एक वस्तु निर्माण करण्याकरितां दहा तास खर्ची पडले तर तितकेच श्रम ज्या दुसऱ्या वस्तूकरितां पडले असतील तिच्याशीं तिचा विनिमय होण्यास कांहींच अडचण राहणार नाहीं. परंतु आजच्या समाजाचे आर्थिक व्यवहार अव्यवस्थित व असंघटित असल्यामुळें कांहीं वस्तु वाजवीपेक्षां फाजील निर्माण होतात व कांहीं जरूरीपेक्षांही कमी प्रमाणांत निर्माण होतात. मालाच्या निर्मितीच्या प्रमाणांत कधीं चढ तर कधीं

उतार होत असल्यामुळें बाजारांत स्पर्धेला सुरुवात होते. मालाचा पुरवठा जास्त झाला कीं, माल विकणाऱ्या लोकांत स्पर्धा वाढते आणि विकत घेणाऱ्या लोकांतील स्पर्धेचें प्रमाण कमी होतें. उलट "गिरमी वाढली व पुरवठा कमी झाला तर माल विकणाऱ्या लोकांतील स्पर्धेचें प्रमाण कमी होतें आणि विकत घेणाऱ्या लोकातील स्पर्धा वाढते. मालाच्या फाजील निर्मितीचा परिणाम साहजिकच असा होतो कीं, मालाची किंमत कमी होते व त्यानें जें अंगभूत मूल्य असतें त्यापेक्षांही कमी किंमतीला तो माल विकणें भाग पडतें. मालाची निपज कमी झाली कीं, हें पारडें पालटतें. पुरवठ्या-पेक्षां मागणी जास्त होते व मालाच्या अंगभूत मूल्यापेक्षा त्याची किंमत वाढते. म्हणून किंमत व मूल्य हीं कधींही सारख्या प्रमाणांत असूं शकत नाहीत. कारण किंमत बाजारातल्या परिस्थितीवर अवलंबून असते. पुरवठा व मागणी याच्या चढउताराबरोबर तीही कधीं कमी तर कधीं जास्त होत असते. परंतु मालाच्या किंमतींत कितीही चढउतार झाले तरी मालाच्या सामान्य अंगभूत मूल्याची पातळी कायमच राहते. समुद्राच्या पाण्याची स्वाभाविक पातळी व समुद्राच्या लाटा याचा जसा संबंध आहे तसाच मालाचें मूल्य व त्याची किंमत याचा संबंध आहे, असें जॉन स्टुअर्ट मिलनें म्हटलें आहे. समु-द्राच्या लाटा पाण्याच्या पातळीच्या कधीं वर चढल्या किंवा कधीं खालीं गेल्या तरी समुद्राच्या स्वाभाविक पाण्याच्या पातळीला त्यामुळें धक्का पोचत नाहीं. मिलची तुलना खरोखरीच समर्पक व बुद्धीला पटणारी आहे यात शंका नाहीं.

वस्तूची निर्मिती करण्याकरितां लागणाऱ्या श्रमाच्या प्रमाणावरून वस्तूचें मूल्य निश्चित करतां येतें, हा रिकार्डोचा सिद्धांत मार्क्सनें मान्य केला आहे आणि हा सिद्धांत अधिक स्पष्ट करण्याकरिता आणखींही कांही प्रमाणें देऊन बाजारात ज्या अनेक घडामोडी होतात त्यांचें कारण काय व त्यांचा मालाच्या किंमतीवर कसा परिणाम होतो याचेंही सूक्ष्म विवेचन मार्क्सनें केलें आहे. मालाच्या परस्परविनिमयाकरितां पैशाचें माध्यम ज्या समाजांत रूढ झालेलें नाही व ज्यात सर्व वस्तूंचा विनिमय प्रत्यक्ष वस्तूंच्या देव-घेवीनेंच होतो अशा एका समाजाची कल्पना करून मार्क्सनें आपल्या विचारांची पुढीलप्रमाणें मांडणी केली आहेः—

समजा, एका विणकऱ्यानें २० वार तागाचें कापड विणलें आहे. हें कापड त्यानें आपली एकादी प्रत्यक्ष गरज भागविण्याकरितां विणलेलें नाहीं. एका शिंप्यानें असाच एक कोट शिवला आहे. त्याचीही त्याला आज प्रत्यक्ष गरज नाहीं. या विणकऱ्यानें व शिंप्यानें आपल्या जवळील या मालाचा विनिमय करण्याचें ठरविलें आणि विणकऱ्यानें २० वार तागाचें कापड देऊन शिंप्याकडून कोट विकत घेतला. विणकरी यापुढें स्वस्थ बसला नाहीं. एका गादीची त्याला गरज होती. २० वार कापड देऊन त्यानें एक गादी विकत आणली. २० वार कापड देऊन त्यानें एक टेबल आणलें, २० वार कापड देऊन त्यानें आपल्या घरचें भाडें भागविलें, आणखी २० वार कापड देऊन त्यानें १० शेर धान्यही खरेदी केलें. या सर्व वस्तूंचें उपयुक्ततामूल्य अर्थात्‌च निरनिराळें होतें आणि यातील कच्चा मालही भिन्न भिन्न प्रकारचा होता. कापड सुताचें विणलेलें होतें व टेबल लाकडाचें बनविलेलें होतें. शिवाय वस्तूंचें उपयुक्ततामूल्य भिन्न भिन्न प्रकारचें असतें म्हणूनच परस्परविनिमयाचा व्यवहार शक्य होतो. धान्य भूक शमविण्याकरितां, वस्त्र अंग झांकण्याकरिता, घर राहण्याकरितां व गादी निजण्याकरितां उपयोगी पडते. या उपयुक्ततेंत भिन्नताच नसेल तर कापड देऊन कापड किंवा गादी देऊन गादी कोणीही घेणार नाहीं. निरनिराळ्या वस्तु निरनिराळ्या लोकांच्या निरनिराळ्या गरजा भागवितात म्हणूनच त्यांचा विनिमय होत असतो. मग याप्रमाणें वस्तूंच्या उपयुक्ततेमध्यें मुळांतच भिन्नता असतांना त्यांच्यामध्यें असें कोणतें साम्य आहे कीं, ज्यामुळें या वस्तूंचा परस्परविनिमय शक्य होतो ? प्रत्येक वेळीं वीस वार तागाचें कापड देऊन विणकऱ्यानें निरनिराळ्या वस्तु खरेदी केल्या. या सर्व व्यवहारांत आपल्याजवळची वस्तु मोबदल्यादाखल देऊन त्याला जी वस्तु पाहिजे होती ती त्यानें घेतली. ज्या समाजांत पैशाचें माध्यम अस्तित्वांत आलेलें नाहीं त्यांत सर्व व्यवहार अशाच रीतीनें होतात. मग विनिमय करण्यांत येत असलेल्या या वस्तूंमध्यें असा कोणता सामान्य गुण आहे कीं, ज्याच्या आधारावर वस्तूंचा परस्परविनिमय करतां येतो ? उपयुक्तता हा या बाबतींतील सामान्य गुण आहे, असें मानतां येत नाहीं. कारण प्रत्येक वस्तूंतील उपयुक्तता निरनिराळ्या स्वरूपाची असते आणि उपयुक्ततेची भावनाही

वेळोवेळीं बदलत राहते. एकदां हें उपयुक्ततेचें प्रमाण नाकारल्यावर वस्तूंच्या विनिमयाला व त्याचें मूल्य ठरविण्याला एकच प्रमाण शिल्लक राहतें व तें प्रमाण म्हणजे वस्तु निर्माण करण्याकरितां लागलेले श्रम होत. या श्रमशक्तीच्या आधारावरच सर्व वस्तूंचा विनिमय करता येतो व त्याचें मूल्य ठरविता येते, असा कार्ल मार्क्सचा सिद्धात आहे. भिन्न भिन्न वस्तु निर्माण करण्याकरिता लागणाऱ्या श्रमाचा प्रकार अर्थात् भिन्न भिन्न असतो. शिंपी आपल्या कामात आपल्या हाताचा जास्त उपयोग करतो तर विणकर आपल्या पायाचा जास्त उपयोग करतो आणि शिक्षकाला आपलें काम करताना डोकें खाजवावें लागतें, मेंदूस शीण द्यावा लागतो. श्रमाचे प्रकार याप्रमाणें निरनिराळे असले तरी सामान्यतः मानवी श्रमशक्तीच या प्रत्येक कामांत खर्ची पडलेली असते. वीस वार तागाचे कापड व एक कोट, या दोहींचें मल्य एकच आहे, असें जेव्हा आपण म्हणतों त्यावेळीं कापड विणण्याला किंवा कोट शिवण्याला सारखेच श्रम खर्ची पडले आहेत, असाच त्या म्हणण्याचा अर्थ असतो. दोन वस्तूंचा विनिमय करण्यांत आला या प्रत्यक्ष व्यवहारावरून असें दिसून येतें कीं, या दोन्ही वस्तूंचें मूल्य निश्चित करण्यात आलें आहे व तेंमुद्दां या वस्तु निर्माण करण्याकरितां जे श्रम पडले त्यावरूनच निश्चित करण्यात आलें आहे. वस्तूंचा जो विनिमय होतो तो अशा तुलनेनेंच होत असतो. वस्तूंची परस्पर तुलना करावयाची म्हणजे त्यांत काहीतरी सामान्य गुण असावाच लागतो, आणि हा सामान्य गुण म्हणजे दुसरें कांहीं नसून त्या वस्तु निर्माण करण्याकरितां जी श्रमशक्ति खर्ची पडली तीच होय असें मार्क्सचें म्हणणें आहे. कोणतीही वस्तु निर्माण करण्याकरिता कांही तास किंवा कांही दिवस श्रम करावे लागतात. वस्तु निर्माण करण्याकरिता लागणारी श्रमशक्ति याच मापानें मोजण्यांत येते. वीस वार तागाचे कापड देऊन त्याच्या बदली एक कोट मिळाला. याचा अर्थ वीस वार कापड विणावयास जितका वेळ लागला तितकाच वेळ कोट शिवण्यास लागला. वीस वार कापड विणण्यास १० तास लागतात व एक कोट शिवावयासही १० तास लागतात. विणकऱ्यानें कापड देऊन शिंप्याकडून कोट घेतला म्हणजे काय केलें तर आपले दहा तासाचे श्रम विकले व दुसऱ्याच्या दहा तासाचे श्रम विकत

घेतले. या रीतीनें दोन्ही वस्तूंचें मूल्य एकच झालें. एकादा विणकर आपल्या धंद्यात चांगला बाकबगार असेल व तो २० वार कापड अवघ्या ५ तासांतच विणून तयार करील, तरी त्याला वीस वार कापडाबद्दल एकच कोट मिळेल. २० वार कापड विणण्याला या विणकऱ्याला पांचच तास लागले व कोट शिवण्याला पूर्वीप्रमाणें १० तास लागले. म्हणून वरील विनिमयाच्या व्यवहारांत कांहीं फरक होणार नाहीं. कारण श्रमशक्तीचें जें प्रमाण ठरविण्यांत येतें तें सर्वसामान्य कारागिराला अमुक एक वस्तु तयार करावयास किती वेळ लागतो याच्यावरूनच ठरविलेलें असतें. समजा, उलटपक्षीं हा विणकर आळशी झाला. त्याला योग्य तीं उपकरणें मिळालीं नाहींत आणि त्याला वीस वार कापड विणण्याला १० तासांच्या ऐवजीं २० तास लागले, म्हणून हा विणकर एकाऐवजीं दोन कोटांची मागणी करूं शकणार नाहीं. त्याला २० वार कापड देऊन एकच कोट मिळेल. श्रमशक्तीचें प्रमाण अशा अपवादात्मक परिस्थितीनें ठरविलें जात नाहीं, तर सामान्य कारागीर समाजांत प्रचलित असलेल्या उपकरणांचा व साधनांचा उपयोग करून फार जलदही नाहीं किंवा फार सावकाशही नाहीं अशा रीतीनें काम करून ज्या वेळांत एकादी वस्तु निर्माण करतो त्या वेळेच्या प्रमाणांतच श्रमशक्तीचें प्रमाण सामान्यतः ठरविलें जातें. मार्क्स ज्या ज्या वेळीं श्रमशक्तीचा उल्लेख करतो त्या त्या वेळीं 'सामाजिक अवश्य श्रम' अशा अर्थानें तो तिचा उल्लेख करीत असतो. केवळ एकाद्या व्यक्तीनें एकादी वस्तु निर्माण करण्याकरितां कांहीं तास श्रम केले येवढ्या एकाच प्रमाणावरून त्या वस्तूचें मूल्य ठरवितां येणार नाहीं. तर एकादा सामान्य मनुष्य समाजांत प्रचलित असलेल्या साधनांचा उपयोग करून सामान्यपणें जितके तास श्रम करून ती वस्तु निर्माण करतो त्यावरूनच वस्तूचें मूल्य ठरवितां येतें. वस्तु निर्माण करतांना ज्याप्रमाणें समाजांत उपलब्ध असलेल्या साधनांचा उपयोग करावयास पाहिजे त्याचप्रमाणें हे श्रम करणें समाजास आवश्यकही असलें पाहिजे. एकादा मनुष्य कितीही तास चाळणींतून पाणी चाळत राहिला तरी त्याच्या या श्रमाला कोणीही किंमत देणार नाहीं व समाजास अनवश्यक असलेल्या श्रमाचें चीज होणार नाहीं. जी वस्तु निर्माण करावयाची तिच्याकरितां श्रम करणें समाजाला आवश्यक वाटलें पाहिजे व

समाजाची जी औद्योगिक परिस्थिति आहे व या परिस्थितींत उत्पादनाची जीं साधनें प्रचलित आहेत त्यांचा उपयोग करण्यांत आला पाहिजे. अशा रीतीनें सामान्य बुद्धीचा मनुष्य एकादी वस्तु निर्माण करण्याकरितां जितके तास श्रम करतो त्यालाच कार्ल मार्क्स " सामाजिक अवश्य श्रम " असें नाव देतो आणि या श्रमाच्या प्रमाणावरूनच कोणत्याही वस्तूचें मूल्य ठरवितां येतें, असा सिद्धांत तो प्रतिपादन करतो. मार्क्सच्या या सिद्धांतामुळें जुन्या अर्थशास्त्रज्ञांच्या विचारात ज्या उणीवा राहिल्या होत्या त्या भरून निघाल्या आहेत. बाजारांत ज्या घडामोडी होतात व वस्तूंच्या किंमतींत जो सारखा चढउतार होत असतो त्याचाही उलगडा मार्क्सच्या सिद्धांतानें करतां येतो.

पैशाच्या रूपानें व्यक्त झालेलें वस्तूचें मूल्य म्हणजेच वस्तूची किंमत होय, हें मागेंच सांगितलें आहे. कांही देशात ही किंमत सोन्याच्या नाण्यानें तर कांहीं देशांत चादीच्या नाण्यानें व्यक्त केली जाते. सोन्याचांदीचें मूल्य-मुद्धां इतर वस्तूंप्रमाणें ते निर्माण करण्याकरितां जे 'सामाजिक आवश्यक श्रम' खर्ची पडलेले असतात त्यावरूच ठरत असतें. आपल्या देशांतील माल पाटवून दुसऱ्या देशांतील सोनें किंवा चांदी आपण खरेदी करतों म्हणजे आपण या दोन्ही मालांच्या निर्मितीकरितां लागलेल्या श्रमाचाच विनिमय करीत असतो. बाजारांत आलेल्या वस्तूचें मूल्य आपण पैशानें व्यक्त करतों म्हणजे आपण दुसरें कांहीं करीत नाहीं तर या सर्व वस्तूंच्या मूल्याला सर्वसामान्य रूप देतो. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे त्या त्या वस्तूच्या निर्मितीकरितां लागलेले श्रम आपण पैशाच्या आंकड्यानें बोलून दाखवितों, व वस्तूच्या अंगभूत मूल्याला बाजारी किंमत देतों. वस्तूची बाजारी किंमत व तिचें अंगभूत मूल्य यांचा परस्परसंबंध काय हें आपण आतां पाहूं. बाजारांत माल विक्रीकरितां आला म्हणजे त्याचा कांहीं तरी एक नक्की दर ठरत असतो. हा दर एकदां नक्की ठरला म्हणजे हा माल ज्यांनी निर्माण केलेला असतो त्या सर्वांना तो त्याच दरानें विकावा लागतो. माल निर्माण करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला तो निर्माण करतांना कोणत्या अडचणी आल्या असतील, कोणत्या परिस्थितींत त्यानें तो निर्माण केला असेल, कोणतीं साधनें त्यानें उपयोगांत आणली असतील, असा व्यक्तिविषयक श्रमाचा विचार मालाचा दर ठरत असतांना होत नसतो. अमुक एका जिनसाचा बाजारांत अ

इतक्या प्रमाणात पुरवठा होण्याला सामान्यतः किती "सामाजिक अवश्य श्रम" खर्ची पडले असले पाहिजेत व कोणत्या सामान्य परिस्थितींत तो निर्माण झाला असला पाहिजे, एवढाच विचार मालाची बाजारी किंमत ठरतांना होत असतो. या तत्त्वावर खरोखरीच मालाची किंमत ठरली तर अंगभूत मूल्य व तिची बाजारी किंमत यांत फारसा फरक पडणार नाही. पण प्रत्यक्ष व्यवहारांत तसें घडून येत नाहीं. वस्तूची बाजारी किंमत तिच्या अंगभूत मूल्यापेक्षां कधीं चढलेली तर कधीं उतरलेली दिसून येते. बाजारी किंमतींत हा चढउतार सारखाच चालू असतो. मागें सांगितल्याप्रमाणें समुद्राच्या लाटा कितीही वर उसळल्या किंवा त्या कितीही खालीं गेल्या तरी समुद्राची सामान्य पातळी ज्याप्रमाणें बिघडत नाहीं, त्याप्रमाणें मालकाला मिळणाऱ्या बाजारी किंमतींत मागणी व पुरवठ्यानुसार कितीही चढउतार झाले तरी वस्तूचें अंगभूत मूल्य बदलत नाहीं.

आतांपर्यंतच्या तात्त्विक विवेचनांत मूल्य व किंमत याचा परस्परसंबंध काय, हें आपण पाहिलें. परंतु आजच्या समाजाच्या आर्थिक रचनेवरून असें दिसून येतें कीं, मालाचें उत्पादन मूल्याकरिता होत नसून तें केवळ नफ्याकरिता होत आहे. श्रमसिद्धांत व नफ्याकडे दृष्टि ठेवून केलेलें उत्पादन या दोन गोष्टीवरूनच पुढें मार्क्सनें भांडवलाच्या व्यवहाराचे नियम निश्चित केले आहेत. या नियमांतील सर्वांत महत्त्वाचा नियम म्हणजे मजूरवर्गाच्या श्रमापैकीं कांहीं अंशाचा सारखा अपहार करून होणारी भांडवलाची वाढ होय. 'अतिरिक्त मूल्य' सिद्धांताच्या साहाय्यानें याच अपहाराचा विचार मार्क्सनें केला आहे.

# अतिरिक्त मूल्य

कार्ल मार्क्सनें जे अनेक सिद्धांत शोधून काढले त्या सर्वांत " अतिरिक्त मूल्य " हा त्याचा अत्यंत महत्त्वाचा सिद्धांत होय. श्रमसिद्धांताचा मार्क्सनें जो विचार केला आहे तशा दृष्टीनें विचार करणारे कांहीं अर्थशास्त्रज्ञ त्याच्या पूर्वी होऊन गेले होते. पण अतिरिक्तमूल्य सिद्धांताची कल्पना मार्क्सनेंच काढली. या सिद्धांताचें संशोधन करून त्याची योग्य तऱ्हेनें मांडणी करण्याचें सर्व श्रेय समाजसत्तावादाला शास्त्रीय स्वरूप देणाऱ्या मार्क्सलाच दिलें पाहिजे. " आर्थिक जीवनांतील अनेक भानगडीच्या प्रश्नावर पूर्णपणें नवा प्रकाश पाडणारा असा हा सिद्धांत आहे, " असें एंजल्सचे म्हणणें असून मार्क्सच्या ऐतिहासिक प्रकृतिवादाच्या सिद्धांताइतकेंच या सिद्धांतालाही त्यानें महत्त्व दिले आहे.

बाजारांत जी वस्तु विक्रीकरिता येते तिच्यांत दोन गुण अगदीं अवश्य असावे लागतात. या वस्तूमुळें मनुष्याची कोणती तरी गरज पूर्ण झाली पाहिजे व दुसरें ही वस्तु तयार करण्याकरिता ' सामाजिक अवश्य श्रम ' खर्ची पडले पाहिजेत. देहच नसेल तर ज्याप्रमाणें आत्म्याची कल्पनाच करतां येत नाहीं त्याप्रमाणें वस्तूच्या ठिकाणीं कांहीं तरी उपयुक्ततेचा गुण नसेल तर ती निर्माण करण्याकरितां 'सामाजिक अवश्य श्रम' खर्ची पडले पाहिजेत, अशी कल्पनाच करतां यावयाची नाहीं. त्याचप्रमाणें पण्यवस्तूला कोणी तरी विकणारा मालक असतोच. बाजारांत वस्तु विकण्याकरितां आणावयाची म्हणजे मालकाला तिचा कांही उपयोग नसला पाहिजे, हें उघड आहे. ज्या वस्तूची आपल्याला प्रत्यक्ष गरज आहे अशी कोणतीही वस्तु बाजारांत कोणीही विक्रीकरितां आणणार नाहीं. वरील तीन्ही गुण जिच्या ठिकाणीं आहेत तिलाच पण्यवस्तु किंवा बाजारांत विकण्याकरिता आलेली वस्तु किंवा बाजारांत विकण्याकरितां आलेला माल, असें चोख रीतीनें म्हणता येईल.

प्राचीनकाळीं ज्यावेळीं गुलामगिरीची प्रथा अंमलांत होती त्यावेळीं

श्रमशक्ति ही बाजारांत विकण्याची वस्तु बनलेली नव्हती. कारण श्रमशक्तीचा सांठा जो गुलाम त्याच्या श्रमशक्तीचा ' स्वतंत्रपणें ' हवा तसा उपयोग मालकाला करतां येत असे. गुलाम हा मालकाच्या खासगी मिळकतीपैकींच एक वस्तु बनला होता. त्याच्या प्राणावर व देहावर मालकाचा ताबा होता. त्याचप्रमाणें तो जें कांहीं उत्पन्न करील त्यावरही अर्थात् मालकाचाच ताबा राहात असे. गुलामगिरीची पद्धति नष्ट होत चालली तसतशी मनुष्याची आपल्या श्रमशक्तीवरील मालकी वाढत चालली. मध्ययुगांत जमीनदार लोक आपलीं शेतें खंडानें देत, पण या कुळांच्या देहांवर ते मालकी सांगूं शकत नसत. शेतकरीच आपल्या देहाचे मालक होते. पण त्याच्या श्रमाच्या फळावर जमीनदाराची मालकी होती. ज्या देशांत ही जमीनदारीची पद्धति अद्यापि अंमलांत आहे तेथें कुळांना आपल्या श्रमाचें फळ जमिनीच्या मालकांना द्यावें लागत आहे. हे ' भूदास ' जमीनदाराचे किंवा सावकारांचे गुलाम नसले तरी अप्रत्यक्षपणें त्यांना आपले देह विकावे लागतच आहेत.

गुलामगिरीची पद्धति नष्ट झाल्यानंतर कारागीरवर्ग मात्र आपल्या श्रमाचा मालक बनला. कारागीर जोंपर्यंत आपली उपजीविका चालविण्याकरितां स्वतःच्या मालकीच्या हत्यारांनीं स्वतःच्या लहानशा कारखान्यांतच राबत होता व आपल्याला लागणारा कच्चा माल तो स्वतःच विकत घेत होता तोंपर्यंत आपल्या श्रमशक्तीचा तो पूर्णपणें मालक होता. त्याची श्रमशक्ति बाजारांतील विकण्याची वस्तु बनलेली नव्हती. लहान प्रमाणावर कां होईना कारागीर स्वतंत्रपणें धंदा करून राबत होता व आपल्या सर्व श्रमांचा उपयोग आपल्या स्वतःच्या गरजा भागविण्याकडे करीत होता.

पण औद्योगिक क्रांतीनंतर ही स्थिति पालटली. भांडवलशाहीची वाढ होऊं लागली. मोठमोठे कारखाने अस्तित्वांत येऊं लागले. कारागिरांनीं एकेकट्याच्या जबाबदारीवर चालविलेले लहान लहान कारखाने नष्ट झाले. बाजारांतील चढाओढींत टिकून राहणें त्यांना अशक्य झालें. कारागिराला आपलीं साधीं हत्यारें बाजूला ठेवावीं लागलीं व मोठमोठ्या कारखान्यांतून मजूर म्हणून काम करावें लागलें. आपल्या श्रमाचा फायदा त्याला मिळेनासा झाला, लोकांकरितां तो राबूं लागला व बाजारांत ज्याप्रमाणें

अनेक वस्तु विक्रीकरतां येतात त्याप्रमाणें कारागिराची श्रमशक्तिही एक पण्यवस्तु बनली.

इतर अनेक पण्यवस्तूंप्रमाणें श्रमशक्तीच्या ठिकाणींही नैसर्गिक व सामाजिक असे दोन धर्म आहेत. कच्च्या मालापासून पक्का माल तयार करून तो समाजाला उपयुक्त होईल असा बनवून देणें—उदाहरणार्थ, कातड्याचे जोडे बनविणें, कापसाचें कापड बनविणें, लोखंडापासून हत्यारें व यंत्रें निर्माण करणें, हा या श्रमशक्तीच्या अंगीं असलेला नैसर्गिक धर्म होय. आणि खुद्द श्रमशक्ति निर्माण करण्यासाठीं लागणारी सामुग्री निर्माण करण्याकरितां सामाजिकरीत्या जितक्या श्रमाची आवश्यकता आहे तितके श्रम करणें हा श्रमशक्तीच्या अंगीं असलेला सामाजिक धर्म होय. श्रमशक्तीच्या अंगीं असलेल्या या सामाजिक धर्माचें स्वरूप कशा प्रकारचें असते, याचें विवेचन मार्क्सनें फारच सूक्ष्मपणें केलें आहे. श्रमशक्ति म्हणजे मानवी जीवनाव्यतिरिक्त दुसरी कांहीं स्वतंत्र वस्तु आहे, अशांतला भाग नाहीं. माणसाच्या नसानसांतून वाहणारी जीवनशक्ति म्हणजेच श्रमशक्ति होय. मेंदू, रक्त, स्नायू, शिरा व हाडें इत्यादींचीच ती बनलेली आहे. मानवी जीवनशक्ति व श्रमशक्ति ह्या दोन्हींही अभिन्न आहेत. जीवनाला अवश्य असलेल्या गरजा पूर्ण करण्याचें सामर्थ्य ज्यावेळीं माणसाच्या ठिकाणीं असतें त्यावेळींच तो श्रम करण्याला समर्थ होतो. जीवनाला अवश्य असलेल्या गरजा मनुष्य जितक्या जितक्या अधिक चांगल्या व समाधानकारक रीतीनें पूर्ण करूं शकतो तितका तितका तो अधिक श्रम करण्यास समर्थ होत जातो. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे मानवी जीवनाला अवश्य असलेल्या वस्तु निर्माण करण्याकरितां जे 'सामाजिक अवश्य श्रम' खर्ची पडतात त्याच्या प्रमाणावरूनच श्रमशक्तीचें मूल्य ठरत असतें. मानवी जीवनाला आवश्य असलेल्या वस्तु सर्वत्र सारख्याच असतात असें सांगतां यावयाचें नाहीं. मनुष्य ज्या नैसर्गिक, सांस्कृतिक व सामाजिक परिस्थितीत राहात असतो त्याच्यावर त्या अवलंबून असतात. उष्ण देशांत मनुष्याच्या गरजा सामान्यतः कमी प्रमाणांत असतात. राहावयास साधें घर, हलकीं पातळ वस्त्रें व निकस अन्न एवढ्यावर त्याचें भागतें. शीत प्रदेशांत श्रम करण्याकरितां लागणारी

उत्पादशक्ति निर्माण करण्यास यापेक्षां अधिक वस्तूंची गरज असते. या प्रदेशात माणसाला चागलें निवाऱ्याचें मजबूत घर, गरम कपडे व ज्यांत पुष्कळ चरबी आहे, असें अन्न लागतें. प्राचीन काळीं आजच्यापेक्षां माणसाच्या गरजा अधिक साध्या स्वरूपाच्या होत्या. आपण जितके आज सुरेख व ठाकठीक दिसावे, अशी काळजी घेतो तितकी काळजी त्यावेळचीं माणसें घेत नसत. ढुंगणाला एक साधें वस्त्र गुंडाळलें असतां त्याचें वस्त्राचें काम भागत असे. पण आजच्या त्यांच्या वंशजाला अंग झांकण्याकरितां नुसतें साधें वस्त्र असून भागत नाहीं तर समाजांत जी पद्धति रूढ असेल ती-प्रमाणें एक विशेष प्रकारचें कापड त्याला लागतें. त्याला राहण्याकरिता साधेंसुधें छप्पर असून भागत नाहीं तर अर्वाचीन शिल्पशास्त्राला अनुरूप व अर्वाचीन सुखसोयी असलेलें घर त्याला लागतें. श्रमशक्तीच्या बाबतींत आणखी एक गोष्ट लक्षांत घेणें जरूरीचें असतें. कामकरी हा जशाचा तसा कायम राहूं शकत नाहीं. तो अजरामर नाहीं. निसर्गतः तो म्हातारा होतो व जसजसा तो म्हातारा होत जातो तसतशी त्याची श्रम-शक्तिही कमी कमी होत जाते. याकरितां श्रमशक्तीची खरेदी करणाऱ्या माणसाला—कारखानदाराला— ती सारखी वाढत कशी राहील व आपले कार-खाने चालविण्याकरितां या मानवी मालाचा सारखा पुरवठा कसा होत राहील, याचाही विचार करावा लागतो. इतर जिवंत प्राण्यांप्रमाणें कामकऱ्यांची ही प्राणीयोनि जिवंत राखावयाची असेल तर त्याला कुटुंब करून राहतां येईल व त्याच्या मुलाबाळांना त्याला पोसतां येईल, अशी व्यवस्था झाली पाहिजे. अशी व्यवस्था झाल्यावर सहजच त्याची पुढील पिढी त्याची जागा भरून काढील. तेव्हां मजुरालाच नव्हे तर त्याच्या कुटुंबालाही त्याच्या भोंवतालच्या नैसर्गिक, सांस्कृतिक व सामा-जिक परिस्थितीप्रमाणें अन्न, वस्त्र व घर वगैरे ज्या आवश्यक गरजा लागतात त्या पुरविण्यासाठीं लागणारे सामाजिक श्रम म्हणजेच मजुराच्या श्रमशक्तीचें मूल्य होय.

समजा, मजूर एक दिवस ( १० तास ) काम करण्यास समर्थ व्हावा म्हणून अन्न वगैरे त्याला लागणाऱ्या वस्तु निर्माण करण्याकरितां जितके श्रम लागतात तितके श्रम तो ५ तासांतच करूं शकतो. म्हणजे पांच तास

काम करून तो जो माल निर्माण करतो त्याची किंमत इतकी असते की, त्या किंमतीत त्याला व अर्थात् त्याच्या कुटुंबालाही त्या दिवसाकरिता लागणाऱ्या सर्व वस्तु मिळूं शकतात. ही गोष्ट आपली थोडी स्पष्ट रीतीनें सांगावयाची म्हणजे मजुराच्या व त्याच्या कुटुंबाच्या एका दिवसाच्या उदर-निर्वाहाकरितां जें सामान लागतें त्याच्या किंमतीइतका माल तो पांच तास श्रम करून निर्माण करूं शकतो. पण मजूर तर प्रत्यक्ष सबंध दिवस म्हणजे १० तास राबतो. तेव्हां बाकीच्या ५ तासांत तो जो माल निर्माण करतो त्याचें मूल्य म्हणजेच "अतिरिक्त मूल्य" होय. मजूर हे जे अधिक पांच तास श्रम करतो त्यालाच "निर्वेतन श्रम" म्हणजे ज्या श्रमाकरितां कांहीं वेतन मोबदला दिलेलें नाहीं, असे श्रम म्हणतात. "अतिरिक्त मूल्य ज्यांतून निर्माण होतें, अशी ही एकच एक वस्तु आहे, व ती म्हणजे श्रमशक्ति होय," असें मार्क्सचें म्हणणें आहे. श्रमशक्ति मिळविण्याकरितां जेवढ्या किंमतीचा माल लागतो त्यापेक्षां जास्त किंमतीचा माल निर्माण करणें, हा श्रमशक्तीचा स्वाभाविक धर्म आहे. जितक्या किंमतीचें खावें त्यापेक्षां जास्त किंमतीचें दूध द्यावें हा ज्याप्रमाणें दुभत्या जनावरांचा सहज-धर्म आहे, तसेंच मजुरांचेही आहे. तो जितकी मजुरी घेतो त्यापेक्षां किती-तरी जास्त किंमतीचा माल तो निर्माण करतो. म्हणूनच मजुरांचे श्रम विकत घेणाऱ्या मालकाला नफा होतो. मजुराच्या निर्वेतन श्रमशक्तींतूनच नफ्याची निर्मिति होत असते. जर मजुराजवळ खुद्द स्वतःचीं हत्यारें असतील, कच्चा मालही खुद्द त्याच्या मालकीचा असेल आणि आपल्या स्वतः-च्याच उपयोगाकरितां तो आपली श्रमशक्ति खर्च करीत असेल तर आपल्या श्रमानें तो जें 'अतिरिक्त मूल्य' निर्माण करील तें त्याचें त्याच्याजवळच राहील. तो जो जास्त माल निर्माण करील त्याचा नफा त्यालाच मिळेल. परंतु सध्याच्या भांडवलशाहीच्या तत्त्वावर प्रस्थापित झालेल्या ज्या समाजांत आपण राहात आहों, जमीन, यंत्रें व कच्चा माल वगैरे उत्पादनाचीं साधनें ज्या समाजांतील भांडवलदार बळकावून बसले आहेत व ज्यांनी मजुराला आपली श्रमशक्ति विकण्यास भाग पाडलें आहे त्या समाजांत मजुराला त्याच्या श्रमाच्या फळाचा अगदीं किंचित् अंश मिळतो व सबंध नफा अतिरिक्त मूल्यरूपानें भांडवलदार गिळंकृत करतो, हें साहजिकच आहे. भांडवलदार

मजुराचे श्रम विकत घेतो म्हणजे अमुक इतकी मजुरी देण्याचें ठरवून त्याला तो कामाला लावतो. असें करण्यांत मजुरानें मजुरीच्या किंमतीइतकाच माल उत्पन्न करावा, असा भांडवलदाराचा मुळींच हेतु नसतो. मजुराकडून त्याच्या मजुरीच्या किंमतीइतका माल निर्माण करून घ्यावा व त्याला मजुरी द्यावी, असा एकादा भांडवलदार करूं लागेल तर तो भांडवलदारच राहाणार नाहीं. असला धंदा तो करीत राहिल्यास त्याचें भांडवल वाढणार नाहीं व तें टिकणारही नाहीं. भांडवलदार मजुराला कामावर ठेवतो वे त्याला केवळ मजुरी द्यावी म्हणून कामावर ठेवीत नाहीं तर मजुराकडून मजुरीच्या किंमतीपेक्षां कितीतरी पट जास्त किंमतीचा माल निर्माण करून घ्यावा म्हणून ठेवीत असतो. "कमींत कमी मजुरी द्यावी व जास्तींत जास्त नफा होईल इतका माल मजुराकडून निर्माण करून घ्यावा," हा भांडवलदारांचा दंडक असतो. याकरितां तो कामाचे तास वाढवितो व जास्त जास्त सुधारलेलीं यंत्रें तो उपयोगांत आणतो व जास्त अतिरिक्त मूल्य पदरांत पाडून घेतो. अतिरिक्त मूल्य म्हणजे निर्वेतन श्रमशक्ति, ज्या श्रमाकरितां कांहींही मोबदला दिलेला नाहीं अशा श्रमानें उत्पन्न करून घेतलेला माल. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे "अतिरिक्त मूल्य म्हणजे मालकानें फुकटांत पाडून घेतलेला माल होय."

कोणत्याही उत्पादक धंद्यांत दोन प्रकारचें भांडवल असतें. त्यांपैकीं एक प्रकारचें भांडवल इमारती, यंत्रें, हत्यारें व कच्चा माल यांत गुंतलेलें असतें व दुसऱ्या प्रकारचें भांडवल मजुरीकरितां खर्ची पडतें. यांपैकीं पहिल्या प्रकारच्या भांडवलाला 'स्थिर–कायम–भांडवल' व दुसऱ्या प्रकारच्या भांडवलाला 'अस्थिर भांडवल' असें म्हणतात. पहिल्या प्रकारचें भांडवल नवीन माल निर्माण करूं शकत नाहीं. भांडवलाचा हा निष्क्रिय अंश आहे. उत्पादनक्रियेंत जेवढी झीज होते तेवढें मूल्य हें भांडवल उत्पन्न झालेल्या नवीन मालावर चढवीत असतें. नवीन माल निर्माण होत असतांना इमारतीचें भाडें व यंत्रांची झीज यांचा हिशेब करून त्याची किंमत नवीन मालाच्या किंमतींत मिळवावीच लागते. पक्का माल तयार होतो म्हणजे दुसरें कांही होत नसून फक्त कच्च्या मालाचें रूपांतर होत असतें. हें रूपांतर होत असतांना कच्च्या मालापैकीं जो अंश नष्ट होतो त्याची किंमत

अर्थात् पक्क्या मालावर धरावीच लागते. तात्पर्य हें स्थिर भांडवल नफ्याला कारणीभूत होत नाहीं. मजुरीकरितां उपयोगांत आणलेलें 'अस्थिर भांडवल' सक्रिय असून तें कच्च्या मालाचें पक्क्या मालांत रूपांतर करीत असतें. तें एका स्वतंत्र नवीन मालाचीच निर्मिति करीत असतें. हेंच भांडवल मालकाला अतिरिक्त मूल्य किंवा नफा मिळवून देतें. कामकऱ्याला जें वेतन मिळत असतें त्याचें स्वरूप काय याचा विचार मागें केलाच आहे. कामकऱ्याला फक्त त्याचें वेतन मिळतें. मजुरी किंवा वेतन म्हणजे कामकऱ्याला त्याच्या उदरनिर्वाहाकरितां जीं साधनें लागतात त्यांची किंमत होय. या साधनांची बाजारांत जी कमींत कमी किंमत असते तितकीच मजुरी कामकऱ्याला मिळत असते. कामकऱ्याला समजा, एक दिवसाची ५ आणे मजुरी मिळाली. हे ५ आणे वसूल होतील इतकें काम करण्यास त्याला ५ तास पुरे होतात. पण मालक त्याच्याकडून आणखी ५ तास जास्त काम करून घेतो. कामकऱ्याचे हे नंतरचे ५ तासाचे श्रम मालकाला फुकटांत मिळालेले असतात आणि या श्रमामुळें जो माल निर्माण होतो तोच मालकाला नफा मिळवून देण्यास कारणीभूत होत असतो. हे पाच तासाचे निर्वेतन श्रम मालाच्या विनिमयमूल्यांत समाविष्ट झालेले असतात. याप्रमाणें मालाच्या मूल्यामध्यें 'स्थिर भांडवलाचा रूपांतर झालेला अंश,' मजुरीकरिता खर्च केलेले पैसे म्हणजे 'अस्थिर भांडवल,' व निर्वेतन श्रमामुळें उत्पन्न झालेला माल म्हणजे 'अतिरिक्त मूल्य' असे तीन भाग असतात. उत्पादनक्रिया सुरू होण्यापूर्वी स्थिर व अस्थिर भांडवल अशा दोनच वस्तु अस्तित्वांत असतात पण ही उत्पादनक्रिया संपल्याबरोबर नवीन निर्माण झालेल्या मालात स्थिर भांडवल, अस्थिर भांडवल व अतिरिक्त मूल्य या तीन्ही वस्तु समाविष्ट झालेल्या दिसतात. वेतन व अतिरिक्त मूल्य किंवा सवेतन श्रम व निर्वेतन श्रम याच्या भागाकारावरूनच शेवटीं अतिरिक्त मूल्याचें प्रमाण निश्चित करतां येतें.

मजुरीचा दर समजा ५ आणे आहे आणि या ५ आण्याचा माल ५ तासांत निर्माण होतो. पण कामकरी तर या पांच आण्याकरितां दहा तास काम करतो. म्हणजे तो दहा आण्याचा माल निर्माण करतो. यावरून अतिरिक्त मूल्याचा दर शेंकडा शंभर ठरतो. अशा रीतीनें कामकऱ्याच्या

वेतनाकरितां मालक जितकें भांडवल घालतो त्याच्यावर शेंकडा शंभर इतका नफा तो मिळवीत असतो. पण एवढ्यावरून मालकाला जो प्रत्यक्ष नफा मिळतो त्याचें प्रमाणही शेंकडा शंभर आहे, असें मात्र म्हणतां यावयाचें नाहीं. उदाहरणार्थ, १,०५,००० रु. भांडवल घालून एकादा कारखाना उभारण्यात आला आहे. यापैकीं इमारती, यंत्रें वगैरेकरितां ७५,००० रु. व कच्च्या मालाकरितां २०,००० रु. एकूण ९५,००० रु. स्थिर भांडवल आणि मजुरीकरितां १०,००० रु. अस्थिर भांडवल आहे. कल्पना करूं कीं, हा कारखाना एक वर्षभर चालला. मजुरीकरितां जें भांडवल घालण्यांत येतें त्यावर शेंकडा शंभर नफा मिळतो, हें मागें दाखविलेंच आहे. तेव्हां अतिरिक्त मूल्याच्या या दराप्रमाणें मजुरांना १०,००० रु. मिळाले व त्यांनीं २०,००० रु. किंमतीचा माल निर्माण केला. वर्षअखेर इमारतीचें भाडें व यंत्राची झीज याकरितां मालकाला ५,००० रु. खर्च करावे लागले. कच्च्या मालाकरितां त्यानें २०,००० रु. खर्च केले. व मजुरीकरितां १०,००० रु. खर्च केले. म्हणजे जो नवीन माल निर्माण झाला त्यावर एकंदर ३५,००० रु. खर्च झाले. याप्रमाणें ३५,००० रु. ही नवीन तयार झालेल्या मालाची मूळ किंमत झाली. या सर्व व्यवहारांत अस्थिर भांडवलानें म्हणजे मजुरीकरितां जें भांडवल खर्ची पडलें त्यानेंच मालकाला हात दिला. मजुरांनीं १०,००० रु. मजुरी घेऊन २०,००० रु. चा माल निर्माण केला म्हणजे १०,००० रु. मालकाला नफा करून दिला. हा शेंकडा शंभर नफा केवळ अस्थिर भांडवलावरील नफा झाला. पण मालकाला खरोखर नफा किती झाला, हें पाहावयाचें असल्यास हे १०,००० रु. अर्थातच ३५,००० रु. वर वांटले जातील म्हणजे अतिरिक्तमूल्य सर्व भांडवलावर वांटलें जाईल. तात्पर्य ३५,००० रु. वर १०,००० रु. नफा म्हणजे शेंकडा २८·५८ हें अखेरच्या निवळ नफ्याचें प्रमाण नक्की होईल. मूळ किंमतीच्या आंत मालक कधींही आपला माल विकणार नाहीं. तसें तो करीत राहील तर त्याचें दिवाळेंच निघेल. उलटपक्षीं मालकाला वर दर्शविल्याप्रमाणें शें. २८ इतका नफा मिळेलच असें नाहीं. बाजारांतील चढाओढ किंवा इतर कांहीं कारणामुळें त्याला आपला माल कमी किंमतीला विकावा लागेल व शेंकडा १०; १५:

२० इतक्या नफ्यावरही तो संतुष्ट होईल. वरील हिशेबाप्रमाणें रु. २८ हें नफ्याचें जास्तींत जास्त प्रमाण असून या वर्तुळांतच मालकाला आपल्या मालाची किंमत घ्यावी लागेल. अशा रीतीनें मालक जास्तींत जास्त नफा मिळवो किंवा बाजारच्या परिस्थितीप्रमाणें थोडासा कमी नफा घेणे त्याला भाग पडो. अतिरिक्त मूल्य हाच सर्व नफ्याचा किंबहुना सर्व संपत्तीचा मूळ झरा असून "मजुराचे फुकट घेतलेले श्रम हेंच भाडवलदारांचें उत्पन्न होय," हेंच यावरून सिद्ध होतें. अतिरिक्त मूल्याचे प्रमाण जितकें जितकें अधिक तितकें तितकें नफ्याचे प्रमाणही अधिक वाढते. भाडवलदाराला जसजसा अधिक नफा मिळतो तसतसें त्याचे भाडवल अधिकाधिक वाढत जाते आणि भाडवल जसजसें वाढत जातें तसतसें अतिरिक्त मूल्यही वाढत जातें व त्याबरोबर नफाही वाढत जातो. कारखानदार आपल्या भाडवलाच्या साहाय्यानें जें अतिरिक्त मूल्य निर्माण करतो तें सर्वच्या सर्व त्याच्याच पदरांत पडतें, असातला भाग नाहीं. कामगाराचे मोबदला न देतां घेतलेले श्रम, म्हणजेच "अतिरिक्त मूल्याची" केलेली लूट, ही कारखानदाराबरोबरच बँकवाले, शेअरहोल्डर, व्यापारी व दुकानदार अशा लहानमोठ्या लुटारूंच्या गटात वाटून घेतली जाते. आपला संसार कृपणपणाने चालवून, अडचणींत उपयोगी पडण्याकरिता निष्पाप मनानें बँकेमध्यें किंवा शेअरमध्यें आपली शिल्लक गुंतवणारा कारकून किंवा शिक्षकही न कळत या भाडवलशाही लुटीमध्ये भागीदार होत असतो.

अतिरिक्तमूल्यसिद्धांत हा अर्थशास्त्रातील एक अत्यंत महत्त्वाचा शोध आहे. तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रामध्यें ऐतिहासिक प्रकृतिवादाचा शोध लावून मार्क्सनें जी अपूर्व कामगिरी केली आहे तशाच प्रकारची कामगिरी त्यानें अर्थशास्त्राच्या क्षेत्रात 'अतिरिक्त मूल्य' सिद्धांताचा शोध लावून केली आहे. "अतिरिक्त मूल्य व ऐतिहासिक प्रकृतिवाद या दोन सिद्धांतावरच अर्वाचीन शास्त्रीय समाजसत्तावादाची प्रस्थापना झाली आहे," असें एंजल्सनें म्हटलें आहे व तें अगदी खरे आहे. उत्पादनसाधनें जसजशीं बदलतात त्याचप्रमाणें समाजरचनाही बदलते, हा ऐतिहासिक प्रकृतिवादाचा मुख्य सिद्धांत आहे. आजचा रोजंदारवर्ग हा आज प्रचलित असलेल्या उत्पादनसाधनाचाच एक साहजिक परिणाम आहे. समाजातील हा वर्ग दिवसें-

दिवस वाढत आहे. चालू समाजरचना बदलली पाहिजे व जिच्यांत आपल्या हितसंबंधांचें पूर्ण रक्षण होईल अशा शास्त्रीय तत्त्वावर समाजाची रचना झाली पाहिजे, असें तो हक्कानें सांगू लागला आहे. ऐतिहासिक प्रकृति-वादाच्या दृष्टीनें विचार केला असतां रोजंदारवर्ग अशाच मागण्या करणार व त्यांच्याकरितां झगडत राहणार, असें मार्क्सनें म्हटलें आहे. त्याचप्रमाणें सर्व समाजाला पोसण्याचा भार रोजंदारवर्गानेंच आपल्या शिरावर घेतला आहे. सर्व समाजाचा हाच आधारस्तंभ आहे. भांडवलदारवर्गाची संपत्ति हाच वर्ग निर्माण करतो. याच्याकडून फुकट घेतलेल्या 'श्रमाचेंच तें फळ आहे. हा श्रमजीवी वर्ग नसेल तर समाज नष्टच होईल, ही गोष्ट अतिरिक्त-मूल्यसिद्धांत ज्याला समजला त्याच्या सहज लक्षांत येण्याजोगी आहे. मजूरवर्ग समाजाची संपत्ति निर्माण करतो तरी या संपत्तीचा त्याला कांहीं फायदा मिळत नाहीं. तिचा फारच थोडा अंश या वर्गाच्या वांट्याला येतो. रोजंदारवर्गाची संपत्ति निर्माण करण्याची शक्ति यंत्रसुधारणेमुळें जसजशी वाढत जात आहे तसतसा त्याच्या वांट्याला येणारा तिचा अंशही कमी कमी होत चालला आहे. अर्वाचीन उद्योगधंद्यांची दिवसेंदिवस प्रगति होत चालली आहे व या क्षेत्रांत रोजच्या रोज नवीन शोध लागत आहेत. यामुळें रोजंदारवर्गाचे कामाचे तास थोडेसे कमी झाले तरी अतिरिक्त मूल्याचें प्रमाण दिवसेंदिवस जास्त जास्तच वाढत चाललें आहे. उद्योगधंद्याच्या वाढीच्या पहिल्या पहिल्या दिवसांत मजुराला एक दिवसाची ( १० तासाची ) जी मजुरी मिळत होती तिच्या किंमतीइतका माल पूर्वी ५ तासांत निर्माण होत होता व मजुराचे ५ तासांचे श्रम मालकाला फुकटांत वापरावयास सांपडत होते. आतां हें प्रमाण आणखी वाढलें आहे. आपल्या मजुरीच्या किंमतीचा माल मजूर चार तासांतच निर्माण करूं लागला आहे म्हणजे मालकाला मजुराचे सहा तासांचे श्रम फुकटांत पाडतां येऊं लागले आहेत. याप्रमाणें अतिरिक्त मूल्याचें प्रमाण दिवसेंदिवस जास्त जास्तच वाढत चाललें आहे व आपल्या श्रमानें उत्पन्न केलेल्या संपत्तीचा कमींत कमी अंश मजुराच्या वांट्याला येऊं लागला आहे. रोजंदारवर्ग सारखा जास्त जास्त दरिद्री होत चालल्यामुळें सामाजिक दर्जाच्या दृष्टीनें रोजंदार व भांडवलदार यांच्यांतील अंतर वाढत चाललें आहे. यांच्यामधील

तिरस्काराच्या व मत्सराच्या भावना दिवसेंदिवस अधिकाधिक खोल रुजत चालल्या आहेत. वर्गकलहाचें स्वरूप गंभीर होत चाललें असून सामाजिक क्रांति घडून येणें अपरिहार्य झालें आहे. भांडवलशाहीच्या युगांत समाजातील मध्यमवर्ग साहजिकच नष्ट होतो व मूठभर बलशाली भांडवलदारांचा एक अत्यंत अल्पसंख्याक व रोजेदार लोकांचा एक प्रचंड बहुसंख्याक असे परस्परविरोधी दोनच वर्ग समाजांत अस्तित्वांत येतात. वर्गकलहाला जसजसें अधिकाधिक उत्कट स्वरूप प्राप्त होऊं लागतें व दोन्ही वर्गांतील दुही जसजशी अधिकाधिक तीव्र स्वरूपाची होऊं लागते तसतसें भांडवलशाहीच्या प्रचंड सामर्थ्याविरुद्ध आपला आर्थिक व राजकीय झगडा चालविण्याकरितां रोजंदारवर्गाला अधिकाधिक संघटित होऊन आपली संघशक्ति वाढविणें भागच पडतें. या संघशक्तीच्या जोरावर रोजंदारवर्ग आपला हा लढा अत्यंत उत्साहानें व निकरानें चालवितो आणि अखेरीस ज्या वेळीं या वर्गाला आपल्या अंगांतील प्रचंड सामर्थ्याची जाणीव होते त्यावेळीं समाजात क्रांति घडून येते व भांडवलदारांच्या हातीं असलेली राज्यसत्ता रोजंदारवर्गाच्या हातीं येते.

अशा रीतीनें सामाजिक व राजकीय क्रांति घडून आल्यानंतर कामकरीवर्ग आपल्या हिताला पोषक अशाच प्रकारच्या संस्था निर्माण करतो. रोजंदारवर्गाचे हितसंबंध पूर्णपणें रक्षण केले जातील, असे कायदेही केले जातात व तशाच प्रकारच्या चालीरीतीही रूढ होतात. खासगी जिनगानीवर उभारलेल्या भांडवलशाहीचे दिवस भरतात आणि लोकांची मालमत्ता बळकावून आजवर जे गबर झाले त्यांची मालमत्ता उलट बळकाविली जाते. अस्तित्वांत असलेल्या उत्पादनसाधनांवर सर्व समाजाची सत्ता प्रस्थापित होते व समाजांत चालू असलेलें सर्व प्रकारचें अपहरण बंद होतें.

# वर्गकलह

" मानवी समाजांतील परस्परसंबंध उत्पादनसाधनांच्या अनुरोधानें ठरत असतात. उत्पादनसाधनांत जसजसा बदल होतो तसतसा उत्पादकांच्या परस्परसंबंधांतही बदल घडून येतो. ते ज्या पद्धतीनें सहकार्य करतात ती पद्धति बदलते आणि उत्पादनकार्यात जशा प्रकारचा ते भाग घेतात त्यांतही फरक होतो. नवीन नवीन शस्त्रें व नवीन नवीन युद्धसाधनें शोधून काढण्यांत आलीं, त्याबरोबर सैन्याच्या सर्व व्यवस्थेंत फरक घडून येणें आवश्यकच झालें. सैन्याच्या घटकांतील परस्परसंबंध, तसाच एका सैन्याचा दुसऱ्या सैन्याशीं असलेला संबंध या सर्वांत क्रांति घडून आली. मानवी समाजाचें तसेंच आहे. उत्पादनाच्या प्रचलित साधनात क्रांति घडून आली व त्यांत फरक झाला कीं, मानवी समाजांतील परस्परसंबंधांतही बदल घडून येतो. प्राचीन रोमन साम्राज्याची इमारत गुलामगिरीच्या पायावर उभारण्यात आली होती. जमीनदारी पद्धत अंमलांत आली त्यावेळीं एक निराळीच समाजरचना अस्तित्वांत आली. हल्लींच्या भांडवलशाही युगांतील समाजरचनेंत तर याहूनही कांहीं निराळेंच स्थित्यंतर घडून आलें आहे. याप्रमाणें उत्पादनसाधनांत जसजशीं स्थित्यंतरें घडून येतात तसतशीं सामाजिक संबंधातही स्थित्यंतरें घडून येतात. " हा कार्ल मार्क्सचा मुख्य सिद्धांत आहे.

मनुष्य ज्यावेळीं शिकार करून राहात होता त्यावेळीं स्वाभाविकपणेंच मनुष्यसमाजाची रचना समाजसत्तावादी स्वरूपाची होती. त्यावेळीं समाजांत पूर्ण समता नांदत होती. मनुष्यसमाज शेती करून राहूं लागला व जनावरांचे कळप पाळूं लागला त्यावेळीं सामाजिक संबंधांना एक निराळेंच स्वरूप प्राप्त झालें. पूर्वीची सहकार्याची भावना व जें काय मिळेल तें सर्वांनीं सारखें वांटून घेण्याची पद्धति नष्ट झाली. सर्व माणसें सारखीं आहेत, सर्वांना सारखेच हक्क आहेत ही भावना नाहींशी होऊन अमक्याला अमुक प्रकारचे हक्क आहेत अमक्याला ते नाहींत. सामान्य लोकांचा दर्जा निराळा, त्यांचीं कामेंही निराळीं, उच्च व असामान्य

लोकाचा त्यांनीं मान राखला पाहिजे, अशा प्रकारच्या भावना व चाली-रीति समाजांत रूढ होत चालल्या. मनुष्यांच्या टोळ्या ज्यावेळीं आपसांत लढूं लागल्या व लढणें हें एक उच्च दर्जाचें कर्तव्य आहे, असें लोकांना वाटूं लागलें त्यावेळीं मानवी समाजांतील विषमता अधिकच वाढूं लागली. धनी व गुलाम असे दोन वर्ग समाजांत पडले. आजच्या समाजांत भांडवलदार व रोजंदार असे जे दोन वर्ग पडले आहेत त्याचें कारणदेखील उघड आहे.

रोजंदारीचा गुलाम बनलेला मजूर कारखान्याच्या उदास व जुलमी वातावरणांत आपला देह झिजवीत असतो. त्याच्या काबाडकष्टाला कांहीं सीमाच नसते. आणि इतकेंही करून कसेंबसें जीवंत राहातां येईल इतकीच मजुरी त्याला मिळते. या परिस्थितींत त्याच्या मनावर अगदींच अनिष्ट परिणाम होतो. संतोषाची व समाधानाची भावना त्याच्या मनांत उत्पन्न होत नाहीं. उलट खासगी मालमत्तेच्या तत्त्वावर प्रस्थापित झालेल्या प्रचलित समाजरचनेबद्दल त्याला तिरस्कार व द्वेष वाटूं लागतो. कांहीं थोडे मालक लोक आपल्या व आपल्या भाईबंदांच्या श्रमाचा व बुद्धीचा हवा तसा उपयोग करीत आहेत, हें तो पाहात असतो. या समाजपद्धती-मुळें आपल्यावर जीं संकटें आलेली असतात तीं नाहींशीं करण्याकरितां जे कोणी प्रयत्न करतात ते लोक जगावर उपकार करणाऱ्या संतांप्रमाणें आहेत व सर्वांनीं त्यांना पूज्य मानले पाहिजे, असें त्याला वाटत असतें. प्रचलित समाजरचना उलथून पाडणारी चळवळ ही एक अत्यंत उदात्त व श्रेष्ठ प्रकारची चळवळ आहे असें तो मानतो.

उलटपक्षीं दुसऱ्याच्या श्रमावर पुष्ट होणारा ऐतखाऊ भांडवलदार समाज संतुष्ट असतो. भोंवतालची परिस्थिति त्याला सुखावह वाटते. या परिस्थितीचा त्याच्या मनावर जो परिणाम होतो तो त्याच्या दृष्टीनें सर्वथैव इष्ट असाच असतो. असंतोषाची भावना चुकूनही त्याच्या मनात उत्पन्न होत नाहीं. उलट प्रचलित समाजरचना अत्यंत इष्ट व हितावह आहे, अशी श्रद्धा त्याच्या मनांत उत्पन्न होते. यामुळें चालू समाजरचना नाहींशीं करण्याचा जे लोक प्रयत्न करतात त्याचे ते प्रयत्न त्याला भयावह वाटतात. या समाजसुधारकांवर तो नानाप्रकारचे दोषारोप करूं लागतो व ते समाजाचे शत्रू आहेत, असें मानूं लागतो.

याप्रमाणें अगदीं परस्परविरोधी मतें धारण करणाऱ्या लोकांचें कधीं काळीं संगनमत होईल अशी कल्पना करण्यांतदेखील कांहीं अर्थ नाहीं. परस्परतडजोड घडवून आणून दोन्ही वर्गांत शांति प्रस्थापित करावी, अशा प्रकारचा हा प्रश्न नाहीं. हा प्रश्न तडजोडीनें मिटण्याजोगा नाहीं. दोन्ही वर्गांनीं परस्परांशीं दोन हात करूनच हा प्रश्न मिटावयाचा आहे. या लढ्यांत जो वर्ग विजयी होईल तोच समाजांत बलशाली वर्ग म्हणून मानला जाईल व समाजावर त्याचीच सत्ता चालेल. दोन्ही वर्ग जर आपपल्या हितसंबंधांचें रक्षण करण्याकरितां झटणार तर उत्पादनसाधनांवर कोणाची सत्ता असावी, हें ठरविण्याकरितां परस्परांत वर्गयुद्ध सुरू होणें अपरिहार्य आहे. ऐतखाऊ व काबाडकष्ट करणारे, गांजणारे व गांजलेले, अपहारक व अपहृत या दोन वर्गांत कोणत्या ना कोणत्या स्वरूपांत सारखीं युद्धें चालूंच आहेत, असें इतिहासावरून दिसून येतें. मानवी समाजांत वर्गभेद निर्माण झाला. या भेदानें वर्गजागृतीच्या भावनाही निर्माण केल्या आणि तेव्हांपासून वर्गावर्गांतील लढयालाही सुरुवात झाली. त्या त्या कालच्या उत्पादनसाधनांनुसार ज्यांचीं ध्येयें व मागण्या निश्चित झालेल्या असतात तोच वर्ग या लढ्यांतून विजयी झालेला आढळून येतो. उत्पादनाची शक्ति ज्यांच्या बाजूला आहे तोच वर्ग राजकीय सत्ताही बळकावूं शकतो आणि या सत्तेच्या जोरावरच उत्पादनसाधनें आपल्या ताब्यांत राहतील, अशी व्यवस्था तो करूं शकतो. प्रत्येक राज्यक्रांतीच्या व सामाजिक परिवर्तनाच्या प्रसंगीं राजकीय सत्ता सर्वच्या सर्व किंवा बऱ्याच अंशीं एका नवीन पण त्यावेळीं दलित असलेल्या वर्गाकडे जात असते. उत्पादनसाधनें ज्यांच्या हातांत सुरक्षितपणें राहतील अशाच वर्गाकडे ही सत्ता जाणें शक्य आहे, असें ऐतिहासिक प्रकृतिवाददृष्ट्या दिसून येतें. या ऐतिहासिक आवश्यकतेच्या दृष्टीनें आजची समाजरचना नष्ट होऊन तिच्या जागीं दुसरी कोणती समाजरचना प्रस्थापित होईल, आज जें प्रचंड वर्गयुद्ध सुरू आहे त्याचा परिणाम काय होईल व भांडवलदार व रोजंदार या वर्गांपैकीं कोणता वर्ग विजयी होईल, हें आतां आपण पाहूं.

आजच्या समाजांत जीवनकलह चालविण्यासाठीं जीं उत्पादनसाधनें प्रचलित आहेत तीं मोठमोठ्या कारखान्यांत केंद्रीभूत झालेलीं असून

त्यांच्या साहाय्यानें प्रचंड प्रमाणावर मालाची उत्पत्ति होत आहे. मोठ-मोठ्या कारखान्यांतून, गिरण्यांतून व खाणींमधून हजारों मजूर एकत्रित येऊन कामें करीत असून मनुष्याला आवश्यक असलेल्या मालाची उत्पत्ति करीत आहेत. उत्पादनव्यवस्था एके ठिकाणीं केंद्रीभूत झाली आहे व सर्व समाज ज्यामध्यें भाग घेतो असें तें एक सामुदायिक काम बनलें आहे. मोठ्या प्रमाणावर श्रमविभाग हें अर्वाचीन उद्योगधंद्याचें एक मुख्य लक्षण आहे. कोणतीही एकादी वस्तु कोणी तरी एकट्याच व्यक्तीनें तयार केली आहे, असें म्हणतां येत नाहीं. या वस्तूच्या निर्मितीला अनेक लोकाचे श्रम कारणीभूत झाले आहेत. कोणत्याही एकाद्या वस्तूंत आपण काय तयार केलें आहे, हें कोणालाही आतां नक्की सांगतां येत नाहीं. कारण प्रत्येक व्यक्ति एका मोठ्या प्रचंड यंत्रांतील एक भाग बनलेली असते. वस्तूच्या ठिकाणीं असलेले गुण हे मनुष्याच्या अंगीं असलेल्या कौशल्यापेक्षां यंत्राच्या ठिकाणीं असलेल्या चोखपणावरच अवलंबून असतात.

याप्रमाणें मालाची निर्मिति जर सामुदायिक रीतीनें होत आहे तर त्या मालाचा उपयोग करणें व उपभोग घेणें यांवरही सर्व समाजाचा हक्क असला पाहिजे व तो ज्याच्या त्याच्या गरजेप्रमाणें समाजात सारखा वांटून दिला पाहिजे, हें सहजच सिद्ध होतें. पण आज या मालाचा उपयोग करण्याचा, त्याचा उपभोग घेण्याचा व तो समाजात वांटून देण्याचा हक्क काहीं थोड्या लोकांनींच बळकावला आहे. सर्व लोकांनीं ज्यांचा उपभोग घ्यावा त्या वस्तूंचा उपभोग काहीं थोडे लोकच घेत आहेत. उदरनिर्वाहाच्या साधनांवर देखील कांहीं थोड्या लोकांचा ताबा असावा, ही तर अगदीं उघड दिसणारी गोष्ट आहे. आजच्यां उत्पादनशक्तींचा विचार केला असता उत्पन्न केलेल्या मालावर आपला हक्क सांगणें व तो बळकावून बसणें, हें सर्वथैव अनुचित व अन्यायाचें आहे. प्रत्येक व्यक्तीनें श्रम करावे व आपल्या जीवन-निर्वाहाच्या वस्तु निर्माण कराव्या, अशी ज्यावेळीं परिस्थिति होती, लहान प्रमाणावर धंदा चालविणें, हेंच ज्यावेळीं जरूर होतें त्यावेळीं उत्पादन-साधनावर व त्यापासून उत्पन्न करण्यांत आलेल्या मालावर व्यक्तीचा ताबा असावा व हा माल लोकांच्या उपयोगाकरितां द्यावा किंवा न द्यावा हें ठरविणें व्यक्तीच्या स्वाधीन असावें, हें चालण्यासारखें होतें. स्वतःच्या श्रमानें

निर्माण केलेल्या वस्तूंवर व्यक्तिगत मालकी असावी, हें योग्यच होतें. कारण खासगी मालमत्ता करणें हेंच त्यावेळीं जरूर होतें. खासगी मालमत्ता ही त्यावेळीं एक ऐतिहासिक आवश्यकतेचीच बाब होती. घरगुती लहान धंद्यात सर्व श्रम एका माणसालाच करावे लागतात. त्याकरितां लागणारीं हत्यारें तो स्वतःच बनवितो व स्वतःच्या श्रमानें तो आपला धंदा चालवीत असतो. या चिमकुल्या कारखान्यांत निर्माण झालेल्या वस्तूंत मालकाचे श्रम व कौशल्य प्रतिबिंबित झालेलीं दिसतात. अशा परिस्थितीत खासगी मालमत्ता निर्माण झाली, धनोत्पादनाच्या साधनांवर मनुष्य व्यक्तिगत मालकी सागूं लागला व उत्पन्न केलेला माल दुसऱ्याला द्यावयाचा कीं नाहीं, हें ज्याचें त्यानेंच ठरविलें तर त्यांत कांहींच नवल नाहीं.

पण औद्योगिक क्रांतीनंतर सर्व पारडें बदललें. उत्पादनाच्या साधनात क्रांति घडून आली. लहान लहान उद्योगधंदे नष्ट झाले व मोठमोठे कारखाने अस्तित्वांत आले. मोठमोठे कारखाने चालवावयाचे व मोठ्या प्रमाणांत मालाची उत्पत्ति करावयाची तर सामुदायिक श्रमानेंच या गोष्टी शक्य होतात. अर्थात् सामुदायिक श्रमानें निर्माण झालेल्या मालावर समाजाचाच हक्क असला पाहिजे व त्या मालाची विभागणी समाजालाच करता आली पाहिजे. पण तसें न होतां जुन्या खासगी मालमत्तेच्या कल्पनेचा फायदा घेऊन या मालावर कोणी वैयक्तिक हक्क सांगूं लागला व मालाच्या विभागणीचीं सर्व सूत्रें तो आपल्याच हातीं ठेवूं लागला तर उद्योगधंद्यावर अनिष्ट परिणाम होईल आणि व्यापारव्यवहारावर अरिष्ट कोसळल्याशिवाय राहाणार नाहीं. सामुदायिक रीतीनें माल उत्पन्न करावयाचा व त्यावर वैयक्तिक हक्क सागावयाचा यामुळेंच उद्योगधंद्यावर अरिष्टें कोसळत असतात. उद्योगधंद्याच्या आजच्या व्यवहारांत कोणाचा पायपोस कोणाच्या पायांत नाहीं. कोणी किती माल निर्माण करावा याला कांहीं मर्यादा नाहीं. बाजारांतील चढाओढींत आपला वरचष्मा झाला पाहिजे व आपला माल खपला पाहिजे याबद्दल सर्वच कारखानदार धडपड करीत असतात. अशा परिस्थितीत सर्वत्र गोंधळ व अराजकता माजली तर त्यांत कांहींच आश्चर्य नाहीं. कारखान्यांतून मालाची उत्पत्ति भराभर मोठ्या प्रमाणावर होत असते आणि हा माल विकत घेण्याची ताकद तर बहुजनसमाजांत राहि-

केली नसते; यामुळें माल पडून राहातो. शिवाय कारखाना बंद करणें तर इष्ट नसल्यामुळें या मालांत पुन्हां आणखी भर पडते. माल गुंतून राहातो, भांडवल गुंतून राहातें, पैशाचा व्यवहार व्हावा तसा होत नाहीं यामुळें इतर धंद्यांवरही त्याचा परिणाम होतो व ते अजीबात डबघाईला येतात. ही परिस्थिति अशीच ताणली गेली की, कारखानदाराची दिवाळीं निघण्याचा प्रसंग येतो. अर्वाचीन समाजाला ज्या रोगानें पछाडलें आहे त्याची उद्योगधंद्यावरील अरिष्टें हीं बाह्य लक्षणे आहेत. आजच्या समाजात प्रचलित असलेल्या चालीरीति, कायदे व संस्था उत्पादनशक्तींना अनुरूप अशा नाहींत, असे हीं संकटें दाखवून देत असतात. चरबी वाढलेला मनुष्य लठ्ठ होता होतां शेवटीं असा होतो की, त्याचे शरीरच त्याला जड वाटूं लागतें व स्वतःचे देहव्यापार चालविण्यासही तो असमर्थ होतो. त्याचप्रमाणें ही समाजपद्धति स्वतःमधील दोषाच्या वाढीमुळें दुर्बल होऊन तिची कार्यक्षमता नष्ट होऊन जाते. आजच्या औद्योगिक युगांत सामुदायिक रीतीनें मालाची उत्पत्ति करण्यात येत आहे तर उत्पादनाचीं साधनें व उत्पन्न झालेला माल यावर समाजाचीच मालकी असली पाहिजे व यांवरील खासगी हक्क अजीबात नष्ट झाला पाहिजे. या मालाच्या क्रयविक्रयावर समाजाचीच मालकी असली पाहिजे. व्यक्तीला या बाबतींत कोणत्याही प्रकारची ढवळाढवळ करण्याचा अधिकार असता कामा नये आणि समाजाचें शासन संघटित सामाजिक संस्थेतर्फेच झालें पाहिजे. समाजांतील सर्व श्रमजीवी घटकाचें हितरक्षण होईल अशाच रीतीनें या शासनसंस्थेचा कारभार चालला पाहिजे. या व अशाच प्रकारच्या मागण्या कारखान्यांत प्रत्यक्ष राबून माल उत्पन्न करणारा प्रचंड रोजंदारसमाजच करूं शकतो. तेव्हां ऐतिहासिक आवश्यकतेच्या नियमानुसार हा वर्गच शेवटीं विजयी झाला पाहिजे यात शंका नाहीं. समाजसत्तेची प्रस्थापना होणें हें न्यायाचें आहे, माणुसकीला धरून आहे किंवा मानवी अंतःकरणांत वसत असलेल्या उदात्त व सात्त्विक भावनांमुळें अशी सत्ता प्रस्थापित होणें, हें पवित्र व इष्ट आहे, म्हणून समाजसत्तावादाचा विजय झाला पाहिजे असें नाहीं, तर समाजसत्तेची प्रस्थापना होणें ही ऐतिहासिक आवश्यकता आहे. ऐतिहासिक विकासाचे भौतिक नियम व आजचीं उत्पादनाचीं साधनें यांचा विचार केला

असतां समाजसत्तेच्या प्रस्थापनेचा काल अधिकाधिक जवळ येत चालला आहे, असें दिसून येईल.

सर्व प्रकारचा सामाजिक विकास उत्पादनाच्या भौतिक साधनांवरच अवलंबून असतो, या कार्ल मार्क्सच्या शोधामुळें समाजसत्तावाद ही एक काव्यमय व गूढ अशी कल्पना राहिलेली नाहीं. उत्पादनशक्तींमधील परिवर्तनाचा ता एक आवश्यक व अपरिहार्य परिणाम आहे, असें सिद्ध झालें आहे. समाजसत्तावादाला मार्क्सनें अशा रीतीनें शास्त्रीय स्वरूप प्राप्त करून दिलें आहे. समाजसत्ता प्रस्थापित होणें ही एक आवश्यक व अपरिहार्यच गोष्ट असेल तर त्याकरितां मतप्रचार किंवा चळवळ करण्याची जरूरच नाहीं, असा एक ठराविक प्रश्न नेहमीं विचारण्यांत येत असतो. तसेंच मानवी समाजाचा इतिहास पूर्वीच लिहून ठेवला आहे, तें एक ब्रह्मलिखित आहे, लोक हे केवळ त्याच्या हातांतील बाहुलीं आहेत, त्यांना स्वतंत्र अशी इच्छाशक्तीच नाहीं, भिन्न भिन्न उत्पादनशक्तीमुळें जी जी परिस्थिति उत्पन्न होते. तिच्यामागून आंधळेपणानें जावें, यापेक्षां मनुष्य जास्त कांहीं करूं शकत नाहीं, असें इतिहासाच्या बाबतींत मार्क्सनें लिहून टेवलें आहे, असेही आक्षेप मार्क्सवर घेण्यांत येतात. पण हे सर्व आक्षेप फोल आहेत. मानवी बुद्धीला, मनुष्याच्या इच्छाशक्तीला. व मानसिक भावनांना दुसरे कोणी जितकें महत्त्व देतात त्यापेक्षांही जास्त महत्त्व मार्क्सनें दिलें आहे.

ऐतिहासिक घटना म्हणजे केवळ आकस्मिक घडलेल्या गोष्टी नव्हत. मानवी इच्छा व भावना ऐतिहासिक घडामोडी घडवून आणतात, असें मार्क्सही मानतो. तथापि कांहीं ठराविक सामाजिक कायद्यानुसारच इतिहास घडून येत असतो, तेव्हां इतिहासाला वळण देणारे हे कायदे कोणते, हें शोधून काढण्यातच मार्क्सचा विशेष आहे. उत्पादनसाधनांना मानवी कल्पनेशिवाय व ज्ञानाशिवाय योग्य तें स्वरूप दिलें जात नाहीं, हें उघड आहे. उत्पादनसाधनांनुसारच समाजामध्येंही परिवर्तन घडून येत असतें, तेव्हां या परिवर्तनाला समाजाची व त्याच्या घटकांची जाणीवशक्ति कारणीभूत होतच नाहीं, असें कोण म्हणेल ! अमुक एक समाजरचना किंवा अमुक सामाजिक संस्था अस्तित्वांत येणें हें ऐतिहासिक दृष्ट्या जरूरीचें आहे, असें जेव्हां सांगण्यात येतें त्यावेळीं ही आवश्यकता उत्पन्न होण्याला

मानवी इच्छा किंवा मानवी जाणीवशक्ति कारणीभूत झालेली नसते, असें कोणीही म्हणत नाहीं. उत्पादनसाधनें व समाजरचना यांचा दुवा जुळविण्याकरितां ज्ञानशक्तीची अत्यंत आवश्यकता आहे. क्रांतीच्या साहाय्यानें सर्व समाजाची नवीन घडी बसवावयाची असेल तर ज्ञानशक्ति व इच्छाशक्ति या दोन्हींचाही मिलाफ झाला पाहिजे. कारण, यांचाही उगम उत्पादनसाधनांतूनच झालेला आहे. अमुक एक प्रकारची समाजरचना अस्तित्वात आली पाहिजे, समाजरचनेंत अशी क्रांति होणें ऐतिहासिक दृष्ट्या जरूरीचें आहे, असें म्हणताना ही आवश्यकता तरी कां उत्पन्न झाली, याचा विचार करावा लागतो आणि इच्छाशक्ति व ज्ञानशक्ति शेवटीं मनुष्याला या आवश्यकतेची जाणीव करून देतात, असें अनुभवाला येतें. प्रचलित असलेल्या उत्पादनसाधनाचें ज्ञान करून घ्यावें व त्यांचा उपयोग करतां येईल, अशी समाजरचना करण्याची इच्छा बाळगावी हा मनुष्याचा सहजधर्म आहे. ऐतिहासिक आवश्यकता यांतूनच निर्माण होते. जुन्या पुराण्या कल्पनांचा व रूढींचा पगडा मनुष्याच्या मनावर बसलेला असतो; त्यावेळीं नवीन प्रस्थापित होणाऱ्या समाजरचनेला तो विरोध करतो. ठरलेली चकारी सोडून जाण्याचे धैर्य त्याला होत नाहीं. त्याचें मन व बुद्धि क्रांतिविरोधी व दुर्बल बनलेलीं असतात. मतप्रचाराची व चळवळीची अशा वेळींच जरूरी भासते. नवीन उत्पादनसाधनाबरोबर उत्पन्न होणाऱ्या नवीन परिस्थितीशीं समरस होण्याकरितां त्यांचीं मनें तयार करावी लागतात. नवीन परिस्थितीचें जसजसें ज्ञान होत जातें तसतसा मनुष्य जुन्या कल्पनांचा व रूढींचा त्याग करूं लागतो. मतप्रचाराचें काम जितकें जितकें जोरांत होईल तितकें तितकें नवीन परिस्थितीचें ज्ञान मनुष्याला जास्त जास्त होत जातें, आणि या व्यापक व प्रबल होत चाललेल्या जाणीवशक्तींतूनच नवजीवनानें भरलेल्या सामाजिक इच्छेचा उदय होतो व समाजात जरूर ती क्रांति घडून येते. मानवी ज्ञानशक्ति व ऐतिहासिक घटना या दोन्हीही हातात हात घालून जात असतात. अंधळा व लंगडा या गोष्टींतल्याप्रमाणें ते इतिहासाची वाट चालत असतात. इतिहासदृष्ट्या ज्या घटना होणें अपरिहार्य आहे त्या अधिक लवकर व अधिक सुलभतेनें घडून याव्या व त्याचा परिणाम अधिक श्रेयस्कर व्हावा, अशी इच्छा असेल तर मतप्रचाराचें व

शिक्षणाचें काम अधिक जोरानें व उत्साहानें केलें पाहिजे. चळवळीनें व शिक्षणानें समाजसत्तावादाची आवश्यकता निर्माण होत नाहीं; तर उत्पादन-साधनांतील परिवर्तनामुळें सामाजिक क्रांतीची जी आवश्यकता निर्माण झालेली असते ती पूर्ण होण्याच्या कामीं आड येणारीं विघ्नें चळवळीनें दूर होतात आणि क्रांतीचें कार्य पूर्ण होतें. मानवी मन उदात्त व सात्त्विक झालें म्हणून समाजसत्तेची प्रस्थापना होत नाहीं तर ऐतिहासिक विकासाच्या भौतिक नियमांनुसारच ती प्रस्थापित व्हावयाची असते. आजच्या समाजरचनेंतच हीं भावी समाजसत्तावादी क्रांतीचीं बीजें रुजलेलीं आहेत. समाजसत्ता ही स्वर्गांतून खालीं गळावयाची नसून जगाच्या प्रत्यक्ष व्यवहारांतूनच ती निर्माण व्हावयाची आहे. उद्यांचे चांगले दिवस आजच्या दिवाळखोरीच्या अवस्थेंतूनच दिसावयाचे आहेत.

समाजसत्ता प्रस्थापित होणें अपरिहार्य आहे, एवढेंच केवळ मार्क्सनें सांगितलेलें नाहीं तर ही सत्ता कशी प्रस्थापित होईल, तेंही त्यानें सांगितलें आहे. ही सत्ता रोजंदारसमाजाच्या हातूनच प्रस्थापित व्हावयाची आहे. आजची समाजरचना नष्ट करून त्या ठिकाणीं नवीन समाजरचनेची प्रस्थापना करण्याचें कार्य रोजंदारवर्गच करूं शकेल. कारण समाजधारणेचें सर्व ओझें या वर्गालाच आपल्या शिरावर वाहावें लागतें. क्रांतीची ज्योत रोजंदारवर्गाच्या हृदयांतच आज तेवत आहे. आज ना उद्यां तिचा भडका होऊन भांडवलशाही समाजपद्धति या आगींत जळून खाक झाल्याशिवाय राहणार नाहीं.

# परिशिष्ट

## थोर पुरुषांचा परिचय

फ्रेडरिक एंजल्स– फ्रेडरिक एंजल्स याचा जन्म बारमेन येथें १८२० सालीं झाला. त्याचा बाप कारखानदार होता. व्यवहारांत लागणारें शिक्षण एंजल्सनें चांगल्या रीतीनें संपादन केलें व नंतर तो धंद्यांत शिरला. आपलीं धार्मिक मतें कायम करण्यापूर्वी त्याला आपल्या मनाशीं बराच झगडा करावा लागला. यंग हेगेलियन पक्षातील मंडळीशीं त्याची चागली दोस्ती जमली. तो अनीश्वरवादी झाला व मोझेस हेस याच्या मतांचा त्याच्या मनावर परिणाम होऊन तो समाजसत्तावादी बनला. एंजल्सचें हें मतांतर त्याच्या बापाला आवडलें नाहीं. बापाचें व त्याचें पटेनासें झालें त्यावेळीं बापाच्या कारखान्यांत काम करण्याचें सोडून देऊन ब्रुसेल्स येथें तो मार्क्स बरोबरच राहूं लागला. एंजल्स घरचा चांगला श्रीमंत पण मतस्वातंत्र्या-करितां घरांतून बाहेर पडला होता. एंजल्स मार्क्सजवळ येऊन राहिला होता खरा, पण मार्क्सचें दारिद्र्य पाहून त्याचें चित्त होरपळून गेलें. मार्क्स तर बोलून चालून शतदरिद्री होता. घरखर्चाकरिता लागणारे पैसेदेखील त्याच्या-जवळ नसायचे. मग चळवळ चालविण्याकरितां लागणारे पैसे कोठून आणणार! मार्क्सला ग्रंथलेखनाची व वाचनाची अतिशय आवड होती. मार्क्सजवळ असलेला ग्रंथसंग्रह त्याला अगदींच अपुरा पडत असे. मार्क्स-जवळ येऊन राहिल्यानंतर या दोघांचा स्नेह लवकरच जमला व पुढें त्याचा हा स्नेह इतका दृढ झाला कीं, तो दोघांच्या हयातीभर टिकून राहिला. आपल्या मित्राच्या सर्व प्रकारच्या गरजा पूर्ण करावयाच्या व त्यानें सुरू केलेल्या चळवळींनाही मदत करावयाची तर पैशाशिवाय भागावयाचें नाहीं. बापाशी थोडें जुळवून घेऊन पुन्हां कारखान्यांतच काम करण्याचें पतकर-ल्यास वरील सर्व गोष्टी जुळण्याजोग्या होत्या. एंजल्सनें मित्रप्रेमाखातर आपलीं मतें थोडींशी बाजूला ठेवण्याचें ठरविलें, एंजल्सच्या बापानेंही फारसें ओढून धरलें नाही व मँचेस्टरमधील आपल्या कारखान्याचा कार-भार त्यानें एंजल्सवर सोंपविला.

एंजल्स अशा रीतीनें मँचेस्टर येथें पुन्हां आपल्या कारखान्यांत काम करूं लागला खरा तथापि कामगार चळवळीकडील त्याचें लक्ष मुळींच कमी झालें नाहीं. मार्क्सप्रमाणें एंजल्सचेंही वाचन दांडगें होतें व त्याची लेखणीही स्फूर्तिमय व तेजस्वी होती. मार्क्सच्या संपादकत्वाखालीं चाल- लेल्या ' न्हायनिश झीटुंग ' पत्रांत प्रसिद्ध करण्याकरितां मँचेस्टर येथें राहू- नच तो लेख पाठवूं लागला. इंग्लंडांतील मजुरांच्या दुःस्थितीचें वर्णन त्यानें या लेखांतून फारच हृदयद्रावक रीतीनें केलें आहे. चार्टिस्ट चळ- वळींतील पुढाऱ्यांचा व रॉबर्ट ओवेनच्या पक्षांतील मंडळींचा मँचेस्टर येथें असतांनाच त्यानें परिचय करून घेतला. या पक्षांतर्फे चालणाऱ्या वर्तमान- पत्रांतूनही त्याचे लेख प्रसिद्ध होत असत. याच दिवसांत अर्थशास्त्रावर टीकात्मक असा एक ग्रंथ त्यानें लिहिला. ' फ्रँको जर्मन मॅन्युअल' वगैरे नियतकालिकांतून सामाजिक नीतिशास्त्रासंबंधानें मार्क्स जीं मतें प्रदर्शित करीत असे त्यांचाच पुरस्कार एंजल्सनें या पुस्तकांत केला आहे. १८४५ सालीं 'इंग्लंडमधील मजूरवर्गाची परिस्थिति' या नांवाचें एक पुस्तक एंजल्सनें प्रसिद्ध केलें. एंजल्स केवळ लेखनवाचनावरच थांबणारा नव्हता. मार्क्सचा तो दोस्त असल्यामुळें पॅरिस, ब्रुसेल्स व न्हाइनलँडमध्यें मार्क्सनें ज्या ज्या चळवळी सुरू केल्या होत्या त्यांतही तो भाग घेत असे. कम्युनिझमच्या मत- प्रसाराच्या बाबतींत तर मार्क्सला तो खूपच मदत करीत असे. 'यंग हेगे- लियन ' पक्षांतील मंडळींच्या मताचें एकीकरण व दृढीकरण करण्याकरितां ' होली फॅमिली ' या नांवाचें पुस्तक मार्क्सनें याच सुमारास लिहिलें. यांतील बरेच लेख एंजल्सनें लिहिले व मार्क्सला त्यानें मदत केली. 'यंग हेगेलि- यन' पक्षांतील मंडळींच्या मताचा कल लिबरल पक्षाकडे वळूं लागला होता, हें पाहून त्यांची चलविचल झालेली वृत्ति स्थिर करण्याकरितां म्हणून मार्क्सला हें पुस्तक लिहावें लागलें. या कामीं एंजल्सच्या मदतीचा त्याला फार उपयोग झाला.

१८४७ सालीं कम्युनिस्ट जाहीरनामा तयार करण्याचें काम मार्क्स व एंजल्स यांच्यावर सोंपविण्यांत आलें. त्यावेळीं या जाहीरनाम्याचा कचा मसुदा एंजल्सनेंच तयार केला होता. तसेंच कम्युनिस्ट लीगची प्रस्थापना करण्याच्या कामीं ज्या मंडळींनीं पुढाकार घेतला होता त्यांत मुख्यत्वें-

करून एंजल्सचीच गणना करावी लागेल. सामाजिक मतप्रसाराच्या कामी त्यानें मार्क्सला उत्साहानें मदत केली. थोडक्यात सांगावयाचें म्हणजे एंजल्स हा मार्क्सचा बहिःस्थित प्राणच होता. मार्क्स व एंजल्स यांची जोडी जर्मनींत सर्वतोमुखीं झाली होती. 'न्यू न्हायनिश झीटुंग' या मार्क्सच्या पत्रांत तो उपसंपादकाचें काम करीत होता. पुढें १८५० सालीं 'न्यू न्हाय-निश रिव्ह्यू'मध्येंही त्यानें बरेच लेख लिहिले. याच सुमारास बव्हेरियांत झालेल्या बंडांतही तो सामील झाला पण तें यशस्वी न झाल्यामुळें त्याला इंग्लंडांत पळून यावें लागलें. यापुढें मात्र तो कोठें गेला नाहीं. मँचेस्टर येथें (१८५० ते १८६९ पर्यंत) आपल्या बापाच्या कारखान्यांतच काम करीत राहिला. मार्क्सला सर्वतोपरी मदत करावयाची व बापाची मर्जीही राखाव-याची तर कारखान्याच्या कामाकडे दुर्लक्ष करणें त्याला शक्यच नव्हतें. यावेळीं मार्क्स सकुटुंब लंडन येथें येऊन राहिला होता. याप्रमाणें एंज-ल्सला मँचेस्टर येथें व मार्क्सला लंडन येथें राहावें लागत होतें तरी, बौद्धिक व्यवसायांत परस्पराना मदत करण्याचें काम दोघेही पत्रद्वारां करीत होते. बहुतेक रोजच्या रोज ते परस्परांना पत्रें लिहीत. शास्त्रीय शोध व राज-कीय घडामोडी या विषयांचीं मतें ते परस्परांना कळवीत होते व ग्रंथलेख-नाच्या ज्या बौद्धिक व्यवसायांत ते गुंतले होते त्याचीही माहिती ते पर-स्पराना पुरवीत होते. मार्क्सच्या ग्रंथसंग्रहांत भर घालण्याच्या कामीं व घरखर्चाकरितांही अगदीं नियमितपणें एंजल्सनें मार्क्सला द्रव्यसाहाय्य केलें. पुढें बाप वारल्यानंतर (१८७०) एंजल्स लंडन येथेंच येऊन राहिला. मार्क्सच्या घरापासून त्याचें बिऱ्हाड दहा मिनिटांच्या अंतरावर होतें. १८७० पासून ते थेट मार्क्सच्या मृत्यूपर्यंत (१८८३) असा एकही दिवस गेला नाहीं कीं, ज्या दिवशीं दोघाचीही भेट झाली नाहीं व कोणत्या तरी विषयावर त्याची चर्चा झाली नाहीं.

दुसऱ्या कोणाच्या मतापेक्षां एंजल्सच्या मताला मार्क्स फार महत्त्व देत असे. लोकांना जें काय सांगावयाचें असे तें तो प्रथम एंजल्सला सांगे व त्याच्या बुद्धीला पटवून देई. एंजल्सला आपली एकादी कल्पना पटवून देण्याकरितां कितीही श्रम पडले तरी मार्क्स त्याची पर्वा करीत नसे. एंज-ल्सची खात्री करून दिली म्हणजे आपण एक मोठा जय मिळविला, असें मार्क्सला वाटत असे.

१८८३ सालीं मार्क्स मरण पावला. आपल्या मित्राचें ग्रंथप्रकाशनाचें अपुरें राहिलेलें काम एंजल्सनें पुरें केलें. 'कॅपिटल' ग्रंथाचा दुसरा व तिसरा भाग एंजल्सनें संपादित केला. या दिवसात तत्त्वज्ञान, राजकारण व वंशशास्त्र या विषयांवरही त्यानें बरींच पुस्तकें लिहिलीं. एंजल्सच्या वयाला आतां ७५ वर्षे झालीं होतीं तरी काम करण्याचा त्याचा उत्साह कमी झाला नव्हता. अगदीं मरणापूर्वी कांहीं दिवस (१८९५) त्यानें आपल्या एका मित्राला एक विस्तृत पत्र लिहिलें. 'कॅपिटल' चा दुसरा व तिसरा भाग कसा वाचावा, याबद्दलच्या विचारपूर्ण सूचना त्यानें या पत्रांत केल्या आहेत. 'कॅपिटल' च्या तिसऱ्या भागाला एक पुरवणीही त्यानें याच दिवसांत लिहिली. फर्स्ट इन्टरनॅशनलचा इतिहास लिहिण्याचें त्याच्या मनांत फार होतें व त्याकरितां तो सामुग्रीही गोळा करीत होता; पण हें काम त्याच्या हातून पुरें झालें नाहीं. तो एकाएकीं आजारी पडला व ५ आगष्ट १८९५ रोजीं त्याचें देहावसान झालें. आपलें शरीर पुरूं नये, त्याचें दहन करावें व त्याची राख समुद्रांत टाकून द्यावी, असें त्यानें आपल्या मृत्युपत्रात लिहून ठेवलें होतें. त्याच्या बऱ्याच जर्मन दोस्तांच्या मनांत त्याचें प्रेत पुरावें व त्यावर स्मारक उभारावें असें होतें. पण एंजल्सची इच्छा पुरी केली पाहिजे, असें इतर सगळ्या मंडळींना वाटल्यामुळें त्याचें प्रेत दहन करण्यांत आलें व त्याची राख समुद्रांत टाकण्यांत आली.

"कोणत्याही संगमरवरी पुतळ्यापेक्षां अधिक टिकाऊ व अशा पुतळ्यावरील लेखापेक्षां अधिक बोलकें, असें स्मारक या दोन्ही मित्रांनीं (मार्क्स व एंजल्स) करून ठेवलें आहे. समाजशास्त्राचें शास्त्रीय संशोधन कसें करावें याची पद्धति व क्रांतीच्या चळवळी कोणत्या धोरणानें चालवाव्या व या कामीं कशा युक्त्या योजाव्या याचें नियम आमच्या उपयोगाकरितां त्यांनीं करून ठेवले आहेत. आपल्या भोंवतालच्या सृष्टीचें सत्यज्ञान करून घेण्याकरितां तिचा व्यापक रीतीनें अभ्यास करण्यास उपयोगी पडेल असलें अक्षय व अगाध ज्ञानभांडारही ते आपल्या मागें ठेऊन गेले आहेत." असें रायझानॉफनें म्हटलें आहे.

स्पिनोझा:— याचा जन्म ॲमस्टरड्याम येथें २४ नोव्हेंबर १६३२ रोजीं झाला. याचें शिक्षण ॲमस्टरड्याम येथेंच झालें. याचे आईबाप ज्यू होते. तेव्हां याच्या मनावर स्वाभाविकच ज्यू धर्माचे संस्कार झाले

होते. याचा बाप व्यापारी होता व त्याचा धंदाही चांगला चालत असे. पण स्पिनोझाचें लक्ष व्यापाराकडे नव्हतें. अध्ययनाची त्याला विशेष गोडी होती. या लहान वयांतच त्यानें ज्यू लोकांचा धर्म व त्याचा इतिहास या विषयावरील पुस्तकें वाचून टाकिलीं. तो चांगला बुद्धिमान् होता. ईश्वर व विश्व यांचा परस्परसंबंध काय असावा, या विचारानें त्याचें मन लहानपणापासूनच वेडावून गेलें होतें. 'विश्व हे ईश्वराचें शरीर आहे,' असें कांहीं ज्यू तत्त्ववेत्त्यांचें मत होतें पण तें ठाम स्वरूपाचें नव्हतें. या सिद्धांतासंबधानें तो जितका जितका विचार करी तितकें तितकें त्याचें मन आश्चर्यमग्न व शंकित होत असे. खिस्ती तत्त्वज्ञानांत या मताला कोठें पुष्टि मिळते का पाहावें, या जिज्ञासेनें त्यानें खिस्ती तत्त्ववेत्त्याच्या ग्रंथांचें अध्ययन करण्याचें ठरविलें. याकरितां त्यानें लॅटिन भाषेचा अभ्यास केला.

सॉक्रेटिस, प्लेटो, अरिस्टॉटल, वगैरे ग्रीक तत्त्ववेत्त्यांचे ग्रंथ त्यानें वाचलेच; पण त्यापेक्षांही डेमोक्रायटस, एपिक्यूरस व लुक्रेशियस वगैरे अणुवाद्यांचे विचार त्याला फार आवडले. विशेषतः विषयवासनाचा सर्वथा त्याग करावयास सांगणाऱ्या स्टोइक (प्रसिद्ध ग्रीक तत्त्ववेत्ता झेनो याचे अनुयायी) तत्त्ववेत्त्यांच्या विचारांचा त्याच्या मनावर फारच परिणाम झाला.

सोळाव्या शतकाच्या अखेरीस प्रसिद्धीस आलेला तत्त्ववेत्ता ब्रूनो याच्या ग्रंथाचा त्यानें चिकित्सापूर्वक अभ्यास केला. ब्रूनोनें आत्मजिज्ञासा तृप्त करून घेण्याकरिता देशच्या देश पालथे घातले होते व अनेक धर्मांतरें केलीं होतीं; पण शेवटीं विश्वाचें गूढ उकलीत असतांना आश्चर्यचकित होऊन भटकत असलेल्या या ब्रूनोला खिस्ती पाद्यांनीं जिवंत जाळून टाकलें. प्रेमळ हृदय असलेल्या या इटालियनानें काव्यमय विचारांनीं विश्वाचें गूढ उकलण्याचा प्रयत्न केला आहे. अखिल विश्व वरवर भिन्न दिसत असलें तरी वस्तुतः तें अभिन्नच आहे, असे ब्रूनोचें म्हणणें असून जडांत चैतन्य व चैतन्यांत जड कसें व्यापून राहिलें आहे, हें दाखविण्याचा त्यानें प्रयत्न केला आहे. परस्परविरोधी वस्तूंच्या झगड्यातून तिसरेच एक नवीन तत्त्व निर्माण होतें ही विरोधविकासाची कल्पनाही ब्रूनोनें मांडून दाखविली आहे.

ब्रूनोच्या या तत्त्वज्ञानाचा स्पिनोझाच्या मनावर बराच परिणाम झाला होता. स्पिनोझा या मनःस्थितीत असतां ॲमस्टरड्याम येथील ज्यू धर्माधिकाऱ्यांनीं

त्याला बहिष्कृत केलें. " विश्व हेंच ईश्वराचें स्वरूप आहे. देवदूत म्हणजे उगाच कांहीं तरी खोट्या कल्पना आहेत. जुन्या करारांत आत्म्याच्या अमरत्वासंबंधानें कांहींच सांगितलेलें नाहीं, " असे विचार मनांत बाळगल्याबद्दल त्याला या धर्माधिकाऱ्यांनीं ५०० डॉलर दंडाची शिक्षा ठोठावली. स्पिनोझानें अर्थात् हा दंड देण्याचें नाकारलें, तेव्हां त्याला विधीपूर्वक बहिष्कृत करण्यांत आलें. स्पिनोझाचें वय त्यावेळीं २४ वर्षांचें होतें.

स्पिनोझानें अत्यंत शांत मनानें ही शिक्षा सहन केली. स्पिनोझाला यापुढें आपण या जगांत अगदीं एकाकी झालों, असें वाटूं लागलें. ज्यू लोकांनीं घातलेला बहिष्कार अत्यंत कडक स्वरूपाचा असतो. लौकिकदृष्ट्या स्पिनोझा एकाकी झाला होता, यामुळें त्याचें मन उदास झालें होतें. तथापि जुन्या धर्मावरील श्रद्धेला धक्का बसल्यामुळें त्याचें मन अधिकच कष्टी झालें होतें. ही श्रद्धा अंतःकरणांतून समूळ उपटून टाकण्याची शस्त्रक्रिया त्याला करावयाची होती. स्पिनोझानें या प्रसंगीं दुसऱ्या एकाद्या धर्माचा स्वीकार केला असता तर या दुसऱ्या कळपांतील लोकांनीं त्याला आपल्या बगलेशीं धरून ऊब दिली असती व धर्मांतर केलेल्या प्रसिद्ध पुरुषांत त्याची गणनाही झाली असती. पण त्यानें तसें केलें नाहीं. दुसरा कोणताही धर्म न स्वीकारतां एकाकी राहूनच त्यानें आपलें पुढील जीवन व्यतीत करावयाचें ठरविलें.

हिब्रू धर्मग्रंथांत व वाङ्मयांत प्राविण्य संपादन करून आपला मुलगा नांव मिळवील, अशी आशा स्पिनोझाच्या बापाला वाटत होती; पण ती नष्ट झाल्यामुळें त्यानें त्याचा त्याग केला. पुढें बापाच्या मरणानंतर जी कांहीं थोडी इस्टेट त्याच्या मागें शिल्लक राहिली होती ती त्याच्या बहिणीनें लाटली आणि जुन्या मित्रांनीं तर त्याला सोडूनच दिलें. स्पिनोझावरील आपत्तींची आणखीही परमावधी व्हावयाची होती. एके दिवशीं रात्रीं स्पिनोझा रस्त्यावरून चालला असतां एका धर्मवेड्या तरुणानें पाठीमागून येऊन त्याच्या बरगडींत खंजीर खुपसून त्याला ठार मारण्याचा प्रयत्न केला. पण तो सफळ झाला नाहीं. स्पिनोझाच्या मानेवर फक्त थोडीशी जखम झाली. सत्याचें संशोधन करणाऱ्या माणसाला सुखानें राहतां येणें मुष्किलीचें आहे असा त्याला अनुभव आला. ॲमस्टरड्याममधील अगदीं एका बाजूच्या रस्त्या-

वरील घरांत त्यानें आपल्याकरितां जागा शोधून काढली व तेथें तो आपलें नांव बदलून राहूं लागला. स्पिनोझा नास्तिक आहे, असें या घरच्या मालक-मालकिणीला कळून आलें तरी या उदासवृत्तीच्या तरुणावर त्यांचें प्रेम बसलें. जवळच्याच एका शाळेंत शिक्षकाची नोकरी धरून व चष्म्याच्या काचा घांसून देऊन तो आपला उदरनिर्वाह करीत असे. ॲमस्टरड्याम येथे तो याप्रमाणें पांच वर्षें होता. पुढें या घरच्या मालकानें आपली ही जागा सोडून दिली व तो लीडन येथें राहावयास गेला. स्पिनोझाही त्याच्याबरोबर गेला. या नवीन घरात मात्र स्पिनोझाला जास्त एकान्त मिळूं लागला. कांहीं कांहीं प्रसंगीं तो दोन दोन, तीन तीन दिवस आपल्या खोलींतून बाहेरसुद्धां पडत नसे. त्याचें जेवण त्याच्या खोलीतच आणून द्यावें लागत होतें.

या पांच वर्षांत स्पिनोझानें "बौद्धिक सुधारणा" व "नीतिशास्त्राचें भूमितीच्या सिद्धांताप्रमाणें विवेचन" अशीं दोन पुस्तकें लिहिली. वरील पुस्तकांपैकीं दुसरें पुस्तक १६६५ मध्येंच लिहून संपलें होतें; पण पुढें दहा वर्षेंपर्यंत तें प्रकाशित करण्याचा त्यानें प्रयत्न केला नाहीं. स्पिनोझा-सारखींच मतें प्रसिद्ध केल्याबद्दल ॲड्रियन कोरबॅग नांवाच्या इसमास १० वर्षांची शिक्षा झाली होती आणि ही शिक्षा भोगीत असताना १८ महि-न्यांतच तो मरण पावला. १६७५ सालीं ॲमस्टरड्याम येथे जाऊन आपलें पुस्तक छापण्याचा त्यानें प्रयत्न केला; पण पुराणमताभिमानी लोक आपल्यावर या बाबतींत फिर्याद करणार आहेत, अशी बातमी समजल्याबरोबर स्पिनोझानें पुन्हा अनुकूल काल येईपर्यंत तें तसेंच अप्रकाशित ठेवण्याचें ठरविलें. "नीतिशास्त्र" हें स्पिनोझाचें पुस्तक त्याच्या मरणानंतर प्रसिद्ध झालें. कार्टीसियन रेने डेस्कार्टिस याच्या तत्त्वज्ञानासंबंधीं – 'तत्त्वज्ञानाचीं मूलतत्त्वे' व 'धर्म व राज्यसंस्था यावरील विचार' हीं स्पिनोझाचीं दोन्हीं पुस्तकें १६७० सालीं तो जिवंत असतांनाच पण निनांवी प्रसिद्ध झालीं. सरकारतर्फें त्याच्या प्रकाशनाला बंदी करण्यांत आल्यामुळें या पुस्तकांच्या खपाला एक प्रका-रची मदतच झाली. या पुस्तकांच्या वरील कव्हरावर वैद्यक ग्रंथाचें किंवा ऐतिहासिक कथांचें नांव छापून त्यांचा सर्वत्र प्रसार करण्यांत आला. या पुस्तकांविरुद्ध शेंकडों टीकाग्रंथ प्रसिद्ध झाले. पृथ्वीच्या पाठीवर आजवर

निर्माण झालेल्या नास्तिकांपैकीं अत्यंत धर्मभ्रष्ट नास्तिक म्हणून स्पिनो-झाचा निषेध या टीकाग्रंथांतून करण्यांत आला होता. यावेळीं अत्यंत कटु टीकांनीं भरलेलीं पत्रांवर पत्रें स्पिनोझाला आलीं. यांपैकीं काहीं पत्रांना त्यानें शांतपणानें उत्तरेंही दिलीं. स्पिनोझाला आलेलीं सर्व पत्रें केवळ अशा प्रकारचींच नव्हतीं. तत्वजिज्ञासेनें व शुद्ध मनानें तत्त्वचर्चा करण्याकरितां देखील इंग्लंडमधील रॉयल सोसायटीचा सेक्रेटरी हेन्री ओल्डेन्बर्ग, डच वैज्ञानिक हॉयजेन्स व प्रसिद्ध तत्त्ववेत्ता लिबनिझ यासारख्या पुष्कळ विद्वान् लोकांनीं व तत्त्ववेत्त्यांनींही त्याच्याशीं पत्रव्यवहार केला होता. लिबनिझनें १६७६ सालीं स्पिनोझाची प्रत्यक्ष भेटही घेतली. ॲमस्टरड्याम व इतर ठिकाणच्या त्याच्या कांहीं श्रीमंत मित्रांनीं आर्थिकदृष्ट्या मदत करण्याकरितां त्याला नियमित स्वरूपाच्या रकमा देऊं केल्या, पण त्यानें त्या सर्व नाकारल्या. "निसर्ग थोड्यावरच संतुष्ट असतो. निसर्गाचें थोडयावरच भागतें तर माझेंही तसेंच भागेल," असें त्यानें आपल्या मित्रांना कळविलें. १६६५ सालीं हूग्बर्ग व १६७० सालीं तो हेग येथे येऊन राहिला. स्पिनोझाला आता बरे दिवस आले होते. त्याला आतां एकाकी राहाण्याचे कष्ट सहन करावे लागत नव्हते व त्याला बऱ्याच प्रेमी मित्रांचा लाभही झाला होता. धर्मदृष्ट्या मात्र तो भ्रष्ट व बहिष्कृत गणला जात होता. तथापि १६७३ सालीं हेडेलबर्ग विद्यापीठातर्फे तत्त्वज्ञानाच्या प्रोफेसरची जागा त्याला देऊं कर-ण्यात आली. राजमान्य प्रस्थापित धर्माविरुद्ध असें कांहीं न बोलतां फक्त तत्त्वज्ञान या विषयावर अगदीं स्वतंत्रपणें त्यानें आपलीं मतें प्रतिपादन करावीं अशी विनंति ती जागा देऊं करतांना त्याला करण्यात आली. स्पिनो-झानें अर्थात्‌च ही विनंति नाकारली व शाळामास्तर होण्यापेक्षा एकांत-वासच आपल्याला जास्त प्रिय असल्याचें त्यानें या विद्यापीठाच्या चाल-कांना कळविलें.

१६७७ सालीं त्याची प्रकृति एकाएकीं बिघडली. 'क्षय' हा त्याच्या घराण्यांत चालत आलेलाच रोग होता. ऐन तारुण्याच्या दिवसांत त्याला जे एकांतवासाचे कष्ट सहन करावे लागले, शहरांतील एका भिकारड्या व धुळीनें व्यापलेल्या भागांत त्याला राहावें लागलें व पोटाकरितां कांचा घांसण्याचें काम त्यास करावें लागलें, या सर्वांचा त्याच्या प्रकृतीवर फारच

वाईट परिणाम झाला होता. त्याचीं फुफ्फुसें बिघडलीं होतीं व त्यामुळें श्वासोच्छ्वास करणेंही त्याला कष्टाचे वाटूं लागलें होतें. मरणाचें भय त्याला राहिलें नव्हतें. पण जीं पुस्तकें आपण प्रसिद्ध करूं शकलो नाहीं, त्याचीं हस्तलिखितें कोठें तरी गमावून जातील याचीच त्याला काळजी वाटत होती. आपण आतां जगत नाहीं, असें वाटल्यावर ही हस्तलिखितें आपल्या लिहिण्याच्या पेटींत ठेऊन त्यानें तिला कुलूप घातलें, त्याची किल्ली घरच्या मालकाच्या स्वाधीन केली व आपल्या एका विश्वासू प्रकाशक मित्राला ती पेटी देण्याबद्दल सांगितलें. ता. २९ फेब्रुवारी १६७७ रोजीं त्याच्या घराचा मालक आपल्या कुटुंबासह प्रार्थनामंदिरांत गेला असताना स्पिनोझाचा अंत झाला. बरेच तत्त्ववेत्ते, सरकारी अधिकारी व निरनिराळ्या धर्मपंथाचे सुप्रसिद्ध लोक स्मशानांत त्याचें शेवटचें दर्शन घेण्याकरिता आले होते.

हेगेल :— जॉर्ज विल्यम हेगेलचा जन्म १७७० त स्टूटगार्ट येथें झाला. त्याचें बाळपण स्टूटगार्ट येथेंच गेलें. टिबिनंजेन ( १७८८–९३ ) येथे त्यानें तत्त्वज्ञान व धर्म या विषयाचा अभ्यास केला. नंतर तो स्विट्झर्लंडमध्यें जाऊन राहिला. फ्रॅंकफर्ट येथेंही त्यानें कांहीं दिवस घालविले. या दोन्हीही ठिकाणीं त्यानें आपल्या आवडत्या विषयांचा अभ्यास चालविला होता. खासगी शिकवण्यावर तो या ठिकाणीं आपला उदरनिर्वाह करीत असे. १८०१ सालीं जेना येथें तो गेला व त्या ठिकाणींच कायमचें राहण्याचें त्यानें ठरविलें. १८०५ सालीं तेथील विद्यापीठात त्याला प्रोफेसराची जागा मिळाली. १८०६ मध्यें जेना येथें झालेल्या युद्धामुळें तेथून तो पळून गेला. १८०६ ते १८०८ हीं दोन वर्षें बॅंबर्ग येथें त्यानें संपादकाचें काम केलें. येथेंही त्याला बरें वाटलें नाहीं. येथून तो नेरेंबर्ग येथें गेला व १८०८ ते १८१५ पर्यंत तेथील एका व्यायामशाळेचा डायरेक्टर म्हणून राहिला. यानंतर हिडेलबर्ग येथील विद्यापीठांत तत्त्वज्ञानाच्या प्रोफेसराची जागा त्याला देण्यात आली. पुढें बर्लिन येथील विद्यापीठांतही याच कामावर तो रुजूं झाला.

हेगेल हा एक प्रसिद्ध आत्मवादी तत्त्ववेत्ता होता; तसाच एक विद्वान् तार्किक म्हणूनही त्याची प्रसिद्धी आहे. अखिल विश्वाच्या मुळाशी अव्यक्त आत्मसंकल्प असून विश्व म्हणजे विरोधविकासन्यायानें झालेला या संकल्पाचाच

विकास होय, हा हेगेलचा सिद्धांत होता. विरोधविकासवादाचा पुरस्कर्ता असल्यामुळें कलहप्रिय तत्त्ववेत्ता अशी हेगेलची ख्याति होती. सर्व ऐतिहासिक घटना विरोधविकासन्यायानेंच घडून येतात. परस्परविरोधी तत्त्वांचा व वर्गांचा आपसांतील कलह हाच इतिहासाचा आत्मा होय, असें त्याचें म्हणणें होतें. हेगेल तरुणपणीं जितका बुद्धिवादी व जहाल होता तितका तो म्हातारपणीं राहिला नाहीं. तरुणपणीं लोकसत्तेचा पुरस्कार करणारा हेगेल म्हातारपणीं प्रशियांतील एकतंत्री राजसत्तेचा पुरस्कार करूं लागला व राजा हें अव्यक्त आत्मतत्त्वाचेंच प्रकट स्वरूप आहे, असें सांगूं लागला. विरोधविकासवादाचा पुरस्कर्ता असलेला हेगेल स्वतःच या सिद्धांताचें उदाहरण होता. यामुळें त्याच्या शिष्यवर्गांत तरुण हेगेलियन व पुराणमतवादी हेगेलियन असे दोन पक्ष पडले. मोलेशॉट, फोरबॅक, बूर व मार्क्स वगैरे तरुण हेगेलियनांनीं त्याच्या बुद्धिवादात्मक तत्त्वज्ञानाचा पुरस्कार केला. मानवी समाजाचा इतिहास वर्गकलहांनीं भरला असून समाजसत्तावादाचीं तत्त्वें अंमलांत येणें अपरिहार्य आहे, असें ते प्रतिपादन करूं लागले व तरुण हेगेलच्या मतांचा आधार देऊन हेगेलची आपल्या या मतांना संमति आहे, असें ते सांगूं लागले.

हेगेल जसजसा म्हातारा होऊं लागला तसतसा तो जास्त जास्त विस्मरणशील व नादिष्ट झाला होता. एकदां तर एका पायांतच बूट चढवून कॉलेजच्या लेक्चररूममध्यें तो गेला होता. तरुणपणीं आपण जहाल मतें प्रतिपादन केल्याबद्दल त्याला केव्हां केव्हां वाईट वाटत असे व तसें तो लोकांपाशीं बोलूनही दाखवीत असे. १८३१ सालीं बर्लिन येथें सुरू झालेल्या कॉलऱ्याच्या सांथीला तो बळी पडला. मरणसमयीं त्याचे बरेच शिष्य त्याचा शेवटचा निरोप घेण्यासाठीं त्याच्या अंथरुणाभोंवतीं जमा झाले होते. काळजीनें काळवंडलेला आपल्या गुरूचा चेहरा अधिकच काळवंडलेला पाहून 'आपल्याला कसलें दुःख होत आहे,' असें एका शिष्यानें त्याला विचारलें व 'आपल्या मतांना चाहणारा व तीं मान्य असलेला केवढा तरी मोठा शिष्यवर्ग आपण आपल्या मागें ठेऊन जात आहां' या गोष्टीची त्यानें हेगेलला आठवण करून दिली. अत्यंत कष्टानें श्वास सोडून हेगेल म्हणाला, "माझ्या शिष्यांपैकीं एकालाही माझें म्हणणें काय आहे, हें

समजलेले नाहीं." किंचित् थांबून तो पुन्हां म्हणाला, "फक्त मिशलेटलाच काय तें माझें म्हणणें समजलें आहे." पुन्हां थोड्या वेळानें "नाहीं, त्यानें-सुद्धा माझें म्हणणें नीट समजून घेतलेलें नाहीं," असे उद्गार त्यानें काढले व त्याचें प्राणोत्क्रमण झालें.

बाकुनिन:— (१८१४ते१८७६) प्रसिद्ध रशियन शासनाभाव समाजवादी. ट्व्हर (टोजोक) येथें याचा जन्म झाला. पोलंडमधील रशियन सरकारच्या सैन्यात तो एक अधिकारी होता. परंतु झारशाही पसंत न पडल्यामुळें तिच्या निषेधार्थ त्या जागेचा त्यानें राजीनामा दिला. नंतर फ्रान्स, जर्मनी, स्विझर्लंड या देशामधून त्यानें प्रवास केला व तिकडेच आपलें राहाणें कायम केलें. रशियन सरकारनें त्यास स्वदेशीं परत येण्याचा हुकूम फर्माविला, परंतु त्यानें तो जुमानला नाही. त्यामुळें रशियन सरकारनें त्याची सर्व मालमत्ता जप्त केली. १८४९ मध्यें ड्रेसडेन येथें झालेल्या क्रांतीमध्यें भाग घेऊन क्रांतीनंतर प्रस्थापित झालेलें नवीन सरकार चालविण्याचा त्यानें प्रयत्न केला. पण तो निष्फळ ठरला. त्याला तेथें अटक करण्यात आली व रशियन सरकारच्या स्वाधीन करण्यांत आलें. रशियन सरकारनें त्यास सैबेरियांत हद्दपार केलें (१८५५). परंतु तेथून तो युरोपात पळून आला (१८६१). यापुढील काळात तो निःशासनसमाजवाद्याचा प्रमुख पुढारी म्हणून समजला जात असे. या चळवळीकरिता अंतर्राष्ट्रीय संघही त्यानें स्थापन केला. सत्य, परस्परविश्वास व ऐक्य हें फार तर १०।१२ लोकातच राहूं शकतें. बाकीच्या लोकांनीं आंधळेपणानें आज्ञा मानल्या पाहिजेत, असें त्याचें एक मत होतें. १८७० मध्यें त्यानें एक क्रांति घडवून आणण्याचा प्रयत्न केला, पण त्यात त्याला फारसें यश आले नाहीं. तरी १८७३ साली स्पेनमध्यें झालेल्या क्रांतीमध्यें याच्या पक्षाच्या लोकांनीं बराच पुढाकार घेतला होता व कांहीं गावेंही त्याच्या ताब्यांत आली होती. त्याचें वैयक्तिक वजन समाजांत फार होतें. याच्या राजकीय तत्वज्ञानाचा इटली, स्पेन व रशिया या देशामध्यें चांगला प्रसार झाला.

फॉरिअर:— (१७७२ ते १८३७). फ्रेंच समाजसत्तावादी लेखक. हा प्रथम लष्करात नोकरीस होता. परंतु प्रकृति चांगली नसल्यामुळें त्याची नोकरी गेली. नंतर दलालाचा व्यवसाय करून लायन्स येथें तो राहात असे.

अखिल विश्वांत सगळीकडे मूलतः ऐक्य नांदत आहे, परंतु व्यक्तिवैशिष्ट्य व चढाओढ यानीं या ऐक्याचा नाश केला असून सर्व समाजाची घडी बिघडली आहे. म्हणून सहकार्याचें तत्त्व अंमलांत आणल्यास हें सर्व सुधारेल, असें त्याचें मत होतें. आपल्या कल्पनेप्रमाणें त्यानें एक समाजरचना आंखली होती. ती अशीः— समाजाचे विभाग करावे. प्रत्येक विभागात १६०० माणसें असावींत. या सर्वांना राहाण्याकरितां एक इमारत असावी व त्यांना पिकविण्याकरितां पुरेशी जमीन तोडून दिलेली असावी. इमारतींची बांधणी एकाच नमुन्याची असावी. लोकांनीं मुख्य धंदा शेतीचा करावा. इतर समाजोपयोगी धंदे ज्याला जो आवडेल त्याप्रमाणें करण्याची सोय असावी. एका धंद्याचा कंटाळा आल्यास दुसरा करावा. खासगी मालमत्ता नाहींशी करण्याचें कांहींच कारण नाहीं. खासगी जीवनास यामध्यें पूर्णपणें वाव आहे. प्रत्येक इमारतींत प्रत्येक कुटुंबाकरितां स्वतंत्र बिऱ्हाडें असावींत. गरीब व श्रीमंत दोन्हींही कुटुंबें त्यांत राहातील. परंतु त्यांनीं मिळून मिसळून वागलें पाहिजे, म्हणजे भेदभावना तीव्र होणार नाहीं. या सर्व लोकांच्या एकंदर उत्पन्नापैकीं प्रत्येकाच्या जीवनास आवश्यक असणारा उत्पन्नाचा भाग आधीं बाजूस काढून मग उरलेल्या उत्पन्नाची वांटणी बुद्धि, भांडवल व श्रम यांच्या प्रमाणानुसार करावी. बुद्धीला $\frac{३}{१२}$ भांडवलाला $\frac{४}{१२}$ व श्रमाला $\frac{५}{१२}$ याप्रमाणें वांटणी व्हावी. या आपल्या कल्पनेप्रमाणें त्यानें प्रयत्न करून पाहाण्याचें ठरविलें होतें व एका ठिकाणीं सुरुवातही केली होती. त्याच्यानंतर त्याच्या अनुयायांनीं अमेरिकेंत अशा धर्तीचे समाज स्थापण्याचे प्रयत्न केले. मनुष्याच्या नैसर्गिक प्रवृत्तींचा पूर्ण विकास होण्यानेंच सुखप्राप्ति व सद्गुणांची वाढ होणार आहे, म्हणून त्यावर नियंत्रण घालणें इष्ट नाहीं. नैसर्गिक प्रवृत्तींचा विचार करून कामाची योजना केल्यास तें कंटाळवाणें न वाटतां आकर्षक होईल. समाजांतील स्वास्थ्य कायम राखावयाचें असल्यास विवाहसंस्था जरूर नष्ट झाली पाहिजे, असें त्याचें म्हणणें होतें.

**अर्न्स्ट हेकेल**–( १८३४ ते १९१९ ). प्रसिद्ध जर्मन जीवशास्त्रज्ञ व तत्त्वज्ञ. पोस्टडॅम येथें जन्म. पदार्थविज्ञानशास्त्र व वैद्यक यांचा अभ्यास यानें केलेला होता. हा जीवसृष्टीच्या उत्क्रांतीच्या सिद्धांताचा पुरस्कर्ता होता. 'मोनेरा'

साध्या केवळ जीवनरसाच्या जातीच्या जीवापासून निरनिराळ्या २६ अवस्थांनीं मानवापर्यंत जीवाची उत्क्रांति झाली आहे. सचेतनाचें व अचेतनाचें ऐक्य अवश्यंकरून आहे. रासायनिक व वास्तविक गुणांनीं युक्त अशा कार्बनच्या प्रोतसंयोगांनींच चलनक्रिया सुरू होते. प्रोतयुक्त असे कार्बनचे संयोग हेंच एक सर्व क्रियेचें मूळ कारण आहे. आत्म्याचें अमरत्व, इच्छास्वातंत्र्य व देव म्हणून कांहीं वस्तु आहे, ह्या गोष्टी त्यास मान्य नव्हत्या.

फिश्टे:—( १७६२ ते १८१४ ) जर्मन तत्त्वज्ञानी. कान्टचें व याचें बरेंच मतैक्य होतें. जेना येथें तत्त्वज्ञान विषयाचा तो प्रोफेसर होता. नीतिनियमांचें स्वरूप दैवी आहे. धर्मामध्यें विश्वातीत व अतींद्रिय असे एक तत्त्व आहे. जीवात्म्याचें व परमात्म्याचें ऐक्य असून परमात्मज्ञान हेंच मानवाचें ध्येय आहे, असें त्याचें मत होतें.

कान्ट:—( १७२४ ते १८०४ ) प्रसिद्ध जर्मन तत्त्वज्ञानी. कोनिग्सबर्ग येथें जन्म. कोनिग्सबर्ग येथें तर्कशास्त्र व अध्यात्मशास्त्र यांचा तो प्रोफेसर होता. तर्कप्रतिष्ठित धर्माचा पुरस्कर्ता असल्यामुळें त्यावेळच्या ख्रिश्चन धर्माभिमान्याशीं त्याचा थोडा विरोध उत्पन्न झाला होता. विश्वाच्या सर्व घडामोडींत कांहीं दैवी हेतु आहे, व विश्वातील ह्या दैवी वस्तूचें ज्ञान अंतःस्फूर्त असते. किंबहुना विश्वातील ह्या परमतत्त्वाचें जें अंतःस्फूर्त असें ज्ञान होतें त्यावरूनच त्याला कांहीं हेतु हा असलाच पाहिजे; धार्मिक नियम हे या उच्च तत्त्वांशी व परम श्रेयाशीं संबंध कसा ठेवावा, तें दाखवून देतात, अशीं त्याचीं मतें होतीं.

लॅसेल:—( १८२५ ते १८६४ ) जर्मन सोशियालिस्ट, ज्यू, ब्रेस्लॉ येथें जन्म. लहानपणींच यानें लोकशाहीच्या स्वातंत्र्याकरिता झगडावयाचें, असें ठरविलें होतें. 'यंग हेगेलियन' मंडळाचा तो सभासद होता. १८४८ च्या क्रांतीच्या बंडामध्यें सामील झाल्याबद्दल यास तुरुंगवासाची शिक्षा झाली होती. प्रशियन उदारमतवादी पक्ष व बिस्मार्क या दोघांनाहीं विरोध करणारा असा याचा राजकीय कार्यक्रम होता. जर्मन कामगारांचा एक पक्ष बनविण्याचा प्रयत्न करून, सार्वत्रिक मतदानाचा हक्क व समाजसत्तावादी सरकारची प्रस्थापना, अशा त्याच्या प्रमुख दोन मागण्या त्याने जाहीर केल्या. विशेषतः दुसऱ्या मागणीवर त्याचा भर होता. पहिली केवळ दुसऱ्याची साधनभूत म्हणून होती. अडीच वर्षे त्यानें कामगारांची संघटना

करून त्यांचा पक्ष स्थापण्याचा सारखा प्रयत्न केला. समाजसत्तात्मक राजकीय कार्यक्रम कामगारांच्या पुढें ठेऊन त्यांची संघटना करणारा व जर्मनीमध्यें त्यांचा पक्ष स्थापणारा हा पहिला सोशियालिस्ट होय.

फोरबॅक :—(१८०४ ते १८७२) जर्मन तत्त्वज्ञानी. हेगेलचा शिष्य. निसर्गात पुनः रुपांतर होणें या स्पिनोझानें प्रतिपादिलेल्या अमरत्वाचा पुरस्कर्ता. विश्वाचें, अनंतत्त्वाचें ज्ञान (ज्ञानाची जाणीव) म्हणजेच खरा धर्म; देव म्हणजे दुसरें तिसरें कांहीं नसून प्रेम आहे, असें त्याचें मत होतें.

एपिक्यूरस्:–(इ. स. पू. ३४१ ते २७०) ग्रीक तत्त्वज्ञानी. असत्मधून कांहींच निर्माण होऊं शकत नाहीं व असत्मध्यें कांहींच परिणत होत नाहीं; अणु व आकाश हीं दोन सनातन व अनंत अशीं तत्त्वें आहेत; आत्मा ही भौतिक वस्तु आहे; दोन निरनिराळ्या प्रकारचे अणूंचे संयोग शरीरामध्यें आहेत; सुख हेंच नीतीचें व धर्माचें ध्येय आहे; मनःशांतींतच खरें सुख आहे, अशीं त्याचीं मतें होतीं.

डिमोक्रायटस्:— (इ. स. पू. ४६० किंवा ४७० च्या सुमारास) ग्रीक भौतिक तत्त्वज्ञान्यांतील अग्रणी. सॉक्रेटिसचा समकालीन. गणित व वास्तवशास्त्र यांचा यानें चांगला अभ्यास केला होता. विश्व चालविण्यास कोणी देवता कारणीभूत आहेत, हें त्यास मान्य नव्हतें. आत्मा ज्याला म्हणतात ती एक भौतिक वस्तु आहे; तरी सर्व जगाचें नियमन करणारी कांहीं तरी सर्वशक्तिमान् अशी आत्मिक शक्ति असावी, असें तो मानीत असे.

बर्गसॉं:— (जन्म इ. स. १८५९) फ्रेंच तत्त्वज्ञानी. १९२७ सालचें वाङ्मयाबद्दलचें नोबल प्राइज यांस मिळालें होतें. हा हेतुगर्भ विकासवादी आहे. बदल, गति व अवधि हीं प्रमुख तत्त्वें आहेत; वस्तूंचें खरें स्वरूप अंतःप्रेरणेनेंच कळतें; मनुष्याच्या ठिकाणीं स्वतंत्र इच्छाशक्ति आहे, असें तो मानतो.

गिझट्:— (१७८७ ते १८७४) फ्रेंच मुत्सद्दी, राजकारणी व इतिहासकार. गिबन्सच्या रोमन साम्राज्याचें अधःपतन व नाश या पुस्तकाचें यानें भाषांतर केलें व याबद्दल त्याची सर्वत्र प्रसिद्धी झाली. सुरुवातीस न्यायमंत्र्याचा प्रमुख चिटणीस होता. पुढें मुख्य प्रधान झाला. अनियंत्रित राजसत्ता व लोकसत्ता यांमधील दुवा जुळविणारी अशी राज्यसत्ता असावी अशा

मताचा तो होता. उदारतेचें धोरण स्वीकारलें तरच राजसत्ता टिकणें शक्य आहे, असें तो १८ व्या लुईला सांगावयास गेला होता, पण त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. लोकांच्या मागण्यांचा विरोधी म्हणून त्याची ख्याति होती. पुढें हा लोकशाहीचा शत्रूच बनला. पुराणमतवादी पक्षाचा तो पुढारी होता. याची कारकीर्द म्हणजे फ्रान्समधील सनदशीर राजसत्तेच्या कालांतील शेवटची कारकीर्द होय व तिचा अंत त्यानें स्वतः पाहिला.

डांटे:—( १२६५ ते १३२१ ) प्रसिद्ध इटालियन कवी. फ्लोरेन्स येथें जन्म. राजकीय घडामोडीमध्येंही यानें बराच भाग घेतला होता. राजाच्या ईश्वरदत्त हक्काचा तो पुरस्कर्ता होता.

गटे:—(१७४९ ते १८३२) प्रसिद्ध जर्मन कवी. फ्रँकफोर्ट ऑन मेन येथें त्याचा जन्म झाला. फौस्ट या प्रसिद्ध नाटकाचा लेखक. याच्या काव्यांत भावनांचें व विचारांचें शब्दामध्यें हुबेहुब व जिवंत असें प्रतिबिंब दिसतें. गीतकाव्याबद्दल याची प्रसिद्धी आहे.

हीन:—( १७९७ ते १८५६ ) जर्मन कवी व वर्तमानपत्रकार. डुसेलडार्फ येथें याचा जन्म झाला. गीतकाव्यामध्यें यानें नवचैतन्य उत्पन्न केलें. तसेंच उच्च दर्जाचा वर्तमानपत्रलेखक, गद्यलेखक व विनोदी लेखक म्हणूनही याची प्रसिद्धी आहे.

डार्विन:—( १८०९ ते १८८२ ) प्रसिद्ध इंग्रज निसर्गशास्त्रज्ञ. श्रुसबरी येथें जन्म. उत्क्रांतिवादी. 'ओरिजिन ऑफ दी स्पिसीज' या प्रसिद्ध ग्रंथाचा लेखक. या ग्रंथात त्यानें जीवसृष्टीची कशी उत्क्रांति होत गेली, हें दाखविलें आहे.

जॉन स्टुअर्ट मिल:—( १८०६ ते १८७३ ) प्रसिद्ध इंग्रज अर्थशास्त्रज्ञ व तत्त्वज्ञ. उपयुक्ततावादाचा पुरस्कर्ता. रिकार्डो व मालथस यांचे अर्थशास्त्रविषयक सिद्धांत यास मान्य आहेत.

रॉबर्ट ओवेन:—( १७७१ ते १८५८ ) ब्रिटिश सोशियालिस्ट. न्यूटन येथें जन्म. मानवी अंतःकरणांतील शुद्ध भावनांवर विश्वास ठेवून प्रेमानें व सहकार्यानें वागल्यास समाजसत्तेची प्रस्थापना करतां येईल, अशी याची कल्पना होती.

प्राउधन:—( १८०९ ते १८६५ ) प्रसिद्ध फ्रेंच सोशियालिस्ट व

राजकीय विषयावरील लेखक. याचा जन्म अगदीं गरीब कुटुंबांत झाला. कोणत्याही शाळेंत न जातां स्वतःच तो सर्व शिकला. प्रथम तो कंपॉझिटर होता. पुढें तो प्रुफें वाचण्याचें काम करूं लागला. याचवेळीं त्यानें तत्त्वज्ञानाच्या अभ्यासास सुरवात केली. अराजक भाषणाबद्दल त्याला तीन वर्षें तुरुंगवासाची शिक्षा झाली होती. कांहीं नैतिक व सत्यतत्त्वांवर अर्थशास्त्राची उभारणी केली पाहिजे, असें त्याचें मत होतें. हीं तत्त्वें, समता, न्याय व स्वातंत्र्य हीं होत. समाजाचा विकास स्वतंत्रपणें होऊं दिल्यास शासनसंस्थेची गरजच भासणार नाहीं व अशा शासनाभावसमाजामध्यें परस्पर सहकार्यानें व एकोप्यानें सर्व व्यवहार चालतील, समाजाचा हा विकास कांहीं नैतिक अगर आध्यात्मिक तत्त्वांनुसार होईल, असें तो म्हणत असे. शासनाभावसमाजवादाचा युरोपमधील हा पहिला पुरस्कर्ता होय. याचें चारित्र्य अत्यंत निर्मल होतें.

सेन्ट सायमन— (१७६०–१८२५) प्रसिद्ध फ्रेंच समाजसत्तावादी. पॅरिस येथें याचा जन्म झाला. अमेरिकेच्या स्वातंत्र्ययुद्धामध्यें हा लढला. राजेलोकांच्या व जमीनदारांच्या हातांतील राजकीय सत्ता नष्ट होऊन ती उद्योगधंदेवाल्यांच्या हातांत आली पाहिजे, असें त्याचें मत होतें. समाजानें उत्पादनशक्तीची संघटना करावी. उपयुक्त माल निर्माण करणें हें समाजाचें ध्येय आहे. गरीबवर्गाचें जीवन सुधारेल अशीच समाजव्यवस्था असावी असें तो म्हणे. त्याचें तत्त्वज्ञान विशेष तर्कशुद्ध नसलें तरी फ्रेंच समाजसत्तावादाचा हा पहिला पुरस्कर्ता म्हणून प्रसिद्ध आहे. समाजामध्यें विरोध व सहकार्य हीं दोन्हीं तत्त्वें असतात. या तत्त्वांच्या कमीजास्तीपणावरूनच समाजाचें स्वरूप ठरतें व समाजाची कोठपर्यंत प्रगति झाली आहे, हें कळून येतें. विरोध नाहींसा होत जाऊन सहकार्य वाढत जातें. आज गरीब कामगारवर्गाचे श्रम लुबाडले जाऊं नयेत म्हणून उत्पादनसाधनांवर समाईक मालकी असली पाहिजे. वारसाहक्काचा कायदा रद्द करून टाकला पाहिजे. स्त्रियांना स्वातंत्र्य व समान हक्क असले पाहिजेत. नैतिक व आध्यात्मिक तत्त्वावर अधिष्ठित अशी सत्ता समाजावर प्रस्थापित झाली पाहिजे, अशीं त्याचीं मतें होतीं.

लिबनिझ:—( १६४६ ते १७१६ ) जर्मन तत्त्वज्ञानी, गणिती व राजकारणी. लैप्झिक येथें जन्म. शक्तीचीं वैयक्तिक केंद्रें अगर एकात्मे हें अखिल विश्वांतील परम तत्त्व आहे; परंतु अणूसारखे दृश्य अगर गोचर

स्वरूप त्यांस नाहीं. हीं केंद्रें अदृश्य व अगोचर अशीं आहेत. सर्व पदार्थ म्हणजे ह्या शक्तींचीं अगर शक्तिकेंद्रांचीं दृश्यस्वरूपें आहेत. प्रत्येक शक्तिकेंद्राच्या कमीजास्त हालचालीवरून केंद्रामध्यें भेद करण्यात येतो. प्रत्येक शक्तिकेंद्रामध्यें विश्वांतील इतर शक्तिकेंद्रेंही प्रतिबिंबित झालेलीं असतात. अशा रीतीनें विश्वामध्यें ऐक्यच आहे, असें तो म्हणतो.

शेलिंगः— ( १७७५ ते १८५४ ) जर्मन तत्त्वज्ञानी. फिश्टे व स्पिनोझा याच्या तत्त्वज्ञानाचा हा अभ्यासी होता. त्यांच्या तत्त्वज्ञानाचा समन्वय करण्याचा यानें प्रयत्न केला. प्रकृति व आत्मा अगर चैतन्यशक्ति हीं दोन्हीं पूर्ण व स्वतंत्र आहेत, परंतु एका परमात्म्याचे अगर अखिल विश्वात्म्याचे ते पूरक भाग आहेत, असें तो म्हणत असे.

शिलरः—(१७५९ ते १८०५) जर्मन कवी, नाटककार व तत्त्वज्ञानी.

डिडेरॉटः— ( १७१३ ते १७८४ ) फ्रेंच वाङ्मयसेवक आणि ज्ञानकोशकर्ता.

सेः— ( १७६७-१८३२ ) फ्रेंच अर्थशास्त्रज्ञ. वस्तूचें मूल्य तिच्या उपयुक्ततेवरून ठरतें, असें त्याचें मत होतें.

रिकार्डो— ( १७७२-१८२३ ) प्रसिद्ध इंग्रज अर्थशास्त्रज्ञ. लंडन येथें जन्म. स्टॉक एक्स्चेंजचा धंदा करीत असे. खंडाच्या उपपत्तीचा याचा सिद्धांत प्रसिद्ध आहे. लोकसंख्येचें प्रमाण व जमिनीचा मगदूर यांवरून खंड ठरत असतो; श्रमामुळेंच मालाला किंमत येते, असें याचें मत होतें. मजुरी कमी केली असताच नफा वाढवितां येतो; मजुरी आहे तशीच ठेवून इतर रीतीनें नफा वाढवितां येणें शक्य नाहीं, असें याचें मत होतें.

ॲडॅम स्मिथ— ( १७२३-१७९० ) प्रसिद्ध इंग्रज अर्थशास्त्रज्ञ. पदार्थांचें विनिमयमूल्य ठरविण्यास त्याकरितां करावे लागलेले श्रम, हेंच एक माप आहे. पदार्थांची खरी किंमत त्यावरूनच ठरते. आधुनिक यांत्रिक युगापूर्वी अशा रीतीनेंच पदार्थांची किंमत ठरत असे. परंतु सध्याच्या यांत्रिक युगात पदार्थांच्या किंमतीमध्यें मजुराच्या श्रमाचा मोबदला, कारखानदाराचा नफा व जमीनदाराचा खंड या तिहींचा अंतर्भाव होतो. मजुरी म्हणजे मजुराला त्याच्या श्रमाबद्दल मिळणारें बक्षीस होय. कच्चा माल गोळा करण्याची, माणसें कामावर लावण्याची, पक्का माल तयार

करण्याकरितां लागणारी यंत्रसामुग्री पुरविण्याची वगैरे क्रिया होत असतांनाच नफ्याची उत्पत्ति होत असते व हा नफा हीं कामें करणाऱ्या कारखानदाराला मिळतो. जमिनीवर ज्यावेळीं खासगी मालकी प्रस्थापित झाली त्यावेळीं खंडाची उत्पत्ति झाली व हा खंड जमीनदाराला मिळूं लागला, असे त्याचे सिद्धांत होते.

टर्जिनेव्ह—(१८१८–१८८३) प्रसिद्ध रशियन कादंबरीकार. यानें लिहिलेल्या लघुकथा प्रसिद्ध आहेत. याच रशियन लेखकाचे ग्रंथ युरोपमध्यें पहिल्यांदा वाचले गेले.

टॉलस्टॉय—(१८२८–१९१०) प्रसिद्ध रशियन कादंबरीकार, नाटककार, लघुकथालेखक व तत्त्वज्ञानी. अहिंसा व शासनाभाव यांचा हा पुरस्कर्ता होता.